म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२९८

६०

१२९८



# राष्ट्रपिता महात्मा गांधी

लेखक
नारायण रामकृष्ण अभ्यंकर

REFBK-0008912

कै. वीर वामनराव जोशी व श्री. ना. रा. अभ्यंकर ह्यांच्या 'राष्ट्रपिता महात्मा गांधी' या मूळ ग्रंथाच्या आधारें लिहिलेली संक्षिप्त पुस्तिका

# राष्ट्रपिता महात्मा गांधी

लेखक :
ना. रा. अभ्यंकर

मूल्य २॥ रुपये

REFBK-0008912

उषा प्रकाशन
१२६, मोरबाग रोड
मुंबई १४

प्रकाशक :
श्री. दत्तात्रेय राजाराम सामंत
बी. ए., एस्. टी. सी., बी. टी.
उषा प्रकाशन
१६२, मोरबाग रोड, मुंबई १४

प्रथम आवृत्ति १९६०

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :
श्री. वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव, मुंबई

# शुभाशीर्वाद

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचें चरित्र कै. वीर वामनराव जोशी व श्री. ना. रा. अभ्यंकर यांनीं पूर्वी लिहिलें होतें. त्याची संक्षिप्त आवृत्ति श्री. ना. रा. अभ्यंकर यांनीं नव्यानें तयार केली असून ती 'उषा प्रकाशन'नें प्रकाशित केली आहे. ही आवृत्ति संक्षिप्त असली तरी त्यांत महात्मा गांधींच्या चरित्रांतील सर्व मोठ्या घटनांचा समावेश झालेला आहे. जनतेला निष्काम कर्म करण्यास प्रवृत्त करण्यासाठीं गीतेचा जन्म झाला, असें गीतेचें सार असल्याचें महात्माजी सांगतात. भारतांतील जनतेला आधुनिक युगांत कर्मप्रवृत्त करण्याचे कामीं महात्मा गांधींनीं फार मोठी कामगिरी केली. आणि गुलामगिरीच्या जोखडाखालीं किंकर्तव्यमूढ बनलेल्या बहुजनसमाजाला त्यांनीं जागृत केलें हें आतां त्यांचे टीकाकारदेखील मान्य करतात. महात्मा गांधींनीं ज्या पार्श्वभूमीवर आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी दिली त्याचें समग्र स्वरूप लेखकानें व्यवस्थितपणें या ग्रंथांत दिलेलें आहे. हा ग्रंथ सर्वसाधारणपणें जिज्ञासूंना आवडेल असाच आहे.

मुंबई
१३ आश्विन १८८२

**यशवंतराव चव्हाण**
(मुख्य मंत्री–महाराष्ट्र राज्य)

महात्मा गांधींच्या चरित्राचा सारांश ह्या छोट्याशा पुस्तिकेंत श्री. अभ्यंकर यांनीं आणला आहे. ही छोटीशी पुस्तिका गांधींच्या जीवनविषयक सर्व गोष्टींचा व त्यांच्या जीवनविषयक सिद्धांतांचा सारांश देणारी आहे. कुठलीहि महत्त्वाची गोष्ट वगळलेली नाहीं व सर्व महत्त्वाचे दृष्टिकोन त्यांत आणले आहेत. गांधींसारख्या महान् विभूतीचें कार्य यथार्थ व यथाप्रमाण वर्णन करणें अशक्य. महात्माजींचें मन आकाशाएवढें विशाल, हिमालयाएवढें उंच व सागराएवढें गंभीर म्हणून समग्र वर्णन करणें कवीलाहि अशक्य. तथापि गंगेचें पाणी माणसानें आपल्या ओंजळींत घेतलें तरी तेवढ्याशा पाण्यांत सुद्धां गंगेचें पावित्र्य येतें. ही पुस्तिका अनेकांना प्रेरणा देणारी, मार्गदर्शन करणारी, उदासीन अवस्थेंत उत्साह निर्माण करणारी, पराभवांत पुनरुत्थानास आशा देणारी आहे यांत मला कांहींहि शंका वाटत नाहीं. गांधींचें जीवन म्हणजे एक आचरण-संहिता आहे. त्यांना निव्वळ वंदावयाचें नाहीं, त्यांची पूजा कृति-सुमनानें करावयाची आहे. हें करण्याचें प्रोत्साहन या पुस्तिकेनें मराठी वाचकांना लाभेल.

**न. वि. गाडगीळ**
पंजाबचे राज्यपाल

कै. वीर वामनराव जोशी व श्री. ना. रा. अभ्यंकर यांच्या "राष्ट्रपिता महात्मा गांधी" या मूळ ग्रंथाच्या आधारें तयार केलेली ही संक्षिप्त आवृत्ति प्रसिद्ध करून, लेखकानें बालसाहित्यांत निःसंशय भर टाकली आहे. "बापू" ह्या आवडत्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या जीवनचरित्राबद्दल कुतूहल असणें स्वाभाविक आहे. ही ज्ञानलालसा व जिज्ञासा या पुस्तकानें पूर्ण होईल असा मला भरंवसा वाटतो.

लेखकाच्या ह्या प्रयत्नाचें स्वागत करून विद्यार्थी-विद्यार्थिनी या पुस्तकाचा अवश्य फायदा घेतील अशी मी आशा व्यक्त करतों.

**स. का. पाटील**
अन्न व शेतकीमंत्री, भारत सरकार

# प्रकाशकाचें निवेदन

कै. वीर वामनराव जोशी व श्री. नारायण रामकृष्ण अभ्यंकर यांनीं लिहिलेल्या 'राष्ट्रपिता महात्मा गांधी' या ग्रंथावरून एक संक्षिप्त पुस्तिका तयार करण्याची मी श्री. ना. रा. अभ्यंकर यांस विनंती केली. त्यांनीं ती तयार करून प्रकाशनासाठीं माझ्या स्वाधीन केली. ही पुस्तिका शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांस वाचनासाठीं व शिक्षणसंस्थांनीं वा इतर संस्थांनीं बक्षिसरूपानें देण्यासाठीं अतिशय उपयोगी पडेल, अशी मला खात्री वाटते.

पुस्तकछपाईचें काम अत्यंत सुबक रीतीनें केल्याबद्दल मी मौज प्रिंटिंग ब्यूरोचे मालक भागवत बंधू यांचा अत्यंत आभारी आहें.

गांधीजयंती
ऑक्टोबर १९६०

**द. रा. सामंत**
बी. ए., एस्. टी. सी., बी. टी.
प्रकाशक

इंग्रजांच्या गुलामगिरींतून आपल्या मातृभूमीची मुक्तता करण्याकरितां हिंदी स्वातंत्र्यभक्तांनीं १८५७ सालीं निकराचा प्रयत्न केला. अशा प्रकारचा प्रयत्न यशस्वी झाल्यास त्याचें ‘स्वातंत्र्ययुद्ध’ अशा नांवानें संकीर्तन करावयाचें व अयशस्वी झाल्यास त्याच्यावर ‘बंड’ असा हिणकस छाप मारावयाचा, असा बहुतेक इतिहासकारांचा परिपाठ आहे. हिंदी स्वातंत्र्यभक्तांचा तो प्रयत्न फसला आणि त्याच्यावर बंडाचा शिक्का मारण्यांत आला. हिंदी जनता हवालदिल झाली. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याचा नुसता विचार डोक्यांत आणतांना सुद्धां हिंदी लोकांना भीतीनें कांपरें भरावें अशी परिस्थिति झाली. त्यानंतर एका तपानें म्हणजे—

ता. २ ऑक्टोबर १८६९ रोजीं मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म काठेवाडांतील पोरबंदर या शहरीं झाला. त्यांचे आजोबा उत्तमचंद हे पोरबंदरचे दिवाण होते. त्यांच्यानंतर मोहनदासाचे वडील करमचंद गांधी हेहि आपल्या वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्या हुद्द्यावर आले. हे दोघेहि पुरुष विलक्षण करारी बाण्याचे होते. मोहनदासाच्या आईचें नांव पुतळीबाई. ती करमचंदांची चवथी व शेवटची पत्नी. तिनें एक मुलगी व चार मुलगे अशा चार अपत्यांना जन्म दिला. रळिआत बेन, लक्ष्मीदास, करसनदास व मोहनदास. ती प्रवृत्तीनें अत्यंत

धार्मिक होती. ती आपली शपथ कधींहि मोडीत नसे. इतर कोणाहिपेक्षां आईचीच मोहनदासावर अधिक छाप पडत असे.

मोहनदास सात वर्षांचा असतांना त्याच्या वडिलांना पोरबंदरची नोकरी सोडून राजकोटला जावें लागलें. थोड्याच दिवसांत ते त्या संस्थानचे दिवाण झाले. मोहनदास तेथील प्राथमिक शाळेंत जाऊं लागला. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्याचा कस्तुरबाईशीं साखरपुडा झाला. करमचंद व कस्तुरबाईचे वडील गोकुळदास मकनजी हे जिवलग स्नेही. मोहनदास व कस्तुरबाई हीं वयानें जवळजवळ सारखींच होतीं. कस्तुरबाईनें शाळेचें तोंडहि पाहिलेलें नव्हतें.

मोहनदास आपल्या वयाच्या बाराव्या वर्षी राजकोटच्या आल्फ्रेड हायस्कुलांत जाऊं लागला. तेराव्या वर्षीं त्याचें कस्तुरबाईशीं लग्न झालें. या भानगडींत त्याचें शाळेचें एक वर्ष फुकट गेलें. पण त्यानंतर त्यानें एका वर्षांत दोन इयत्ता करून वेळेचें नुकसान भरून काढल. विद्यार्थी या नात्यानें तो फार हुषार होता असा मात्र याचा अर्थ नव्हे. तसेंच, घोकंपट्टीचा त्याला कंटाळा असल्यामुळें त्याचा संस्कृत हा विषय कांहींसा कच्चा राहिला. भूमितीमध्यें तर्कबुद्धीला वाव असल्यामुळें ती त्याला बरीच आवडत असे. आपली नीति बिघडूं नये याबद्दल तो अतिशय खबरदारी घेई. 'श्रावण पितृभक्ति' हें नाटक वाचल्यावर आपणहि श्रावणाप्रमाणें आपल्या आईवडिलांची सेवा करावी असें त्याला वाटूं लागल. 'हरिश्चंद्र' नाटक तर त्याला फारच आवडलें. सर्व लोकांनीं हरिश्चंद्रासारखें सत्यनिष्ठ कां होऊं नये, हा प्रश्न त्याच्या मनाला एकसारखा भंडावूं लागला.

तो कधीं खेळांत भाग घेत नसे त्याप्रमाणेंच व्यायामशाळेंतहि जात नसे. त्यावेळीं राजकोटवर सुधारणेचें वारें आलें होतें. साहेब लोक मांस खात असल्यामुळेंच इतके बळकट असतात व एवढ्या अफाट देशावर

राज्य करूं शकतात या भ्रमाला बळी पडून इतर सवंगड्यांसमवेत मोहनदासहि मांस खाऊं लागला. पण ही गोष्ट आपल्या आईवडिलांस समजल्यास त्यांना अतिशय वाईट वाटेल या जाणिवेनें त्यानें थोड्याच दिवसांनीं मांसाशन सोडलें. एका मित्रामुळें त्याला धूम्रपानाचेंहि व्यसन लागलें होतें. त्या व्यसनापायीं चोरी करण्याचा मोहहि मोहनदासाला आवरतां आला नाहीं. पण त्यानंतर त्याला पश्चात्ताप होऊन त्यानें आपली चूक आपल्या बापाजवळ कबूल केली आणि असलें पाप पुन्हा कधींहि न करण्याची शपथ घेतली.

आपल्या वडिलांच्या आजारीपणांत मोहनदासानें त्यांची सतत पांच वर्षे सेवा केली. तो सोळा वर्षांचा असतांना त्याचे वडील निवर्तले. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं कस्तुरबाईंनीं आपल्या पहिल्या अपत्यास जन्म दिला. पण तें अपत्य अल्पायुषी ठरल. १८८७ सालीं मोहनदास मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला.

त्यानंतर गांधी भावनगरच्या सामळदास कॉलेजांत जाऊं लागले. पण कॉलेजांतील अभ्यास त्यांना कठीण वाटूं लागल्यामुळें त्यांनीं कॉलेजला लौकरच रामराम ठोकला व ते घरीं येऊन बसले. त्यांना बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेला पाठविण्याचा बूट निघाला; पण तेथें गेल्यावर आपला मुलगा बिघडेल अशी त्यांच्या आईला भीति वाटूं लागली. शिवाय, पैशांची अडचण होतीच. पण गांधींच्या प्रेमळ भावानें पैशांची व्यवस्था करण्याचें अभिवचन दिलें. आपण विलायतेस गेल्यावर मद्य, मांस व स्त्रिया यांना स्पर्शहि करणार नाहीं अशी गांधींनीं शपथ घेतली. तेव्हां त्यांच्या आईनें त्यांस विलायतेस जाण्याची परवानगी दिली. त्यांच्या शाळेनें त्यांस निरोप देण्याचा समारंभ घडवून आणला असतांना गांधींना आभारप्रदर्शक दोन शब्दसुद्धां धडपणें बोलतां आले नाहींत.

या वेळीं त्यांचें नवें अपत्य कांहीं महिन्यांचें होतें. विलायतेला जाणारे गांधी हे त्यांच्या ज्ञातींतले पहिलेच गृहस्थ. त्या जातीच्या लोकांनीं आपली सभा भरविली आणि गांधींना जातीबाहेर हाकलून दिल्याचें जाहीर केलें. पण गांधींनीं विलायतेला जाण्याचा आपला बेत बदलला नाहीं.

१८८८ सालीं सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस गांधी साऊथँप्टनला पोहोंचले. प्रवासांत त्यांनीं मद्य आणि मांस यांस स्पर्शहि केला नाहीं. लंडनला गेल्यावर चारच दिवसांनीं एका स्वस्त अशा बोर्डिंग हाऊस-मध्यें ते राहायला गेले. त्यांना मांस तर खायचें नव्हतें आणि तेथील शाकाहारी पदार्थ अगदींच बेचव लागत. त्यामुळें त्यांची उपासमार होऊं लागली. अखेर शाकाहारी पदार्थ चांगल्या प्रकारचे मिळूं शकतील असें एक हॉटेल त्यांना सांपडलें. शाकाहाराचें महत्त्व पटवून देण्यासाठीं त्या हॉटेलच्या वतीनें कांहीं वाङ्मयहि प्रसिद्ध केलें जात असे. तेथें गेल्यावर गांधींनीं आहारासंबंधींचे निरनिराळे प्रयोग सुरू केले.

इंग्रजी समाजांत आपल्याला चांगली प्रतिष्ठा मिळावी म्हणून त्यांनीं चांगल्यापैकीं कपडे शिवून घेतले. तसेंच, नृत्य शिकण्यासहि प्रारंभ केला. पण नृत्याचे पांचसहा धडे शिकल्यावर, हें आपलें काम नव्हे अशी त्यांची खात्री पटली. व्हायोलिन शिकण्याचाहि असाच प्रकार झाला. मग हे ललित नाद सोडून ते फ्रेंच भाषा शिकूं लागले आणि त्याच-बरोबर वक्तृत्वकलेंतील धडेहि घेऊं लागले. पण तें सर्व चालू झाल्याबरोबर आपल्याला डुलक्या येऊं लागतात असा अनुभव आल्यामुळें त्यांनीं तोहि नाद सोडला आणि केवळ कायद्याच्या अभ्यासा-कडेच सारें लक्ष पुरविण्याचा त्यांनीं निश्चय केला.

ते पैन्‌पैचा हिशेब लिहून ठेवीत आणि आपल्या हातून जरासुद्धां वावगा खर्च होऊं नये अशी दक्षता घेत. थोड्याच दिवसांनीं आपल्या

जागेंत त्यांनीं एक पोटभाडेकरू ठेवला आणि आपलें जेवणहि आपल्या हातानें तयार करूं लागले. आतां त्यांचा आठवड्याचा खर्च अवघ्या सतरा शिलिंगांत भागूं लागला.

१८८९ सालच्या अखेरीस त्यांची दोन थिऑसॉफिस्ट लोकांशीं ओळख झाली. त्यांच्याबरोबर त्यांनीं गीता पहिल्यानें वाचली. याच लोकांमुळें निरनिराळ्या धर्मांच्या प्रवर्तकांचा जीवनवृत्तान्त वाचण्याची गोडी गांधींच्या मनांत उत्पन्न झाली.

बॅरिस्टरच्या अभ्यासासाठीं त्यांना 'इनर टेंपल'मध्यें प्रवेश मिळाला होता. ता. १० जून १८९१ रोजीं गांधी बॅरिस्टर झाले.

इंग्लंडमध्यें विचारस्वातंत्र्य होतें, भाषणस्वातंत्र्यहि होतें. तेथील तीन वर्षांच्या वास्तव्यांत या स्वतंत्र वातावरणाचा गांधींच्या जीवनावर फार परिणाम झाला. ते इंग्लंडमध्यें असतांना हिंदुस्थानांत कॉंग्रेसचीं दोन अधिवेशनें झालीं. १८८८ सालीं अलाहाबादला व १८८९ सालीं मुंबईला. या दोन्ही अधिवेशनांच्या अध्यक्षपदासाठीं दोन इंग्रज गृहस्थांची निवड करण्यांत आलेली होती. अलाहाबादला जॉर्ज यूल व मुंबईला सर वुइल्यम वेडरबर्न हे अध्यक्ष होते.

बॅ. गांधी १८९१ सालच्या जून महिन्यांत मुंबईला पोहोंचले. आल्याबरोबर आपल्या आईच्या मृत्यूची वार्ता त्यांना ऐकावी लागली. आपल्या वडील बंधूंबरोबर नाशिकला जाऊन त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें. तेव्हां त्यांच्या ज्ञातिबंधूंनीं त्यांच्यावरील बहिष्कार उठविला. राजकोटला आल्यापासून त्यांनीं आपल्या कुटुंबीयांच्या राहणींत इंग्रजी पद्धतीचा शिरकाव केल्यामुळें कुटुंबाचा खर्च भलताच वाढला. तेव्हां बॅरिस्टरीची प्रॅक्टिस करण्यासाठीं त्यांनीं मुंबईला जाण्याचें ठरविलें. त्यावेळीं त्यांचें वय अवघें बावीस वर्षांचें असून अनुभवाचें ज्ञान अजिबात नव्हतें. ते गिरगांवांत राहात व दररोज पायीं हायकोर्टांत जात. पण

मुंबईला यश मिळण्याचा रागरंग न दिसल्यामुळें ते राजकोटला परत गेले.

अर्जांचा वगैरे मसुदा तयार करण्यांत ते वाकबगार होते. राजकोटला परत आल्यापासून त्यांना दरमहा तीनशें रुपयांची प्राप्ति होऊं लागली. त्यांच्यावर एकदां ब्रिटिश पोलिटिकल एजंटला भेटण्याचा प्रसंग आला. इंग्लंडमध्यें असतांना गांधींची त्या साहेबाशीं थोडीशी ओळख झालेली होती. पण आतां हिंदुस्थानांत आल्यानंतर ते त्याला भेटायला गेले असतांना त्या साहेबानें त्यांना आपल्या चपराश्याकरवीं बाहेर हाकलून दिलें. गांधी त्या साहेबावर खटला भरणार होते पण त्यावेळीं कांहीं कामानिमित्तानें राजकोटला आलेले सर फिरोजशहा मेहता त्यांना म्हणाले, 'हिंदुस्थानांतील अनेक बॅरिस्टरांचा आणि वकिलांचा हा नित्याचा अनुभव आहे. ब्रिटिश अधिकारी हिंदी लोकांशीं कसे वागत असतात याचा तुम्हांला आज अनुभव आला. या देशांत तुम्हांला सुखानें जगायचें असेल तर असले अपमान गिळून टाकण्याची तुम्हांला संवय केली पाहिजे.' या असल्या वातावरणांत राहाणें गांधींना असह्य होऊं लागलें. पण याच सुमारास काठेवाडांतील दादा अब्दुल्ला आणि कंपनीचें दक्षिण आफ्रिकेंत कांहीं कायद्याचें काम निघालें. तेथील त्यांच्या वकिलाला मदत करण्यासाठीं त्या कंपनीनें गांधींना तिकडे पाठविण्याचें ठरविलें व गांधींनींहि ही योजना मान्य केली.

सन १८९३ च्या मे अखेर गांधी द. आफ्रिकेंतील दरबान या शहरीं पोहोंचले. आपल्या आईकडून मिळालेली तुळशीची माळ गांधींनीं आपल्या गळ्यांत घातली होती.

द. आफ्रिकेंतील हिंदी लोकांना अत्यंत क्षुद्रपणें वागविण्यांत येत असल्याचा गांधींना अनुभव आला. सन १८९०–९१ पासून सुमारें दीड लक्ष हिंदी लोक द. आफ्रिकेचे रहिवासी बनले होते. त्यांतील

बहुतेक लोक नाताळ ऊर्फ दरबानमध्यें राहात असत. या लोकांना तेथें 'असंस्कृत व जंगली' म्हणून हिणविण्यांत येत असे. खरें म्हटलें तर नाताळ सरकारनें विनंती केल्यावरूनच हिंदुस्थान सरकारनें त्याच्याशीं करार करून हे हिंदी लोक तिकडे पाठवून दिले होते. त्या हिंदी लोकांत एकजुटीचा अभाव असल्याचें पाहून गांधींना अतिशय वाईट वाटलें. पारशी कारकून स्वतःला पर्शियन म्हणवीत, मुसलमान व्यापारी स्वतःला अरब म्हणविण्यांत भूषण मानीत; पण उच्चवर्णीय हिंदूंची मात्र ना अरत्र ना परत्र अशी परिस्थिति होती. तरी पण या तिघांमध्यें थोड्या तरी प्रमाणांत खेळी-मेळीचें वातावरण होतें. परंतु चवथा जो मजुरांचा वर्ग होता तो संख्येनें सर्वांत मोठा असून त्याची स्थिति मात्र अत्यंत अनुकंपनीय अशी होती. धर्मानें त्यांपैकीं कांहीं हिंदू, कांहीं मुसलमान तर कांहीं ख्रिस्ती होते. इंग्रज लोक या सर्वांना 'हमाल' म्हणून हिणवीत असत; आणि हिंदी रहिवाशांपैकीं बहुसंख्य लोक मजूर असल्यामुळें साऱ्याच हिंदी लोकांना हमाल किंवा सामी म्हणण्याची प्रथा पडली होती. हिंदी व्यापाऱ्यांना सुद्धां हमाल व्यापारी असें म्हणण्यांत येत असे. गांधी हमाल बॅरिस्टर म्हणून ओळखले जाऊं लागले.

गांधी ज्या कामासाठीं आफ्रिकेंत आले होते त्या कामासाठीं त्यांना प्रिटोरिया येथें जावें लागलें. नाताळची राजधानी मारित्सबर्ग येथें आपल्या तिकिटाप्रमाणें गांधी आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्यांत जाऊन बसले. पण रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना त्यांच्या सामानासकट डब्याबाहेर फेकून दिलें. गांधींनीं रेल्वेच्या जनरल मॅनेजरकडे याबद्दल लेखी तक्रार केली पण त्यानें रेल्वे अधिकाऱ्यांचीच बाजू घेतली. पुढील प्रवासांतहि गांधींना अपमानास्पद असे अनुभव आले. जोहान्स-बर्गला गेल्यावर ते ग्रँड हॉटेलमध्यें उतरण्यास गेले पण त्यांना तेथें थारा

मिळाला नाहीं. तेव्हां ते आपल्या एका मुसलमान व्यापारी मित्राकडे उतरले. तो व्यापारी हसून म्हणाला, 'अशा ठिकाणीं फक्त आमच्या-सारखे लोकच राहूं शकतात. पैसा हें आमचें दैवत असल्यामुळें तो मिळविण्यासाठीं असल्या प्रकारचे कितीहि अपमान गिळण्याची आमच्या मनाची तयारी असते. हा देश तुमच्यासारख्या लोकांसाठीं नाहीं.'

प्रिटोरियाला गेल्यानंतर पहिल्याच आठवड्यांत गांधींनीं तेथील हिंदी रहिवाशांची सभा घेतली. सदर सभेस उपस्थित असलेल्या मेमन व्यापाऱ्यांना उद्देशून, व्यापारांत सुद्धां सत्यधर्माचें पालन केलें पाहिजे याबद्दल गांधींनीं विवेचन केलें. श्रोत्यांपैकीं बऱ्याच लोकांना इंग्रजी भाषा येत नसल्याचें समजल्यावरून त्यांनीं स्वतः त्यांस इंग्रजी शिकविण्याचें ठरविलें. त्यानंतर अशा प्रकारची सभा ते दर महिन्याला घेऊं लागले.

ऑरेंज फ्री स्टेटच्या १८१८ च्या कायद्याप्रमाणें हिंदी लोकांना कसल्याहि प्रकारचे राजकीय हक्क उरलेले नव्हते. त्यांना तेथें अगदीं हलक्यांतलीं हलकीं कामें करून राहावें लागत असे. ट्रान्सवालच्या हद्दींत पाऊल टाकतांना प्रत्येक हिंदी माणसाला तीन पौंड 'प्रवेश-कर' द्यावा लागे. त्याला कोणत्याहि प्रकारचा मताधिकार नसे. रात्रीं नऊ वाजल्यानंतर त्याला घराबाहेर पडणें असल्यास त्यासाठीं सरकारकडून परवाना मिळवावा लागे. गांधींना असा परवाना मिळालेला होता. पण तरीहि एका शिपायानें त्यांना लाथ मारून खालीं पाडलें. गांधींच्या एका इंग्रज मित्रानें सदर शिपायाविरुद्ध फिर्याद करण्याचा त्यांस सल्ला दिला. पण ते म्हणाले, 'कसल्याहि प्रकारच्या वैयक्तिक कारणासाठीं कोर्टाची पायरी न चढण्याची मीं शपथ घेतलेली आहे.' मात्र आलेल्या या अनुभवामुळें तेथील हिंदी लोकांची परिस्थिति कशी सुधारावी हा एकच विचार त्यांच्या मेंदूला एकसारखा सतावूं लागला.

ज्या कामासाठीं ते आफ्रिकेंत गेले होते त्यांत अनेक प्रकारच्या

गुंतागुंती होत्या. दादा अबदुल्लांची तय्यबशेटवरील फिर्याद चाळीस हजार पौंडांची होती. अखेरीस गांधींच्या सल्ल्यानुसार त्यांनीं लवादामार्फत आपला निकाल लावून घेतला.

सन १८९३ च्या अखेरीस गांधी हिंदुस्थानास परत येणार होते पण त्याच वेळीं नाताळ सरकार हिंदी लोकांचे तेथील नागरिकत्वाचे हक्क नष्ट करण्याचा घाट घालीत असल्याचें त्यांना समजलें. या कायद्यानंतर इतरहि अनेक अमानुष कायदे संमत करण्यांत येतील हें गांधींना स्पष्ट दिसत होतें. म्हणून त्यांनीं तेथील हिंदी लोकांना आपल्या हक्कांबाबत जागरूक राहाण्याचा इशारा दिला. त्या लोकांच्या आग्रहावरून तेथें एक महिना राहाण्याचें गांधींनीं मान्य केलें.

नाताळच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीकडे सादर करण्यासाठीं गांधींनीं त्याच रात्रीं एक अर्ज तयार केला. त्या वेळेपर्यंत हिंदी लोकांना युरोपियन लोकांच्या बरोबरीनें नागरिकत्वाचे अधिकार होते. कमींत कमी पन्नास पौंडांची स्थावर मिळकत असलेल्या व वर्षाकांठीं कमींत कमी दहा पौंड भाडें देत असलेल्या वयांत आलेल्या प्रत्येक ब्रिटिश प्रजाजनास मतदानाचा हक्क देण्यांत आलेला होता. अर्थात्, या कायद्याप्रमाणें मतदानाचा हक्क असणारे नाताळमध्यें फक्त अडीचशेंच हिंदी लोक होते. युरोपिअन मतदारांची संख्या जवळजवळ दहा हजार होती. आतां वर्णभेदाच्या सबबीखालीं हिंदी लोकांचा हा एवढासा अधिकारहि नाकारण्यांत येणार होता. गांधींच्या त्या अर्जाचा कांहीं उपयोग झाला नाहीं व कायदा संमत झाला.

यामुळें एक मोठा फायदा झाला तो हा कीं, आपण सर्व एक आहों ही जाणीव हिंदी लोकांत उत्कटत्वानें निर्माण झाली. गांधींनीं नाताळ सुप्रीम कोर्टांत काम करण्यासाठीं सनद मिळविली. पण आपल्या सार्व-जनिक कामांच्या पुढें वकिलीच्या कामाची त्यांस फारशी मातब्बरी वाटत

नसे. इंग्लंडच्या राणीनें आपल्या विशेष अधिकाराचा उपयोग करून नाताळमध्यें जारी झालेला हा कायदा रद्द करावा अशी तिला वसाहत-मंत्री लॉर्ड रिपन यांनीं विनंती करावी, यासाठीं दहा हजार हिंदी लोकांच्या सह्यांचा अर्ज तयार करून गांधींनीं तो त्यांच्याकडे पाठविला. पण त्या अर्जानें काम भागण्याचा रंग दिसेना. तेव्हां हिंदी लोकांच्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं एक कायमची संस्था असली पाहिजे असें गांधींना वाटूं लागलें. नाताळमध्यें ता. २२ मे १८९४ रोजीं स्थापन करण्यांत आलेल्या या संस्थेला 'नाताळ इंडियन कॉंग्रेस' असें नांव देण्यांत आलें. पहिल्याच महिन्यांत तिचे तीनशें सभासद झाले. इतक्यांत लॉर्ड रिपननें सदर कायदा रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याची वार्ता आल्यामुळें हिंदी लोकांचा उत्साह दुणावला. नाताळप्रमाणेंच ट्रान्सवाल व केपटाऊन येथेंहि इंडियन कॉंग्रेसची स्थापना करण्यांत आली. १८९६ सालच्या मध्याला आपल्या पत्नीला व मुलांना तिकडे घेऊन जाण्यासाठीं गांधी हिंदुस्थानांत यायला निघाले.

## २

द. आफ्रिकेंतील हिंदी लोकांची परिस्थिति हिंदुस्थानांतील हिंदी लोकांना समजावून देण्यासाठीं, हिंदुस्थानांत आल्याबरोबर त्यांनीं निरनिराळ्या पुढाऱ्यांस भेटण्याचें काम सुरू केलें. पुण्याला जाऊन त्यांनीं लो. टिळकांची भेट घेतली. लो. टिळकांनीं त्यांना सर्व प्रकारच्या साहाय्याचें आश्वासन दिलें. त्यानंतर गांधींनीं गोखल्यांची भेट घेतली.

गोखल्यांनीं त्यांचें अत्यंत प्रेमानें स्वागत केलें. या पहिल्याच भेटींत गांधींना गोखल्यांचें विलक्षण आकर्षण वाटूं लागलें.

१८९६ च्या नोव्हेंबरअखेर आपली पत्नी व दोन मुलगे यांच्यासह गांधी दक्षिण आफ्रिकेंत जाण्यासाठीं बोटींत बसले. आपल्या जिवाला कांहींतरी धोका असल्याची कुणकुण गांधींना लागली होती. बोट आफ्रिकेच्या किनाऱ्याला लागल्याबरोबर कस्तुरबाईंना व मुलांना त्यांनीं पुढें पाठवून दिलें. गांधी धक्क्यावर उतरल्याबरोबर गोऱ्या लोकांनीं त्यांना घेरलें आणि त्यांच्यावर दगड व अंडीं यांचा मारा सुरू झाला. कित्येकांनीं त्यांना लाथाबुक्क्यांनीं तुडविण्यास सुरुवात केली. अखेर तेथील पोलीस सुपरिंटेंडेंटची पत्नी त्या बाजूनें चालली असतांना तिनें हा प्रकार पाहिला व पोलीसांच्या साहाय्यानें तिनें गांधींना सोडविलें. त्या वेळचे वसाहतमंत्री जोसेफ चेंबर्लेन यांनीं, गांधींना ज्यांनीं मारहाण केली असेल त्यांना ताबडतोब गिरफदार करण्यांत यावें असा नाताळ सरकारला हुकूम सोडला. पण गांधी म्हणाले, 'कोणालाहि अटक करण्यांत यावी असें मला वाटत नाहीं. हिंदुस्थानांत जाऊन मी येथील गोऱ्या लोकांची खोटी बदनामी केली असा इकडील कांहीं लोकांचा समज झाला आहे. कोणाला दोष द्यायचाच असेल तर ज्यांनीं त्यांचा हा गैरसमज करून दिला त्यांनाच तो दिला पाहिजे. खरी हकीकत समजल्यानंतर मला मारहाण करणाऱ्या लोकांना पश्चात्ताप झाल्याशिवाय राहाणार नाहीं.' गांधी पूर्णपणें निर्दोषी असल्याबद्दल नाताळच्या वृत्तपत्रांनीं ग्वाही दिली व तीनचार दिवसांनंतर एकंदर वातावरण निवळलें.

हिंदी व्यापाऱ्यांना विघातक व द. आफ्रिकेंत वस्ती करणाऱ्या लोकांना जाचक असे दोन कायदे नाताळ लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत संमत झाले. ते कायदे संमत होऊं नयेत म्हणून गांधींनीं घेतलेले सारे परिश्रम वायां गेले. अलीकडे कांहीं दिवस गांधींनीं आपल्या वागणुकींत

शक्य तितका साधेपणा आणला होता. ते आपले कपडे स्वतः धुवीत. आपले केसहि ते स्वतः कापूं लागले. आपल्या हातून प्रत्यक्ष अशी कांहीं तरी सेवा घडावी अशा प्रकारची तळमळ त्यांना अलीकडे लागून राहिलेली असे. एकदां एक महारोगी त्यांच्या दाराशीं आला असतांना त्यांनीं त्याला आसरा दिला, त्याच्या जखमांना उपचार केला व जातीनें त्याची शुश्रूषा करूं लागले. द. आफ्रिकेंत राहात असतांना त्यांना आणखी दोन मुलगे झाले. त्यानंतर आपल्याला अधिक मुलें होऊं नयेत म्हणून ते आत्मसंयमनाचा सराव करूं लागले.

ता. १० ऑक्टोबर १८९९ रोजीं बोअर युद्ध सुरू झालें. गांधींना बोअर लोकांविषयीं सहानुभूति वाटत होती. पण ज्याअर्थीं आपण ब्रिटिश प्रजाजन या नात्यानें आपल्या हक्कांसाठीं भांडतों त्याअर्थीं युद्धप्रसंगीं ब्रिटिश साम्राज्यशाहीला मदत करणें हें आपलें कर्तव्यच होय अशी त्यांची विचारसरणी होती. त्यांनीं अकराशें हिंदी लोकांचें एक शुश्रूषापथक उभारलें. पहिल्यानें ही मदत स्वीकारण्यास ब्रिटिश लोक तयार होईनात. पण युद्धांत जसजसा त्यांचा पाय मागें येऊं लागला तसतशी त्यांना सर्व प्रकारच्या साहाय्याची गरज भासूं लागली. गांधींनीं देऊं केलेली मदत १८९९ च्या अखेरीस स्वीकारण्यांत आली. या पथकाला लागणारे कपडे व इतर सामग्री हिंदी व्यापाऱ्यांनीं पुरविली होती. १९०० सालच्या फेब्रुवारी महिन्यांत इंग्रजांना महत्त्वाचे असे विजय मिळाल्यावर या पथकाला मोकळें करण्यांत आलें. या शुश्रूषापथकाची सर्वांनीं एकमुखानें प्रशंसा केली होती. गांधींना एक पदक देऊन त्यांना गौरविण्यांत आलें.

द. आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या विनंतीवरून गांधी तेथें फक्त एक महिना राहाणार होते पण आतां सहा वर्षांनंतरहि ते तेथेंच होते. त्यांना आतां हिंदुस्थानाची ओढ लागली होती. पण हिंदुस्थानला

येण्यासाठीं निघतांना, तितकीच गरज भासली तर आपण पुन्हा इथें येऊं असें गांधींनीं तेथील हिंदी लोकांना आश्वासन दिलें.

हिंदुस्थानांत आल्यावर त्या वर्षीं कलकत्त्यास भरणाऱ्या कॉंग्रेस अधिवेशनाला ते उपस्थित राहिले. कॉंग्रेसच्या त्या वेळच्या अधिकाऱ्यांनीं त्यांच्यावर सोंपविलेलें लिहिण्यासवरण्याचें काम तर त्यांनीं उत्तम प्रकारें केलेंच पण झाडलोट करण्याचें व शौचकूप वगैरे साफ करण्याचें कामहि त्यांनीं अंगावर घेतलें. या कामीं त्यांना एकाहि स्वयंसेवकानें मदत केली नाहीं.

हिंदी जनतेचीं सुखदु:खें समजावून घेण्याच्या दृष्टीनें गांधींनीं सर्व हिंदुस्थानचा प्रवास रेल्वेच्या तिसऱ्या वर्गानें करावयाचें ठरविलें. हा प्रवास आटोपून १९०२ सालच्या मध्याच्या सुमारास ते मुंबईला येऊन राहिले. गोखले आठवड्यांतून दोनतीनदां गांधींच्या ऑफिसांत जाऊन त्यांना भेटत असत. एक दिवस गांधींना दक्षिण आफ्रिकेंतून तार आली—'चेंबर्लेन येथें येणार आहेत—तुम्ही इकडे ताबडतोब निघून यावें.' द. आफ्रिकेला जाण्यासाठीं १९०२ सालच्या डिसेंबर महिन्यांत गांधींनीं हिंदुस्थानचा किनारा सोडला.

बोअर युद्धापूर्वीं कोणीहि हिंदी मनुष्य केव्हांहि ट्रान्सवालमध्यें जाऊं शकत असे, पण आतां मात्र त्याला त्यासाठीं परवानगी मिळवावी लागे. गांधींनीं चेंबर्लेनची भेट घेतली. पण चेंबर्लेन त्यांना म्हणाले, 'स्वायत्तता देण्यांत आलेल्या वसाहतींच्या कारभारावर साम्राज्य सरकारचें फारसें नियंत्रण असूं शकत नाहीं.'

गांधींनीं वकिली करण्याची परवानगी मिळविली व ते जोहान्सबर्गला जाऊन राहिले. हिंदुस्थानांतील आपल्या वडील बंधूंना त्यांनीं कळविलें कीं, 'माझ्याजवळ शिल्लक राहात असलेला सर्व पैसा मी आतांपर्यंत तुम्हांला देत होतों. पण यापुढें जर माझ्याजवळ कांहीं शिल्लक राहिलेंच

तर त्यांतील कांहींहि तुम्हांला न देतां त्या सर्व रकमेचा विनियोग मी सार्वजनिक कामासाठीं करीन.'

मजुरांनीं मळ्यावर काम करून फुरसतीच्या वेळीं छापखान्यांत काम करावें अशी योजना आंखून 'इंडियन ओपीनिअन' हें पत्र चालविण्याचें गांधींनीं ठरविलें. दरबानपासून थोड्याच अंतरावर त्यांनीं 'फीनिक्स' नांवाची नवीन वसाहत स्थापन करून आपल्या सर्व मंडळीला तेथें आणून ठेवलें. 'इंडियन ओपीनिअन'हि दरबानहून फीनिक्सला आणलें. पूर्वीं या पत्राच्या इंग्रजी, तामीळ, गुजराथी व हिंदी अशा चार भाषेंत आवृत्त्या निघत. आतां हें साप्ताहिक फक्त इंग्रजी व गुजराथी या दोनच भाषांत काढण्यांत येऊं लागलें. 'राजे एडवर्ड यांच्या युरोपिअन व हिंदी प्रजाजनांना एकमेकांच्या अधिक जवळ आणणें, लोकमताला इष्ट असें वळण लावणें, हिंदी लोकांना त्यांच्यांतील दोष समजावून सांगणें व आपले न्याय्य हक्क प्रस्थापित करण्याच्या कामीं त्यांना मार्गदर्शन करणें' हें या पत्राचें उद्दिष्ट होतें. हा वेळपर्यंत गांधींची उत्कृष्ट वकील म्हणून ख्याति झालेली होती. उलटतपासणीच्या बाबतींत तर त्यांचा हातखण्डाच होता. कोणत्याहि खोट्या साक्षीदाराचा त्यांच्यापुढें निभाव लागणें अशक्य असे. आपल्या अशिलांच्या बाबतींत त्यांचें धोरण अतिशय न्यायनिष्ठुर असे. 'तूं थोडाहि अप्रामाणिकपणा केल्याचें मला दिसून आल्यास मी तुझें वकीलपत्र भिरकावून देईन' असें ते आपल्या अशिलाला स्पष्टपणें सांगत.

आपल्या वकिलीच्या धंद्यांत त्यांना या सुमारास दरमहा तीनशें पौंड मिळत असत. अशील गरीब असला तर ते त्याच्याकडून फार थोडे पैसे घेत–अगदींच गरीब असला तर त्याचें काम फुकटहि करीत. एखाद्या अशिलानें त्यांचे पैसे बुडविले तरी ते त्याच्यावर कायदेशीर इलाज करीत नसत. आतां त्यांचे तीन मुलगे मणिलाल, रामदास व देवदास

अनुक्रमें दहा, आठ व पांच वर्षांचे होते. गांधींच्या कुटुंबांतील सर्व माणसें सकाळीं साडेसहा वाजतां दळायला बसत असत. त्यांच्या राहत्या घरापासून त्यांच्या ऑफिसची जागा सहा मैल दूर होती. कांहीं दिवस सायकल वापरल्यानंतर मग ते पायींच जाऊं लागले. आपल्या मुलांना शाळेंत न घालतां ते त्यांना आपल्याबरोबर ऑफिसांत नेत व जातांना आणि येतांना त्यांना निरनिराळे विषय गुजराथींतून शिकवीत. गांधींच्या घरांत इंग्रजी भाषा बोलणारे कांहीं लोक राहात असल्यामुळें त्या मुलांना इंग्रजी भाषा आपोआपच येऊं लागली.

१९०६ सालीं झुलु बंड उद्भवलें. गांधींनीं शुश्रूषापथक उभारलें. या बंडाच्या निमित्तानें गांधींना एक नवीन प्रचीति आली. गोरे लोक रागानें बेफाम झाल्यावर काळ्या लोकांवर किती अमानुष जुलूम करतात याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव आला. गांधींच्या पथकानें सहा आठवडे काम केल्यानंतर या बंडाचा बीमोड झाला. झुलुलंडच्या टेंकड्यांवरून व दऱ्याखोऱ्यांतून हिंडतांना गांधींच्या मनांत दोन विचार पक्के ठसले. ज्याला आपलें जीवन सेवेला वाहून घ्यावयाचें असेल त्यानें ब्रह्मचर्याचें पालन केलें पाहिजे व स्वखुषीनें दारिद्र्य पत्करलें पाहिजे हे ते दोन विचार होत. फीनिक्स वसाहतींत परत आल्याबरोबर आपण ब्रह्मचर्यव्रताचा अंगिकार केला असल्याचें त्यांनीं कस्तुरबाईंना सांगितलें व नंतर लगेच ते जोहान्सबर्गला निघून गेले.

१९०६ सालच्या ऑगस्ट महिन्यांत ट्रान्सवाल सरकारनें एक नवा कायदा जारी केला. आठ किंवा अधिक वर्षें वयाच्या प्रत्येक हिंदी माणसानें, अरबानें व तुर्कानें आपलें नांव सरकारांत नोंदवून त्याबद्दलचा दाखला जवळ बाळगला पाहिजे हा तो कायदा होय. असें करतांना त्या माणसाला आपल्या शरिरावरील जन्मखुणा नमूद करून हाताचा आंगठाहि द्यावा लागणार होता. एका विशिष्ट तारखेच्या आंत याप्रमाणें

न करणारांस नागरिकत्वाचा हक्क गमावावा लागून तो दंड व शिक्षा यांनाहि पात्र ठरणार होता. सदर कायद्याला विरोध करण्याचा गांधींनीं निश्चय केला. त्यासाठीं जी चळवळ उभारावयाची तिला त्यांनीं सविनय प्रतिकार असें नांव दिलें. गांधींनीं सरकारशीं रदबदली केल्यावर या कायद्यांतून फक्त स्त्रियांना सूट मिळाली. गांधी हिंदी लोकांचें एक शिष्टमंडळ घेऊन इंग्लंडला गेले.

१९०६ सालीं हिंदी कॉंग्रेसचें अधिवेशन कलकत्ता येथें झालें. सदर अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनीं आपल्या भाषणांत 'स्वराज्य' हा शब्द उच्चारतांच सर्व लोकांच्या अंगांत जणुं कांहीं विजेचा संचार झाला आणि 'स्वराज्य' अशी गर्जना करून सर्व लोक उठून उभे राहिले. 'स्वराज्य' हा शब्द प्रथम उच्चारणारे दादाभाईच होत.

गांधींच्या प्रयत्नांना यश आलें नाहीं. गांधींचे स्वयंसेवक नोंदणी-विरुद्ध घरोघरीं जाऊन प्रचार करूं लागले. 'इंडियन ओपीनिअन'-मधील जाहिराती गांधींनीं बंद करून टाकल्या व तें पत्र आणि छापखाना याच कामाला वाहून टाकला. नंतर त्यांनीं आपल्या चळवळीला सविनय प्रतिकाराऐवजीं 'सत्याग्रह' हें नांव दिलें. गांधींना दोन महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. शिक्षा भोगून आल्यावर गांधींनीं चहा पिण्याचें वर्ज्य केलें व दिवस मावळल्यानंतर अन्नग्रहण करावयाचें नाहीं असें बंधन स्वतःवर लादून घेतलें. थोड्याच दिवसांत, बहुसंख्य हिंदी लोकांनीं आपलीं नांवें स्वखुषीनें नोंदवून घेतलीं तर हा काळा कायदा थोड्याच दिवसांत रद्द करण्यांत येईल असें तेथील सरकारनें गांधींना आश्वासन दिलें. या कायद्याच्या कांहीं कलमांत गांधींनीं ज्या दुरुस्त्या सुचविल्या त्यांनाहि मान्यता देण्यांत आली. तेव्हां आपलीं नांवें स्व-खुषीनें नोंदवून घेणें हें आतां हिंदी लोकांचें कर्तव्य झालें असल्याचें गांधींनीं त्यांना पटवून दिलें.

पण गांधींनीं लांच खाऊन ही तडजोड केली अशी कांहीं लोकांना शंका आली. गांधी आपलें नांव नोंदण्यासाठीं नोंदणी ऑफिसांत गेल्याबरोबर एका पठाणानें आपल्या हातांतील सोटा गांधींच्या डोक्यावर हाणला. गांधींच्या तोंडून फक्त ‘हे राम’ एवढे शब्द बाहेर पडले आणि ते मूर्छित होऊन खालीं पडले. नंतर त्या पठाणाच्या सोबत्यांनीं गांधींना लाथाबुक्क्या मारण्यास सुरुवात केली. सदर पठाणांना पोलिसांनीं पकडल. त्या पठाणांना सरकारनें क्षमा करावी म्हणून गांधींनीं रदबदली केली पण तिकडे लक्ष न देतां सरकारनें त्यांस सक्तमजुरीची शिक्षा दिली. दोन महिन्यांनीं, प्रकृति सुधारल्यानंतर, अमूक दिवसांच्या आंत सदर काळा कायदा रद्द करण्यांत येणार असल्याचें सरकारनें आश्वासन दिलें पाहिजे अशी गांधींनीं मागणी केली. पण ती अमान्य करण्यांत आली. तेव्हां गांधींच्या आदेशाप्रमाणें ता. २३ जुलै १९०८ रोजीं ट्रान्सवालमधील सर्व हिंदी व्यापाऱ्यांनीं हरताळ पाळला. गांधींनीं पाडलेला हा पहिला हरताळ होय. नंतर नोंदणीदाखल्यांची होळी करण्यासाठीं गांधींनीं हिंदी लोकांची प्रचंड सभा जोहान्सबर्ग येथें भरविली. तो पठाण मारेकरी या सभेला उपस्थित होता. त्यानें व्यासपीठावर जाऊन आपला पश्चात्ताप प्रकट केला. नंतर कायदेभंग करून तुरुंगांत जाण्याची चळवळ गांधींनीं सुरू केली. तेव्हां गांधींना दोन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली. त्यानंतर १९०९ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत, आपलें नांव नोंदण्याचा कायदा न पाळल्याबद्दल त्यांना तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली.

# ३

तुरुंगांतून सुटल्यानंतर हिंदी लोकांचें एक शिष्टमंडळ घेऊन गांधी इंग्लंडला गेले. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेथून परत येतांना, प्रवासांत, त्यांनीं 'हिंद स्वराज्य' हें आपलें गुजराथी भाषेंतील पुस्तक तयार केलें. या पुस्तकांत द्वेषाच्या ऐवजीं प्रेम, अत्याचारांच्या ऐवजीं स्वार्थत्याग आणि ऐहिक सामर्थ्याऐवजीं आत्मिक सामर्थ्यावर भर देण्यांत आलेला होता. ध्येय आणि साधनें यांचा विचार करतांना सदर पुस्तकांत असें म्हटलें होतें कीं, वृक्ष आणि बीं यांचा जो अन्योन्य संबंध आहे तोच ध्येय आणि साधनें यांचाहि आहे. ईश्वराच्या पूजनापासून प्राप्त होणारें सुख सैतानाची पूजा करून लाभणें अशक्य आहे. सैतानाच्या द्वारां कोणी परमेश्वराचें पूजन करूं पाहील तर तो त्याचा वेडेपणाच ठरेल. आपण पेरावें तसेंच उगवतें हा नियम कोणीहि विसरूं नये. हिंदुस्थानांतील आपल्या एका मित्राला पाठविलेल्या पत्रांत त्यांनीं म्हटलें होतें, 'हिंदी लोकांना जें स्वातंत्र्य पाहिजे आहे तें त्यांना दुसऱ्यांचे खून पाडून किंवा अत्याचारी कृत्यें करून मिळणार नसून स्वतःच्या चुका दुरुस्त करूनच मिळणार आहे. आपण असें वागल्यानें इंग्रज लोक आपले राज्यकर्ते न ठरतां आपले नोकर ठरणार आहेत.' गांधींचें 'हिंद स्वराज्य' हें पुस्तक लौकरच मुंबई सरकारनें जप्त केलें.

हिंदुस्थानांतील कॉंग्रेस अधिवेशनांत द. आफ्रिकेसंबंधानें ठराव मांडतांना ना० गोखले म्हणाले, 'द. अफ्रिकेंतील हिंदी लोकांवर होत असलेला अन्याय दूर करून घेण्यासाठीं गांधींनीं केलेल कार्य अमर आहे. त्यांच्या नांवाचा उच्चार होतांच, वर्तमान किंवा भविष्यकाळीं

प्रत्येक हिंदी माणसाचें मस्तक आदरानें नम्र होईल आणि त्याची छाती अभिमानानें फुगून येईल यांत मला यत्किंचितहि शंका वाटत नाहीं. मी तुम्हांला छातीठोकपणें असें सांगूं शकतों कीं, गांधींपेक्षां अधिक पवित्र, अधिक उमदा, अधिक शूर आणि आत्मिक सामर्थ्यानें अधिक संपन्न असलेला मनुष्य या क्षणापर्यंत जन्मास आलेला नाहीं. गांधी हे पुरुषांतील पुरुषोत्तम आहेत, शूरांतील शूर आहेत, देशभक्तांचे देशभक्त आहेत. हिंदी मानवतेचें ते मूर्तिमंत प्रतीक आहेत असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.'

वकिलीच्या कामांत आतां गांधींना वर्षाकांठीं पांचसहा हजार पौंड सहज मिळत असत. त्यांतील बहुतेक पैसे ते सार्वजनिक कामासाठीं खर्च करीत. पण १९१० सालापासून त्यांनीं वकिलीचा धंदा बंद केला.

गांधींच्या आग्रहावरून १९११ सालीं गोखले द. आफ्रिकेस गेले. द. आफ्रिकन सरकारच्या मंत्र्यांशीं त्यांची मुलाखत झाली. काळा कायदा लौकरच रद्द करण्यांत येणार असल्याचें त्यांनीं आश्वासन मिळविल्यावर ते हिंदुस्थानला परत गेले. पण प्रत्यक्ष अनुभव मात्र असा कीं द. आफ्रिकन सरकारनें त्या काळ्या कायद्याहूनहि अधिक जाचक असें बिल आणावयाचें ठरविलें व गांधींनीं त्याविरुद्ध पुन्हा सत्याग्रह आरंभिला. कस्तुरबाईनीं त्यांत भाग घेतला व त्याबद्दल त्यांना सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली. गांधींच्या आदेशावरून मजूरहि संपावर जाऊं लागले. गांधींनीं प्रचण्ड मोर्चा काढण्याचें ठरविलें. या मोर्चांत २०३७ पुरुष, १२७ स्त्रिया व ५७ मुलें यांनीं भाग घेतला होता. गांधींना नऊ महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली.

तुरुंगांतून सुटल्यानंतर द. आफ्रिकेचे जनरल स्मट्स् यांनीं गांधींशीं तडजोड केली. सदर तडजोडीप्रमाणें हिंदी लोकांवरील बरेचसे अन्याय दूर होणार होते. पुढें अनेक वर्षांनीं जनरल स्मट्स्

यांनीं आपल्या आठवणी प्रसिद्ध केल्या. एका आठवणींत पुढील मजकूर होता. 'ज्यांच्याविषयीं मला त्या काळांतहि अत्यंत आदर वाटत होता अशा गांधींचा प्रतिस्पर्धी होण्याचें माझ्या प्राक्तनांत आलें होतें. तुरुंगांत शिक्षा भोगीत असतांना माझ्या प्रतिस्पर्ध्यानें माझ्या-साठीं चपलांचा एक जोड तयार केला होता. आपल्या मुक्ततेनंतर त्यानें तो जोड मला नजर केला. त्या चपला त्यानंतर मी किती दिवस तरी वापरीत होतों. पण तसें करीत असतांना, ज्यानें मला ही भेट दिली त्याच्या जोड्याशीं उभें राहाण्याची सुद्धां माझी लायकी नाहीं ही माझी जाणीव मात्र कोणत्याहि क्षणाला नाहींशी झालेली नव्हती.'

प्रो. गिल्बर्ट यांनीं आपल्या एका लेखांत म्हटलें होतें, 'जो ऐहिक सुखाविषयीं बेफिकीर आहे, पैसा म्हणजे ज्याला कःपदार्थ वाटतो, सुखाची किंवा प्रशंसेची ज्याला तिळमात्रहि आसक्ति नाहीं आणि जो केवळ त्याला सत्य वाटेल तेंच करीत असतो अशा माणसाशीं वागतांना सत्ताधाऱ्यांनीं अतिशय सावधगिरी बाळगली पाहिजे. त्याचें शरीर ते सहज जिंकूं शकतील. पण त्याच्या आत्म्याला मात्र त्यांना कधींच डिंचवतां येणार नाहीं—आणि म्हणूनच असा मनुष्य शत्रु झाला म्हणजे तो अतिशयच भयंकर ठरतो आणि सत्ताधाऱ्यांच्या अंगांत एखाद्या तीक्ष्ण कांट्यासारखा सतत सलत राहतो.'

ता. १८ जुलै १९१४ रोजीं गांधी आपल्या सर्व कुटुंबीयांसह इंग्लंडला निघाले. ते इंग्लंडला पोहोंचण्यापूर्वी दोनच दिवस म्हणजे ४ ऑगस्ट रोजीं जागतिक महायुद्धाचा भडका उडाला. लंडनला पोहोंचल्यावर गोखले आपल्या प्रकृतीसाठीं फ्रान्सला गेले असून तिकडेच अडकून पडले असल्याचें त्यांना समजलें. पॅरिस व लंडन यांमधील दळण-वळण तुटलें असल्यानें गोखले इंग्लंडला परत कधीं येणार हें समजण्यास मार्ग नव्हता. लंडनमध्यें गांधींचा गौरव करण्यासाठीं घडवून आणलेल्या

समारंभांत भाषण करतांना गांधी म्हणाले, 'इंग्लंडवर ओढवलेल्या युद्धाच्या प्रसंगाचा फायदा आपण घेणें अन्यायाचें आहे. निदान मी तरी या युद्धांत इंग्लंडला साहाय्य करण्यास तयार आहें.' पुढें गांधींना प्ल्यूरसीचा विकार झाला असल्याचें डॉक्टरांना आढळून आलें व त्यांना त्यांनीं हिंदुस्थानला जाण्याचा सल्ला दिला. त्यांना निरोप देण्याच्या समारंभाच्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले, 'मला व माझ्या पत्नीला प्रकृतीच्या अस्वास्थ्यासाठीं इथून जावें लागत आहे. द. आफ्रिकेंत मीं जें कांहीं केल तें केवळ कर्तव्यबुद्धीनेंच केल. मातृभूमीला पोहोंचल्यानंतर फक्त माझें कर्तव्य करीत राहाण्याचीच माझी महत्त्वाकांक्षा आहे. माझ्या गुरूची म्हणजे गोखल्यांची मला अशी आज्ञा आहे कीं, हिंदुस्थान हा तूर्त मला अपरिचित असल्यामुळें मी यावेळीं हिंदी प्रश्नावर कांहींहि बोलूं नये. पण माझ्या कल्पनेंतील हिंदुस्थान हा देश केवळ अतुलनीय आहे. हिंदुस्थानांत अध्यात्माचें अमूल्य भांडार भरलेलें आहे.'

ता. १९ डिसेंबर रोजीं गांधी कस्तुरबाईंना घेऊन हिंदुस्थानला निघाले. ते हिंदुस्थानला पोहोंचले तेव्हां त्याची परिस्थिति अनुकंपनीय झालेली होती. सर्वांच्या समोर 'पुढें काय?' हा प्रश्न आ वासून उभा होता. १९०८ सालीं लो. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली होती. १९१४ सालीं परत आल्यानंतर ते म्हणाले होते, 'अशा आणीबाणीच्या प्रसंगीं प्रत्येक हिंदी माणसानें—मग तो लहान असो किंवा मोठा असो, गरीब असो किंवा श्रीमंत असो–, आपल्या सर्व सामर्थ्यानिशीं सरकारला मदत करणें हेंच त्याचें कर्तव्य आहे.'

या वेळीं राष्ट्रीय सभेंत दोन तट पडलेले होते. जहाल व नेमस्त. टिळक हे जहाल पक्षाचे पुढारी असून नेमस्त पक्षाचें पुढारीपण गोखल्यांकडे आलेलें होतें. मगनलाल गांधी फीनिक्स वसाहतींतील लोकांना

घेऊन गांधींच्या पूर्वीं हिंदुस्थानला येऊन पोहोंचले होते. गांधींनीं त्या सर्व लोकांना 'शांतिनिकेतन' आश्रमांत पाठविलें, याचा रवींद्रनाथ टागोर यांना अतिशय आनंद झाला.

ता. ९ जानेवारी १९१५ रोजीं गांधी मुंबईला पोहोंचले. हिंदुस्थानच्या भूमीवर पाऊल टाकल्यापासून त्यांनीं स्वदेशी कापड व पोशाख वापरण्यास सुरुवात केली. आतां त्यांचा पोशाख म्हणजे काठेवाडी अंगरखा, काठेवाडी पद्धतीचा फेटा व धोतर असा असे. मुंबईंत अनेक ठिकाणीं त्यांचा सत्कार झाला. अशा एका समारंभाच्या वेळीं ते म्हणाले, 'मला विजय किती मिळाले एवढेंच तुम्हांला माहीत आहे. मला अनुभवाव्या लागलेल्या पराभवांची तुम्हांला माहिती नाहीं. दुरून डोंगर साजरे असें म्हणतात. आतां मी प्रत्यक्ष तुमच्यांत आल्यावर माझ्यांतील कित्येक दोषांचा तुम्हांला प्रत्यक्ष अनुभव येईल. पण माझ्या दोषांकडे दुर्लक्ष करून तुम्ही माझी सेवा गोड करून घ्याल अशी मला आशा आहे.' गुजराथी जमातीनें केलेल्या सत्कारसमारंभांत बॅ. जिनांनीं व इतर अनेक वक्त्यांनीं इंग्रजींतून भाषण केलें पण गांधी मात्र गुजराथींतच बोलले. गुजराथी भाषिकांच्या सभेंत इंग्रजी भाषण करण्याच्या प्रथेचा त्यांनीं निषेध केला.

गांधी कस्तुरबाईसह शांतिनिकेतनला पोहोंचल्यावर थोड्याच दिवसांनीं गोखल्यांच्या निधनाची वार्ता येऊन थडकली. त्यानिमित्त भरलेल्या शोकसभेंत भाषण करतांना गांधी म्हणाले, 'मी खऱ्या शूर माणसाचा शोध करीत होतों. सबंध हिंदुस्थानांत मला तसा मनुष्य एकच आढळला—आणि तो म्हणजे गोखले.' त्यांच्या मृत्यूविषयींचा आपला शोक व्यक्त करण्यासाठीं गांधींनीं एक वर्षपर्यंत अनवाणी चालण्याची शपथ घेतली.

# ४

हिंदुस्थानच्या प्रश्नांची चांगली माहिती व्हावी म्हणून गांधींनीं सर्वंध देशभर प्रवास करण्याचें ठरविलें. मद्रासच्या एका सभेंत भाषण करतांना ते म्हणाले, 'कोणत्याहि अन्यायापुढें मान वांकविणें हा शुद्ध नामर्दपणा आहे. अन्यायाचा प्रतिकार करावयाचा पण तो अन्याय करणाऱ्याचें रक्त सांडून नव्हे. आपला धर्म आपणाला तसें शिकवीत नाहीं. आपला धर्म अहिंसेवर आधारलेला आहे. आपल्या मित्रांवरच नव्हे तर आपल्या शत्रूंवरहि आपण प्रेमच केलें पाहिजे. जर आपणाला सत्य व अहिंसा हीं तत्त्वें आचरावयाचीं असतील तर आपण पूर्णपणें निर्भय बनलें पाहिजे. आपला धर्म हक्कावर भर देत नसून कर्तव्यावर भर देत असतो. हें कर्तव्य करीत असतांना तुम्हांला कोणत्याहि माणसाची भीति बाळगण्याचें कांहींहि कारण नाहीं. द. आफ्रिकेंतील तुमच्या देशबांधवांना इंग्रजी भाषा अजिबात येत नव्हती आणि आधुनिक संस्कृतीचा त्यांना गंधहि नव्हता. पण त्यांनीं केवढा पराक्रम गाजविला हें तुम्हीं पाहिलेंच आहे. आपल्या अशिक्षित देशबांधवांनीं द. आफ्रिकेसारख्या दूरच्या देशांत एवढा पराक्रम करून दाखविला. मग आपल्या देशांत तर त्याहून दसपट पराक्रम करून दाखवितां आला पाहिजे.'

मायावरम् येथील आपल्या भाषणांत ते म्हणाले, 'इथल्या अस्पृश्यांना राहण्याची सोय नाहीं कीं पाणी मिळण्याची सोय नाहीं. हा आपल्या हिंदुधर्माचाच भाग आहे काय? जर अस्पृश्यता हा हिंदुधर्माचा आवश्यक भाग आहे असें मला कोणी सिद्ध करून दाखविलें तर मी खुद्द हिंदुधर्माविरुद्धच बंडाचें निशाण उभारल्याशिवाय राहाणार नाहीं.'

ता. २५ मे १९१५ रोजीं अहमदाबादपासून थोड्याच अंतरावर असलेल्या कोचराब या खेड्यांत गांधींनीं आपला 'सत्याग्रह आश्रम' स्थापिला. मातृभूमीची सेवा करूं पहाणारानें कांहीं यमनियम पाळणें अत्यावश्यक असतें असा गांधींचा स्पष्ट अभिप्राय होता. चरखे व हातमाग हिंदुस्थानांतून नाहींसे झाल्यामुळें हिंदुस्थान दरिद्री झाला ही गांधींना खात्री वाटत असल्यामुळें त्यांनीं स्वतः चरखा फिरवून व हातमाग चालवून, या धंद्यांना पुन्हा चालना द्यावी असें सर्वांना सांगितलें. या आश्रमांतील विद्यार्थ्यांना धर्मतत्त्वें, शेती, चरखा, हातमाग वगैरेंच्या शिक्षणाबरोबरच इतिहास, भूगोल, अंकगणित, बीजगणित, भूमिति, अर्थशास्त्र या विषयांचेंहि शिक्षण मिळे. संस्कृत, हिंदी व कोणती तरी एक प्रादेशिक भाषा तेथील प्रत्येक विद्यार्थ्याला शिकावी लागे. इंग्रजी ही दुसरी भाषा म्हणून ठरविण्यांत आली होती. सबंध शिक्षणक्रम दहा वर्षांचा असून, मी मोठा झाल्यावर माझ्या पोटाचा उद्योग काय करावा असा विचारहि कोणाच्या डोक्याला शिवणार नाहीं अशी दक्षता सदर आश्रमांत घेतली जात असे. आश्रमाची स्थापना झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं गांधींनीं एका अस्पृश्य कुटुंबाला त्यांत आश्रय दिला.

बिहार प्रांताच्या वायव्येला असलेल्या चंपारण्य नांवाच्या जिल्ह्यांत नीळ तयार करतांना इंग्रज मालक हिंदी शेतकऱ्यांचे अनन्वित हाल करतात असें गांधींच्या कानावर आल्याबरोबर १० एप्रिल १९१७ रोजीं ते पाटण्याला गेले. गेल्याबरोबर त्यांनीं मळेवाल्यांच्या असोसिएशनच्या चिटणिसांची भेट घेतली व आपल्या आगमनाचें कारण त्याला समजावून सांगितलें. नंतर मजुरांचीं गाऱ्हाणीं समजावून घेण्यासाठीं ते दौऱ्यावर निघाले. शेतकऱ्यांच्या साक्षी लिहून काढण्याचा उद्योग त्यांनीं सुरू केला. नंतर चंपारण्यांतील प्रश्नासंबंधानें त्यांनीं एक

उत्कृष्ट निवेदन तयार केलें. या कामीं जवळजवळ चार हजार शेतकऱ्यांच्या साक्षी गोळा करण्यांत आल्या होत्या व त्यांतील एक अक्षरहि खोटें नसल्याबद्दल गांधी आणि त्यांचे सहकारी यांनीं आपली खात्री करून घेतली होती. चंपारण्यांतील शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायांचें चित्र सदर निवेदनांत रेखाटलेलें होतें. गांधींचें हें निवेदन हातीं पडल्यावर सरकारनें संबंधित जिल्हाधिकारी आणि मळेवाले यांस आपलीं निवेदनें सादर करण्यास सुचविलें. तेथील ले. गव्हर्नरनीं गांधींना रांची येथें मुलाखतीस बोलाविलें. तीन दिवसांच्या मुलाखती-नंतर या प्रश्नाची चौकशी करण्यासाठीं समिति नेमण्यांत येऊन गांधी हे त्या समितीचे एक सभासद असावेत असें ठरलें.

आतां आठ हजार साक्षींचें काम पूर्ण झालें होतें. त्या साक्षींचा नीट अभ्यास करण्याचा उद्योग गांधींनीं सुरू केला. चंपारण्यांतील या सर्व प्रकरणांत बाबू राजेंद्रप्रसाद यांची गांधींना अतिशय मदत झाली होती. समितीनें केलेल्या सर्व शिफारसी सरकारनें जवळजवळ जशाच्या तशा मान्य केल्या.

चंपारण्यांतील शेतकऱ्यांचे हाल होण्यास त्यांचें अज्ञानच मुख्यतः कारणीभूत होत असल्याची गांधींची खात्री होऊन चुकली होती. त्यांनीं एक पत्रक काढून तेथील लोकांना शिक्षण देण्यासाठीं विनावेतन शिक्षकाचा पेशा स्वीकारण्यासाठीं लोकांनीं पुढें यावें असें जनतेला आवाहन केलें. कर्नाटकांतून बाबासाहेब सोमण व पुंडलीक, मुंबईहून अवन्तिकाबाई गोखले, पुण्याहून शंकरराव देव व आनंदीबाई वैशंपा-यन, गांधींच्या आश्रमांतील छोटेलाल, सुरेंद्रनाथ व देवदास यांनीं हें काम करण्याचें मान्य केलें. महादेव देसाई व नरहरि पारीख हे दोघेहि याच सुमारास आपापल्या कुटुंबासह गांधींना येऊन मिळाले. गांधींनीं खेड्यांतून शाळा सुरू केल्या व प्रत्येक शाळेसाठीं शिक्षक नेमून दिले.

१९१७ सालीं प्लेग उद्भवल्यामुळें गांधींना कोचराब येथील आपला आश्रम हालवावा लागला. जून महिन्यांत त्यांनीं साबरमतीच्या तीरावर आपल्या आश्रमासाठीं जागा मिळविली.

या सुमारास लो. टिळक, ॲनी बेझंट व गांधी हीं तीन नांवें सर्वतो-मुखीं झालीं होतीं. स्वराज्य या शब्दानें लोकप्रियतेची परिसीमा गांठली होती. स्वराज्याच्या चळवळीचें लोण देशाच्या कोनाकोपऱ्यांत पोहोंचविण्यासाठीं लो. टिळकांनीं तुफानी दौरे सुरू केले होते.

याच वेळीं अहमदाबादचे गिरणीमालक व कामगार यांच्यांत झगडा उपस्थित झाला. महागाई इतकी झाली होती कीं, मिळणाऱ्या पगारांत उदरनिर्वाह करणें कामगारांना अशक्य झालें होतें. परिस्थितीचा नीट अभ्यास करून, मजुरांना पस्तीस टक्के पगारवाढ होणें न्याय्य ठरेल असा गांधींनीं आपला अभिप्राय व्यक्त केला. मजुरांनाहि हें पटलें पण गिरणीमालक आपला हट्ट सोडीनात. तेव्हां मजुरांच्या वतीनें लढा उभारण्याचा गांधींनीं निश्चय केला. त्यांनीं मजुरांना पुढील अटी पाळ-ण्याचा आदेश दिला. (१) अत्याचारांचा अवलंब न करणें, (२) संपांतून फुटणाऱ्या कामगारांना त्रास न देणें, (३) भिक्षेवर अवलंबून न रहाणें, (४) कितीहि दिवस संप चालू ठेवावा लागला तरी आपल्या निश्चयापासून विचलित न होणें व (५) संप चालू असेपर्यंत इतर कोणता तरी उद्योग करून आपला उदरनिर्वाह चालविणें.

दिवसेंदिवस परिस्थिति गंभीर होत चालली. पंधरा दिवसांनीं मजूरहि बेचैन होऊन गेले. ते दंगाधोपा करून आपल्या कार्याची हानि करतात कीं काय अशी गांधींना शंका येऊं लागली. त्यांनीं आमरण उपोषणाचा आपला निर्णय जाहीर केला. त्यानंतर तीनच दिवसांनीं गिरणीमालक लवादाचा निकाल मान्य करण्यास तयार झाले व गांधींनीं आपलें उपोषण सोडलें.

त्यानंतर लगेच खेडा येथील शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्या-करितां गांधींना तिकडे जावें लागलें. त्या सालीं शेतीचें उत्पन्न रुपयां-तील चार आणे असल्याचें शेतकऱ्यांचें म्हणणें होतें. पण सरकार हें मान्य करीना. गांधी त्या तालुक्यांतील पन्नास खेड्यांत फिरले व तेथील शेतकऱ्यांची त्यांनीं कसून तपासणी केली. तेव्हां शेतकऱ्यांचा दावा बरोबर असल्याची त्यांची खात्री पटली. या प्रकरणीं निःपक्ष अशी चौकशी समिति नेमण्यांत यावी अशी त्यांनीं सरकारकडे मागणी केली. सरकारनें त्यांची ही मागणी अमान्य केल्यावर या तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना निम्मा सारा माफ करण्यांत यावा असा त्यांनीं दुसरा पर्याय सुचविला. त्यांची ही मागणीहि मान्य करण्यास सरकार तयार होईना. तेव्हां त्यांनीं तेथील पाटीदारांस सत्याग्रहाचा अवलंब करण्यास सांगितलें. या लढ्याच्या वेळीं वल्लभभाई पटेल, शंकरलाल बँकर, इंदुलाल याज्ञिक व महादेव देसाई हे त्यांचे प्रमुख सहकारी होते. थोड्याच दिवसांत सत्याग्रहींचा आंकडा दोन हजारांच्या वर गेला.

महायुद्धाची परिस्थिति अत्यंत आणीबाणीची झाली असतांना गांधींनीं हा लढा सुरू केल्याबद्दल तेथील कमिशनरनें त्यांस ठपका दिला. तेव्हां गांधी म्हणाले, 'हा प्रसंग कमिशनरनेंच आपल्या हातानें ओढवून घेतला आहे. साम्राज्याला जर्मनांपेक्षां या कमिशनरच्या वृत्तीपासूनच जास्त धोका आहे. हिंदुस्थान देश आपल्या निद्रेतून आतां जागा झाला आहे हें कोणीहि विसरूं नये. आपले हक्क काय व आपलें कर्तव्य काय हें समजण्याला शेतकरी सुशिक्षितच असावे लागतात असें नाहीं. आपल्या सामर्थ्याची एकदां त्यांना जाणीव झाली म्हणजे कोणतेंहि सरकार कितीहि सामर्थ्यशाली असलें तरी त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर राज्य करणें त्याला अशक्य होऊन बसतें. येथील शेतकरी हेंच सत्य सिद्ध करून दाखविणार आहेत.'

हा लढा चार महिने चालल्यावर नडियाद तालुक्याच्या मामलेदारानें गांधींना निरोप पाठविला कीं, ज्यांची परिस्थिति उत्तम आहे अशा पाटीदारांनीं आपला सारा भरल्यास गरीब शेतकऱ्यांचा सारा माफ करण्यांत येईल. गांधींनीं याला आपली संमति दिली. अशा रीतीनें हा लढा यशस्वी झाला.

त्या युद्धांत हिंदुस्थानानें साम्राज्य सरकारला मदत करावी असेंच गांधींचें मत होतें. तरुणांनीं हजारोंच्या संख्येनें सैन्यांत दाखल व्हावें असा गांधी त्यांना उपदेश करीत होते. पण या कामीं त्यांनीं अति परिश्रम केल्यामुळें त्यांची प्रकृति बिघडली व ते साबरमती आश्रमांत जाऊन राहिले. या आजारापासून गांधी शेळीचें दूध पिऊं लागले.

सन १९१८ च्या नोव्हेंबर महिन्यांत युद्धसमाप्ति झाली. मुंबई येथील राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनांत, 'साम्राज्यांतर्गत स्वराज्याशिवाय अन्य कशानेंहि हिंदुस्थानचें समाधान होणें शक्य नाहीं,' असा ठराव संमत झाला.

महागाईची परमावधी झाल्यामुळें हिंदुस्थानांतील शेतकरीवर्ग हवालदिल होऊन गेला होता. मजूरवर्ग एकसारखा संप करून उठत होता. यांतच भर म्हणून जनतेच्या सर्वसामान्य नागरिकत्वाच्या हक्कावर गदा आणणारें रॉवलट बिल आलें होतें. या बिलाविरुद्ध सत्याग्रहाची मोहीम उभारण्याचें गांधींनीं ठरविलें. त्यांनीं प्रथम मुंबई येथें सत्याग्रह सभेची स्थापना केली. पहिल्याच पंधरा दिवसांत सत्याग्रहाच्या प्रतिज्ञापत्रकावर बाराशें लोकांच्या सह्या जमा झाल्या.

मध्यवर्ति कायदेमंडळांत सदर बिल संमत झालें. गांधींनीं सार्वत्रिक हरताळ पाडण्याचें ठरविलें—व त्यासाठीं १९१९ सालांतील ६ एप्रिल हा दिवस मुक्रर केला. त्या दिवशीं सकाळीं हजारों स्त्रीपुरुषांसह

गांधींनीं चौपाटीवर समुद्रस्नान केलें व प्रचण्ड मिरवणूक काढली. त्या दिवशीं गांधींनीं अनेक सभांतून भाषणें केलीं.

सरकारांत रजिस्टर न करतां 'सत्याग्रह' हें वृत्तपत्र गांधींनीं सुरू केलें. ता. ७ एप्रिल रोजीं या पत्राचा पहिला अंक निघाला. नंतर ते दिल्लीला जाण्यास निघाले. पण त्यांना सरकारनें मुंबईला परत पाठविलें. मुंबईस आल्यानंतर केलेल्या पहिल्याच जाहीर भाषणांत ते म्हणाले,

'मुंबईंत कांहीं लोकांनीं दगडफेंक केली—ट्रॅमगाड्या अडविल्या ! हा सत्याग्रह नव्हे. ही चळवळ अत्याचारांपासून सर्वथैव अलिप्त ठेवणें जर आपणाला शक्य होत नसेल तर ती आपण स्थगित तरी केली पाहिजे किंवा तिचें स्वरूप तरी बदलून टाकलें पाहिजे.'

अहमदाबादेंत लष्करी कायदा जारी करण्यांत आला होता. तेथें जाऊन तेथील नागरिकांची त्यांनीं प्रचंड जाहीर सभा भरविली. या प्रसंगीं श्रोत्यांना उद्देशून ते म्हणाले, 'या शहरांत जो लष्करी कायदा जारी करण्यांत आला आहे तो तुमच्या अत्याचारी कृत्यांमुळेंच नव्हे काय ? लष्करी अंमल चालू झाल्यापासून सर्वस्वीं निरपराधी असलेलीं कित्येक माणसें प्राणांना मुकल्याची बोलवा आहे. हें खरें असेल तर त्या पापाची जबाबदारीहि पर्यायानें तुमच्यावरच पडते. तुमच्या आततायी कृत्यांमुळें सत्याग्रहाच्या चळवळीचें फारच नुकसान झालेलें आहे. आपली ही चळवळ अत्याचारांनीं दूषित झाली नसती तर रॉवलट कायदा एव्हांना रद्द झाला असता. अत्याचारांचा अवलंब करून आपण स्वराज्य मिळवूं शकणार नाहीं किंवा देशाचें कल्याणहि साधूं शकणार नाहीं.' त्यानंतर तेथें लौकरच शांतता प्रस्थापित झाली आणि लष्करी अंमल उठविण्यांत आला.

ता. ११ एप्रिल रोजीं जनरल डायर अमृतसरमध्यें आला व तेथील लष्कराचा त्यानें ताबा घेतला. ता. १२ एप्रिल रोजीं तेथील जालि-

यनवाला बागेंत सभा भरली. जनरल डायर आपले पन्नास लष्करी सैनिक घेऊन तेथें गेला. सभेंतील लोकांना कोणत्याहि प्रकारची सूचना न देतां त्यानें आपल्या लष्कराकरवीं एकदम गोळीबारास सुरुवात केली. त्या ठिकाणचे मृत्यूचे व जखमी लोकांचे आंकडे सरकारनें मान्य केले ते अनुक्रमें ३७९ व सुमारें २०० असे होते. ता. १५ एप्रिलपासून त्या जिल्ह्यांत लष्करी कायदा जाहीर करण्यांत आला. गांधींनीं या प्रकारा-संबंधानें जनतेंत विलक्षण जागृति केल्यामुळें या प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं सरकारला एक चौकशीमंडळ नेमणें भाग पडलें. सदर मंडळाचे हंटर हे अध्यक्ष असल्यामुळें त्या मंडळाला हंटरकमिटी हें नांव प्राप्त झालें होतें. गांधींनीं व कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनींहि चौकशीच्या बाबतींत चंग बांधला. आपला रिपोर्ट तयार करतांना त्यांत सत्याचा यत्किंचितहि अपलाप होणार नाहीं याबद्दल गांधी अतिशय दक्ष असत.

ता. ८ ऑक्टोबर १९१९ रोजीं गांधींनीं 'यंग इंडिया' हें इंग्रजी साप्ताहिक सुरू केलें. त्यापूर्वीं सुरू असलेलें 'नवजीवन' हें गुजराथी साप्ताहिकहि त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. हीं दोन्ही पत्रें त्यांनीं अहमदाबादला नेलीं. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अमृतसर येथें भरलें. या अधिवेशनाला लो. टिळक व गांधी तर हजर होतेच पण कैदेंतून नुकतेच मुक्त झालेले अलीबंधूहि उपस्थित होते. या अधिवेशनांत 'महात्मा गांधीकी जय' च्या घोषणांनीं सारें वातावरण दुमदुमून गेलें होतें. यानंतर गांधींच्या नांवाचा उल्लेख करतांना सारी हिंदी जनता त्यांच्या नांवामागें 'महात्मा' ही पदवी कटाक्षानें लावूं लागली.

तुर्कस्थानच्या खलिफाचे कांहीं विशिष्ट अधिकार काढून घेण्यांत आल्यामुळें हिंदी मुसलमान अतिशय चिडून गेले होते. याच सुमारास मौ. आझाद यांची कैदेंतून मुक्तता होऊन ते दिल्लीस आले होते. ते

अतिशय विद्वान गृहस्थ असून अव्वल दर्जाचे वक्ते होते. गांधीजींचे ते एकदम निकटचे सहकारी बनले. शिष्टमण्डळें नेमून आणि अर्ज-विनंत्या करून राजकारणांत फारसें यश मिळूं शकत नाहीं. तेव्हां ज्याचा सरकारवर प्रत्यक्ष दाब पडेल असा कांहीं तरी कार्यक्रम आंख-ण्याकरितां गांधीजी, हकीम अजमलखान आणि मौ. आझाद यांची एक पोटसमिति नेमण्यांत आली. असहकारितेची योजना या पोटसमितींत पहिल्यानें आंखण्यांत आली. याबाबतचा आपला सविस्तर कार्यक्रम गांधीजींनीं त्या दोघांना समजावून दिला. या कार्यक्रमाशिवाय देशाला तरणोपाय नाहीं अशी त्या दोघांची खात्री झाली. नंतर थोड्याच दिवसांनीं मीरत येथें भरलेल्या खिलाफत परिषदेंत सदर कार्यक्रम जाहीरपणें मांडण्यांत आला.

ता. २५ मार्च १९२० रोजीं पंजाबांतील अत्याचारांसंबंधानें कॉंग्रेसनें नियुक्त केलेल्या चौकशीमंडळाचें निवेदन प्रसिद्ध झालें. हें निवेदन गांधीजींनीं तयार केलें असून त्यासाठीं त्यांनीं पंधरा दिवस अहोरात्र परिश्रम घेतले होते. सदर अत्याचारांचा जाहीर निषेध करण्यासाठीं ता. ६ एप्रिल ते १३ एप्रिल हा आठवडा राष्ट्रीय सप्ताह म्हणून पाळण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें. गांधीजी म्हणाले, ‘आपल्यांतील हजार निरपराध स्त्रीपुरुषांचे मुडदे पाडण्यांत आले म्हणून आपण खचून जातां कामा नये. आपण आपलें काळीज वज्रा-प्रमाणें बनविलें पाहिजे व फांसावर लटकणें ही अगदीं मामुली गोष्ट आहे असेंच आपण धरून चाललें पाहिजे.’

त्या काळीं हिंदुस्थानच्या राजकारणांत लो. टिळकांचा दर्जा हुकुमाच्या एक्क्यासारखा होता. गांधीजींच्या कांहीं विचारांशीं ते सहमत नव्हते. बेझंटबाईनीं होमरूल लीगच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर तें पद गांधीजींना देण्यांत आलें. नवीन सुधारणा राबवण्या-

बाबत पूर्वी लो. टिळक व गांधीजी यांच्यांत एकमत होतें. परंतु पंजाब प्रकरण व खिलाफत यामुळें सदर सुधारणांशीं सहकार करणें हें आपल्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे असें गांधीजींना वाटूं लागलें होतें. अर्थात्, लोकमान्यांना राष्ट्राचें लक्ष कौन्सिलप्रवेशाकडे लावावयाचें होतें तर गांधीजी या बाबतींत अधिकाधिक उदासीन बनत चालले होते.

हंटरकमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर त्यांत सरकारच्या कृत्यांवर पांघरूण घातलें असल्याचें आढळून आलें. या रिपोर्टामुळें खिलाफत प्रकरणामुळें पेटलेल्या आगींत तेल ओतल्यासारखें झालें.

ता. ३० मे रोजीं बनारस येथें भरलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकींत गांधीजींनीं आपली असहकारितेची योजना मांडली. सदर कार्यक्रमाचा सांगोपांग विचार करण्याकरितां कलकत्ता येथें शक्य तितक्या लौकर कॉंग्रेसचें जादा अधिवेशन भरविण्यांत यावें असें ठरलें. हिंदुस्थानांत वादळी वारे वाहूं लागलेले गांधीजींना दिसत होते. पण त्यांना एकदम वादळ व्हायला नको होतें. आगामी लढ्यासाठीं जनमत तयार करण्याची ते हळूहळू पण सतत कोशीस करीत होते. ता. १ ऑगस्टपासून असहकारितेच्या चळवळीला प्रारंभ करण्यांत येईल अशी ता. २८ जुलै रोजीं गांधीजींनीं घोषणा केली. जुलै ३१ हा दिवस पूर्वतयारीचा म्हणून पाळण्यांत यावा व त्या दिवशीं सर्वांनीं उपवास व प्रार्थना करावी असें त्यांनीं सुचविलें होतें. या सूचनेचें समर्थन करतांना त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, जगाच्या पाठीवर ज्या ज्या थोर विभूति होऊन गेल्या त्या त्या सर्वांना उपवास व प्रार्थना यांच्या जोरावर समाजाचें कल्याण करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें व त्यांची दृष्टि पवित्र झाली. पुष्कळदां या दोन्ही गोष्टी निष्फळ ठरत असतात. कारण त्या अंतःकरणापासून नव्हे तर देखाव्यासाठीं करण्यांत आलेल्या असतात. तेव्हां ज्यांची या गोष्टींवर श्रद्धा असेल त्यांनींच त्या कराव्यात. इतरांनीं त्या न केलेल्या बऱ्या.

ता. २६ जुलैपासून लो. टिळकांची प्रकृति फारच बिघडली व ता. १ ऑगस्टच्या रात्रीं बारा वाजून चाळीस मिनिटांनीं त्यांनीं इहलोक सोडला. त्यांच्या शवाची मिरवणूक निघाली तींत लक्षावधि लोक सामील झाले होते. गांधीजी, जवाहरलाल, शौकतअली, डॉ. किचलू लोकमान्यांच्या शवाला आळीपाळीनें खांदा देत होते. हिंदुस्थानाला असा खंदा पुढारी आतां कोण मिळणार हा एकच प्रश्न प्रत्येक हिंदी माणसाला आतां भेडसावूं लागला. लोकमान्यांच्या निधनाविषयीं लिहितांना गांधीजींनीं म्हटलें होतें, 'देशभक्ति हा लोकमान्यांचा स्थायीभाव होता. देशप्रीतीशिवाय अन्य कोणताहि धर्म त्यांना माहीत नव्हता. त्यांचें खाजगी जीवन अत्यंत शुद्ध व पवित्र होतें. धैर्याचा ते केवळ मेरु होते. स्वराज्य त्यांनीं अनेक वर्षें अलीकडे आणलें यांत शंका नाहीं. ते नोकरशाहीचे शत्रु होते. इंग्रज लोकांना त्यांनीं शत्रु मानलें नाहीं. ते हिंदी जनतेसाठीं जगले व तिच्यासाठींच त्यांनीं देहत्यागहि केला. शौर्य, साधेपणा, दीर्घोद्योग व देशभक्ति हे त्यांचे गुण आपल्या अंगीं बाणवून हिंदवासीयांनीं त्यांचें खरें व जिवंत स्मारक उभारावें.'

## ५

आपल्या असहकारितेच्या चळवळीचा प्रसार करतांना गांधीजी अनत्याचारावर विशेष भर देत. अहिंसाधर्म पाळणें म्हणजे भ्याडपणा पत्करणें होय असें कांहीं लोकांचें मत होतें. म्हणून आपण प्रवर्तित असलेल्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा खरा अर्थ काय हें जनतेला

समजण्यासाठीं गांधीजींनीं ता. १३ ऑगस्ट १९२० च्या 'यंग इंडिया'च्या अंकांत 'तलवारीचें तत्त्वज्ञान' या शीर्षकाखालीं एक लेख लिहिला. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें, 'हिंसा आणि भ्याडपणा या दोहोंतच निवड करण्याचा प्रसंग माझ्यावर आला तर मी केव्हांहि हिंसेचीच निवड करीन. हिंदी जनतेनें षंढांप्रमाणें इंग्रज राज्यकर्त्यांच्या लाथा खात बसण्यापेक्षां आपल्या मानरक्षणासाठीं सशस्त्र क्रांतीचा अवलंब केलेला मला अधिक आवडेल. परंतु अहिंसेचें सामर्थ्य हिंसेच्या सामर्थ्यापेक्षां अनंत पटींनीं श्रेष्ठ आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे. प्राचीन काळापासून रूढ असलेला त्यागाचा धर्म हिंदुस्थानाला शिकविण्याचें धाडस मी करीत आहें. अखिल वातावरण हिंसेनें भरून गेलेलें असतांना ज्या ऋषिमुनींनीं अहिंसेचा धर्म शोधून काढला ते न्यूटनपेक्षां सहस्र पटींनीं बुद्धिमान असून वेलिंग्टनपेक्षां अनंत पटींनीं थोर योद्धे होते; आणि म्हणूनच हिंसेनें नव्हे तर अहिंसेनेंच मानवांची मुक्ति होईल असा अखिल जगाला त्यांनीं संदेश दिला. अहिंसेचें पालन करणें म्हणजे जुलमापुढें नेभळ्याप्रमाणें मान तुकविणें नव्हे तर जुलमाविरुद्ध आपलें सारें आत्मिक सामर्थ्य उभें करणें होय. अहिंसाधर्म हें हिंदुत्वाचें मूलतत्त्व आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे आणि त्या धर्माचें पालन करून हिंदुस्थानच्या सेवेंत माझें सर्वस्व वाहण्याचा माझा कृतसंकल्प झालेला आहे."

याच दिवशीं गांधीजींनीं, इंग्रज सरकारनें त्यांना बहाल केलेलें कायसर-इ-हिन्द सुवर्णपदक व झुलू व बोअर युद्धांच्या वेळीं दिलेलीं पदकें सरकारकडे निषेधपूर्वक परत केलीं.

कित्येक मुलें शाळाकॉलेजांतून बाहेर पडूं लागलीं, कित्येक लोक सरकारी किताब परत करूं लागले, कित्येक सरकारी नोकरांनीं आपल्या नोकरीवर लाथ मारली, कांहीं वकिलांनीं आपला धंदा स्थगित केला,

हिंदुमुसलमानांच्या एकीचा पुरावा सर्वत्र दिसूं लागला. हिंदुस्थान हें एक राष्ट्र असल्याचें विलोभनीय दृश्य पहिल्यानेंच दिसूं लागलें. अर्जविनंत्यांच्या राजमार्गावरून चाललेली हिंदुस्थानच्या राजकारणाची गाडी गांधीजींनीं प्रत्यक्ष कृतीच्या रुळावर नेली हा हिंदुस्थानच्या राजकारणाचा अधःपात आहे असें कित्येक लोकांना वाटत होतें.

ता. ४ सप्टेंबर १९२० रोजीं जादा राष्ट्रीय सभेचें अधिवेशन कलकत्ता येथें लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखालीं सुरू झालें. सदर अधिवेशनांत गांधीजींनीं आपला 'अनत्याचारी असहकारिते'चा ठराव मांडला. त्याचा सारांश असा: पंजाब प्रकरण व खिलाफत या दोन्ही घोर अन्यायांचें निराकरण झालें नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानांतील जनता संतुष्ट होणें शक्य नाहीं. राष्ट्राचा झालेला हा अपमान धुवून टाकण्याचा व त्याची पुनरावृत्ति होऊं न देण्याचा एकमेव मार्ग म्हणून हिंदुस्थाननें स्वराज्य मिळविलें पाहिजे. हें स्वराज्य मिळावयाचें तर त्यासाठीं अनत्याचारी असहकारिता हाच एकमेव मार्ग आहे. लोकांना किताब बहाल करून, शाळाकॉलेजांतील विद्यार्थ्यांना आपल्याला इष्ट अशा प्रकारचें शिक्षण देऊन, न्यायालयांच्या व कायदेमंडळांच्या देखाव्यानें प्रस्तुत सरकार आपलें आसन स्थिर करण्याचा बनाव करीत असतें. म्हणून या सभेचा जनतेला असा संदेश आहे कीं, लोकांनीं सरकारी किताब परत करावे. सरकारी अधिकारी सरकारी व निमसरकारी अधिकाऱ्यांच्या सन्मानार्थ समारंभ करतात. अशा प्रकारच्या समारंभांना कोणीहि उपस्थित राहूं नये. शाळांतून व कॉलेजांतून मुलांना काढून घेण्यांत यावें. ब्रिटिशांच्या अंमलाखालील न्यायालयांवर वकिलांनीं बहिष्कार घालावा व खासगी न्यायालयें स्थापन करून पंचांमार्फत वादांचा निकाल लावून घ्यावा. मेसापोटेमियांत नोकरीसाठीं बोलावणें येईल तेव्हां सैनिकांनीं व श्रमाचीं कामें करणाऱ्या इतर

माणसांनीं सदर बोलावणें स्वीकारूं नये. कायदेमंडळाच्या निवडणुकी-साठीं उमेदवारांनीं उभें राहूं नये आणि राष्ट्रीय सभेचा हा आदेश धुडकावून लावून कोणी उमेदवार निवडणुकीसाठीं उभे राहिलेच तर मतदारांनीं मतदान करूं नये. परदेशी मालावर बहिष्कार घालावा. शिस्तपालन व त्यागवृत्ति यांशिवाय राष्ट्राची प्रगति होणें अशक्य असल्यामुळें सर्व जनतेच्या अंगीं हे गुण बाणविण्याचें कार्य ही चळवळ पहिल्यानें हातीं घेईल. घरोघरीं चरखा फिरविण्यांत येऊन हातमागाच्या धंद्याला उत्तेजन देण्यांत यावें.

सदर ठरावावर भाषण करतांना गांधीजी म्हणाले, 'नुसता ठराव संमत करण्यानें कांहीं आपलें काम संपत नाहीं. त्या ठरावाचा जो भाग ज्याला लागूं पडत असेल तो त्यानें प्रत्यक्ष आचरणांत आणावयाचा आहे. क्रोधाच्या आहारीं जाऊन पुकारलेला असहकार सर्वस्वीं निरुपयोगी आहे. आपण क्रोधाच्या आहारीं न जातां त्यालाच आपल्या काबूंत ठेवलें पाहिजे. क्रोधाला संयमाची जोड असली म्हणजे विश्वालाहि हादरून सोडण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त होत असतें. माझ्या या योजनेपेक्षां अधिक प्रभावी अशी दुसरी एखादी योजना असल्याची तुमची बालंबाल खात्री पटल्याशिवाय तुम्ही त्या दुसऱ्या योजनेला आपला पाठिंबा देऊं नये अशी माझी आपणांला विनंती आहे. माझ्या या योजनेला पुरेसा पाठिंबा मिळाल्यास आपण एका वर्षांत स्वराज्य मिळवूं शकूं असें विधान करण्याचें मी धाडस करतों. हा ठराव केवळ संमत केल्यानें आपल्याला स्वराज्य मिळेल असें कोणीहि समजूं नये. त्या ठरावाच्या यशाला प्रत्यक्ष कृतीची अपेक्षा आहे. आपण आपल्या संसारांत त्यागाची वृत्ति कांहीं प्रमाणांत दाखवितों—तीच आतां आपण देशकार्यांत दाखवायला शिकलें पाहिजे. या ठरावांत सांगितलेल्या या साध्या गोष्टी करायला सुद्धां लोक तयार

नसतील तर स्वराज्य या शब्दाचा नुसता उच्चार करायला सुद्धां आपण लायक नाहीं असेंच म्हणावें लागेल. स्वातंत्र्यसंपादनाच्या इतिहासाचा हा श्रीगणेशा आहे. इंग्रज सरकारवर जर तुमचा यत्किंचितहि विश्वास नसेल आणि त्यानें केलेल्या अन्यायाची त्याला यत्किंचितहि चाड नसल्याची तुमची खात्री होऊन चुकलेली असेल तर त्यानें निर्माण केलेलीं कायदेमंडळें तुम्हांला स्वराज्य मिळवून देतील का तुमच्या मानेभोंवतालचे गुलामगिरीचे पाश अधिक घट्ट आंवळण्याचें काम करतील याचा तुम्हीच विचार करा.'

विरुद्ध पक्षानें या ठरावावर गहजब उडविला. बिपिनचंद्र पाल यांनीं या ठरावास उपसूचना मांडली व चित्तरंजन दास यांनीं त्या उपसूचनेस पाठिंबा दिला. गांधीजींच्या ठरावांत स्वराज्याच्या मागणीचाहि अंतर्भाव असावा असें विजयराघवाचारी व मोतीलाल नेहरू यांचें म्हणणें होतें. गांधीजींनीं हें तत्काळ मान्य केलें आणि आपल्या ठरावांत त्यांनीं स्वराज्याची मागणी घातली. मतमोजणी होऊन म. गांधीजींच्या या ठरावाला १८५५ मतें मिळालीं तर विरुद्ध बाजूनें ८७३ मतें पडलीं व तो अशा रीतीनें संमत झाला.

गांधीजींनीं आपल्या 'यंग इंडिया' पत्रामधून असहकारितेच्या प्रचाराचा धूमधडाका सुरू केला. ते म्हणत, न्यायालयांचें मुख्य कर्तव्य न्यायदान हें असल्यामुळें न्यायालय म्हणजे कोणत्याहि राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा मानबिंदु म्हणून समजतात. तें ज्या क्षणीं हें आपलें पवित्र कर्तव्य बजावण्याऐवजीं पापानें माखलेल्या हातांच्या सरकारला उचलून धरूं पाहील त्या क्षणापासून मानबिंदूच्या ऐवजीं तें जळतें घरच ठरेल. हिंदुस्थानांतील गरीब रयतेचे अमानुष खून केल्याच्या घोर पातकाबद्दल एका तरी इंग्रज माणसाला असल्या महान अपराधाबद्दल कायद्यानें सांगितलेली शिक्षा एखाद्या न्यायालयानें दिलेली कोणी ऐकली आहे काय?

आपण हिंदी लोक इंग्रजांहून एक रेंसभरहि कमी नाहीं असा पुरेपूर विश्वास आपल्यांत निर्माण झाला नाहीं तोंपर्यंत स्वराज्य या शब्दाचा अर्थ तरी काय लावायचा? आज परिस्थिति अशी आहे कीं, कोणत्याहि लहान किंवा मोठ्या गोष्टीसाठीं आशाळभूत नजरेनें इंग्रजांकडे पहात बसण्याची आपणां हिंदी लोकांना संवय लागलेली आहे. परचक्रापासून त्यांनींच आपलें निवारण केलेलें आहे, आपल्या मुलांना शिक्षण त्यांच्या मुळें मिळत आहे, आपल्या रोजच्या गरजा त्यांच्यामुळें भागत आहेत, सारांश, इंग्रज आहेत म्हणून आपण जगत आहोंत अशा भावना आज हिंदी लोकांच्या अंतःकरणांत घट्ट मूळ धरून बसल्या आहेत. हिंदुस्थानांतील संस्थानिक आणि लक्ष्मीपुत्र इंग्रजांना देव मानून त्यांच्यापुढें निरांजनें ओवाळीत असतात. नेहमीं मेंढरांच्या कळपांत राहिल्यामुळें स्वतःला मेंढरूं समजूं लागलेल्या सिंहाला त्याच्या खऱ्या जातीची ओळख पटवून देणें हें अत्यंत बिकट असें कार्य आहे हें मला माहीत आहे. आज हिंदी जनतेची अवस्था रात्रंदिवस मेंढरांच्या कळपांत वावरणाऱ्या सिंहासारखी झाली आहे. त्यामुळें तिच्या मनांत स्वतःच्या दुबळेपणाशिवाय दुसरी कसलीच भावना नांदत नाहीं. आपली खरी जात कोणती तें इंग्रज आपल्याला शिकवितील हें कसें शक्य आहे? आपण त्यांच्या शिकवणुकीच्या प्रसादानें हलके हलके स्वराज्याला पात्र होत जाऊं असाच ते शंख करीत राहणार!

सगळ्या जगापासून स्वतःचें संरक्षण करण्यास समर्थ होणें यालाच मी स्वराज्याचे धडे घेणें असें म्हणतों. हिंदी जनतेला आपलें जीवन पूर्ण स्वातंत्र्यानें व्यतीत करतां आलें तर स्वराज्यांत इतर कांहींहि उणीवा असल्या तरी मला त्याची पर्वा वाटणार नाहीं. स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणें शक्य नाहीं.

इंग्रज लोक आपल्या संगिनींच्या जोरावर हिंदी लोकांना गुलाम-

गिरींत जखडून ठेवीत आहेत हें खरें असलें तरी हिंदी जनता हरएक बाबतींत त्यांच्याशीं सहकार्य करते म्हणूनच त्यांना हें शक्य होतें हेंहि कांहीं खोटें नाहीं. कायदेमंडळांत थोड्याफार सुधारणा झाल्या, न्यायालयांच्या संख्येंत वाढ झाली किंवा हिंदी लोकांना मोठ्या अधिकाराच्या जागा मिळूं लागल्या म्हणजे आपलें स्वराज्य जवळ आलें अशा आशेनें हुरळून जाण्याचा मूर्खपणा आपण यापुढें करतां कामा नये. आपलें लक्ष आपल्या ध्येयावरून उडवून भलत्याच फालतू गोष्टींकडे वेधण्याची ही एक युक्ति आहे. आपल्या नुसत्या संगिनींच्या जोरावर हिंदी जनतेला गुलामगिरींत खितपत ठेवणें इंग्रजांना अशक्य आहे. हें त्यांनाहि माहीत आहे आणि म्हणूनच हिंदी लोकांना भुरळ पाडण्यासाठीं ते असलें कांहीं तरी थातुरमातुर करीत असतात. आपली साम्राज्यतृष्णा भागविण्यासाठीं हिंदुस्थानच्या मनुष्यबळाची इंग्रजांना गरज आहे. आपलीं माणसें आणि आपला पैसा यांचा इंग्रजांना चालू असलेला खुराक आपण बंद केला म्हणजे आपलें ध्येय आपण गांठल्याशिवाय राहाणार नाहीं."

ता. २६ डिसेंबर १९२० रोजीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन श्री विजयराघवाचारी यांच्या अध्यक्षतेखालीं नागपूर येथें झालें. गांधीजींना विरोध करण्यासाठीं बॅ. सी. आर. दास आपल्या अनेक बंगाली प्रतिनिधीं-सह आले होते. महाराष्ट्राच्या वतीनें विरोध करण्यासाठीं दादासाहेब खापर्डे आणि तात्यासाहेब केळकर उपस्थित होते. बॅ. जिनांच्या कच्छपीं असणारे अनेक पुढारीहि जिद्दीनें आले होते. परंतु कलकत्त्याला संमत करण्यांत आलेल्या अनत्याचारी असहकारितेच्या चळवळीचीं सारीं कलमें या अधिवेशनांत अगदीं पक्कीं करून घ्यावयाचीं असा गांधीजींचा संकल्प झालेला होता. कोर्टांवर बहिष्कार घालण्याची व वकिलांनीं वकिली सोडण्याची चळवळ तहकूब करण्यांत यावी अशा-साठीं गांधीजींवर दाब आणण्याचा पुष्कळ पुढाऱ्यांनीं प्रयत्न केला पण

गांधीजींनीं एक रेंसभरहि मागें न हटण्याचा निश्चय केलेला होता. अखेर गांधीजींचा विजय होऊन असहकारितेचा ठराव खुद्द दास यांनीं मांडला व बिपिनचंद्र पाल यांनीं त्यास पाठिंबा दिला. सरकारशीं असलेले सारे संबंध सोडण्यापासून करबंदीपर्यंत जनतेची तयारी करण्याचा संकल्प या अधिवेशनांत जाहीर करण्यांत आला. सर्व कायदेशीर व शांतताप्रधान मार्गांनीं स्वराज्य मिळविणें हें राष्ट्रीय सभेचें ध्येय असल्याचेंहि घोषित करण्यांत आलें. राष्ट्रीय सभेची नवीन घटना मुक्रर करण्यांत आली. तिच्या कार्यकर्त्यांवर रोजच्या रोज कांहींतरी प्रत्यक्ष कार्य करण्याची जबाबदारी येऊन पडली. या चळवळीचें लोण खेड्यापाड्यांपर्यंत पोहोंचवून साऱ्या जनतेंत जागृति घडवून आणण्याचें काम या वेळेपासून सुरू झालें. गांधीजींना कलकत्ता येथें मिळालेल्या पाठिंब्यापेक्षां नागपूरला मिळालेला पाठिंबा अधिक भरींव होता. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीय सभेचें स्वरूप उघड क्रांतिकारक बनलें.

या चळवळीचा प्रत्यक्ष परिणाम फार मोठ्या प्रमाणावर पहिल्यानें दिसून आला तो बंगालमध्यें. १९२१ सालच्या जानेवारी महिन्यांत तीन हजार विद्यार्थ्यांनीं कॉलेजवर बहिष्कार घातला, हजारों मुलांमुलींनीं शाळा सोडल्या. चार महिन्यांच्या आंत पाटणा, अलिगड, अहमदाबाद, मुंबई, बनारस व दिल्ली येथें राष्ट्रीय कॉलेजें सुरू करण्यांत आलीं. पं. मोतीलाल नेहरू, सी. आर. दास, वल्लभभाई पटेल, बाबू राजेंद्रप्रसाद, राजगोपाळाचारी अशा अव्वल दर्जाच्या कायदेपंडितांनीं कोर्टावर बहिष्कार घालून व आपला धंदा स्थगित करून दरमहा मिळणाऱ्या हजारों रुपयांवर पाणी सोडण्याचा अलौकिक स्वार्थत्याग करून दाखविला. त्याग हीच पुढारीपणाची खरी कसोटी होऊन बसली. बाबू सुभाषचंद्र बोस यांचें वय त्यावेळीं अवघें पंचवीस वर्षांचें होतें. ते आय.

सी. एस्. ची परीक्षा पास झाले असून सरकारी नोकरी करीत होते. गांधीजींच्या आदेशाप्रमाणें त्यांनीं सरकारी नोकरीवर लाथ मारली व ते कलकत्त्याच्या राष्ट्रीय कॉलेजाचे प्राचार्य झाले.

शेट जम्नालाल बजाज यांनीं गांधीजींनीं उभारलेल्या टिळक स्वराज्य फंडाला एक लाख रुपयांची देणगी दिली. देशाच्या कोना-कोपऱ्यांतून गांधीजींच्या चळवळीचा डंका दुमदुमूं लागला होता पुढाऱ्यांचीं भाषणें ऐकण्यासाठीं प्रत्येक सभेला हजारों श्रोते जमत. गांधीजी, अबुल कलम आझाद, अली बंधू, पं. मोतीलाल व जवाहर-लाल नेहरू, सी. आर. दास यांनीं तर सभा घेण्यांत व लोकजागृति करण्यांत अनेक प्रकारचे विक्रमच प्रस्थापित केले.

सरकारनें दडपशाही सुरू केली. १७ नोव्हेंबरला इंग्लंडच्या युवराजांचें पाऊल हिंदुस्थानच्या भूमीवर पडलें. राष्ट्रीय सभेनें त्यांच्या आगमनावर कडकडीत बहिष्कार पुकारला होता. पण पारशी लोकांनीं त्यांचें स्वागत करण्याचें ठरविल्यामुळें इतर जमातीच्या लोकांनीं त्यांस पिटण्यास सुरुवात केली. तेव्हां गांधीजींनीं आपला उपोषणाचा संकल्प जाहीर केला. थोड्याच अवधींत शांतता प्रस्थापित झाली व गांधीजींनीं आपलें उपोषण सोडलें. ता. १९ नोव्हेंबरपासून सरकारनें दडपशाहीचें थैमान सुरू केलें. कॉंग्रेस व खिलाफत स्वयंसेवक संस्था कांहीं प्रांतांच्या सरकारांनीं बेकायदा ठरविल्या. ता. १० डिसेंबर रोजीं बहुतेक मातबर पुढाऱ्यांना अटक करण्यांत आली. स्वयंसेवक हजारोंनीं गिरफदार करण्यांत आले. डिसेंबर अखेरपर्यंत तीस हजार लोक तुरुंगांत गेले होते तर तितक्याच लोकांनीं आपलें एक पाऊल तुरुंगाच्या दारांत टाकलें होतें. प्रत्यक्ष स्वराज्य हातीं आलें नसलें तरी गुलामगिरीची झांपड उडून जाऊन जनता मनानें निःसंशय स्वतंत्र झाली होती. एकंदर काळच किती बदलून गेला होता याचा एक स्पष्ट पुरावा म्हणून पं. जवाहरलाल

नेहरूंनीं १९२२ सालीं मॅजिस्ट्रेटसमोर जी कैफीयत सादर केली होती तिच्याकडे बोट दाखवितां येईल. सदर कैफियतींत त्यांनीं म्हटलें होतें, 'प्रेम आणि राजनिष्ठा यांची निर्मिति अंतःकरणांत होत असते. या गोष्टी बाजारांत विकत मिळत नाहींत आणि संगिनींच्या जोरावर तर नाहींतच नाहींत. आम्ही हिंदी लोक आमच्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं लढत आहोंत. कैदेंतून मुक्त झाल्यानंतर मी पुन्हाहि आनंदानें तुरुंगांत जाईन. तुरुंग हा आम्हां हिंदी लोकांना आतां नंदनवनासारखा वाटूं लागलेला आहे, तें आमचें पवित्र यात्रेचें स्थान झालेलें आहे. माझ्या सद्भाग्याचें माझें मलाच नवल वाटतें. आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याची संधी मिळणें हाच मोठा सन्मान आहे. पण महात्मा गांधीं-सारख्या पुढाऱ्याच्या हाताखालीं लढण्याची संधि मिळणें हा तर मी त्याहूनहि मोठा सन्मान समजतों. आपलीं सुखस्वप्नें सत्यसृष्टींत प्रत्यक्ष आणण्याच्या कामीं मृत्यु येण्यापेक्षां हिंदी माणसाचें अधिक थोर भाग्य तें कोणतें?'

गांधीजींच्या सर्व अटी पाळण्याचें बार्डोलीच्या जनतेनें मान्य केल्यावरून ता. ३१ जानेवारीला सुरत येथें भरलेल्या वर्किंग कमिटीनें त्या तालुक्याला सविनय कायदेभंग सुरू करण्याची परवानगी दिली. पण नंतर चौरीचौरा येथें दंगा होऊन बावीस शिपायांना जिवंत जाळ-ण्यांत आलें. बार्डोली येथील कायदेभंगाची चळवळ स्थगित केली असल्याचें गांधीजींनीं जाहीर केलें. आपल्या या निर्णयाचें समर्थन करतांना ते म्हणाले,

'चौरीचौऱ्याचा व बार्डोलीचा संबंध काय, असें कांहीं लोक विचा-रतात. त्याला माझें उत्तर असें आहे कीं, सबंध देश अहिंसेला चिकटून राहिला असता तरच बार्डोलीच्या कायदेभंगाला 'सविनय' हें विशेषण शोभलें असतें. सरकारनें कितीहि अत्याचार केले तरी लोक अत्याचार

करणार नाहींत असा पुरेपूर विश्वास निर्माण झाल्याशिवाय सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करतां कामा नये, हाच त्याचा अर्थ आहे.'

वार्डोलीच्या कायदेभंगाबाबत गांधीजींनीं माघार घेतली म्हणून कांहीं इंग्रज अधिकाऱ्यांच्या डोक्यांत विजयोन्माद संचारला. भारतमंत्री मॉंटेग्यू यांनीं गर्जना केली कीं, 'आम्ही इंग्रज लोक हिंदुस्थानांतून माघार घेऊं अशा वेडगळ आशेनें हिंदी जनतेनें भरमसाट मागण्या केल्या तर हिंदुस्थांतील आमची सत्ता अबाधित ठेवण्याच्या आमच्या निश्चयरूपी खडकावर तिचें डोकें आपटल्याशिवाय रहाणार नाहीं.' लॉर्ड बर्कनहेड यांनीं अशी ग्वाही दिली कीं, 'ब्रिटिश सुंभाचा पीळ अजून कायम आहे.'

गांधीजींनीं त्यांना असें उत्तर दिलें:

'ब्रिटिश सिंह आपले कराल पंजे आमच्यासमोर नाचवीत असेपर्यंत ब्रिटिशांची व आमची मैत्री होण्याची आशा कशाला पाहिजे? इंग्रजांचा करारी बाणा व पीळ यांची पूर्ण कल्पना असूनच हिंदी जनतेनें १९२० सालच्या सप्टेंबर महिन्यांत स्वराज्य मिळविण्याची आपली प्रतिज्ञा घोषित केली आहे. हिंदुस्थानची ही रास्त मागणी इंग्रजांनीं समजूतदारपणानें मान्य केली नाहीं तर त्यांना हिंदी जनतेंत जागृत झालेली ही स्वातंत्र्याची भावना चिरडून टाकण्यासाठीं आपलें शक्तिसर्वस्व पणाला लावण्याची वेळ आल्याशिवाय राहाणार नाहीं. इंग्रजांच्या मगरूरपणाला हिंदुस्थान मगरूरीनें जबाब देणार नाहीं. पण हिंदी जनता अंगिकारिलेल्या व्रताला चिकटून राहिली तर तिची प्रार्थना परमेश्वराला ऐकावीच लागेल. सत्तेच्या उन्मादानें बेभान झालेली आणि आपल्या दीनदुर्बल प्रजेची पिळवणूक करणारी एकहि साम्राज्यशाही चिरकाल टिकल्याचा अजून दाखला नाहीं आणि परमेश्वर म्हणून कांहीं चीज असेल तर जगाच्या पाठीवरील दीनदुर्बलांची

पद्धतशीरपणें पिळवणूक करण्यास सोकावलेली ब्रिटिश साम्राज्यशाही फार काळ जिवंत रहाणें शक्य नाहीं. स्वतःला ब्रिटिश साम्राज्याचे प्रतिनिधी म्हणविणाऱ्या या दोघांना, ब्रिटिशांचा कडवेपणा चाखून पहाण्याच्या कामीं हिंदुस्थानानें आपले किती सुपुत्र बळी दिलेले आहेत याची नीटशी कल्पना दिसत नाहीं. चौरीचौरा येथील दुर्दैवी घटना घडली नसती तर या ब्रिटिश सिंहाची क्षुधा शमविण्यासाठीं आणखी किती तरी सुपुत्रांनीं आपलीं मस्तकें त्याच्या सुपूर्द केलीं असतीं. परंतु परमेश्वरी संकल्प कांहीं निराळाच होता. डाऊनिंग स्ट्रीट व व्हाईटहॉल येथील प्रतिनिधींनीं आपला काय मगदूर असेल तो खुशाल खर्च करावा. १९२० सालीं हिंदी जनतेनें केलेली प्रतिज्ञा या क्षणालाहि कायम आहे—मग ती पुरी व्हायला कितीहि वेळ लागो! सुरू झालेली ही लढाई सोक्षमोक्ष झाल्याशिवाय थांबणार नाहीं—मग इंग्रज लोक समजूतदारपणानें वागोत नाहीं तर दडपशाहीची परमावधी करोत! माझी परमेश्वराच्या चरणीं एवढीच प्रार्थना आहे कीं, वाटेल त्या भीषण प्रसंगीं आपल्या अहिंसेच्या व्रताला चिकटून रहाण्याचें सामर्थ्य त्यानें हिंदी जनतेला द्यावें. उद्दाम आणि मगरूर भावेनें हिंदी लोक दबले जातील अशी आशा इंग्रजांनीं यापुढें बाळगूं नये.'

ऑल इं. काँ. कमिटीची सभा ता. २४ फेब्रुवारीला झाली. सदर सभेंत गांधीजींविरुद्ध काहूर उठलें. महाराष्ट्र व बंगाल यांनीं त्यांना उघड उघड विरोध केला. त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठरावहि मांडण्यांत आला. स्वसमर्थनार्थ गांधीजी एक शब्दहि बोलले नाहींत. अखेर गांधीजींचाच विजय झाला. याबद्दलचे विचार प्रकट करतांना ते म्हणाले, 'कळत वा न कळत देशांत अत्याचाराची प्रवृत्ति वाढत आहे. माझी आंधळेपणानें पूजा करणारांचा मला मनस्वी वीट आलेला आहे. त्यापेक्षां

डोळे उघडे ठेवून ते माझ्या तोंडावर थुंकले तर मला अधिक बरें वाटेल. आपण अंगिकारिलेलें अहिंसाव्रत म्हणजे केवळ ढोंग आहे. आपण संतापानें जळत आहोंत आणि सरकार आपल्या दडपशाहीनें त्या आगींत तेल ओतीत आहे. अशानें आपल्या डोक्यांत आगीचा डोंब उसळून आपण अत्याचारांना प्रवृत्त होऊं आणि सगळीकडे खून, जाळपोळ यांना ऊत आला कीं त्यांना आळा घालून आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय हिंदी लोकांना पटवून देण्याची आपल्याला संधि मिळेल हा सरकारचा डाव आहे.

आपल्या अहिंसेचा जन्म नाइलाजाच्या पोटीं झाला असल्याचें मला स्पष्ट दिसत आहे. संधि मिळतांच सूड घेण्याची भावना आपल्या मनांत दडून बसलेली आहे. अशा ढोंगी अहिंसावृत्तींतून सोज्वळ अहिंसा कशी निर्माण होणार? आणि असें नाटक करण्यांत अर्थ तरी काय? जर आपल्याला हिंसेनेंच स्वराज्य मिळवायचें असेल तर अहिंसेचा हा लटका पडदा आपण झुगारून देऊं या आणि हिंसाव्रताचा राजरोस अंगिकार करूं या. हा मार्ग मर्दपणाचा आणि प्रामाणिक तरी आहे. राष्ट्रीय सभेनें अंगिकारिलेल्या अहिंसाव्रतावर ज्याची पुरेपूर श्रद्धा नसेल त्यानें तींतून बाहेर पडावें.'

ता. १० मार्चला गांधीजींना सरकारनें अटक केली व १८ तारखेला त्यांचा खटला सुनावणीला निघाला. त्यांनीं आपला बचाव करण्याचें नाकारून कोर्टाला फक्त आपलें निवेदन सादर केलें. सदर निवेदनांत त्यांनीं म्हटलें होतें,

'नवीन सुधारणा या इंग्रज सरकारच्या हृदयपालटामुळें देण्यांत आल्या नसून हिंदुस्थानाची अधिक पिळवणूक करण्यासाठीं व त्याच्या मानेभोंवतालच्या गुलामगिरीच्या शृंखला अधिक घट्ट आंवळण्यासाठींच देण्यांत आलेल्या आहेत याबद्दल माझी खात्री होऊन चुकली

आहे. ब्रिटिशांशीं संबंध आल्यापासून हिंदुस्थान पूर्वीं कधींहि नव्हता इतका सर्व बाजूंनीं दुबळा बनला. देशभक्ति हा या देशांत गुन्हा ठरविण्यांत आलेला आहे. आपल्या पाशवी शक्तीचें वारंवार प्रदर्शन करून आणि हिंदी लोकांची प्रतिकारक्षमता कमी करून आजच्या राज्यपद्धतीनें हिंदी जनतेला जवळजवळ पौरुषहीन करून सोडलें आहे.

राजद्रोहाच्या आरोपावरून मला या न्यायमंदिरांत उभें करण्यांत आलें आहे. राज्यपद्धतीविषयीं आपला असंतोष व्यक्त करणें हाहि या सरकारनें गुन्हा ठरविला आहे. हा गुन्हा माझ्यावर लादण्यांत आला हा मी माझा गौरव समजतों. पातकी दुर्जनांशीं अत्याचारांनीं मुकाबला करण्याची जगाची आजपर्यंतची रीत आहे. अत्याचारांनीं फार झालें तर मलमपट्टीचें काम होतें पण अहिंसेच्या आचरणानें रोगाचें समूळ उच्चाटन होतें अशी माझी दृढ श्रद्धा असल्यामुळेंच मी माझ्या देशबांधवांना अहिंसेचा दिव्य मंत्र सांगितलेला आहे. न्यायमूर्तींना व त्यांच्या सल्लागारांना मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, १२४ अ या कायद्याची अंमलबजावणी करणें हें पाप आहे व मी निरपराधी आहें असें त्यांना वाटत असेल तर त्यांनीं आपापल्या जागांचे राजीनामे देऊन पापाचे भागीदार होण्याचें टाळावें आणि जर हिंदी जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीनें आजची राज्यपद्धति व हा कायदा सर्वस्वीं योग्य आहे अशी त्यांची भावना असेल तर या कायद्यांत सांगितलेली कठोरांतील कठोर शिक्षा त्यांनीं मला द्यावी.’

न्यायमूर्तींनीं गांधीजींना सहा वर्षें साध्या कैदेची शिक्षा दिली.

# ६

१९२२ सालअखेर सी. आर. दास यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या गया काँग्रेसमध्यें श्री राजगोपाळाचारी यांनीं मांडलेला कौन्सिल-बहिष्काराचा ठराव संमत झाला तेव्हां सी. आर. दास व पं. मोतीलाल नेहरू यांनीं उघड बंडाचें निशाण उभारलें व ता. १ जानेवारी १९२३ रोजीं आपल्या स्वराज्य पक्षाची राजरोस स्थापना केली. दास हे या पक्षाचे अध्यक्ष असून मोतीलाल हे कार्यवाह होते. स्वराज्य अधिक लौकर मिळविण्यासाठींच त्या पक्षाची स्थापना करण्यांत आली असल्याचें निवेदन त्यांनीं प्रसिद्ध केलें. त्यावर्षीं मे महिन्यांत भरलेल्या ऑ. इं. काँ. कमिटीच्या सभेंत स्वराज्य पक्षासंबंधानें नापसंती व्यक्त करण्यांत येऊन दास यांना राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यांच्या जागीं डॉ. अन्सारी यांची निवड करण्यांत येऊन कार्यवाहाच्या कामावर पं. जवाहरलाल नेहरु यांची योजना झाली. पण नंतर नागपूर येथें झालेल्या सदर कमिटीच्या बैठकींत मौ. अबुल कलम आझाद यांस अध्यक्ष या नात्यानें निवडण्यांत आलें.

फेर-नाफेरवाल्यांची रस्सीखेंच सुरू होऊन फेरवाल्यांचा जोर होऊं लागला. १९२३ च्या सप्टेंबरमध्यें दिल्लीस भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनांत निवडणुकी लढविण्यास फेरवाल्यांना परवानगी देण्यांत आली.

त्याच सालीं खिलाफतीचा प्रश्न तुर्कांनीं स्वतःच सोडविला. हिंदुस्थानांतील मुसलमानांनीं त्यासंबंधानें कांहींहि चळवळ केली तरी त्याचा कांहींहि परिणाम होणार नसल्याचें स्पष्ट झालें. हिंदुमुसलमानांच्या

एकीच्या भावनेला तडा पडला. मोठाल्या शहरांतून त्या दोन जमातींत दंगे सुरू झाले. जातीय वादानें पछाडलेले लोक आपलीं डोकीं वर काढूं लागले. दहशतवादीहि जोरावर येऊं लागले. असहकारवादाची पिछेहाट झाल्याचा भास होऊं लागल्यामुळें विधायक कार्यावरील लोकांची निष्ठाहि बऱ्याच प्रमाणांत डळमळूं लागली.

तुरुंगांत गांधीजींना अपेंडिसायटिसचा विकार झाल्यामुळें ता. ११ जानेवारी १९२४ रोजीं त्यांना पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. ऑपरेशन यशस्वी झाल्यावर ता. ५ फेब्रुवारीला त्यांची बिनशर्त मुक्तता झाली. ता. १० मार्च रोजीं ते विश्रांतीसाठीं जुहू येथें येऊन राहिले. त्याच दिवसापासून हिंदी पुढाऱ्यांचें जुहू हें पवित्र तीर्थाचें स्थान होऊन बसलें.

गांधीजींनीं शस्त्रक्रिया करून घेतली म्हणून कांहीं लोक त्यांच्या आचारविचारांतील विसंगतीबद्दल त्यांना दोष देऊं लागले. तेव्हां ते म्हणाले, 'पूर्णत्वाला जाण्याचा मार्ग मला माहीत आहे पण मी अजून त्या अवस्थेला पोहोंचलों नाहीं. मी स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार झालों तो माझ्या मनाच्या दुबळेपणामुळेंच होय असें मला वाटतें. माझ्या ठिकाणीं जर अहंकाराचा लेशहि नसता तर केवळ परमेश्वरी इच्छेवर विसंबून मी स्वस्थ राहूं शकलों असतों. पण याच शरिरानें जिवंत राहण्याच्या मोहाला मी बळी पडलों. माणसानें सतत परिश्रम व परमेश्वराची उपासना करून आपली उन्नति करून घेतली पाहिजे.'

आपल्या पक्षाला गांधीजींचा आशीर्वाद मिळविण्यासाठीं दास व मोतीलाल नेहरु जुहूला आले. त्यांनीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली पण त्यांना यश आलें नाहीं.

दास व मोतीलाल नेहरु यांच्या महनीय नेतृत्वाखालीं, कायद्याच्या चौकटींत राहून जें कांहीं मिळवितां येणें शक्य होतें तें स्वराजिस्टांनीं

मिळविलें. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व नगरपालिकांचीं अध्यक्षपदें कॉंग्रेसजनांनीं भूषविलीं. असें असलें तरी कायदेमंडळें व म्युनिसिपालिट्या यांतील कार्यामुळें प्रत्यक्ष फळ हातीं येण्याचा रंग दिसेना. देशांतील सर्वसामान्य जनतेंत एक प्रकारची वैफल्याची भावना निर्माण होऊन नेतृत्वासाठीं ती पुन्हा गांधीजींकडे पाहूं लागली.

हिंदुमुसलमानांच्या दंग्यांसंबंधानें मौ. शौकत अलींशीं बोलतांना गांधीजी म्हणाले, 'या दोन जमातींत सरळ सरळ लढाई झाली तर त्याला माझी मुळींच हरकत नाहीं. पण आज चालला आहे तो सगळा नामर्दपणा आहे. दगड मारून किंवा खून करून पळून जायचें, न्यायालयांत खोट्या तक्रारी नोंदवून बनावट साक्षीदार तयार करावयाचे, हा केवळ नामर्दपणा नव्हे तर काय ?'

सरकारनें स्वराज्य पक्षाविरुद्धहि मोहीम सुरू केल्यावर फेरवाले व नाफेरवाले या दोघांनींहि राष्ट्रीय सभेंत राहून आपापलें कार्य करावें, कॉंग्रेसमधील कोणत्याहि लहानमोठ्या अधिकारावर असलेल्या व्यक्तीला दर महिन्याला दोन हजार वार सूत कांतण्याचें बंधन असावें, वगैरे गोष्टी ठरविण्यांत आल्या.

ता. २६ डिसेंबर १९२४ रोजीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन गांधीजींच्या अध्यक्षतेखालीं बेळगांव येथें झालें. दुसऱ्या दिवशीं हिंदुमहासभेचें अधिवेशनहि त्याच मंडपांत पं. मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें. आपल्या भाषणांत ते म्हणाले, 'राष्ट्रीय सभेला कोणाहि हिंदूनें विरोध करणें हें लज्जास्पद आहे. राष्ट्रीय सभेला पूरक म्हणून काम करून तिला अधिक बलशाली करणें हाच हिंदुमहासभेचा उद्देश आहे. राष्ट्रीय सभा ही राजकीय संस्था असल्यामुळें राजकारणाशीं संबंध नसलेल्या किंवा सामाजिक स्वरूपाच्या समस्या तिला हातीं घेतां येत नसल्यामुळेंच हिंदुसभा जन्माला आलेली आहे.'

काँग्रेसमधील दोन्हीं गटांत एकी प्रस्थापित करण्याची गांधीजींना अतिशय आतुरता लागून राहिली असल्यामुळें वर्किंग कमिटीच्या सभासदांत स्वराज्य पक्षाचे पुढारी बहुसंख्येनें घेण्याचें त्यांनीं ठरविलें. ऑ. इं. काँ. कमिटीच्या कार्यवाहाच्या जागीं पं. जवाहरलाल नेहरु यांची योजना करण्यांत आली.

ता. १६ जून १९२५ रोजीं देशबंधु दास निधन पावले. त्यांच्या स्मारकासाठीं गांधीजींनीं फंड सुरू केला आणि दोन महिन्यांच्या अवधींत दहा लाख रुपये जमा करून त्यांचें स्मारक म्हणून त्यांच्या रहात्या बंगल्याचें स्त्रिया व मुलें यांच्या इस्पितळांत रूपांतर केलें.

कलकत्त्याच्या ओव्हर्टन हॉलमध्यें भाषण करतांना गांधीजी म्हणाले, 'इंग्रज राज्यकर्त्यांविषयीं व सडून गेलेल्या त्यांच्या राज्ययंत्राविषयीं मी जितकें जळजळीत भाषेंत बोललों आहें तितकें निदान हिंदुस्थानांत तरी दुसरा कोणी बोललेला नाहीं. तरीहि मी असें अभिमानानें सांगतों कीं, माझ्या मनांत कोणाहि इंग्रज माणसाबद्दल यत्किंचितहि द्वेष नाहीं. मी कोणाहि माणसावर प्रेम करतों तें केवळ त्याच्या सद्गुणांकडे पाहून नाहीं. त्याच्या अंगांतील दुर्गुण मला माहीत असूनहि मी त्याच्यावर प्रेम करूं शकतों. या क्षणाला सुद्धां इंग्रज सरकारला मी सैतानी सरकारच म्हणतों आणि तरी सुद्धां इंग्रज माणसाला शासन करणें हें मी उचित मानीत नाहीं. असहकार करावयाचा तो दुर्गुणाशीं—दुर्गुणी माणसाशीं नव्हे! राष्ट्रीय वृत्ति अंगीं बाणावयाला द्वेषाची यत्किंचितहि आवश्यकता नाहीं. माझ्यापुरतें बोलावयाचें तर मी असें स्पष्ट सांगतों कीं, हिंदुस्थान स्वतंत्र होणें याचा अर्थ जर इंग्लंडनें जलसमाधि घेणें किंवा पृथ्वीतलावर एकहि इंग्रज मनुष्य जिवंत न रहाणें असा असेल तर तें स्वातंत्र्य मला मुळींच नको. पण इंग्रज राज्यकर्त्यांनीं आमच्यावर

लादलेली स्मशानशांतता आणि दिलेली सढवाईची सावली पाहून मात्र माझ्या अंगाचा तिळपापड उडतो.'

थोड्याच अवधींत स्वराज्यपक्षांत दुफळी झाली. त्या पक्षांतील कित्येक पुढारी प्रतियोगी सहकारितेची भाषा बोलूं लागले.

आपले इतर सारे व्याप संभाळून 'सत्याचे प्रयोग' या आपल्या ग्रंथाच्या लेखनाची जबाबदारीहि गांधीजींनीं आपल्या अंगावर घेतली आणि दर आठवड्याला त्या ग्रंथाचें एक प्रकरण लिहिण्याचें बंधन त्यांनीं स्वतःवर घालून घेतलें. आश्रमांतील कांहीं तरुणतरुणींच्या हातून थोडेंफार शिस्तबाह्य वर्तन झाल्यामुळें गांधीजींनीं सात दिवसांचा उपवास केला. मुलांना सुधारण्यासाठीं त्यांना शिक्षा न करतां ती स्वतःला करून घेण्याच्या तंत्राचा ते अवलंब करीत. कोणीहि कोणत्याहि कारणासाठीं उपवास केल्यास त्याच्या मार्गदर्शनासाठीं त्यांनीं सूचना केल्या या अशा : प्रारंभापासून शारीरिक व मानसिक शक्तीची शक्य तितकी बचत करावी. उपवास सुरू असतांना कसल्याहि प्रकारच्या अन्नाचा विचारहि मनांत आणूं नये. सोडा किंवा मीठ घालून किंवा नुसतें पाणी शक्य तितकें प्यावें. मात्र एका वेळीं खूप पाणी पिऊं नये. दररोज कोमट पाण्यानें अंग पुसून स्वच्छ करावें. दररोज एनिमा घ्यावा. शक्य तों उघड्या जागेंत निजावें. सकाळच्या वेळीं सूर्याचे किरण अंगावर घ्यावे. स्वतःच्या उपवासाचा विचार चुकूनहि मनांत आणूं नये. शक्य तों सर्व वेळ ईशचिंतनांत घालवावा.

स्वराज्यपक्षाच्या कांहीं सभासदांनीं पक्षाचा राजीनामा देऊन असेंब्लींतील आपल्या जागा मोकळ्या केल्या व त्यांनीं प्रतियोगी सहकारितेची चळवळ करण्याचें ठरविलें.

गांधीजींच्या आत्मचरित्राचें एक प्रकरण यंग इंडिया व नवजीवनच्या प्रत्येक अंकांत क्रमशः प्रसिद्ध होऊं लागलें. बहुतेक सर्व भाषांतील

वृत्तपत्रें त्यांतील मजकूर उद्धृत करूं लागलीं. गांधीजींनीं कोणासहि बंदी केली नाहीं.

ता. १४ फेब्रुवारी १९२६ रोजीं अकोला येथें प्रतियोगी सहकारिता पक्षाची प्रतिष्ठापना होऊन बॅ. जयकर हे त्याचे अध्यक्ष निवडले गेले. पं. मालवीय व लाला लजपतराय यांनीं आपला स्वतंत्र काँग्रेस पक्ष स्थापन केला. हा पक्ष केवळ हिंदूसाठींच असून त्याचें हिंदुसभेशीं हरएक बाबतींत सूत असे. जातीयवादानें चांगलेंच मूळ धरलें. स्वराज्यपक्षाचा धुव्वा उडून मद्रासखेरीज बाकीच्या सर्व प्रांतांत प्रतिसहकारवाद्यांचे उमेदवार निवडून आले. निवडणुकीच्या वेळीं हिंदु व मुसलमान पुढाऱ्यांनीं बेफाट वृत्तीनें केलेल्या प्रचाराचे परिणाम लौकरच दिसूं लागले. ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांचे दंगे होऊं लागले—एका वर्षाच्या अवधींत अशा प्रकारचे पसतीस दंगे झाले!

गांधीजींनीं खादीप्रसाराचें काम सुरू केलें. खादीचें महत्त्व जनतेला पटवून देतांना ते म्हणत, 'कौन्सिलप्रवेशाला मी महत्त्व देत नाहीं. हिंदुस्थान म्हणजे त्याच्यांतील दहावीस शहरें नव्हत. हिंदुस्थानांतील सात लक्ष खेडीं हेंच खरें हिंदुस्थान आहे. प्रत्येक खेडुताला—मग तो हिंदु असो वा मुसलमान असो, पुरुष असो किंवा स्त्री असो, वृद्ध असो किंवा बालक असो,—आपल्या देशासाठीं करतां येईल अशी गोष्ट चरख्यावर सूत काढण्याशिवाय दुसरी कोणतीहि नाहीं. हिंदुस्थानाची खरी उन्नति जर शहरांतून न होतां खेड्यांतून व्हावयाची असेल तर त्याला चरख्याशिवाय अन्य उपायच नाहीं.'

खादीच्या प्रसारासाठीं त्यांनीं तुफानी दौरा काढला. खानदेशाच्या दौऱ्यांत एकदोन ठिकाणीं त्यांना टिळक स्वराज्य फंडाविषयीं कांहीं प्रश्न विचारण्यांत आले. तेव्हां खुलासा करतांना गांधीजी म्हणाले, 'या फंडाचा पैन् पै हिशेब लिहिलेला असला तरी त्यांत बारीक-

सारीक गफलती झालेल्या आहेत हें कांहीं खोटें नाहीं. जगांत निदान मला तरी अशी एकहि मोठी संस्था माहीत नाहीं कीं जींत शंभर टक्के कार्यकर्ते प्रामाणिक आहेत. काँग्रेसहि याला अपवाद नाहीं. एखाद्या अत्यंत जागरूक अशा व्यापाऱ्याला सुद्धां क्वचित् प्रसंगीं थोडीफार तूट सोसावी लागते—इतक्याच अल्प प्रमाणांत या फंडांत गफलत झालेली आहे. हिशेब लिहिण्यांत व ते तपासून घेण्यांत पराकाष्ठेची काळजी घेतली जात असतांहि ती घडलेली आहे. काँग्रेसचे चिटणीस पं. जवाहरलाल नेहरु व खजीनदार श्री जमनालाल बजाज या दोघांचेंहि चारित्र्य संशयातीत आहे. या फंडाच्या साहाय्यामुळें फार मोठें राष्ट्रकार्य साधलेलें आहे. या फंडाची मदत नसती तर राष्ट्रीय सभेला आज प्राप्त झालेलें हें विराट स्वरूप प्राप्त होणें अशक्य होतें.'

रत्नागिरीस गेले असतांना ते म्हणाले, ' लोकमान्यांची ही जन्मभूमि हें माझेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील आम जनतेचें पवित्र तीर्थस्थान आहे. लोकमान्यांनीं दिलेला मंत्र मी जितक्या प्रमाणांत आचरणांत आणीत आहें तितक्या प्रमाणांत त्यांचा दुसरा कोणताहि अनुयायी आणीत नसेल. कारण, स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे व तो मिळविणें हें आपलें पवित्रतम कर्तव्य आहे हें मला माहीत आहे. कोणी मला विचारतात कीं, जर तुमच्या या चरख्यांत कांहीं अर्थ असेल तर लोकमान्यांनीं त्याचा संदेश आम्हांला कसा दिला नाहीं ? याला माझें उत्तर असें आहे कीं लोकमान्यांनीं प्रवर्तित केलेल्या स्वदेशीमध्यें खादीला स्थान नव्हतें कीं काय ? पित्याकडून मिळालेल्या मिळकतींत जो अधिक भर टाकणार नाहीं तो पुत्र कसला ? वादासाठीं क्षणभर आपण असेंहि धरून चालूं या कीं, खादीची कल्पना सुद्धां लोकमान्यांना शिवली नव्हती ! पण एखादी चांगली गोष्ट लोकमान्यांना सुचली नाहीं एवढ्यासाठींच ती त्याज्य समजावयाची कीं काय ?' रत्नागिरीच्या

मुक्कामांत गांधीजींनीं स्वातंत्र्यवीर सावरकरांची त्यांच्या निवासस्थानीं जाऊन भेट घेतली.

तामीळनाडच्या आपल्या दौऱ्यांत ते श्रोत्यांना म्हणत, 'रामनामाला एवढें सामर्थ्य कशामुळें प्राप्त झालें? ज्यांनीं आपणाला रामनाम दिलें त्या ऋषींच्या तपश्चर्येच्या पुण्याईमुळें! खादीचा प्रचार करणारांनीं तपश्चर्या केली पाहिजे असें मी नेहमीं म्हणत असतों तें याचसाठीं. तपश्चर्येचें बळ त्यांच्या पाठीशीं असल्याशिवाय खादीला अवश्य तें सामर्थ्य प्राप्त होणें अशक्य आहे. सत्याग्रहाचें शस्त्र ज्याप्रमाणें सर्वसाधारण शस्त्रापासून सर्वस्वीं भिन्न आहे त्याचप्रमाणें खादी ही सुद्धां इतर सर्व व्यापारी वस्तूंहून निराळी चीज आहे.'

याच सुमारास मिस् मेयोचें 'मदर इंडिया' हें पुस्तक प्रसिद्ध झालें. सदर पुस्तकांत लेखिकेनें हिंदी लोकांची भरमसाट टिंगल केली होती. सदर पुस्तकावर आपला अभिप्राय व्यक्त करतांना गांधीजी म्हणाले, 'हिंदुस्थान देश म्हणजे एक अतिप्रचण्ड गटार आहे असें भासविण्याचा या लेखिकेचा प्रयत्न दिसतो. असें असलें तरी वाईटांतूनहि चांगलें घेतां येतें या न्यायानें आपण आपल्यांतील व आपल्या समाजांतील दोष नष्ट करण्याचा भगीरथ प्रयत्न केला पाहिजे. या पुस्तकाचा कितीहि धिःकार केला तरी तो अपुराच होईल हें खरें असलें तरी तसा धिःकार करतांना आपण हिंदी लोक म्हणजे सर्व सद्गुणांचे मूर्तिमंत पुतळे आहोंत असा खोटा अभिमान धरून जगाच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा प्रयत्न आपण करतां कामा नये. हंस दुधापासून पाणी वेगळें काढून शुद्ध दुधाचाच स्वीकार करतो. तसें करायला आपण शिकलें पाहिजे.'

गांधीजींनीं सीलोनचाहि दौरा काढला. तेथील व्यापारीवर्ग, मजूरवर्ग, बौद्धधर्मीय वगैरे निरनिराळ्या गटांसमोर त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर

व्याख्यानें दिलीं. सीलोन नॅशनल कॉंग्रेसपुढें भाषण करतांना त्यांनीं सांगितलें, 'स्त्रिया दागिने घालून नटतात त्या पुरुषांच्या डोळ्यांना सुख व्हावें म्हणून, असें मला समजलें आहे. मी स्त्री असतों तर स्त्रियांनीं पुरुषांच्या हातचें खेळणें बनण्याच्या या वृत्तीविरुद्ध मी बंडाचें निशाण उभारलें असतें. पुरुषांची गुलामगिरी स्वीकारणें हा कांहीं स्त्रियांचा धर्म नव्हे. स्त्रियांनीं अत्तरें किंवा सेंट वापरून आपल्या भोंवतालचें वातावरण सुगंधानें भारण्याऐवजीं आपल्या अंतःकरणांत ओथंबणाऱ्या सात्विक प्रेमभावनेनें अखिल मानवजातीला सुगंधानें न्हाऊं घातलें पाहिजे. स्त्री ही पुरुषाची माता आहे. पुरुष हा स्त्रीच्या रक्तामांसाचा अंश आहे. पुरुषांना कुमार्गावरून सन्मार्गावर आणण्याचा अधिकार स्त्रियांचा आहे.'

तेथून ओरिसांत आल्यानंतर, बहुजनसमाजांतील लोक आपल्या आजूबाजूलाहि फिरकत नसल्याचा त्यांना अनुभव आला. या परिस्थिती-विषयीं ऊहापोह करतांना ते म्हणाले, 'ओरिसांत आज जी नांदते आहे तिलाच स्मशानशांतता असें म्हणतात. माझ्याशीं दुरूनहि संबंध ठेवला तरी त्या पातकाबद्दल आपणाला शासन भोगावें लागेल अशी येथील लोकांना भीति वाटत आहे. ही घटना हिंदी जनता आणि परकी राज्यकर्ते या दोघांनाहि शरमेची आहे. राजे, जमीनदार व पोलीस हे आपल्याच रक्ताचे बांधव आहेत. पण लोकांना ही जी जरब बसली आहे तिचें मूळ परकी राज्यकर्त्यांच्या वृत्तींत आहे. या जरबेच्या पायावरच त्यांनीं आपल्या राज्ययंत्राची उभारणी केली आहे. पण आजच्या या लज्जास्पद प्रकाराला आपणच जबाबदार आहों. जर आपल्या अंगांत थोडाहि स्वाभिमान असता, जर भीतीचें भूत आपल्या मानेवर बसलेलें नसतें, तर आपली अशी स्थिति करण्याची राज्यकर्त्यांची काय छाती होती? भीतीसारखा दुसरा रोग नाहीं. रोग शरीर मारतो, पण भीति आत्माहि मारूं शकते.'

१९२८ च्या जानेवारी महिन्यांत गांधीजींचा क्रमांक तीनचा मुलगा रामदास याचा विवाह झाला. सदर विवाहसमारंभांत कोणत्याहि प्रकारचा डामडौल नव्हता, वाजंत्रीं नव्हतीं किंवा मेजवानीचा थाटहि नव्हता. अहेर म्हणून एक मंगलमाला, भगवद्गीता, आश्रम भजनावली व दोन टकळ्या या वस्तू गांधीजींनीं दिल्या तर मुलीच्या आईनें जांवयास एक चरखा दिला. मुलाला आशीर्वाद देतांना गांधीजी म्हणाले, 'तुझ्या पत्नीची प्रतिष्ठा संभाळण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे. तूं स्वतःला तिचा मालक न समजतां तिचा खराखुरा मित्र मानलें पाहिजे. तुम्ही दोघांनीं परस्परांकडे कामतृप्तीचें साधन अशा दृष्टीनें बघतां कामा नये. भगवद्गीता ही मला अमूल्य रत्नांची खाण वाटते. तुमच्या आयुष्यभर ती तुमचें मार्गदर्शन करो! सेवावृत्तीनें जगण्यासाठीं परमेश्वर तुम्हां उभयतांना उदंड आयुष्य देवो!'

भगवद्गीतेवर प्रवचन करतांना एकदां गांधीजी म्हणाले, 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न।' हें तर गीतेचें सारसर्वस्व आहे. पण निष्काम बुद्धीनें कर्म करीत रहाण्याची वृत्ति अंगीं बाणावयाची तर सत्य व अहिंसा हीं तत्त्वें मनांत ठाम ठसलेलीं असावीं लागतात, असें मला वाटतें. फलासंबंधींची आसक्ति नसेल तर असत्य व हिंसा यांचा मोहच कसा होईल? असत्य आणि हिंसा यांनीं युक्त असलेली कोणतीहि कृति घेतली तरी तिच्या मूळाशीं तुम्हांला फलाशाच आढळून येईल. अर्थात् अहिंसेचें तत्त्वज्ञान प्रतिपादण्यासाठीं गीतेचा जन्म झालेला नाहीं हें मला मान्यच आहे. जनतेला निष्काम कर्म करण्यास प्रवृत्त करण्यासाठींच गीतेचा जन्म झाला. असें असलें तरी एका विशिष्ट विषयावर सम्यक् भाष्य करणाराच्या मनांत इतर कोणत्याहि तत्त्वज्ञानाचा अभावच असतो असें थोडेंच आहे? गीतेचा जन्म होण्यापूर्वी यज्ञयागांत पशू बळी देण्याची प्रथा असली तरी गीतेंत या प्रकाराचा

उल्लेखहि आढळत नाहीं. मीं गेलीं चाळीस वर्षें सतत गीतेचा जो सूक्ष्म अभ्यास केला त्यावरून माझ्या मनाची अशी ठाम निश्चिती झाली आहे कीं, अहिंसेचें तत्त्व अंगांत पूर्णपणें बाणलें असल्याशिवाय निष्काम बुद्धीनें कर्म करतां येणें सर्वस्वीं अशक्य आहे.'

टॉलस्टॉयच्या श्राद्धदिनीं आपली श्रद्धांजलि अर्पण करतांना टॉलस्टॉयनें लिहिलेला 'THE KINGDOM OF GOD IS WITHIN YOU' हा ग्रंथ आपल्या वाचनांत आल्यानंतर हिंसेचा फोलपणा पटून आपण अहिंसेचे एकनिष्ठ उपासक बनलों असें त्यांनीं सांगितलें. टॉलस्टॉयच्या चरित्राचें मुख्य वैशिष्ट्य त्यांनीं असें सांगितलें कीं, त्यांच्या उक्तीबरहुकूम त्यांची कृति असे आणि सत्यासाठीं वाटेल तो त्याग करण्यास ते तयार असत. कोणाचेंहि वाईट चिंतणें, क्रोधाच्या आहारीं जाणें, द्वेषाला बळी पडणें या गोष्टी खऱ्या अहिंसावृत्तीला वर्ज्य असून सर्वांविषयीं प्रेमभाव हाच खऱ्या अहिंसावृत्तीचा स्थायीभाव आहे. अशा दृष्टीनें त्यांचें चरित्र आदर्शवत् होतें असेंच म्हटलें पाहिजे.

राजकारणांतील आपल्या भूमिकेचें स्पष्टीकरण करतांना ते म्हणत, 'माझ्यापुरतें बोलावयाचें तर स्वातंत्र्य म्हणजे काय हें मला समजत नसलें तरी इंग्रजांच्या गुलामगिरींतून मला मुक्त व्हावयाचें आहे. मग त्यासाठीं वाटेल ती किंमत पडो. इंग्रजांच्या गुलामगिरीच्या ऐवजीं मी बेबंदशाहीसुद्धां मोठ्या आनंदानें पत्करीन. कारण इंग्रजांनीं आपल्या देशांत प्रस्थापित केलेली शांतता ही खरी शांतता नसून स्मशानशांतता आहे. सबंध राष्ट्र जिवंत असून मेल्यासारखें असण्यापेक्षां दुसरी कोणतीहि परिस्थिति शतपटीनें बरी. इंग्रजांच्या सैतानी राजसत्तेनें या आपल्या सुंदर मातृभूमीचा भौतिक, नैतिक व आध्यात्मिक दृष्ट्या सर्वथैव नाश केलेला आहे. त्यांनीं उभारलेलीं न्यायमंदिरें न्यायाला धाब्यावर बसवून सत्याचा खून पाडीत असलेलीं रोजच्या रोज माझ्या डोळ्यांना दिसत

आहेत. तीस कोटी लोकांना गुलामगिरींत राबविण्यासाठीं इंग्रज राज्यकर्ते आपल्या लष्करावर इतका अफाट खर्च करीत आहेत कीं त्या खर्चापायीं माझ्या लक्षावधि देशबांधवांना अर्धपोटीं राहावें लागत आहे. अशी वस्तुस्थिति असली तरी कोणत्याहि परिस्थितींत अनत्याचारानें वागणें हेंच माझें व्रत आहे. माझा मार्ग आत्मक्लेशाचा आहे—दुसऱ्यांना चिरडण्याचा नाहीं. अहिंसेचा अर्थ पूर्णांशानें आकलन न होतांहि अखिल जनतेला व्रत म्हणून नाहीं तरी धोरण म्हणून अहिंसामार्गाचा स्वीकार करतां येईल अशी माझी खात्री आहे. नाहीं तरी बहुजनसमाजाला आपल्या कोणत्याहि कृतीचा खरा अर्थ समजत नसतोच.'

गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा झाली असतांना त्यांच्या प्रकृतीच्या निमित्तानें त्यांची सुटका मुदतीच्या पुष्कळच अगोदर करण्यांत आली होती. त्या सुटकेच्या वेळींच त्यांनीं असें ठरवून टाकलें होतें कीं, आपल्या मूळ शिक्षेची—सहा वर्षांची—मुदत पूर्ण होईपर्यंत आपण प्रत्यक्ष राजकारणांत भाग घ्यावयाचा नाहीं. ही मुदत १९२८ सालच्या मार्च महिन्यांत संपली व राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेण्यास ते मोकळे झाले.

## ७

सरदार वल्लभभाई पटेल यांनीं बार्डोलीच्या शेतकरीवर्गांत विलक्षण जागृति घडवून आणली होती. मुंबई सरकारनें बार्डोलींतील शेतकऱ्यांवर अन्याय्य व जुलमी कर लादले होते. शेतकऱ्यांना घाबरवून सोडण्यासाठीं सरकारनें बार्डोलींत दांडगे पठाण आणून त्यांच्याकडून त्यांची लूटमार चालविली. कर न देणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनींचे

लीलांव पुकारले जाऊं लागले. वल्लभभाई शेतकऱ्यांना सारखा धीर देत होते. 'सरकार त्याला वाटल्यास तुमच्या जमिनी इंग्लंडला घेऊन जाऊं दे–' असें ते शेतकऱ्यांना सांगत. शेतकरीवर्गांत काम करण्यासाठीं वल्लभभाईंनीं तयार केलेल्या सर्व म्हणजे अडीचशें शेतकऱ्यांना कडक शिक्षा ठोठावण्यांत आल्या. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे तेव्हांचे अध्यक्ष श्री विठ्ठलभाई पटेल यांनीं बार्डोली प्रकरणीं व्हाईसरॉयनें मध्यस्थी करावी असें सुचवून बार्डोलीच्या शेतकऱ्यांना स्वतःची मदत म्हणून दरमहा एक हजार रुपयांची देणगी देण्यास सुरुवात केली.

या प्रकरणीं चौकशीमंडळ नेमण्यांत येणार असल्याचें सरकारनें जाहीर केलें. गांधीजी बार्डोलीला गेले. सरकारनें लादलेला बावीस टक्के कर चौकशी मंडळानें ५·७ टक्क्यांवर आणला. बार्डोलीचा हा संपूर्ण विजय नसला तरी स्वतंत्रपणें चौकशी करून घेण्याचा हक्क तिनें निर्विवादपणें शाबीत केला.

हिंदी लोकांना कशी राज्यघटना पाहिजे तें त्यांनीं आम्हांला एकमुखानें सांगावें असें भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड वारंवार म्हणत असत. सर्व प्रमुख राजकीय पक्षांच्या सहकारानें मोतीलाल नेहरूंनीं एक अहवाल तयार केला. तो 'नेहरू रिपोर्ट' म्हणून प्रसिद्ध झाला. सदर रिपोर्टांत हिंदुस्थानसाठीं वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करण्यांत आलेली होती. मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघास त्यांत विरोध करण्यांत आला होता. मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत राखीव जागा ठेवण्यास त्यांत मान्यता देण्यांत आलेली होती. या रिपोर्टाला अलीबंधूंनीं जोराचा विरोध केला. पं. जवाहरलाल नेहरु व सुभाषचंद्र बोस यांना हा रिपोर्ट निराळ्या कारणांसाठीं मान्य नव्हता. म्हणून हा रिपोर्ट ऑ. इं. कॉं. कमिटीच्या संमतीसाठीं पुढें मांडतांना, इंग्रज सरकारनें दोन वर्षांच्या अवधींत या रिपोर्टास मान्यता न दिल्यास राष्ट्रीय सभेनें

असहकारितेची चळवळ सुरू करावी अशी पुस्ती जोडण्यांत आली. तरीहि जहाल गटाचें समाधान होईना. तेव्हां गांधीजींनीं ही मुदत एका वर्षावर आणली आणि मग त्यांचा ठराव संमत झाला. या ठरावाप्रमाणें सन १९२९ च्या डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत इंग्रज सरकारनें नेहरू रिपोर्टास मान्यता न दिल्यास गांधीजींना सत्याग्रह सुरू करणें भाग पडणार होतें. म्हणून तें साल उजाडल्याबरोबर ते राष्ट्राची तयारी करण्याच्या उद्योगास लागले. खादीचा सतत प्रचार करून परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याची चळवळ त्यांनीं प्रथम हातीं घेतली.

गांधीजींच्या तुफानी दौऱ्यामुळें जनतेंत विलक्षण जागृति झाली. बहिष्काराच्या चळवळीनें चांगलाच जोर धरला आणि देशांतील सर्व भागांत परदेशी कापडाच्या होळ्यांचा डोंब उसळला. गांधीजींचा दौरा ब्रह्मदेशांत चालू असतांना हिंदुस्थानांत एक नवीनच प्रकरण उपस्थित झालें. मुंबईच्या गिरणी कामगार यूनिअनचे बहुतेक पुढारी व बंगाल, युक्तप्रांत व पंजाब येथील प्रमुख कामगार पुढारी यांना अटक करण्यांत आली. बादशहाचें राज्य उलथून पाडण्याचा कट केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. या घटनेवर टीका करतांना गांधीजी म्हणाले, 'हा अनुभव आपल्याला कांहीं नवा नाहीं. अधूनमधून आपल्या पाशवी शक्तीचें प्रदर्शन करून हिंदी लोकांच्या मनांत भीति निर्माण करावयाची व आपले दाखवायचे दांत आंत ओढून घेऊन चावायचे दांत बाहेर काढावयाचे ही इंग्रज सरकारची नेहमींचीच नीति आहे. अर्थात् या सरकारच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें खटल्याचा देखावा उभारण्यांत येईलच. पण हे कामगार पुढारी शहाणे असतील तर आपल्या बचावासाठीं वकील उभे करून या देखाव्याला हातभार न लावतां मिळेल त्या शिक्षेला ते आनंदानें सादर होतील. कायदेशीरपणाच्या नांवाखालीं झोटिंगपाच्छाईचें थैमान घालणारें हें राज्ययंत्र असेंच चालू

राहिलें तर अशा रीतीनें तुरुंगभरती करण्याची पाळी माझ्या हजारों देशबांधवांवर लौकरच आल्याशिवाय राहाणार नाहीं.'

ता. ८ एप्रिल रोजीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत बॉंब टाकल्याबद्दल पंजाबचे भगतसिंग व बंगालचे कानपूरनिवासी बटुकेश्वर दत्त या दोघां तरुणांना अटक करण्यांत आली. ठिकठिकाणीं कामगारांचे संप होऊं लागले व त्यांच्या अनुषंगानें धरपकडीचें सत्र सुरू झालें.

गांधीजींच्या आंध्रच्या दौऱ्यांत त्यांना देण्यांत आलेल्या एका मानपत्रांत, प्रत्येकानें स्वतःला पुरेशी खादी निर्माण करावी असें सूचित करण्यांत आलें होतें. त्या मानपत्राला उत्तर देतांना गांधीजी म्हणाले, 'ही सूचना अज्ञानाची द्योतक आहे. प्रत्येकानें स्वतःपुरता तांदूळ पिकवावा अशा सूचनेप्रमाणेंच ही खादीबद्दलची सूचनाहि अंमलांत आणणें केवळ अशक्य आहे. दररोज आठ तास सूत कांतणारे लोक आज या देशांत लाखांनीं आहेत. त्यांनीं तयार केलेली सर्व खादी काय फक्त त्यांनींच वापरायची? त्यांची गरज भागून उरणारी खादी आपण खरेदी करणें हें इतर नागरिकांचें पवित्र कर्तव्यच आहे. मनुष्य हा पशूंप्रमाणें एकलकोंडेपणानें राहाणारा प्राणी नसून समाज करून राहाणारा आहे. स्वतंत्र राहाण्याचा माणसाला हक्क आहे त्याचप्रमाणें दुसऱ्या माणसांच्या उपयोगी पडणें हें त्याचें कर्तव्य आहे.'

शपथेसंबंधानें आपले विचार प्रकट करतांना एकदां गांधीजींनीं लिहिलें होतें, 'शपथेच्या बंधनाशिवाय जीवन म्हणजे नांगराशिवाय आगबोट किंवा आगबोट लागण्याकरितां बांधलेला वाळूचा धक्का होय. मनुष्य शीलवान बनण्याला शपथेचा फार चांगला उपयोग होतो. ज्या माणसाच्या शीलाविषयीं खात्री देतां येत नाहीं त्याच्यावर विश्वास ठेवायला कोण तयार होईल? एक काळ असा होता कीं, शीलसंपन्न माणसाच्या शब्दाला लेखी कराराइतकी किंमत होती. लाखों रुपयांचे

व्यवहार तोंडीं ठरत व ते न चुकतां पाळले जात. अशा प्रकारची शाश्वती नसती तर जगाच्या चिंधड्या उडाल्या असत्या. हिमालय स्थिर नसता तर हिंदुस्थानावर आपत्काल ओढवला असता. सूर्य, चंद्र वगैरे ग्रहांच्या भ्रमणांतहि नियमितपणा असतो. तसें नसतें तर आपणाला आपले व्यवहारच करतां आले नसते. आज युगानुयुगें सूर्य दररोज पहांटे उगवतो व सायंकाळीं मावळतो. चंद्राचा क्रमहि ठरलेलाच आहे; म्हणूनच आपल्या कोणत्याहि कृत्याला सूर्य–चंद्र साक्षीदार आहेत असें आपण म्हणतों. हाच नियम माणसालाहि लागू आहे. ज्याला आपल्या शपथेची किंमत वाटत नाहीं तो विश्वासाला पात्र ठरूंच शकत नाहीं. आपल्या मनाची ज्याला खात्री वाटत नाहीं तोच शपथ घेतांना कचरतो. मला जमेल तितकी सावधगिरी मी बाळगीन असें म्हणणाऱ्या सेनापतीवर कोण कसा विसंबूं शकेल ?

जी शपथ पाळण्याचें सामर्थ्य आपल्यांत नाहीं अशी शपथ वहाणें हा केवळ अविचार आहे. आपण शपथ घेतांना ती कांहीं अपवादांसहित घेऊं शकतों. उदाहरणार्थ, आपण प्रवासांत किंवा आजारी नसूं तेव्हां दररोज एक तास सूत काढूं अशी कोणी शपथ घेतली तर त्यांत वावगें काय आहे ? कोणतीहि शपथ पाळावयास बिकट असण्यावर तिचें महत्त्व अवलंबून नसून ती आपण पाळलीच पाहिजे असा आपण जो निश्चय करतों त्यावर तिचें महत्त्व असतें.

संयमन हा शपथेचा आत्मा आहे. आपल्या मनाला लहर लागेल तसें आपण वागूं अशी कोणी शपथ घेतल्यास तिला काय अर्थ आहे ? तसेंच, एखादी अनीतीची गोष्ट करण्याची आपण शपथ घेतली असली तर तिचा शक्य तितक्या लौकर भंग करणें हेंच आपलें पवित्र कर्तव्य ठरत नाहीं काय ? ‘मी हें दुकान पांच वर्षें चालविण्याचा करार केलेला आहे, तेव्हां मी तो कसा मोडावा ?’ असें एखाद्या दारू-दुकानदारानें

विचारलें तर तें हास्यास्पदच नाहीं का? ज्या शपथेच्या पालनामुळें माणसाची अधोगति न होतां उन्नति होईल तीच खरी शपथ होय.'

जुलै महिन्यांत गांधीजी साबरमती आश्रमांत परत आले. त्या वर्षीच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षत्वाची जबाबदारी गांधीजींनीं स्वीकारावी असा अनेक लोकांचा आग्रह होता. पण ते म्हणाले,

'कॉंग्रेसच्या अध्यक्षानें करणें आवश्यक तीं कामें करण्याचें माझ्या अंगांत आतां त्राण उरलेलें नाहीं. तसेंच, काळाच्या ओघाबरोबर गति ठेवणेंहि मला जमत नाहीं. तेव्हां एका दृष्टीनें तरुण पिढी व मी यांच्यांत एक प्रकारची रेषा निर्माण झाली आहे. तरुण पिढीबरोबर काम करण्याची वेळ येईल तेव्हां मला त्यांच्या मागच्या रांगेंतच बसलें पाहिजे.

कॉंग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं आज अवश्य असलेले सर्व गुण पं. जवाहरलाल नेहरु यांच्या ठिकाणीं एकवटलेले आहेत. गेलीं कित्येक वर्षे कॉंग्रेसचा कार्यवाह या नात्यानें त्यांनीं आत्यंतिक निष्ठेनें व उत्कृष्ट रीतीनें काम केलेलें आहे. त्यांच्या अंगीं उत्कटत्वानें वसत असलेल्या शौर्य, निर्धारवृत्ति, योजकता, प्रामाणिकपणा, धडाडी इत्यादि बहुमोल सद्गुणांमुळें त्यांना देशांतील तरुणांचें नितांत प्रेम लाभलेलें आहे. कामकरी व शेतकरी या वर्गांशींहि त्यांनीं संपर्क राखलेला आहे. युरोपच्या राजकारणाचा त्यांचा सखोल अभ्यासहि आपल्या देशाच्या राजकारणाला उपकारक ठरल्याशिवाय राहाणार नाहीं.

कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, सध्यां आपल्याला फार नाजुक प्रश्न हाताळावयाचे आहेत. कॉंग्रेसच्या बाहेरील अनेक पक्षांशीं आपणाला वाटाघाटी करावयाच्या असून ब्रिटिश मुत्सद्यांशीं बोलणीं करण्याचा प्रसंगहि प्राप्त होणें अशक्य नाहीं. अजून आपण हिंदुमुसलमानांचा प्रश्न यशस्वीपणें सोडवलेला नाहीं. तेव्हां अशा परिस्थितींत मीच

पुढारी असावयास पाहिजे. पण जर माझ्या अंगीं कांहीं विशेष गुण असतीलच तर त्यांचा उपयोग अध्यक्षीय जबाबदारी माझ्या खांद्यावर नसली तरच मला अधिक चांगल्या प्रकारें करतां येईल. जोंपर्यंत जनतेच्या प्रेमाला व विश्वासाला मी पारखा झालेला नाहीं तोंपर्यंत मी कोणत्या तरी अधिकारपदावर नसलों तर माझ्या गुणांचा मला उपयोग करून घेतां येणार नाहीं, अशी भीति बाळगिण्याचें कांहींच कारण नाहीं. अधिकारपदावर नसतांनाहि १९२० सालापासून आतांपर्यंत देशाच्या जीवनाची दिशा आंखण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें मला दिलें. या कालावधींत फक्त एकच वर्ष मी कॉंग्रेसचा अध्यक्ष होतों. त्यावर्षी म्हणजे मला कांहीं विशेष सेवा करतां आली असें मला वाटत नाहीं.

माझे व जवाहरलालचे संबंध ज्यांना माहीत आहेत त्यांना हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं कीं, ते कॉंग्रेसचे अध्यक्ष असणें म्हणजे मीच अध्यक्ष असल्यासारखें आहे. आम्हां दोघांत कितीहि बौद्धिक मतभेद असले तरी आमचीं अंतःकरणें मात्र सर्वस्वीं एकरूपच आहेत. त्यांचें तरुण रक्त वारंवार उसळत असतें हें खरें असलें तरी ते शिस्तीचे मोठे भोक्ते असून अतिशय निष्ठावंत आहेत. या त्यांच्या गुणांमुळें कोणीहि त्यांच्यावर निर्धास्तपणें विश्वास टाकूं शकतो.

अखेरचा मुद्दा म्हणजे राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष हा कांहीं एखादा झोटिंगपादशहा नसतो. ज्या संस्थेला सुस्पष्ट अशी घटना आहे व जिचा विशिष्ट असा व सर्वांना उत्तम प्रकारें ज्ञात असा संप्रदायहि आहे त्या संस्थेचा तो प्रतिनिधि आहे. इंग्लंडच्या राजाला ज्याप्रमाणें आपलीं मतें किंवा आपला दृष्टिकोन आपल्या प्रजाजनांवर लादतां येत नाहीं तीच स्थिति राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचीहि आहे. राष्ट्रीय सभा ही पंचेचाळीस वर्षांची जुनी संस्था असून तिच्या बहुतेक मोठमोठ्या अध्यक्षांपेक्षांहि तिचा दर्जा अधिक श्रेष्ठ आहे. योग्य वेळीं इंग्रज मुत्सद्यांना

वाटाघाटी कराव्या लागतील त्या कॉंग्रेसशींच, ही गोष्ट आपल्यापेक्षांहि ते अधिक जाणून आहेत.

शौर्याच्या गुणांत जवाहरलालना कोणीहि मागें काढूं शकणार नाहीं. त्यांच्याहून अधिक प्रमाणांत देशावर प्रेम करणें कोणालाहि शक्य होईल असें मला वाटत नाहीं. ते फार उतावळ्या स्वभावाचे असून त्यांची धडाडी अनावर आहे याची कांहीं लोकांना भीति वाटते. पण आजच्या परिस्थितींत या त्यांच्या स्वभावविशेषामुळें त्यांच्या थोर योग्यतेंत अधिकच भर पडते असें मला वाटतें. त्याचबरोबर हेंहि विसरतां कामा नये कीं, त्यांच्या अंगीं वीरपुरुषाची धडाडी व उतावळे-पणा आहे तसेंच त्यांना मुत्सद्याचें डोकेंहि आहे. वृत्तीनें ते जहाल असून भविष्यकाळाचा विचार करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत वसत आहे. पण त्यांच्या अंगीं नम्रता व व्यवहारचातुर्यहि आहे. त्यांचें चारित्र्य स्फटिकासारखें निर्मळ आहे, त्यांची सत्यप्रियता संशयातीत आहे, त्यांच्या हातांत राष्ट्र निर्धास्त आहे.'

ता. २३ डिसेंबर रोजीं व्हाईसरॉयनें गांधीजी, मोतीलाल नेहरु, विठ्ठलभाई पटेल, तेजबहादुर सप्रू व जिना यांची एकत्र मुलाखत घेतली. पण व्हाईसरॉय कसलीहि हमी घेण्यास तयार होईनात आणि म्हणून वाटाघाटी फिसकटल्या.

१९२९ सालीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन लाहोर येथें पं. जवाहर-लाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं अतिशय तंग वातावरणांत सुरू झालें. सरहद्द गांधी खान अबदुल गफारखान आपल्या अनुयायांसह आले होते. मुसलमान जनता कायदेभंगाच्या चळवळींत सहकार्य करणार नाहीं हें ध्वनित करण्यासाठीं अलीबंधु आले होते. प्रतिनिधी व प्रेक्षक यांची संख्या तीस हजारांवर गेली होती.

स्वराज्य म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य असें स्वतः गांधीजींनीं जाहीर केलें.

स्वातंत्र्याचा ठराव जवळजवळ एकमतानें संमत झाला. ता. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीं बाराच्या ठोक्याला हा ठराव संमत झाल्याचें घोषित करण्यांत आलें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें प्रतीक असलेला तिरंगी झेंडा 'इन्किलाब झिंदाबाद,' 'क्रांति चिरायु होवो—,' अशा गगनभेदी आरोळ्यांत जवाहरलालांच्या हस्तें फडकविण्यांत आला.

या स्वातंत्र्याच्या घोषणेचे पडसाद सर्व जगभर उमटले. ता. ९ जानेवारी १९३० रोजीं, देशांतील अहिंसेचें वातावरण टिकून राहिल्यास, आपण सार्वत्रिक कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यास तयार असल्याची गांधीजींनीं घोषणा केली. गुजराथ विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांपुढें भाषण करतांना त्यांनीं सांगितलें, 'इंग्लंडनें हिंदुस्थानशीं असलेला आपला संबंध सोडला तर इथें बेबंदशाही माजून सर्वस्व-नाशाची पाळी येईल असा आम्हां हिंदी लोकांना धाक दाखविण्यांत येतो. पण मी अहिंसेचा एकनिष्ठ उपासक असूनहि असें स्पष्ट जाहीर करतों कीं, माझी मातृभूमि गुलामगिरींत खितपत पडलेली पहाण्यापेक्षां मी बेबंदशाहीलाहि आनंदानें सादर होईन. इतकेंच नव्हे तर हिंदु-मुसलमानांनीं एकमेकांच्या नरडीचा घोट घेतला तरीहि मला चालेल.

पण माझा आशावाद दुर्दम्य आहे. अहिंसेच्या मार्गानें हिंदुस्थान आपलें स्वातंत्र्य मिळवूं शकेल ही माझी श्रद्धा कशानेंहि ढळणें शक्य नाहीं. माझी तुरुंगांत रवानगी झाल्यास देशांत हिंसेच्या ज्वाला भडकण्याची भीति आहे. त्या ज्वालांत आत्माहुति देण्यास तुम्ही तयार असल पाहिजे. हिंसेचे उपासकहि तुमच्याकडून अशा प्रकारच्या त्यागाचीच अपेक्षा करीत असतील ही तुमची खात्री असूं द्या.'

एकदां गांधीजी असेंहि म्हणाले होते, 'हिंसेवर श्रद्धा बाळगणारा एक पक्ष आजहि या देशांत विद्यमान आहे. आपल्यापैकीं मोठ्यांतील मोठ्या देशभक्तांइतकाच त्यांचाहि देशाभिमान ज्वलंत आहे. इतकेंच

नव्हे तर त्यांच्या पाठीशीं फार मोठ्या त्यागाची पुण्याईहि आहे. साहसाच्या गुणासंबंधानें म्हणाल तर आपल्यापैकीं कोणीहि त्या गुणांत त्यांना मागें काढूं शकणार नाहीं. केवळ राणा भीमदेवी थाटाचीं भाषणें करणें म्हणजेच मोठा देशाभिमान असें समजणारांसंबंधानें मी अर्थातच हें बोलत नाहीं. देशाला स्वतंत्र करण्याच्या ध्येयानें प्रेरित होऊन त्यांच्यापैकीं ज्या स्त्रीपुरुषांनीं आपल्या सर्वस्वाचा त्याग केलेला आहे त्यांच्या संबंधानें मला आदर वाटत असला तरी त्यांच्या मार्गावर माझी श्रद्धा नाहीं. त्यांच्या त्या मार्गामुळें देशाचें अपरंपार नुकसान झालेलें आहे असें माझ स्पष्ट मत आहे. माझें हें विधान कदाचित् त्यांना पटणार नाहीं आणि पटलेंच तरी तसें कबूल करण्यांत त्यांना कदाचित् कमीपणा वाटेल. पण हें मात्र निश्चित कीं, कोणत्याहि प्रकारच्या तर्कशास्त्रानें त्यांचें समाधान करतां येणें अशक्य आहे. पण सत्याग्रहाला ते जरूर मानतील अशी माझी अपेक्षा आहे. देशांतील गुप्त चळवळींना पायबंद घालण्यास केवळ एक सत्याग्रहच समर्थ आहे असें मला वाटतें.'

ता. ६ जानेवारी रोजीं सर्व देशभर स्वातंत्र्याची प्रतिज्ञा जाहीर रीतीनें करण्याचा कार्यक्रम मुक्रर करण्यांत आला. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील सर्व शहरांतून व खेड्यांतून हजारोंच्या व लाखोंच्या संख्येनें स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचा जाहीरपणें उच्चार करण्यांत आला. हिंदुस्थानच्या वतीनें बोलण्याचा अधिकार फक्त काँग्रेसलाच आहे हें पुन्हा एकदां उत्कट रीतीनें सिद्ध झालें. गांधीजींनीं, त्यांच्या रिवाजाप्रमाणें, हिंदुस्थानचीं कांहीं गाऱ्हाणीं दूर करण्याबाबत व्हाईसरॉयला सुचविलें व तसें झाल्यास सत्याग्रहाचा अवलंब करण्याचें स्थगित करण्यांत येईल अशी ग्वाही दिली.

# ८

फेब्रुवारी महिन्यांत साबरमती येथें वर्किंग कमिटीची सभा झाली. सत्याग्रहाची चळवळ सुरू करण्यांत आल्यानंतर देशांतील एखाद्या भागांत अत्याचार घडले तरीहि ती चळवळ स्थगित करण्यांत येणार नाहीं अशी गांधीजींनीं घोषणा केली. सत्याग्रहाची ही चळवळ कशा प्रकारें सुरू करण्यांत येणार यासंबंधानें देशांत विलक्षण कुतूहल निर्माण झालें. प्रत्येक मनुष्याला हवापाण्याइतकीच मिठाचीहि आवश्यकता असते. टोलेजंग प्रासादांत निवास करणारा कोणी लक्ष्मीपुत्र असो किंवा जमिनीचें अंथरूण व आकाशाचें पांघरूण करून पडणारा एकादा भणंग असो, दोघांनाहि मिठाची जरुरी असतेच. अशा या मिठासारख्या वस्तूवर कर लादून इंग्रज सरकारनें आपल्या राक्षसी वृत्तीची परिसीमाच गांठली असल्याबद्दल गांधीजींनीं यंग इंडियांत टीकेचा भडिमार चालू केला. सत्याग्रहाच्या चळवळींत सामील होणाऱ्या स्वयंसेवकांनीं कशा प्रकारें वागावें हें सांगतांना गांधीजी म्हणत, प्रतिस्पर्धी कितीहि रागावला तरी त्यानें रागाला थारा देतां कामा नये. त्याला मारहाण करण्यांत आल्यास त्यानें प्रतिकार करतां कामा नये. परंतु त्याचबरोबर प्रतिस्पर्धी रागाच्या आवेगांत त्याच्यावर हुकमत गाजवूं लागला तर शिक्षेच्या भयानें त्यानें आपली मान लववितां कामा नये अगर कोणालाहि शिवीगाळ करतां कामा नये. इतकेंच नव्हे तर अशा गोष्टींपासून त्यानें स्वतःचा प्राण पणाला लावून प्रतिस्पर्ध्याचा बचाव केला पाहिजे. त्याला अटक होऊं लागल्यास त्यानें ती चुकविण्याचा प्रयत्न करतां कामा नये अगर त्याची मालमत्ता जप्त होण्याचा प्रसंग

आल्यास त्यानें त्या कामीं अडथळा निर्माण करतां कामा नये. पण जर तो एखाद्या मालमतेचा विश्वस्त असेल तर मात्र त्यानें प्राणपणानें त्या मालमत्तेचा बचाव करण्याची शिकस्त केली पाहिजे. त्यानें आपल्या पुढाऱ्याचे आदेश बिनतक्रार पाळले पाहिजेत. त्याला अटक करण्यांत आल्यावर कैदी या नात्यानें त्याची वागणूक आदर्श असली पाहिजे. आपल्या कुटुंबियांची तरतूद केली जाईल अशी अपेक्षा त्यानें बाळगितां कामा नये.

गांधीजींच्या पत्राला व्हाईसरॉयकडून प्रतिकूल जबाब आला. आपल्या आश्रमांतील सत्याग्रहींचा मोर्चा साबरमती आश्रमापासून दोनशें मैलांवर समुद्रकिनारीं असणाऱ्या दांडी या गांवीं नेण्याचें गांधीजींनीं मुक्रर केलें. ७९ सत्याग्रहींची पहिली तुकडी निश्चित करण्यांत आली. या पथकांत देशांतील सर्व भागांतील लोक असून त्यांत दोन मुसलमान, एक ख्रिस्ती, दोन हरिजन व बाकीचे स्पृश्य हिंदू होते. या तुकडींत सर्वांत लहान सत्याग्रहीचें वय १६ असून सर्वांत वडील सत्याग्रहीचें म्हणजे गांधीजींचें वय ६१ होतें.

ता. ७ मार्च रोजीं सरदार पटेलांना अटक झाली. ता. ९ मार्च रोजीं साबरमतीच्या आश्रमांत पाऊण लाख लोकांचा मेळावा जमला. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाहीं व सरकारलाहि स्वस्थता मिळूं देणार नाहीं अशी या सगळ्या लोकांनीं शपथ घेतली.

ता. १२ मार्च रोजीं सकाळीं साडेसहा वाजतां आपल्या ७८ सहकाऱ्यांसह गांधीजींनीं दांडी प्रयाणास प्रारंभ केला. आपला दंडा हातांत घेऊन गांधीजी एखाद्या नवजवानाच्या उत्साहानें सर्वांच्या अग्रभागीं चालत होते. स्वराज्य मिळवीपर्यंत मी आश्रमांत परत येणार नाहीं अशी घनघोर प्रतिज्ञा करून गांधीजी बाहेर पडले होते. वयाच्या

एकसष्टाव्या वर्षीं गांधीजींच्या अंगीं वसत असलेला उत्साह व जोम पाहून सारें जग आश्चर्यानें थक्क होऊन गेलें.

ते दररोज कमींत कमी दहा मैल चालत. सभांतून भाषणें करीत. प्रार्थनेंत कधींहि खंड पाडीत नसत. त्यांचें सूतकताईचें कामहि सुरू असेच. रोजनिशी लिहिण्याचें त्यांचें काम अव्याहत चालू होतें. ते सर्वांच्या अगोदर उठून आपला पत्रव्यवहार पुरा करीत. तेलाच्या अभावीं दिवा विझल्यास आपल्या लेखनाचें काम ते चांदण्यांच्या उजेडांत उरकून घेत. हा कार्यक्रम अनेकदां पहांटे चार वाजतां होई. आपल्या मदतीसाठीं ते कोणालाहि उठवीत नसत.

मोतीलाल व जवाहरलाल नेहरु गांधीजींना भेटण्यासाठीं जंबुसरला गेले. गांधीजींशीं विचारविनिमय केल्यानंतर मोतीलालजींनीं अलाहाबाद येथील आपलें प्रासादतुल्य निवासस्थान—'आनंदभवन' —'स्वराज्यभवन' या नांवानें राष्ट्राच्या सुपूर्द करण्याचें निश्चित केल.

ता. ५ एप्रिल रोजीं गांधीजी आपल्या सहकाऱ्यांसह दांडीला पोहोंचले. ता. ६ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां गांधीजींनीं समुद्रस्नान केलें आणि दोन्ही हातांनीं मीठ गोळा करून घेतलें. कायदेभंग करणाऱ्या सत्याग्रहींचा छळ करण्याची सरकारनें परमावधि केली. केवळ लाठ्यांचाच नव्हे तर पिस्तुलांच्या व बंदुकांच्या गोळ्यांचा त्यांच्यावर वर्षाव करण्यांत येत होता. गांधीजी म्हणत, हें बोलूनचालून समर आहे. यांत उतरलेल्या माणसानें या सर्व आपत्तींना हंसतमुखानें सादर झालेंच पाहिजे.

ता. १४ एप्रिलला जवाहरलालनां अटक झाली. जवळजवळ सबंध हिंदुस्थानभर सभाबंदीचा हुकूम जारी करण्यांत आला. सरकारच्या या दडपशाहीला उत्तर म्हणून सगळीकडे सत्याग्रहाच्या चळवळीचा वणवा भडकला. ता. ४ मे रोजीं गांधीजींना अटक झाली.

सारा हिंदुस्थान आसेतुहिमाचल हादरून गेला आणि सबंध देश एकसमयावच्छेदेंकरून सरकारच्या विरुद्ध उभा ठाकला. सोलापुरांत एक आठवडा जनतेचें राज्य स्थापन झाल्यासारखें झालें होतें. मैमनसिंग, कलकत्ता, कराची, लखनौ, मुलतान, दिल्ली, रावळपिंडी, पेशावर इत्यादि ठिकाणीं चळवळीचा जोर इतका विलक्षण वाढला कीं सरकारला आपल लष्कर, विमानें, रणगाडे, तोफा वगैरेंच्या साहाय्यानें आपलें संरक्षण करण्याची पाळी आली.

ता. २१ मे रोजीं दोन हजार सत्याग्रहींच्या पथकासह सरोजिनी नायडू धारास्ना येथील मिठागरावर चालून गेल्या. मुंबई येथें वडाळा येथील मिठागरावर अशाच प्रकारचा सत्याग्रह करण्यांत आला. दोन्ही ठिकाणीं सरकारनें अनन्वित प्रकार केले. सत्याग्रहाच्या या चळवळी-बरोबरच परदेशी कापडाच्या दुकानांवर व दारूच्या गुत्त्यांवर स्त्रिया सतत निरोधन करीत होत्या. परदेशी कापडाची नेआण करणाऱ्या लॉऱ्यांसमोर स्वयंसेवक बिनदिक्कत आडवे पडत व त्यांतील विदेशी माल पुन्हा दुकानांत नेऊन ठेवणें भाग पाडीत. परदेशी मालाला गिऱ्हाईक मिळेनासें झालें. प्रभातफेऱ्यांची एकच धमाल सुरू झाली. खादीचा खप एवढा वाढला कीं कोणत्याहि खादीभांडारांत एक वार खादीहि शिल्लक राहिली नाहीं. वऱ्हाड-मध्यप्रांतांत जंगल सत्याग्रहाची चळवळ जोरांत सुरू झाली.

कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीला बेकायदेशीर ठरविण्यांत आलें. तुरुंगांत सत्याग्रहींची एवढी भयंकर गर्दी झाली कीं, त्यांना जागा करून देण्यासाठीं सरकारला ठिकठिकाणच्या बदमाष गुन्हेगारांना मुदतीपूर्वींच मुक्त करावें लागल! सरकार व कॉंग्रेस यांच्यांत तडजोड घडवून आणण्यासाठीं सप्रू व जयकर यांनीं प्रयत्न सुरू केले.

हिंदुस्थानांत सत्याग्रहाची चळवळ व सरकारची दडपशाही चालू

असतांनाच ता. १२ नोव्हेंबर १९३० रोजीं इंग्लंडमध्यें गोलमेज परिषदेचें नाटक सुरू करण्यांत आलें. जानेवारी १९३१ च्या अखेरीस, कोणताहि महत्त्वाचा निर्णय न घेतां सदर परिषद स्थगित करण्यांत आली. ता. २५ जानेवारी १९३१ रोजीं गांधीजी व वर्किंग कमिटीचे सभासद यांची मुक्तता करण्यांत येऊन वर्किंग कमिटीवर मारण्यांत आलेला बेकायदेशीरपणाचा शिक्का काढून घेण्यांत आला. ता. ६ फेब्रुवारी रोजीं मोतीलाल नेहरु कालवश झाले. व्हाईसरॉय गांधीजींशीं वाटाघाटी करण्यास तयार झाल्यामुळें गांधीजी दिल्लीला गेले. ता. ४ मार्च रोजीं त्यांच्यांत समेट घडून आला व ता. ५ रोजीं सदर समेटाच्या मसुद्यावर गांधीजी व व्हाईसरॉय आयर्विन यांच्या सह्या झाल्या. या समेटान्वयें सत्याग्रहाची चळवळ स्थगित करण्यांत आली.

मुंबई येथें कामगार विभागांत एकदां गांधीजींचें व्याख्यान चालू असतांना कांहीं समाजसत्तावाद्यांनीं आपलें लाल निशाण व्यासपीठावर लावलें. तेव्हां गांधीजी म्हणाले, ‘स्वतःला समाजसत्तावादी म्हण-विणारांच्या पुढाऱ्यांचा जन्महि झालेला नव्हता तेव्हांपासून कामगारांच्या वतीनें मीं झगडे उभारले आहेत. मी तुमच्याकडून इतर कसली नाहीं तरी सभ्यपणाची अपेक्षा करतों. तुम्ही स्वतःला समाजसत्तावादी म्हण-वितां पण त्याप्रमाणें तुम्ही आपलें जीवन जगत नाहीं. तें जीवन मी जगत आहें. समाजसत्तावादाला सभ्यतेचें वावडेंच असलें पाहिजे असें तुम्ही समजत असाल तर ही तुमची भूल आहे. मी व्हाईसरॉयशीं केलेल्या करारामुळें कामगारवर्गाचें काडीइतकेंहि नुकसान झालेलें आहे असें मला वाटत नाहीं. माझ्या कोणत्याहि चळवळीमुळें अगर मी केलेल्या कोणत्याहि कृतीमुळें एकाहि कामगाराचें जरासुद्धां नुकसान झालेलें नाहीं किंवा होणार नाहीं. जर कॉंग्रेसनें गोलमेज परिषदेला आपले प्रतिनिधी पाठवलेच तर ते कामगार आणि शेतकरी यांना उपयुक्त असलेल्या

स्वराज्यावांचून अन्य कशाचीहि मागणी करणार नाहींत. समाजसत्तावाद्यांचा पक्ष जन्मालाहि आला नव्हता तेव्हांपासून कामगार व शेतकरी यांना उपयुक्त अशा स्वराज्याचीच कॉंग्रेस मागणी करीत आलेली आहे. तुमच्या या कामगारांना दरमहा वीस रुपये तरी मिळत असतील. पण ज्यांना एक छदामहि मिळत नाहीं आणि जे नेहमींच अर्धपोटी असतात अशांसाठीं स्वराज्य संपादन करण्याची माझी धडपड चाललेली आहे. हें मात्र खरें कीं भांडवलदारांना मी आपले शत्रू मानीत नाहीं. त्यांच्या केसालाहि धक्का लावण्याचा विचार माझ्या मनाला या क्षणापर्यंत शिवलेला नाहीं. माझी महत्त्वाकांक्षा ही आहे कीं, मी हाल सोसून त्यांची सदसद्विवेकबुद्धि जागृत करावी आणि आपल्याच हाडामांसाच्या बंधुभगिनींशीं न्यायानें वागण्याची सुबुद्धि त्यांच्या मनांत निर्माण व्हावी. भांडवलदार झाले तरी तींहि माणसेंच आहेत आणि माझ्या या कष्टांचा परिणाम त्यांच्यावर झाल्याशिवाय राहाणारच नाहीं अशी माझी बालंबाल खात्री आहे. गेल्या कायदेभंगाच्या चळवळींत कित्येक भांडवलदार सामील झाले, त्यांनीं अलौकिक त्याग केला, भयंकर प्रकारचे कष्टहि सहन केले. त्यांच्या तुम्ही काय मुंड्या मुरगळणार आहांत? आपणा सर्वांचें जें एकच ध्येय आहे तें गांठण्याच्या कामीं ते तुमच्या खांद्याला खांदा लावून लढायला तयार असले तरीहि त्यांना लाथ मारून तुम्ही दूर सारणार आहांत? या ठिकाणीं मी तुम्हाला निःसंदिग्ध भाषेंत असें जाहीर आश्वासन देतों कीं, जर कॉंग्रेसनें आपले प्रतिनिधी गोलमेज परिषदेला पाठविलेच तर ते आपल्याला पाहिजे आहे तें तरी घेऊन येतील किंवा कांहींच आणणार नाहींत.’

ता. १९ मार्च रोजीं गांधीजींनीं व्हाईसरॉयची पुन्हा मुलाखत घेतली व राजबंदीच्या मुक्ततेचा प्रश्न धसाला लावला. भगतसिंग व

त्याचे सहकारी यांची फांशीची शिक्षा रद्द करण्यासंबंधानेंहि गांधीजींनीं खूप रदबदली केली पण या बाबतींत त्यांना यश मिळूं शकलें नाहीं व ता. २३ मार्चच्या रात्रीं भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांना फांशीं देण्यांत आलें. सर्व देशभर हरताळ पाळण्यांत आला. गांधीजी म्हणाले, 'भगतसिंगानें दाखविलेल शौर्य आणि केलेला त्याग पाहून कोणाचेंहि मस्तक आदरानें विनम्र झाल्याशिवाय राहाणार नाहीं. पण मला त्याच्याहूनहि अधिक शौर्य दाखविणारे लोक हवे आहेत. कोणाचाहि घातपात न करतां, अहिंसाधर्माचें व्रत घेऊन हंसतमुखानें फांसावर चढणारे वीर मला पाहिजे आहेत.'

ता. २९ मार्च रोजीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन कराची येथें सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. कोणत्याहि स्वरूपांतील राजकीय अत्याचार कॉंग्रेसला संमत नसला तरी भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांनीं दाखविलेल्या शौर्याबद्दल व केलेल्या त्यागाबद्दल ही कॉंग्रेस आपला आदर व्यक्त करीत असून त्यांची शिक्षा रद्द करून हिंदुस्थानच्या जनतेची सद्भावना मिळविण्याची आलेली ही सुवर्णसंधि सरकारनें गमावली असल्याचें आपल मत जाहीर करीत आहे अशा आशयाचा ठराव संमत करण्यांत येऊन कॉंग्रेसचें ध्येय पूर्ण स्वराज्य असल्याचें पुन्हा एकदां घोषित करण्यांत आलें. गोलमेज परिषदेसाठीं कॉंग्रेसतर्फे पाठविण्यांत येणाऱ्या प्रतिनिधींनीं गांधीजींच्या पुढारीपणाखालीं काम करावें असें ठरलें.

लॉर्ड आयर्विन यांच्या मागून आलेल्या लॉर्ड विलिंग्डन यांच्या सरकारनें गांधी-आयर्विन करारांतील कलमांचा भंग करण्याचा जणुं विडाच उचलला होता. ऑगस्ट महिन्यांत गांधीजींनीं सिमला येथें नव्या व्हाईसरॉयची मुलाखत घेतली. गांधी-आयर्विन करारास पुन्हा एकवार मान्यता देण्यांत आली. ता. २९ ऑगस्ट रोजीं मुंबईहून

सुटणाऱ्या राजपुताना या बोटीनें गांधीजी काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधि म्हणून गोलमेज परिषदेला उपस्थित राहाण्यासाठीं इंग्लंडला निघाले. कमरेला पंचा व अंगावर उपरणें असा जो पोशाख ते हिंदुस्थानांत असतांना करीत तोच त्यांनीं इंग्लंडला जातांना व गेल्यानंतरहि कायम ठेवला होता. लंडनच्या मुक्कामांत ते मिस् लेस्टर या बाईकडे पाहुणे म्हणून राहिले होते. पहांटे चार वाजल्यापासून रात्रीचे बारा वाजून जाईपर्यंत ते कोणत्या ना कोणत्या तरी कामांत गढून गेलेले असत.

अस्पृश्यांसाठीं स्वतंत्र मतदारसंघ पाहिजे या मागणीस डॉ. आंबेडकर घट्ट कवटाळून बसले होते. ता. १३ नोव्हेंबरच्या आपल्या भाषणांत इंग्लंडचे पंतप्रधान मॅकडोनल्ड यांनीं या मागणीस उचलून धरलें. तेव्हां गांधीजी म्हणाले, 'अस्पृश्यांच्या वतीनें स्वतंत्र मतदार संघाची मागणी करण्यांत यावी याचें मला मनस्वी दुःख होतें. अस्पृश्यांसाठीं स्वतंत्र मतदार संघ बनविण्यांत आला तर त्यामुळें स्पृश्य आणि अस्पृश्य असे हिंदूंमध्यें कायमचे दोन तट उभारण्याच्या पातकाचे आपण धनी होणार नाहीं काय? आम्हांला अस्पृश्य हा वर्ग स्पृश्य हिंदूंहून निराळा असा नको आहे. शीख हे शीख म्हणून, मुसलमान हे मुसलमान म्हणून किंवा ख्रिस्ती हे ख्रिस्ती म्हणून जगाच्या अंतापर्यंत राहूं इच्छितात, त्याचप्रमाणें अस्पृश्य सुद्धां अस्पृश्य म्हणूनच यावच्चंद्रदिवाकरौ राहूं इच्छितात काय? मला तर प्रामाणिकपणें असें वाटतें कीं, अस्पृश्यतेची रूढि टिकण्यापेक्षां हिंदुधर्मच नष्ट झालेला बरा. त्रिभुवनाच्या राज्याच्या मोबदल्यांत सुद्धां मी ही गोष्ट करण्यास आपली मान्यता देणार नाहीं. मी याच क्षणीं असें जाहीरपणें घोषित करतों कीं, मला इतर कोणाचेंहि साहाय्य मिळालें नाहीं तरी मी एकाकी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला प्राणपणानें विरोध केल्याशिवाय राहाणार नाहीं.'

गोलमेज परिषदेहून परत येतांना गांधीजी रोमला गेले होते.

इटालीचे सर्वाधिकारी मुसोलिनी यानें त्यांचें अत्यादरपूर्वक स्वागत केलें. लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनें आपण आपलें राष्ट्र कसें तयार केलें आहे असा प्रश्न मुसोलिनीनें विचारला असतांना गांधीजी म्हणाले, 'हा तुम्ही पत्त्यांचा बंगला बांधलेला आहे.'

इकडे हिंदुस्थानांतील परिस्थिति अधिकाधिक चिघळत चालली होती. ता. २४ डिसेंबर रोजीं गफारखान यांस अटक झाली. ता. २८ डिसेंबर रोजीं पं. जवाहरलाल यांस कैद करण्यांत आलें. गांधीजी हिंदुस्थानांत आल्यावर कॉं. वर्किंग कमिटीची सभा तांतडीनें घेण्यांत आली. ता. ४ जानेवारी १९३२ रोजीं गांधीजींना अटक करण्यांत येऊन सरदार पटेल यांना त्यांच्या सोबतीसाठीं पाठविण्यांत आलें. ता. १० जानेवारीपर्यंत कॉंग्रेसच्या बहुतेक सर्व लहानमोठ्या पुढाऱ्यांना अटक होऊन कॉंग्रेसवर बेकायदेशीरपणाचा शिक्का मारण्यांत आला. कॉंग्रेस संबंधानें सहानुभूति वाळगिणाऱ्या संस्थाहि बेकायदा ठरविण्यांत आल्या.

## ९

तरीहि हिंदी लोक नाउमेद झाले नाहींत. बहिष्काराची व कायदेभंगाची चळवळ चालूच राहिली. पहिल्या चार महिन्यांत तुरुंगांत गेलेल्यांची संख्या ऐशीं हजार भरली. जनतेनें चळवळ चालू ठेवली होती पण तिला पुढाऱ्यांचें मार्गदर्शन लाभत नव्हतें.

ब्रिटिश सरकारनें अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ दिल्यास आपण प्राणांतिक उपोषण करूं असें गांधीजींनीं ता. ११ मार्चला भारतमंत्र्यास

कळविलें होतें. ता. १७ ऑगस्ट रोजीं मॅक्डोनल्डसाहेबांचा निर्णय जाहीर झाला. त्यांच्या निर्णयानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ देण्यांत आला होता.

ता. १८ ऑगस्ट रोजीं गांधीजींनीं मॅक्डोनल्डला पत्र लिहून ता. २० सप्टेंबरपासून आपण प्राणांतिक उपोषण सुरू करणार असल्याचें कळविलें.

गांधीजींच्या या निर्णयाचा परिस्फोट झाल्यावर मॅक्डोनल्डसाहेबांनीं आपला निर्णय बदलावा म्हणून देशांतील निरनिराळ्या पक्षांतील लोक आपापल्या परीनें खटपट करूं लागले. अस्पृश्यांचे एक पुढारी एम्. सी. राजा यांनीं ता. १३ सप्टेंबर रोजीं एक पत्रक काढून मॅक्डोनल्डसाहेबांनीं दिलेल्या निर्णयाचा तीव्र धिःकार केला. देशांतील प्रत्येक पुढारी हा पेंचप्रसंग टाळण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करूं लागला. डॉ. आंबेडकरांनीं मात्र गांधीजींनीं केलेल्या घोषणेवर, 'राजकीय स्टंट' असा शिक्का मारला. १४ सप्टेंबर रोजीं अलाहाबादमधील सर्व देवळें अस्पृश्यांसाठीं खुलीं करण्यांत आलीं. इतर अनेक शहरांनींहि तसेंच केलें. १९ सप्टेंबरला सर्व देशभर सभा घेण्यांत येऊन प्रत्येक सभेंत मॅक्डोनल्डच्या निर्णयाचा जाहीर निषेध करण्यांत आला. साऱ्या जगाचें लक्ष येरवड्याकडे लागून राहिलें.

मंगळवार ता. २० सप्टेंबर रोजीं गांधीजींच्या प्राणांतिक उपोषणास सुरुवात झाली. सायंकाळीं वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना ते म्हणाले, 'अस्पृश्य गणल्या गेलेल्या नीचांतील नीच लोकांचें प्रतिनिधित्व मी करूं शकतों असा माझा दावा आहे. स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यांत अशा प्रकारची फळी निर्माण करण्यांत आल्यास त्या माझ्या बांधवांची उन्नति होण्याची आशाच करायला नको; आणि म्हणूनच त्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाला मी प्राणपणानें विरोध करीत आहें. हिंदुधर्मावरील

अस्पृश्यतेचा कलंक पार धुतला गेला पाहिजे अशी माझी भावना आहे. इंग्रज सरकारच्या जातीय निवाड्याच्या निर्णयामुळें अस्पृश्यतेच्या राक्षसी रूढीला चिरंतन रूप मिळण्याची भीति निर्माण झाली. रोगाच्या असल्या चिन्हाचें निदान मी अचूक करूं शकत असल्यामुळें मी हें विष ताबडतोब हेरलें. हिंदुधर्मानें आपल्या अस्पृश्य बांधवांच्या बाबतींत इतकीं अनन्वित पातकें केलीं आहेत कीं, त्या पातकांचें परिमार्जन करण्यासाठीं माझ्यासारख्या शंभर माणसांचे प्राण बळी द्यावे लागले तरीहि त्याबद्दल विषाद वाटण्याचें कारण नाहीं. माझ्या या दिव्यामुळें स्पृश्य हिंदूंच्या डोळ्यावरील अज्ञानाची झांपड उडून जाऊन त्यांना जर त्यांच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव झाली तर माझ्या दिव्याचें सार्थक झालें असेंच मी समजेन. हिंदुधर्मावरील अस्पृश्यतेचा सैतानी कलंक नाहींसा करण्यासाठीं केवढीहि भारी किंमत द्यावी लागली तरी ती कमीच ठरेल अशी माझी प्रामाणिक भावना आहे. माझ्याजवळ माझ्या प्राणांशिवाय द्यायला दुसरें कांहींच नसल्यामुळें मी तेच द्यायला तयार झालों आहें.'

गांधीजींच्या उपोषणाच्या पांचव्या दिवशीं म्हणजे ता. २४ सप्टेंबर रोजीं सर्वांना मान्य असा कराराचा मसुदा तयार झाला. अस्पृश्यांच्या वतीनें डॉ. आंबेडकर व एम्. सी. राजा व स्पृश्य हिंदूंचे प्रतिनिधि या नात्यानें पं. मालवीय यांनीं त्यावर सह्या केल्या. अनेक नेमस्त पुढाऱ्यांनीं व कॉंग्रेस पुढाऱ्यांनींहि त्यास आपली संमति दर्शविण्यासाठीं त्यावर सह्या केल्या. कोणत्याहि सार्वजनिक ठिकाणीं अस्पृश्यता पाळण्यांत येऊं नये व अस्पृश्यांना स्पृश्य हिंदूंच्या बरोबरीचे हक्क असावेत अशा आशयाचा तो करार होता. हिंदुस्थानला स्वराज्य प्राप्त होईपर्यंत अशा अर्थाचा कायदा झालेला नसल्यास स्वराज्याच्या काळांतील लोकसभेंत हा कायदा लौकरांत लौकर संमत करण्यांत येईल असें त्यांत आश्वासन देण्यांत आलेलें होतें. सदर करारास

सरकारकडून मान्यता मिळण्यास फारसा वेळ लागला नाहीं. सोमवार ता. २६ सप्टेंबर रोजीं सायंकाळीं गांधीजींनीं आपलें उपोषण सोडलं. ता. २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर हा सप्ताह हिंदुस्थानभर अस्पृश्यता-निवारण सप्ताह म्हणून पाळण्यांत आला. देशभर सार्वत्रिक सभा घेण्यांत येऊन या करारांतील कलमें सर्वांना समजावून देण्यांत आलीं. स्पृश्यास्पृश्यांचीं सहभोजनें करण्यांत येऊन कित्येक देवालयें व विहिरी अस्पृश्यांसाठीं खुल्या करण्यांत आल्या. अखिल भारतीय स्वरूपाची अस्पृश्यतानिवारणाची संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेनें पंचवीस लक्ष रुपयांचा निधि उभारण्याचा संकल्प जाहीर करतांच अनेकांकडून देणग्या येऊं लागल्या. गेले कांहीं दिवस सरकारनें गांधीजींना ज्या विशेष सवलती दिल्या होत्या त्या ता. २९ सप्टेंबरपासून काढून घेण्यांत आल्या. नोव्हेंबर महिन्यापासून अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याला पोषक अशा कांहीं सवलती मात्र सरकारनें गांधीजींस दिल्या.

१९३२ सालच्या अखेरीस गोलमेज परिषदेचें तिसरें अधिवेशन इंग्लंडमध्यें भरविण्यांत आलें. या अधिवेशनांत सर चिमणलाल सेटलवाड यांनीं सरकार व काँग्रेस यांच्यांत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्यांना यश आलं नाहीं. सप्रू आपल्या भाषणांत म्हणाले, 'काँग्रेसजनांचें व माझें फारसें सूत जमत नसलें तरी मी असंदिग्ध भाषेंत असें घोषित करूं इच्छितों कीं हिंदुस्थानच्या ज्वलंत स्वाभिमानाचें व देशाभिमानाचें गांधीजी हे मूर्तिमंत प्रतीक आहेत. आम्हीं वाटाघाटी तरी कोणाशीं करायच्या? गांधींविषयीं म्हणाल तर ते तुरुंगांत असतांना कसल्याहि प्रकारच्या राजकीय वाटाघाटी करण्यास तयार होणार नाहींत. सरकारनें एकंदर परिस्थितीचा शांतपणें व निर्विकार मनानें विचार करावा असें माझें त्यास कळकळीचें व आग्रहानें सांगणें आहे.'

ता. ११ फेब्रुवारी १९३३ रोजीं गांधीजींच्या 'हरिजन' या नव्या साप्ताहिकाचा पहिला अंक पुणें येथें प्रसिद्ध झाला. या साप्ताहिकाची ओळख करून देतांना गांधीजींनीं म्हटलें होतें, 'जगाच्या पाठीवर अस्तित्वांत असलेला प्रत्येक धर्म, ज्याला कोणीच किंमत देत नाहीं त्याचा परमेश्वर मित्र बनत असतो असें सांगतो. बाकीच्या जगाची गोष्ट सोडून दिली तरी निदान हिंदुस्थानांत हिंदूंतील चार कोटी अस्पृश्यांपेक्षां मित्रांना सर्वस्वीं पारखे झालेले, असहाय आणि दुर्बल असे दुसरे कोण आहेत? तेव्हां परमेश्वराचीं लेंकरें असें जर कोणाला यथार्थानें म्हणतां येईल तर तें अस्पृश्यांनाच होय. आणि म्हणूनच अस्पृश्यांना उद्देशून 'हरिजन' असा शब्दप्रयोग उपयोगांत आणण्याचें मी ठरविलें आहे. त्यांच्या नांवांत फरक करण्यांत आला म्हणजे त्यांच्या दर्जांत किंवा परिस्थितींत फरक पडला असें होत नाहीं हें खरें असलें तरी अस्पृश्य या शब्दांत जी गर्भित निंदा आहे ती केल्याचें पातक तरी हरिजन हा शब्द वापरल्यानें लागणार नाहीं असें मला वाटतें.'

'हरिजन'ला शह देण्यासाठीं सनातनी लोकांनीं आपलीं वृत्तपत्र सुरू केलीं. गांधीजींविषयीं शक्य तितकें विकृत लिहिण्याच्या बाबतींत त्यांची जणुं कांहीं चढाओढच लागलेली असे.

मेच्या ८ तारखेपासून आपण उपोषणास प्रारंभ करणार असल्याचें गांधीजींनीं जाहीर केलें. गांधीजींची शिष्या मीराबेन हिनें त्यांस लिहिलेल्या पत्रांत, गांधीजींच्या या निर्णयानें कस्तुरबांच्या मनाला विलक्षण धक्का बसला असल्याचें लिहिलें होतें. पण इतरांप्रमाणेंच आपलेंहि गांधीजी ऐकणार नाहींत हें त्यांना माहीत असल्यामुळें फक्त परमेश्वराची प्रार्थना करण्याचें कस्तुरबांनीं ठरविलें असल्याचेंहि कळविलें होतें. या पत्राला गांधीजींनीं उत्तर लिहिल होतें, 'बा ला माझा असा निरोप कळवा कीं, तिच्या वडिलांनीं तिला जन्माचा जोडीदार म्हणून जो मनुष्य

पाहून दिला त्याला संभाळतांना कोठलीहि स्त्री मरूनच गेली असती ! बा च्या प्रेमाची महती काय वर्णावी ? अखेरपर्यंत तिनें असाच धीर धरला पाहिजे.'

मेच्या ८ तारखेला दुपारीं बारा वाजतां गांधीजींचें उपोषण सुरू झालें आणि त्याच रात्रीं साडेनऊ वाजतां सरकारनें त्यांना कैदेंतून मुक्त केलें. आपल्या मुक्ततेबरोबर कायदेभंगाची चळवळ एक महिनापर्यंत स्थगित करण्याचा गांधीजींनीं आदेश दिला. अशी तहकुबी झाल्या-बरोबर सरकारनें सर्व राजबंदींची मुक्तता करावी अशीहि त्यांनीं सूचना केली. जुलै महिन्यांत तुरुंगाबाहेर असलेल्या कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांची बैठक पुणें येथें भरविण्यांत आली. गांधीजींनीं व्हाईसरॉयची मुलाखत घ्यावी असा ठराव संमत झाला. पण कायदेभंगाची चळवळ संपूर्णपणें बंद करण्यांत आल्याशिवाय अशा मुलाखतीचा विचारहि करण्याचें सर-कार मान्य करीना.

ता. २६ जुलै रोजीं आपला साबरमती आश्रम विसर्जित करण्यांत आला असल्याचें गांधीजींनीं जाहीर केलें. गेलीं दोन वर्षें आश्रमानें कोणत्याहि प्रकारचा कर सरकारला देण्याचें बंद केलें होतें आणि सरकारनें आपल्या करवसुलीसाठीं आश्रमांतील वस्तू नेऊन विकल्या होत्या. ही परिस्थिति अशीच चालू ठेवणें गांधीजींना इष्ट वाटत नव्हतें. मुंबई सरकारला पत्र लिहून आश्रम आपल्या ताब्यांत घेण्याबद्दल त्यांनीं सुचविलें. ता. ३१ जुलै रोजीं आपल्या आश्रमवासीयांसमवेत आपण बाहेर पडणार असल्याची गांधीजींनीं घोषणा केली. त्यांची योजना अशी होती:

आपल्या तेहतीस आश्रमवासीयांसमवेत आश्रमांतून बाहेर पडावयाचें व मजल दर मजल करीत खेड्यापाड्यांतून फिरावयाचें. कोणीहि एक पैसाहि बरोबर घ्यावयाचा नाहीं. खेड्यांतील लोक प्रेमानें

जें खायलाप्यायला देतील त्यावर समाधान मानावयाचें. पावसा-पाण्यापासून संरक्षण होण्यासाठीं उतरण्यास छपराची झोंपडी मिळाली तर उत्तमच. नाहीं तर झाडाखालीं सुद्धां मुक्काम करण्याची तयारी ठेवावयाची. कोणत्याहि गांवांत एका रात्रीपेक्षां अधिक मुक्काम करावयाचा नाहीं.

ता. १ ऑगस्ट रोजीं गांधीजी, कस्तुरबा, गांधीजींचे चिटणीस महादेवभाई देसाई व तीन आश्रमवासी यांना अटक करण्यांत येऊन त्यांची साबरमतीच्या तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. तेथून गांधीजींना येरवड्याच्या तुरुंगांत पाठवण्यांत आलें. तेथें त्यांच्यावर खटला चालविण्यांत येऊन त्यांस एक वर्ष कारावासाची शिक्षा देण्यांत आली. त्यानंतर वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू होऊन अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांची तुरुंगांत रवानगी करण्यांत आली.

हरिजनकार्य केल्याशिवाय गांधीजींना आपलें जीवन असह्य वाटत असल्यामुळें ता. १६ ऑगस्टपासून त्यांनीं प्राणांतिक उपोषणास सुरुवात केली. ता. २१ ऑगस्ट रोजीं त्यांस ससून हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत आल. त्यांची शक्ति प्रतिक्षणीं क्षीण होत चालली होती. ता. २३ ऑगस्ट रोजीं सरकारनें त्यांस विनशर्त मुक्त केलें. सरकारनें गांधीजींना दिलेल्या शिक्षेची मुदत पुढील वर्षाच्या ऑगस्ट महिन्याच्या तीन तारखेला संपणार होती. तेव्हां त्या दिवसापर्यंत राजकीय चळवळ करावयाची नाहीं असें बंधन त्यांनीं स्वतःवर लादून घेतलें.

प्रकृति थोडीशी सुधारतांच ता. ७ नोव्हेंबरपासून हरिजनकार्य करण्यासाठीं ते दौऱ्यावर निघाले. प्रत्येक सभेंत गांधीजी हरिजनकार्या-साठीं फंड जमा करीत. पहिल्याच आठवड्यांत जवळजवळ पंधरा हजार रुपये जमा झाले ! ते अमरावतीस गेले असतांना एका गृहस्थानें त्यांस विचारलें, ‘ हरिजनकार्यावर आतांपर्यंत किती पैसे खर्च झाले

आहेत ?’ तेव्हां गांधीजी म्हणाले, ‘काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमांत मी अस्पृश्यतानिवारणाचा अंतर्भाव केलेला होता. या कार्यासाठीं जवळजवळ वीस लाख रुपये खर्च झालेले आहेत. मी व्यक्तिशः त्यासाठीं जवळजवळ पांच लाख रुपये खर्च केले आहेत. टिळक स्वराज्य फंडांतलीहि बरीच मोठी रक्कम या कामासाठीं खर्चीं पडलेली आहे.’

नोव्हेंबर महिन्याच्या उत्तरार्धांत गांधीजींनीं चौदाशें मैलांचा प्रवास केला व हरिजनकार्यासाठीं बत्तीस हजार रुपये जमा केले. या झंझावाती दौऱ्याचा गांधीजींच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होऊन त्यांना रक्तदाबाचा विकार जडला. तेव्हां गांधीजींनीं कोणत्याहि दिवशीं चार तासांहून अधिक काम करतां कामा नये असा डॉक्टरांनीं त्यांस सल्ला दिला. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत त्यांनीं सहाशें मैलांचा प्रवास करून एकवीस हजार रुपये मिळविले. दुसऱ्या आठवड्यांत ते दिल्लीस गेलें व त्या एकाच शहरांत त्यांनीं बारा हजार रुपये जमविले. ता. १६ डिसेंबरपासून गांधीजींच्या दक्षिणेकडील दौऱ्याला बेझवाड्यापासून प्रारंभ झाला. तेथील आपल्या एका दिवसाच्या मुक्कामांत त्यांनीं बारा जाहीर सभांतून भाषणें केलीं व पांच हजारांहून अधिक रक्कम जमा केली. मद्रासचा दौरा आटोपून, २३ डिसेंबरला ते आंध्रला आले. तेथील पंधरा दिवसांच्या दौऱ्यांत त्यांनीं १७०८ मैलांचा प्रवास केला, साठ सभा घेतल्या व ६८४३० रुपये जमविले !

४ जानेवारीला ते म्हैसूर प्रांतांत गेले. तेथून ते बंगलोर व नंतर मलबारला आले. ता. १८ रोजीं अल्लेप्पी येथील जाहीर सभेंत भाषण करतांना ते म्हणाले, ‘हिंदुधर्माला लागलेलें अस्पृश्यतेचें पाप मला धुवून काढावयाचें आहे. अस्पृश्यतेच्या या राक्षसी रूढीनें हिंदुधर्माचें स्वरूप अगदीं विद्रूप करून टाकलें आहे. जरी कधीं

काळीं हिंदुधर्मानेंच अस्पृश्यतेला मान्यता दिलेली आहे अशी माझी खात्री झाली तरी मी मात्र तिला कधींच मान्यता देणार नाहीं. पण त्यावेळीं सुद्धां हिंदुधर्मच मुळीं भिकार आहे आणि परमेश्वर हा परमेश्वर नसून सैतान आहे असें मात्र मी म्हणणार नाहीं. त्याचा परिणाम एवढाच होईल कीं, हिंदू व हिंदुधर्म यांच्यावरील माझा विश्वास उडून जाईल आणि परमेश्वरावरील माझी श्रद्धा अधिक दृढ होईल. असें कां होईल तेंहि मी सांगतों. श्रद्धा म्हणजे कांहीं थोड्याशा वादळी हवेनें कोमेजून जाणारें एखादें नाजुक फूल नव्हे. श्रद्धा ही हिमालय पर्वतासारखी आहे. वादळ झालें म्हणून तें कांहीं हिमालयाला हलवूं शकत नाहीं. हिंदु लोक जेव्हां मला निराश करतात तेव्हां मी परमेश्वराची प्रार्थना करीत असतों कीं, तूंच निर्माण केलेल्या या हिंदु बांधवांनीं जरी माझी निराशा केलेली असली तरी मूल आपल्या आईच्या स्तनांना बिलगून राहतें तसा मीहि तुझ्या आश्रयाला आलेलों आहें. देवाविषयीं व धर्माविषयीं अशा प्रकारची श्रद्धा तुम्हां सर्वांच्या अंतःकरणांत निर्माण होवो !'

गांधीजींचा हा तुफानी दौरा दक्षिणेंत चालू असतांना उत्तर विहारमध्यें धरणीकंपाच्या जबरदस्त धक्क्यानें एकच हाहाःकार उडवून दिला. ही दुर्दैवी घटना ता. १५ जानेवारी रोजीं घडली. दहा लाखांहून अधिक घरें कोसळलीं—जवळजवळ दीड कोटी माणसें निर्वासित झालीं. रेल्वेचे नऊशें मैल लांबीचे रूळ उखडले गेले. सर्वांची मति गुंग होऊन गेली. पृथ्वीचा प्रलयकाळच येऊन ठेपला अशी लक्षावधि लोकांची ठाम भावना झाली. या आपत्तीच्या प्रसंगीं जनतेला राजेंद्र-बाबूंची मदत मिळावी म्हणून ता. १७ जानेवारी रोजीं सरकारनें त्यांस बंधमुक्त केलें. या आपत्तीसंबंधीं लिहितांना गांधीजींनीं हरिजनच्या एका अंकांत लिहिलें होतें,

'मानवांच्या पातकांचें प्रायश्चित्त म्हणूनच बिहारसारख्या आपत्ती ओढवत असतात असें मला प्रामाणिकपणें वाटतें. या असल्या आपत्ती म्हणजे सर्वस्वीं अपघाताच्या स्वरूपाच्या होत हें मान्य करण्यास मी तयार नाहीं. ग्रहांच्या गती नियमाला धरून होत असतात तशाच या आपत्तीहि नियमबद्धच असतात असें मला वाटतें. पण या नियमांचें आपल्याला ज्ञान नसल्यामुळें आपण त्यांना अपघात समजतों. अर्थात् हा सगळाच तर्क आहे. पण मानवाच्या जीवनांत तर्कालाहि महत्त्वाचें स्थान असतें. या आपत्तीमुळें मी अधिक नम्र होतों, ही आपत्ति निवारण करण्यासाठीं मला स्फुरण चढतें, आत्मशुद्धि करण्याची आवश्यकता मला विशेषच जाणवूं लागते, मी परमेश्वराच्या अधिक संनिध जातों. माझा तर्क कदाचित् चुकीचा असला तरी त्याचे परिणाम मात्र हे असेच होतात. तर्कामुळें जेव्हां आत्मशुद्धीची बुद्धि होत नाहीं तेव्हां त्याला धर्मभोळेपणा असें नांव मिळत असतें.'

ता. ११ मार्च १९३४ रोजीं गांधीजी पाटण्याला आले. ता. १४ रोजीं ते मोतीहारीला पोहोंचले. तेथें ज़मिनीला सगळीकडे भेगा पडलेल्या असून जिकडेतिकडे वाळूचें साम्राज्य पसरल्यासारखें दिसत होतें. या एकाच जिल्ह्यांत रिलीफ कमिटीनें दहा हजार लोकांना कामास लावलें होतें. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं निरनिराळ्या कमिट्यांचे लोक त्यांचा सल्ला विचारण्यासाठीं आलेले असतांना गांधीजी म्हणाले, 'मला तुम्हांला फक्त दोनच गोष्टी सांगायच्या आहेत. रिलीफ कमिट्यांकडे जमा झालेले पैसे भिक्षेकरी तरी घेऊन जातील किंवा कामकरी तरी घेऊन जातील. मला भिक्षेकरी नको आहेत. धरणीकंपाच्या या आपत्तीमुळें आपण सगळे भिक्षेकरी बनलों तर तें आपणाला लांछनास्पद आहे. आंधळे, थोटे किंवा लंगडे असल्यामुळें ज्यांना कोणतेंहि काम करणें अशक्य आहे त्यांना भिक्षा मागण्यास

हरकत नाहीं. गीतेच्या परिभाषेंत बोलावयाचें तर धडधाकट माणसांनीं भिक्षा मागणें म्हणजे चोरी करणेंच होय. दुसरी गोष्ट ही कीं, ही आपत्ति म्हणजे परमेश्वरानें आपणाला आपला प्रसाद दिलेला आहे असेंच आपण मानलें पाहिजे. अशी आपली श्रद्धा एकदां ठाम झाली म्हणजे या आपत्तीचा अर्थ आपणाला बरोबर समजूं लागेल. तो अर्थ हाच कीं, कोणाहि माणसानें स्वतःला दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ समजूं नये. मी सांगितलेल्या या दोन्ही गोष्टी तुम्हांला पटल्या तर ही धरणीकंपाची आपत्ति म्हणजे परमेश्वराची देणगी ठरल्याशिवाय राहाणार नाहीं.'

हीं सर्व कामें चालू असतांना हरिजन फंड जमा करण्याचें गांधीजींचें काम चालूच होतें. मुझफरपूर, सीतामऱ्ही, दरभंगा, मधुबनी, आटोपून ते भागलपूर जिल्ह्यांत आले. तेथें लोकांनीं गर्दी करण्याची तर शिकस्तच केली. एका दिवसांत चार लाख लोक गांधीजींचें दर्शन घेऊन गेले! मोंधीरला दहा हजारांहून अधिक लोक मृत्युमुखीं सांपडले होते. तेथील लोकांना उद्देशून गांधीजी म्हणाले, 'मानवांचीं पातकें आणि नैसर्गिक आपत्ती यांचा कांहीं तरी अन्योन्य संबंध आहे असें मला तरी वाटतें. जेव्हां माणसाच्या एखाद्या अवयवाला इजा होते तेव्हां त्याच्या सबंध शरिरासच तें दुःख भोगावें लागत असतें. मी असहकारवादी असलों तरी या प्रसंगीं सर्वांनीं सरकारशीं सहकार केला पाहिजे असेंच माझें सांगणें आहे. या प्रसंगीं कामच इतकें मोठें आहे कीं, जनता आणि सरकार या दोघांच्याहि सहकाराशिवाय तें पुरें होणेंच शक्य नाहीं. प्राणांतिक संकटाच्या वेळीं जुनें शत्रुत्व विसरलेंच पाहिजे. आज लोक कॉंग्रेसवाले या नात्यानें कार्य करीत नसून मानव या नात्यानें कार्य करीत आहेत. या सबंध दौऱ्यामध्यें मी कॉंग्रेसचा नुसता उच्चारसुद्धां केलेला नाहीं. संकटग्रस्तांना मदत करणें याव्यतिरिक्त दुसरा कसलाहि विचार कोणाच्या डोक्याला शिवलेला नाहीं.'

ता. ४ एप्रिल रोजीं डॉ. अन्सारी, भुलाभाई देसाई व डॉ. बिधन रॉय हे गांधीजींना भेटण्यासाठीं पाटण्याला आले. या वाटाघाटींत, सत्याग्रहाची चळवळ स्थगित करून ती सर्वस्वीं आपल्या हातीं ठेवावी व कायदे-मंडळांतून काम करण्यासाठीं स्वराज्यपक्षाची पुन्हा स्थापना करण्यांत यावी अशाविषयीं गांधीजींनीं आपली संमति दिली. मात्र कायदेमंडळांतून काम करण्याबाबत आपलीं मतें १९२० सालीं होतीं तशींच कायम असल्याचें स्पष्ट करण्यास ते विसरले नाहींत. ज्यांना कायदेमंडळांतून कामें करण्याची उमेद वाटत असेल त्यांनीं स्वराज्यपक्षाला येऊन मिळण्याच्या बाबतींत विलंब करूं नये अशी त्यांनीं कॉंग्रेसजनांस सूचना दिली.

ता. ४ मे पासून गांधीजींच्या ओरिसाच्या दौऱ्यास प्रारंभ झाला. ८ मे पासून त्यांनीं पायीं दौरा काढण्यास सुरुवात केली. एका खेड्यांत ब्राह्मणवर्गाला उद्देशून ते म्हणाले, 'खरा ब्राह्मण म्हणजे नम्रतेचा मूर्तिमंत अवतार असला पाहिजे. त्याला आपल्या शहाणपणाचा किंवा विद्वत्तेचा यत्किंचितहि गर्व असतां कामा नये. तो ज्या क्षणीं स्वतःला इतरांपेक्षां श्रेष्ठ समजूं लागेल त्या क्षणापासून त्याचें ब्राह्मणत्व संपलें म्हणून ठाम समजावें. त्यानें ब्राह्मणाकडे किंवा एखाद्या भंग्याकडे समदृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. तसेंच, आपलीं जीं प्रमाणिक मतें असतील तीं स्पष्टपणें बोलून दाखविण्याचें किंवा त्याप्रमाणें आचरण करण्याचें ज्याला धैर्य नसेल तो मुळीं खरा ब्राह्मणच नव्हे. आपण परमेश्वराशिवाय इतर कोणाचीहि भीति बाळगतां कामा नये. शहाणपणा व भीरुता यांचें सूत कधींच जमूं शकत नाहीं. पापी लोकांना देवालयांत स्थान नाहीं असें म्हणून भागणार नाहीं. देवालयें म्हणजे आध्यात्मिक इस्पितळेंच आहेत आणि पापी लोकांना म्हणजेच आध्यात्मिक दृष्टीनें रुग्णाईत असतील त्यांना देवालयांत प्रवेश मिळण्याचा इतर कोणाहीपेक्षां अधिक हक्क आहे. देवालयें हीं खरें म्हटलें असतां साधुसंतांसाठीं नसून पातकी

लोकांसाठींच आहेत; आणि ज्या ठिकाणीं सर्वच लोक पापी आहेत त्या ठिकाणीं सरस-नीरस कसें काय ठरवायचें ?'

गांधीजींचा हा पायी दौरा ता. ८ जून रोजीं समाप्त झाला. ता. ६ जून रोजीं गांधीजींनीं कायदेभंगाची चळवळ स्थगित केल्याचें जाहीर केलें होतें व त्यानंतर दोन महिन्यांनीं सरकारनें कॉंग्रेसवरील बेकायदेशीरपणाचा छाप काढून घेतला. पुणें, भावनगर, अजमीर, कराची, लाहोर, कलकत्ता, कानपूर, लखनौ इ. ठिकाणचा दौरा आटोपून ता. २९ जुलैला गांधीजी दौऱ्याच्या अखेरच्या मुक्कामाला म्हणजे बनारसला गेले. या ठिकाणीं सनातनी लोकांनीं गांधीजींच्या प्रतिमेची होळी केली. तेथील स्त्रियांच्या जाहीर सभेंत भाषण करतांना गांधीजी म्हणाले,

'खाण्यापिण्यावर बंधनें घालणें व खोट्या उच्चनीचपणाच्या कल्पनांची जोपासना करणें यालाच आपण आजकाल धर्म समजूं लागलों आहोंत ही अत्यंत शोचनीय अशी घटना आहे. खरें म्हटलें तर नीति हाच धर्माचा खरा निकष आहे. कोणालाहि जन्माला घालतांना परमेश्वरानें त्या माणसाच्या कपाळावर उच्चनीचपणाचा शिक्का मारलेला नाहीं. जें शास्त्र माणसांच्या जन्मामुळें त्यांच्यांत उच्चनीचपणाचा भेदभाव निर्माण करतें तें मुळीं खरें शास्त्रच नव्हे. आपण त्याला आपली मान्यता देण्याचें कांहींच कारण नाहीं. जगांत पापी कोण नाहीं ? कमीअधिक प्रमाणांत आपण सर्वच पापी आहोंत. पण गीता, भागवत व तुळसीरामायण हे ग्रंथ आपणास असें शिकवितात कीं जो मनुष्य परमेश्वराला शरण जाऊन त्याचें नामस्मरण करतो तो पापापासून मुक्त होतो. हा नियम सर्वच मानवांना लागू आहे. हरिजनांना जन्माला घालतांना परमेश्वर त्यांच्या कपाळावर अस्पृश्य असा छाप मारून जन्माला घालतो काय ? आपल्याइतक्याच प्रमाणांत हरिजनहि माणसेंच आहेत. आपण कुत्र्यामांजरांनाहि अस्पृश्य मानीत नाहीं आणि

आपल्याच हाडामांसाच्या एका विशिष्ट वर्गाला मात्र अस्पृश्य मानतों. हा धर्म नव्हे तर पराकोटीचा अधर्म आहे. हें जें पाप आपण वर्षानुवर्ष करीत आलों आहोंत तें धुवून टाकण्याचा एकच उपाय म्हणजे हरिजनांशीं बरोबरीच्या नात्यानें वागणें हा होय.'

आपल्या या हरिजनदौऱ्यांत गांधीजींनीं १२५०० मैलांहून अधिक प्रवास केला व हरिजन फंडासाठीं आठ लाख रुपये गोळा केले.

ता. ५ ऑगस्ट रोजीं गांधीजी वर्ध्याला गेले. आगाऊ जाहीर केल्याप्रमाणें ता. ७ पासून सात दिवस त्यांनीं उपोषण केलें. त्यांनीं स्वतःवर लादून घेतलेल्या बंधनाची मुदत संपतांच त्यांनीं पहिला लेख स्वदेशीवर लिहिला. आतां त्यांनीं आपलें सारें लक्ष ग्रामोद्योगांकडे लाविलें होतें. हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणांहून या विषयाची आवड असणारे लोक गांधीजींशीं विचारविनिमय करण्यासाठीं वर्ध्याला येऊं लागले. त्या वर्षींचें कॉंग्रेसचें अधिवेशन आटोपल्यावर कॉंग्रेस सोडण्याचें गांधीजींनीं ठरविलें होतें. कॉंग्रेसच्या नैसर्गिक वाढीला आपल्या व्यक्तिमत्वाचा अडथळा होत आहे व त्यामुळें इतर अनेकांच्या बुद्धीला वाव मिळत नाहीं अशा विचारानें त्यांनीं हा निश्चय केला होता. आपले हे विचार प्रकट करतांना त्यांनीं म्हटलें होतें, 'माझ्या कार्यक्रमांत चरख्याला आणि खादीला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. कॉंग्रेसमधील बहुतेक बुद्धिवादी सभासदांनीं सूत कांतण्याचें जवळजवळ सोडूनच दिलें आहे. आज कायदेभंगाचा कार्यक्रम नसल्यामुळें कॉंग्रेसमध्यें पार्लमेंटरी पार्टी अवश्य असली पाहिजे अशी माझी खात्री झालेली आहे. पण या बाबतींतहि आमचें एकमत नाहीं. जो आपणाहून अधिक शहाणा व अधिक अनुभवी असल्याची आपली खात्री आहे त्याच्यापुढें आपण कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत पड खाल्ली तर त्याला सद्गुणच म्हटलें पाहिजे व त्याच्यामुळें आपल्या संस्थेचाहि फायदाच होत असतो.

पण असें नेहमींच होऊं लागलें तर त्याला कांहीं सद्गुण म्हणतां येणार नाहीं. पण मला मात्र हा अगदीं नको तोच अनुभव नेहमीं येऊं लागला. माझ्यासारख्या लोकशाहीच्या कट्टया पुरस्कर्त्याला हें मान्य होणें अशक्य होतें. समाजवाद्यांचे व माझे अनेक बाबतींत मतभेद असूनहि कॉंग्रेसमध्यें मी त्यांचें स्वागत केलेलें आहे. जर उद्यां त्यांना कॉंग्रेसमध्यें बहुमत मिळालें तर मी कॉंग्रेसमध्यें राहूं शकणार नाहीं. संस्थानी प्रजेच्या बाबतींत माझे अनेकांशीं मतभेद आहेत. अहिंसेची गोष्ट घ्या. बहुतेक कॉंग्रेस सभासदांच्या दृष्टीनें अहिंसा हें केवळ धोरण आहे. सत्याग्रहासंबंधानेंहि मी पूर्ण विचार केल्यानंतरच तो करण्याचा अधिकार एकट्या आपल्याकडे राखून ठेवण्याचा मीं निर्णय घेतला. सत्याग्रहाच्या बाबतींत शक्य तितक्या कमी चुका व्हाव्या ह्या हेतूनेंच मीं तो निर्णय घेतला आहे. हें सर्व सांगितल्यावर मला हें स्पष्ट सांगावेंसें वाटतें कीं, आज हिंदुस्थानांत कॉंग्रेस हीच सर्वांत सामर्थ्यवान व अधिकांत अधिक प्रातिनिधिक अशी संस्था आहे. या संस्थेच्या स्थापनेपासून आतांपर्यंत हिला ज्या कठीण प्रसंगांना तोंड द्यावें लागलें तसें कोणत्याच संस्थेला द्यावें लागलेलें नसेल. तिच्या वतीनें तिच्या सभासदांनीं आजपर्यंत एवढा मोठा स्वार्थत्याग केलेला आहे कीं, त्याबद्दल कोणालाहि अभिमानच वाटला पाहिजे. मी कॉंग्रेसच्या बाहेर पडल्यानें माझ्या देशाची सेवा मी अधिक चांगल्या प्रकारें करूं शकेन अशी माझी खात्री पटेल तेव्हांच मी ती सोडीन.'

त्या वर्षींच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीं म्हणजे ता. २८ ऑक्टोबर १९३४ रोजीं गांधीजी कॉंग्रेसमधून निवृत्त होण्याचा आपला निश्चय जाहीर करण्यासाठीं उभे राहिले तेव्हां या आपल्या वंदनीय पुढाऱ्याविषयींचा आपला आदर प्रकट करण्यासाठीं सगळे म्हणजे एंशीं हजार श्रोते उठून उभे राहिले !

# १०

ग्रामोद्योग, हरिजनसेवा व विधायक कार्य यांकडे अधिक लक्ष पुरवितां यावें म्हणून गांधीजी काँग्रेसमधून बाहेर पडले होते. त्या सालच्या नोव्हेंबर महिन्यांत गांधी सेवा संघाचा वर्षदिन वर्धा येथें साजरा होत असतांना कार्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणाले, 'खादी वापरणाऱ्या कित्येक लोकांनीं आपली अशी समजूत करून घेतलेली दिसते कीं, खादी वापरली कीं आपण आपल्या कर्तव्यांतून मोकळे झालों! बाकीच्या कोणत्याहि वस्तूंचा मन मानेल तसा वापर करायला आपल्याला कांहीं हरकत नाहीं. या लोकांकडे पाहिलें म्हणजे मला असें वाटतें कीं, या लोकांच्या हातून स्वराज्य संपादन होणें अशक्य आहे.

आपणाला रोजच्या रोज ज्या गोष्टींची आवश्यकता भासते अशा किती तरी वस्तू अगदीं अलीकडच्या काळापर्यंत आपल्या खेड्यांत तयार होत होत्या. आतां त्या प्रत्येक वस्तूसाठीं आपली भुकेली नजर दुसरीकडे लावण्याचा प्रसंग त्यांच्यावर आलेला आहे. शहरांत राहाणारे लोक आपणाला लागणाऱ्या किती तरी वस्तू पूर्वी खेडयापाडयांतून घेत असत. आतां त्याच वस्तू त्यांना शहरांतून घ्याव्या लागतात. अशा वस्तू पुन्हा खेडयांत तयार होऊं लागल्या व त्या खेडयांतूनच घ्यावयाच्या असा शहरवासीयांनीं निर्धार केला तर शहरें व खेडीं यांच्यामधील तुटलेला धागा पुन्हा सांधायला कितीसा वेळ लागणार? अशा दृष्टीनें विचार करतां, अन्न व वस्त्र या दोन बाबी इतर सर्व गोष्टींपेक्षां अधिक आवश्यक व हा उद्देश सफल होण्याच्या कामीं अधिक यशस्वी होण्यासारख्या आहेत. त्यांपैकीं खादीनें बराचसा कार्यभाग साधलेला आहे थोड्याच वर्षां-

पूर्वीपर्यंत आपण आपलें भात स्वतः भरडीत होतों व धान्य दळीत होतों. आरोग्याचा विचार बाजूला ठेवला तरी भाताच्या व पिठाच्या गिरण्यांमुळें खेड्यांतील आपल्या लक्षावधि भगिनींच्या पोटावर पाय आला आहे, ही वस्तुस्थिति नाहीं काय? गुळाची जागा साखरेनें पटकावली असून बिस्किटांसारख्या वस्तूंनीं खेडोपाडीं आक्रमण केलें आहे. याचा सरळ अर्थ असा कीं, खेड्यांतील लोकांचे धंदे त्यांच्या हातांतून निसटून जाऊं लागले असून फक्त कच्चा माल बनवून स्वतःची नागवणूक करून घेण्यासाठीं तो दुसऱ्यांच्या हवालीं करणें एवढेंच त्यांच्या हातीं राहिलें आहे. खेडुतानें मर मर मरून निर्माण केलेला माल दुसऱ्यांना द्यावयाचा व त्याच्या मोबदल्यांत हातीं पडेल त्यावर आपली गुजराण करावयाची असा काळ तूर्त ओढवलेला आहे. त्याच्या हातांत पडणारा पैपैसा साखरेचे व कापडाचे व्यापारी खाऊन जाणार! खेडुताचें मन आणि शरीर, त्याला ज्यांच्यांत चोवीस तास वावरावें लागतें त्या गुरांसारखेंच झालेलें आहे. आजच्या खेड्यांतील सुताराला चरखा करतां येत नाहीं कीं लोहाराला चाती बनवितां येत नाहीं. ही परिस्थिति अत्यंत लाजिरवाणी आहे.

खेड्यांकडे धांव घेणें म्हणजे काळाच्या मागें जाण्यासारखें आहे हा प्रवाद मला मान्य नाहीं. मी कांहीं शहरांतल्या लोकांना खेड्यांत जाऊन रहायला सांगत नाहीं. खेड्यांतील लोकांना जें मिळणें न्यायाला धरून आहे तें तुम्ही त्यांना दिलें पाहिजे एवढेंच माझें शहरवासीयांना सांगणें आहे. खेडुतांचे नाहींसे झालेले धंदे त्यांना पुन्हा करण्याची संधि देणें हेंहि कांहीं सोपें काम नाहीं.

कांहीं बाबतींत शास्त्रीय माहिती मिळविण्यासाठीं मी कांहीं शास्त्रज्ञांकडे व डॉक्टरांकडे एक प्रश्नपत्रिका पाठविली होती. पण मला पाहिजे होतीं तशा प्रकारचीं उत्तरें कोणीच पाठवूं शकला नाहीं. गुळासारख्या

साध्या पदार्थांचेंहि शास्त्रीय पृथक्करण केलेलें नसावें हा दैवदुर्विलासच नव्हे काय ? याचें कारण एवढेंच कीं, खेडीं व खेडूत यांच्या उन्नतीचा विचारच आपल्या डोक्याला किंवा मनाला कधीं शिवलेला नाहीं. मधाचें उदाहरण घ्या. उत्तम मधाची जी कसोटी आहे तिला उतरल्याशिवाय इतर देशांतून मधाची विक्रीच होऊं शकत नाहीं. सडलेले तांदूळ बिनसडलेल्या तांदुळांइतके सकस नसतात हें प्रयोगांनीं सिद्ध झालेलें असूनहि लोकांना सडलेले तांदूळ खाण्यापासून परावृत्त करण्यासाठीं राजरोस प्रचार करायला मात्र कोणीच तयार होत नाहीं.

आपल्याला प्रयोगशाळा पाहिजेत—त्यांत निरपेक्षपणें, केवळ समाजसेवाबुद्धीनें व निरलसपणें काम करणारे शास्त्रज्ञ पाहिजेत. खेडीं प्रथमतः स्वयंपूर्ण झालीं पाहिजेत व त्यानंतर शहराच्या गरजा भागविण्याच्या कामीं त्यांनीं झटलें पाहिजे. यासाठीं जिल्हानिहाय संस्था काढणें इष्ट आहे. एखादा जिल्हा फारच मोठा असला तर त्याचे पोटविभाग पाडून त्या प्रत्येकासाठीं एक स्वतंत्र संस्था काढली पाहिजे. या सर्वांवर देखरेख ठेवण्यासाठीं व सर्वांचे काम सुसूत्र चालवण्यासाठीं एक मध्यवर्ति समिति राहील. या कार्यावर दृढ निष्ठा असणारीं व कार्यतत्पर अशीं माणसें पाहिजेत.'

ता. १४ डिसेंबर रोजीं अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची स्थापना वर्धा येथें झाली. श्री जमनालाल बजाज यांनीं या कार्याला पुरेल एवढी जमीन देणगी म्हणून दिली होती. या संस्थेचे सर्वाधिकारी या नात्यानें गांधीजींची निवड करण्यांत आली होती. ही संस्था म्हणजे राष्ट्रीय सभेचीच निर्मिति होती. पण तिचें स्वरूप मात्र राजकारणापासून सर्वस्वीं अलिप्त व स्वयंसिद्ध असें ठेवण्यांत आलेलें होतें. या संस्थेच्या अधिकारपदावर असलेल्या कोणाहि व्यक्तीनें कायदेभंगाच्या चळवळींत सामील होतां कामा नये असा निर्बंध घालण्यांत आला

होता. या संस्थेचा एक स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करण्यांत आला असून व्यवस्थापक मंडळ त्यास जबाबदार होतें.

ग्रामोद्योगांच्या कार्यकर्त्यांना उद्देशून गांधीजी म्हणत, 'आपल्याला दररोज लागणाऱ्या वस्तू आपणाला माहीत असतातच. त्या आपल्या आपण बनविण्याच्या उद्योगाला ताबडतोब लागलें पाहिजे. उदाहरणार्थ, दांत घांसायचा ब्रश. बाभळीच्या काटकीनें ब्रशाचें कार्य साधत नाहीं काय ? काटकीचें एक टोंक ठेंचून तिचा ब्रशाप्रमाणें उपयोग करतां येतो व ती काटकी मधोमध चिरून तिनें जीभ साफ करतां येते. पैशाच्या दृष्टीनें तर असें करणें स्वस्त आहेच पण आरोग्याच्या दृष्टीनेंहि तें अधिक इष्ट आहे. टूथ पावडरपेक्षां स्वच्छ राखुंडींत मीठ घालून ती वापरणें अधिक चांगलें नाहीं काय ? हातांनीं विणलेली खादी, हातांनीं सडलेला तांदूळ, घाणीवरचें तेल हीं सारीं गिरणींतून मिळणाऱ्या त्या त्या वस्तूपेक्षां निःसंशय अधिक श्रेष्ठ आहेत. गुणधर्मांत साखरेपेक्षां गूळ अधिक श्रेष्ठ असल्याचें सप्रयोग सिद्ध झालेलें आहे.

जो तो माणूस आपलें अंगण साफसूफ करण्याची दक्षता घेतो. पण तोच केरकचरा आपल्या शेजाऱ्याच्या अंगणांत फेंकून देतांना त्याच्या मनाला कांहीं दिक्कत वाटत नाहीं. या आपल्या गुणांनीं हे खेडूत आपल्या साऱ्या खेड्याला एखाद्या उकिरड्याचें हिडिस स्वरूप आणून देतात. खेड्यांतील तळ्यांत किंवा विहिरींत स्फटिकासारखें स्वच्छ पाणी पिण्यासाठीं मिळूं नये, हें कशाचें लक्षण ? प्रत्यक्ष लोकांचा सहकार नसेल तर खुद्द सरकारहि कांहीं सुधारणा करूं शकणार नाहीं. पण लोकांनीं सहकार करावयाचें मनावर घेतल्यास सरकारला कांहीं करण्याची आवश्यकताच उरणार नाहीं. वैयक्तिक व सामुदायिक आरोग्या-संबंधींची दक्षता बाळगणें हें शिक्षणाचें पहिलें तत्त्व आहे. आपल्या मलमूत्राचाहि हे खेडूत योग्य प्रकारें उपयोग करूं शकत नाहींत हें

आश्चर्य नव्हे काय? तें आपल्या शेतांत नेऊन टाकलें तर त्याचा उत्कृष्ट खत म्हणून उपयोग होतो हें का त्यांना माहीत नाहीं? खेड्यांतील सर्व लहानमोठे रस्ते स्वच्छ ठेवणें किती बरें आवश्यक आहे? इकडे तिकडे पडलेल्या हाडांच्या निरनिराळ्या उपयुक्त वस्तू होऊं शकतात. त्याच हाडांची बारीक पूड केल्यावर तिचा उत्तम प्रकारचें खत म्हणून उपयोग होतो. चिंध्या व कागदांचे कपटे यांपासून कागद तयार होऊं शकतो.

खेड्यांतील तळ्यांचा कसा दुरुपयोग करण्यांत येतो पहा. त्याच तळ्यांतील पाणी लोक पितात, त्यांतच स्नान करतात, त्यांतच धुणीं धुतात. इतकेंच नव्हे तर त्या लोकांच्या म्हशी सुद्धां त्याच तळ्यांत येऊन बसतात. अशा प्रकारचें गलिच्छ पाणी हें अनेक रोगांचें मूळ आहे हें नव्यानें का सांगायला पाहिजे? कळकळीचे कार्यकर्ते लाभले तर या सर्व बाबतींत हां हां म्हणतां सुधारणा घडून येईल.

खेड्यांतून कार्य करूं पहाणाऱ्या कार्यकर्त्यांना साधा ताप, अजीर्ण, मलावरोध अशांसारख्या सर्वसामान्य आजारांवर तरी उपाय करतां आले पाहिजेत. रोगांचें निदान बरोबर झाल्यानंतर त्या रोगावरील औषध खेड्यांतून अगदीं स्वल्प किंमतींत मिळूं शकतें. कोणत्याहि खेड्यांत एरंडेल तयार होऊं शकतें, सोनामुखीचीं पानें हवीं तितकीं मिळूं शकतात. प्रत्येक जातीच्या तापाला क्विनाईनचा उपयोग होतोच असें नाहीं. एखादा दिवस लंघन केल किंवा आहार अगदीं कमी केला तर बहुतेक प्रकारचे ताप नाहींसे होतात. गरम पाण्याचा उपयोग औषधासारखा होऊं शकतो. अशा पाण्यानें आंतडीं साफ होतात, घाम येतो व तापहि निघतो. उकळलेलें पाणी म्हणजे स्वस्तांत स्वस्त व अगदीं निरुपद्रवी असें रोगजंतुनाशक औषधच आहे. अर्थात, हें उकळलेलें पाणी पिववेल इतकें निवेपर्यंत थांबलें पाहिजे. ज्या रोगाचें निदान कार्यकर्त्यांना होणार नाहीं त्या रोग्याला त्यांनीं

स्थानिक वैद्याकडे न्यावें. तो केवळ नांवाचाच वैद्य असल्याची सदर कार्यकर्त्यांची खात्री असेल तर त्यांनीं सदर रोगी माणसाला शक्य तितक्या जवळच्या डॉक्टरकडे न्यावें—अर्थात् तो डॉक्टरहि माणुसकीला पारखा न झालेला डॉक्टर असावा. पण या कोणत्याहि प्रसंगीं स्वच्छतेला अतिशय महत्त्व आहे हें त्या कार्यकर्त्यांनीं विसरतां कामा नये. निसर्गासारखा उत्कृष्ट धन्वंतरी नाहीं, ही त्यांनीं आपल्या मनाशीं पक्की खूणगांठ बांधून ठेवावी. मनुष्याच्या हातून घडलेल्या चुका दुरुस्त करण्यासाठीं निसर्गाची सतत धडपड चाललेली असते. मनुष्य एकसारखा चुकाच करीत रहातो तेव्हां मात्र निसर्गाचा नाइलाज होतो. मग आपल्या भात्यांतील शेवटचा बाण जो मृत्यु तो त्या माणसाच्या भेटीस पाठविणें निसर्गाला भाग पडतें.'

मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत आपलीं अपुरीं राहिलेलीं कामें पुरीं करून टाकण्याच्या उद्देशानें गांधीजींनीं एक महिन्याचें मौनव्रत घेतलें. ता. १९ एप्रिलला हें व्रत सोडून ते आपलीं सार्वजनिक कामें पुन्हा करूं लागले. हिंदी साहित्य संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं ते इंदूर येथें गेले. आपल्या अध्यक्षीय भाषणांत ते म्हणाले, 'आज हिंदुस्थान जिवंत दिसत आहे तो केवळ त्याच्या शेतकऱ्याच्या जिवावर! जर हिंदुस्थानचा शेतकरी उद्यां स्वस्थ बसला तर राजामहाराजांना सुद्धां अन्नावांचून तडफडून मरण्याची पाळी येईल. सर हुकुमचंदजवळ पेवेंच्या पेवें भरून जातील इतकीं हिरेमाणकें असलीं तरी तो सहारा वाळवंटांत गेल्यावर त्याला जर कोणी पाणी दिलें नाहीं तर त्याला पाणी-पाणी करून तडफडत मरावेंच लागणार! सोन्यांत किंवा हिरेमाणकांत आपली भूक किंवा तहान शमविण्याचें का सामर्थ्य आहे? आपलें जीवित सर्वथैव शेतकऱ्यांवर व कामकऱ्यांवर अवलंबून आहे. हे शेतकरी व कामकरी जी हिंदी भाषा बोलतात व

जी हिंदी भाषा त्यांना उत्तम प्रकारें समजते तीच हिंदी किंवा हिंदुस्थानी भाषा राष्ट्रभाषा म्हणून गणली गेली पाहिजे. त्यांच्याशीं बोलतांना तुम्ही कालिदासाची भाषा बोलूं लागलांत तर ती त्यांना समजणार तरी कशी? तुम्ही त्यांची भाषा शिकून घेऊन त्या भाषेंतच त्यांच्याशीं बोलले पाहिजे.'

खादी कांतणारांना दररोज कमींत कमी किती वेतन मिळेल याचा अंदाज काढण्यासाठीं श्री विनोबा भावे आदिकरून त्या विषयांतील तज्ञ मंडळी त्यासंबंधानें प्रत्यक्ष प्रयोग करून पाहूं लागली. वर्धा आश्रमांत श्री विनोबा सूतकताई विभागाकडे जातीनें लक्ष पुरवूं लागले. गांधीजींनीं चामड्याचीं कामें करणाऱ्या लोकांस धडे देण्यास सुरुवात केली. चपला तयार करतांना उभे व आडवे पट्टे कुठें व कसे लावावे इथपासून ते शिक्षण देत.

## ११

ता. २ ऑगस्ट रोजीं प्रांतिक स्वायत्ततेच्या सुधारणांना बादशहांनीं आपली संमति दिली. त्या संबंधांत अनेक बंधनें घालण्यांत आलीं होतीं. निरनिराळ्या प्रांतांचे गव्हर्नर्स व व्हाईसरॉय यांस सदर घटनेंत जे जादा अधिकार देण्यांत आले होते त्यासंबंधानें कॉंग्रेसनें आपली तीव्र नापसंती दर्शविली होती. कारण या कलमामुळें त्या त्या राज्यांत अनियंत्रित राजसत्तेला कायमचें स्थान मिळून बसेल असें कॉंग्रेसचें म्हणणें होतें. शिवाय त्या घटनेंत जातीयतेचा अंतर्भाव करून विभक्त मतदारसंघास देण्यांत आलेली मान्यता कॉंग्रेसला मान्य होणें शक्य नव्हतें.

गांधीजींना आतां रक्तदाबाच्या विकाराचा त्रास होऊं लागला होता. १९३६ सालच्या जानेवारी महिन्यांत संततिनियमनाचा पुरस्कार करणारांत अग्रगण्य अशा मार्गारेट सँगर नांवाच्या बाई गांधीजींची मुलाखत घेण्यासाठीं आल्या. त्या बाईंच्या निरनिराळ्या शंकांचें निरसन करतांना ते म्हणाले, 'स्त्री ही आपल्या पित्याची किंवा पतीची कांहीं गुलाम नाहीं. पुरुषानें तिला गुलाम बनविलें व गुलामगिरीच्या सरावानें तिला त्यांत भूषण वाटूं लागलें. स्त्री ही पुरुषाची गुलाम नव्हे ही माझी शिकवण माझ्या भगिनींना पटली तर हिंदुस्थानांत संततिनियमनाचा प्रश्नच उद्भवणार नाहीं. कामविकाराच्या तृप्तीसाठीं पुरुष स्त्रीच्या जवळ जातो तेव्हां त्याचा यशस्वीपणें प्रतिकार करण्यास स्त्रीनें शिकलें पाहिजे. प्रत्येक पुरुष कांहीं पशुवृत्तीचा नसतो. पण आमच्या देशांतील स्त्री पुरुषाचा प्रतिकार करण्याचा सहसा प्रयत्नच करीत नाहीं. स्त्रीनें आपली विरक्ति दर्शविली तर पुरुष सहसा जबरदस्ती करणार नाहीं. पण तिला तसें शिक्षणच मिळालेलें नाहीं. ब्रह्मचर्याच्या पालनानें कित्येक लोकांना वेड लागतें वगैरे आक्षेपांत मला फारसा अर्थ दिसत नाहीं. ब्रह्मचर्यपालनाचा नियम करावयाचा आणि कोणत्याहि प्रकारचे यमनियम मात्र पाळावयाचे नाहींत, असें करून कसें चालेल ? विषयसुख म्हणजे स्त्रीपुरुषांतील प्रेम अबाधित रहाण्याचें साधन आहे असें मला वाटत नाहीं. आपल्याला मिळणाऱ्या सुखाचे परिणाम भोगण्याची मनाची तयारी नसतांना त्या सुखासाठीं एकत्र येणें याला प्रेम म्हणण्यापेक्षां कामविकार म्हणणेंच अधिक सयुक्तिक नाहीं का ?

तीन किंवा चार मुलें झाल्यानंतर पतिपत्नींनीं शरीरसुखापासून विरक्त कां होऊं नये ? दुर्दैवानें तीं सर्व मुलें मेलींच तर वाटल्यास प्रजोत्पादनाचा मार्ग पुन्हा स्वीकारावा. दुसऱ्याची गुलामगिरी करतांना माणसाला लाज वाटते तशी विषयसुखाची गुलामगिरी करतांना कां वाटूं

नये ? तुम्ही संततिनियमनाचा पुरस्कार करणारे लोक संयमाविषयीं एक चकार शब्दहि उच्चारीत नाहीं.'

ता. २९ फेब्रुवारी रोजीं गांधी सेवा संघाच्या वतीनें वार्षिक सभा भरली असतांना गांधीजींनीं आपलें अंतःकरण श्रोत्यांसमोर उघडें केलें. ते म्हणाले, 'गांधीवाद म्हणून एखादा स्वतंत्र पंथ आहे ही कल्पनाच साफ चुकीची आहे. एखादा नवा संप्रदाय निर्माण करण्यासारखें कोणतें नवें तत्त्वज्ञान मी लोकांना सांगितलें आहे ? शाश्वत सत्याचीं मूल्यें आपल्या दररोजच्या जीवनाला व आपणापुढें निर्माण होणाऱ्या प्रश्नांना लावावीं यासंबंधीं मी प्रयत्न करीत आलों आहें हें मात्र खरें. तेव्हां मनुस्मृतीसारखी एखादी गांधीस्मृति मी मागें ठेवण्याचा प्रश्नच उद्भवूं शकत नाहीं.. त्या महात्म्याची व माझी तुलना करणें सुद्धां हास्यास्पद आहे. सत्य व अहिंसा हीं सनातन तत्त्वें आहेत. या दोन्ही तत्त्वांचा जितक्या जास्त प्रमाणांत मला उपयोग करतां येण शक्य आहे तितका करण्याचा मी प्रयत्न करीत असतों. असें करतांना माझ्या हातून अनेक चुका झाल्या आणि त्या चुकांमुळें माझ्या ज्ञानांत भर पडली. सत्यावरील माझी निष्ठा जवळजवळ माझ्या जन्मापासूनच असली तरी अहिंसेवरील माझी निष्ठा मात्र तशी नाहीं. सत्यासाठीं अहिंसेचें तत्त्व दूर सारतांना मला कांहीं वाटत नसे. पण खरें सांगायचें तर सत्याचा शोध करीत असतांनाच मला अहिंसेचा शोध लागला. सत्यापरता श्रेष्ठ धर्म नाहीं असें आपलीं धर्मशास्त्रें सांगतात. पण तींच धर्मशास्त्रें अहिंसा हा मानवाचा अत्युच्च धर्म असल्याचीहि ग्वाही देतात.'

१९३६ सालच्या एप्रिल महिन्यांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन पं. जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखालीं लखनौ येथें झालें. आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या शेवटीं ते म्हणाले, 'आपणांपैकीं अनेकांचे गांधीजींशीं मतभेद होते, अजूनहि आहेत व कदाचित् यापुढेंहि

राहातील; आणि म्हणूनच ज्यांची ज्या कार्यावर श्रद्धा असेल तें त्यानें करीत रहाणें हें केव्हांहि योग्यच होय. पण आपल्या मतभेदांपेक्षां त्यांच्याशीं आपणाला जोडणारे प्रेमरज्जू अनंत पटींनीं अधिक सामर्थ्यवान आहेत. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याची व दारिद्र्यांत खितपत पडलेल्या आपल्या बहुजनसमाजाच्या उन्नतीची त्यांच्याइतकी तळमळ आपणांपैकीं कितीशा लोकांत आहे? निर्भयता, शिस्तपालन आणि त्यागबुद्धि यांचे धडे आपणास याच विभूतीनें दिले. त्याचप्रमाणें या महात्म्यानें हिंदुस्थानाची मान उंचावण्याचें जें महत्कार्य करून दाखविलें, त्याचाहि आम्हांला विसर पडणें अशक्य आहे. स्वातंत्र्याची प्रतिज्ञा आपण अजून पूर्ण केलेली नाहीं आणि ती पूर्ण करण्याच्या कामीं त्यांनीं आपणास मार्गदर्शन करावें म्हणून त्यांना आपण विनंती करीत आहोंत. पण पुढारी कितीहि थोर असला तरी तो एकटाच साऱ्या कामाचा भार पेलूं शकत नाहीं. आपल्या सामर्थ्याप्रमाण आपण सर्वांनीं या कामीं हातभार लावला पाहिजे. कोणीतरी एकादी जादू करून दाखवील अशी आपण दीनवाण्यासारखी आशा करीत बसतां कामा नये.'

गांधीजी या अधिवेशनास हजर होते पण त्यांत त्यांनीं प्रत्यक्ष असा कोणताहि भाग घेतला नाहीं. अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या प्रदर्शनाचें उद्घाटन मात्र त्यांनीं केलें. त्यावेळीं ते म्हणाले, 'लोकांचे डोळें दिपविणें हा कांहीं या प्रदर्शनाचा हेतु नव्हे. पण दुःखाची व शरमेची गोष्ट अशी आहे कीं, आपले मेंदूच अलीकडे विकृत झालेले आहेत. आपल्या दृष्टीसमोर दिसणाऱ्या चमत्कारांना नमस्कार करायला आपण तयार होत नाहीं. या प्रदर्शनांत ठेवण्यांत आलेल्या वस्तूंच्या तुलनेनें अगदीं भिकार अशा वस्तू युरोपांतून इकडे आल्या तर आपण त्यांचें तोंड फाटेपर्यंत कौतुक करूं! युरोपांतल्या कुठल्या तरी देशांतील अगदीं अपरिचित व चमत्कारिक नांव असलेल्या एखाद्या झऱ्याचें पाणी

कोणी हिंदुस्थानांत आणलें तर जगांत असतील नसतील ते सारे सद्गुण त्या पाण्याला चिकटविण्याच्या बाबतींत आपणांत अहमहमिका चालू होईल. पण ज्या गंगेचें पाणी परम पवित्र, अत्यंत शुद्ध व रोगजंतुनाशक असल्याबद्दल आज हजारों वर्षे लौकिक आहे त्या गंगेच्या पाण्याला मात्र आपण एखाद्या घाणेरड्या डबक्यांतील पाण्यापेक्षां अधिक किंमत देण्यास तयार होणार नाहीं.

तुमच्या अर्धपोटी बांधवांच्या पोटांत दोन घांस घालण्याचीहि बुद्धि तुम्हांस होत नसेल तर तुमची कींवच केली पाहिजे. आपलें राष्ट्रीय निशाण आपण मोठ्या दिमाखानें फडकवतों व त्या निशाणाबद्दल आपल्याला अतिशय अभिमानहि वाटतो. पण जर तुम्हांला आपल्या देशांत तयार होणाऱ्या वस्तूंचें थोडेंहि कौतुक नसेल आणि परदेशांतून येणाऱ्या वस्तूंबद्दलच तुम्हांला जिव्हाळा वाटत असेल तर त्या तुमच्या अभिमानाचा उपयोग काय? आपल्या अर्धपोटी असलेल्या कारागिरांनीं केलेल्या कलेच्या आविष्कारानें ज्यांच्या अंतःकरणांत कौतुकाच्या ऊर्मी उसळत नाहींत व त्या कलेला उत्तेजन देण्यासाठीं अगदीं अल्पहि त्याग करण्याची ज्यांना बुद्धि होत नाहीं त्यांनीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या गप्पा मारण्यांत अर्थ काय?'

त्यानंतर नागपूर येथील अखिल भारतीय साहित्य परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें सदर प्रसंगीं ते म्हणाले, 'उत्कृष्ट असें वाङ्मय हिंदुस्थानां-तील सर्व लोकांना समजेल अशा भाषेंत प्रसिद्ध करण्यांत आलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर वाचकांची मानसिक उन्नति होईल अशा प्रकारचें नवीन वाङ्मयहि निर्माण झालें पाहिजे. अलीकडे प्रत्येक प्रांतिक भाषेंतील वाङ्मयकृतींत कामुक भावनेचा सुळसुळाट झालेला दिसून येतो. कांहीं कांहीं लेखकांची तर शृंगाराशिवाय इतर कोणत्याहि रसांत कांहींच अर्थ नाहीं असें म्हणण्यापर्यंत मजल गेलेली आहे. इतर रसांचा

आविष्कार करणाऱ्या लेखकांचा ते शुष्क व अरसिक म्हणून उपहास करण्यांत येतो. माझें तर मत असें आहे कीं, वाचकांचें कामोद्दीपन करणारा शृंगाररस हा सर्व रसांत अत्यंत कनिष्ठ असा रस आहे. माझ्या हातीं सत्ता असती तर जातीयवादी, धर्मवेड वाढीस लावणारें, जाती-जातींत विद्वेष निर्माण करणारें, असें सर्व वाङ्मय मी बेकायदा ठरविलें असतें.'

वर्ध्याजवळच्च असलेल्या शेगांव या खेडयांत आपला कायमचा मुक्काम करण्याचें गांधीजींनीं ठरविलें. त्यांच्या निकटवर्ति सहकाऱ्यांस हा विचार रुचला नाहीं. शेगांवला तार ऑफिस तर नव्हतेंच पण पोस्ट ऑफिस-सुद्धां नव्हतें. गांधीजींना खेडयांत जाऊन रहाण्याची एवढी तळमळ लागून राहिली असल्यास त्यांनीं निदान गुजराथेंतील एखाद्या खेडयांत जाऊन रहावें असें त्यांचें म्हणणें होतें. पण गांधीजी त्यांना म्हणत कीं, गुजराथेंत कार्य चाललेंच आहे. आपण तेथें गेलों तर तेथील कार्यकर्ते आपलें काम थांबवतील व मार्गदर्शनासाठीं आपल्या तोंडाकडे पाहूं लागतील.

आपले जुने सहकारीसुद्धां आपल्याबरोबर नसावेत असें गांधीजींना वाटत होतें. ज्या संकटांना तोंड देण्याचा ते दुसऱ्यांना उपदेश करीत त्या संकटांना स्वतः तोंड देण्याचा त्यांचा निश्चय झालेला होता. त्यांच्या आजवरच्या सहकाऱ्यांपैकीं बहुतेक मंडळी मध्यम वर्गांतील होती. आतां बहुजनसमाजांतील लोक त्यांना सहकारी म्हणून हवे होते. कांहीं लोक गांधीजींच्या वयाचा व अशक्तपणाचा मुद्दा उपस्थित करीत. आपल्या अशक्तपणामुळें आपणास काम करणें अशक्य झाल्यास तसें प्रांजलपणें कबूल करून पुन्हा वर्ध्याला परत येण्यास आपण लाजणार नाहीं असें गांधीजींनीं त्या लोकांना निक्षून सांगितलें.

ग्रामोद्योगांचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपदेश करतांना गांधीजी

म्हणत, 'आजकाल माणसाची किंमत रुपये-आणे-पैनीं ठरविण्यांत येत असल्यामुळें मुलांना मिळणाऱ्या शिक्षणांतहि व्यापारी दृष्टि घुसलेली आहे. जर तुमची दृष्टि सुद्धां अशाच प्रकारची असेल तर या विद्यालयांत तुमच्या पदरीं निराशेशिवाय कांहींच पडणार नाहीं. तुमचा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर सन्मान्य वेतन म्हणून तुम्हांला दरमहा दहा रुपये मिळतील. एखाद्या कंपनीच्या मॅनेजरला किंवा एखाद्या मोठ्या हपिसराला जो पगार मिळतो त्याच्याशीं तुम्ही त्या दहा रुपयांची तुलना करतां कामा नये. आपणाला हल्लींचीं जीवनमूल्यें बदलायचीं आहेत. किमान मोबदला घेऊन आपण देशसेवा करीत असल्याचा तुमच्या मनाला आनंद वाटला पाहिजे. देशासाठीं अंग मोडून कामें करणारीं माणसें आपणाला हवीं आहेत. आपल्या कामांत येणाऱ्या अडचणींना तोंड देतांना खऱ्या देशसेवकाला सुखसोहाळे उपभोगीत असल्याचाच आनंद वाटला पाहिजे. खऱ्या देशसेवकाला सेवेंतच समाधान वाटलें पाहिजे. अशा वृत्तीचे कार्यकर्ते लाभल्याशिवाय आपल्या या संघाचें पाऊल पुढें पडणार नाहीं. तुम्ही तशा प्रकारचे कार्यकर्ते व्हा.'

गांधीजींचा सर्वांत वडील मुलगा हरिलाल हिंदुधर्म सोडून मुसलमान झाला तेव्हां ते म्हणाले, 'मुसलमानी किंवा अन्य कोणत्याहि धर्मांतील धर्मतत्त्वें मनोमन पटल्यामुळें एखादा हिंदु परधर्मांत गेला तर त्याचा मला विषाद वाटणार नाहीं. पण कोणत्याहि ऐहिक सुखाच्या लालसेनें कोणीहि धर्मांतर केल्यास मी तो त्याचा अधःपातच समजतों. हरिलालला दारु पिण्याचें जबरदस्त व्यसन होतें. तो बाहेरख्यालीहि होता. मुंबईंतील कांहीं पठाणांकडून जबर व्याजानें पैसे कर्जाऊ घेण्यापर्यंत त्याची मजल गेलेली होती. असल्या प्रकारची एखादी व्यक्ति हिंदुधर्मांतून कमी झाली तर मला त्याचें बिलकुल दुःख वाटत नाहीं. मुसलमान धर्म स्वीकारल्यानंतर त्यानें हे सर्व दुर्गुण सोडले तर मला आनंदच

होईल. त्याचे हे सर्व दुर्गुण तसेच राहिले तर मात्र माझ्या मुसलमान बंधूंनीं, आपल्या धर्मीयांत अशा एका माणसाची भर पडली म्हणून आनंद मानावा कीं काय हा मोठा प्रश्न आहे.'

शेगांवला सर्वांनीं पायीं यावें असें गांधीजींचें सांगणें असे. त्याप्रमाणें गांधीजींचे खासगी चिटणीस श्री महादेवभाई देसाई यांस आपलें काम करण्यासाठीं दररोज अकरा मैलांची रपेट पडे.

जवाहरलाल नेहरूंचे विचार समाजवादी बनत चालल्यामुळें गांधीजी व जवाहरलाल यांच्यांत वैमनस्य निर्माण झालें असल्याच्या लोकांच्या शंकेचें निरसन करतांना गांधीजी म्हणाले, 'अत्याचारी मार्गानें हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणें अशक्य असून अनत्याचारी मार्गांनींच तें मिळवितां येईल हा माझा सिद्धान्त जवाहरलालनां पटलेला आहे. आम्हां दोघांत मतभेद जरूर आहेत. पण त्यामुळें आमच्या वैयक्तिक संबंधांवर यत्किंचितहि परिणाम झालेला नाहीं. काँग्रेसच्या ध्येयाशीं आम्ही दोघेहि पूर्वींइतकेच आजहि सहमत आहोंत. मी व जवाहरलाल यांच्यांत स्पर्धा असल्याचें कांहीं लोक म्हणतात. पण आम्हां दोघांत स्पर्धा असण्याचें कारण काय, हेंच मला समजत नाहीं. एका बाबतींत मात्र आमच्यांत स्पर्धा असणें शक्य आहे. आम्हां दोघांपैकीं कोण कोणावर अधिक प्रेम करतो किंवा आम्हां दोघांचेंहि जें एकच ध्येय आहे तें गांठण्यासाठीं कोण अधिक प्रयत्न करतो, ही ती बाब होय. आमचें समान ध्येय गांठण्यासाठीं आम्ही दोघे निरनिराळ्या मार्गांनीं जात असल्यासारखे कोणाला दिसलों तरी ती घटना क्षणिक समजूत आम्ही अगदीं लौकरच एकमेकांना अधिक प्रेमानें भेटणार आहोंत, अशी लोकांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून ठेवावी.'

वाङ्मयासंबंधींचे आपले विचार पुन्हा एकदां स्पष्ट करतांना गांधीजी म्हणाले होते, 'शेगांवांतील खेडुतांचे अस्थिचर्मांचे सांगाडे माझ्या

कल्पनेपुढें दिसूं लागले कीं, आजचें आपलें वाङ्मय म्हणजे नुसता भुसा आहे असें मला वाटूं लागतें. आणि त्या खेड्यांतील आपल्या भगिनी! त्यांना नुसती अक्षरओळख सुद्धां नाहीं! काबाडकष्ट करीत रहावयाचें व गुलामगिरींत आनंद मानावयाचा एवढेंच त्यांना माहीत आहे. उन्हातान्हांतून आणि पावसापाण्यांतून त्या पाणी भरतात, गवत कापतात, शेतीचीं किरकोळ कामें करतात आणि त्यांना माझ्यासारख्या कोणी तरी एखादें काम देऊन त्याच्या मोबदल्यांत पैसा किंवा दोन पैसे दिले तर कृतज्ञतेनें डोळ्यांत आंसवें आणून त्याच्याकडे भक्तिभावानें बघत असतात.

आपल्या साहित्यिकांची स्त्रीवर्गाविषयीं कशी दृष्टि असते पहा. आपल्या भगिनींच्या रूपसंपदेचें व शरीरसौष्ठवाचें रसभरित वर्णन करण्यांत ते काय पण रंगून जातात! जणुं कांहीं आपल्या भगिनींचें सारें सौंदर्य किंवा सामर्थ्य त्यांच्या शरीररचनेंत किंवा पुरुषांचा कामविकार तृप्त करण्याच्या सामर्थ्यांतच सामावलेलें आहे! पुरुष मात्र मानववंशांत जन्मलेले आहेत आणि स्त्रियांचा जन्म काय दुसऱ्या एखाद्या वंशांत झालेला आहे? स्त्रियांनीं काय फक्त घरांतलीं उष्टीं काढावीं आणि आपला पति दगड असला तरी त्याची पूजा करण्यांत आपल्या जन्माचें सार्थक मानावें? माझी साहित्यिकांना अशी आग्रहाची विनंती आहे कीं, त्यांनीं लेखनासाठीं आपलें कलम उचलण्यापूर्वीं स्त्रीला आपली माता मानून तिचें चित्र डोळ्यापुढें उभें करावें. असें केल्यानें त्यांचें कलम अत्यंत पवित्र असेंच साहित्य प्रसवेल अशी मी ग्वाही देतों. एक स्त्री तुम्हाला पत्नी या नात्यानें लाभली त्यापूर्वीं एका स्त्रीनेंच तुम्हाला जन्महि दिला होता हें तुम्ही विसरूं नका. हल्लींच्या वाङ्मयांत स्त्रियांचीं जीं वर्णनें येतात तीं वाचल्यावर आपण त्या निकषावर कशा काय टिकणार, असाच प्रश्न आपल्या भगिनींपुढें उभा रहात असेल. स्त्रियांच्या

अंगोपांगांचें विश्लेषणात्मक चित्र ज्यांत रंगविलेलें नाहीं तें मुळीं वाङ्मयच ठरूं शकत नाहीं कीं काय? उपनिषदें, कुराण आणि बायबल या ग्रंथांतून अशा प्रकारचीं वर्णनें आढळतात काय? तुळसीदासाच्या महनीय ग्रंथांतून असल्या वर्णनांचा मागमूस तरी आढळतो काय?'

राष्ट्रीय सभेचें त्या वर्षीचें अधिवेशन फैजपूर येथें पं. जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. कायदेमंडळांच्या निवडणुकीनंतर काँग्रेसनें अधिकारस्वीकार करावा कीं नाहीं याबद्दल काँग्रेसच्या प्रतिनिधींत खूपच रण माजलें. सन १९३५ च्या इंडिया ॲक्टशीं सहकार करणें म्हणजे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीशीं द्रोह करणें आहे; तेव्हां सदर ॲक्टास काँग्रेसचा सक्त विरोध असून कायदेमंडळांतून व बाहेरून हा ॲक्ट गाडून टाकण्यासाठींच काँग्रेस निवडणुकीच्या रणांगणांत उभी ठाकत आहे हें या अधिवेशनांत स्पष्ट करण्यांत आल. गांधीजींनीं या वादविवादांत भाग घेतला नाहीं. मात्र विधायक कार्यक्रमासंबंधानें ऊहापोह करतांना ते म्हणाले कीं, 'कायदेमंडळांतील कामाला थोडेंफार महत्त्व असलें तरी तें आपणास स्वातंत्र्य मिळवून देऊं शकणार नाहीं. त्या कामाचें महत्त्व इतकेंच कीं, आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या कामांत इंग्रज सरकार आपल्या वटहुकुमांच्या जोरावर जे अडथळे निर्माण करील त्या वटहुकुमांना हिंदी प्रतिनिधींची संमति आहे अशी फुशारकी त्या सरकारला मारतां येणार नाहीं. काँग्रेसचे उमेदवार अशा प्रकारच्या उपायांना संमति देणें अशक्य असल्यामुळें जनतेनें त्यांनाच निवडून दिलें पाहिजे. आपण या ठिकाणीं जमलों आहों यांपैकीं कितीसे लोक आमदार किंवा नामदार बनणार आहेत? या प्रतिनिधींना निवडून देण्याचा हक्क आज फक्त साडेतीन कोटी लोकांना आहे. देशांतील बाकीच्या साडेएकतीस कोटी लोकांची वाट काय? स्वराज्याच्या माझ्या कल्पनेप्रमाणें ते साडेएकतीस कोटी लोक या देशाचे खरे मालक

असून हे साडेतीन कोटी मतदार त्यांचे सेवक आहेत व कायदेमंडळांत जाणारे पंधराशें प्रतिनिधी हे त्या साडेतीन कोटी मतदारांचे सेवक आहेत.

पण या साडेएकतीस कोटी लोकांचें कांहीं कर्तव्य म्हणून आहेच. स्वराज्य म्हणजे काय, तें कसें संपादन करावयाचें, वगैरे गोष्टींची जर ते माहिती करून घेणार नाहींत आणि आळसानें स्वस्थ बसून रहातील तर ते या पंधराशें प्रतिनिधींचे स्वतःच गुलाम बनून रहातील. साडेतीन कोटी मतदारांनाहि हाच नियम लागू आहे. ते जर उद्योगी व शहाणे झाले नाहींत तर ते या पंधराशें प्रतिनिधींचीं प्यादीं ठरल्याशिवाय रहाणार नाहींत—मग ते मतदार कॉंग्रेसवाले असोत किंवा दुसरे कोणी असोत! निवडणुकीच्या वेळीं मतदान केलें म्हणजे आपलें कर्तव्य संपलें—त्यानंतर पुन्हा निवडणुकीचा जमाना येईपर्यंत हातपाय ताणून पडणें एवढेंच आपलें काम, अशा भ्रमांत हे मतदार मश्गूल होऊन रहातील तर त्यांच्या कपाळींहि या पंधराशें प्रतिनिधींची गुलामगिरी आल्याशिवाय खात्रीनें रहाणार नाहीं.

ही आपत्ति टाळावयाची असेल तर देशांतील पसतीस कोटी लोकांनीं उद्योगी व शहाणे होणें एवढा एकच उपाय आहे असें मला वाटतें. चरखा आणि ग्रामोद्योग यांच्या ठिकाणीं हे गुण त्यांच्या अंगीं बाणविण्याचें सामर्थ्य निश्चितपणें आहे असा माझा दृढ विश्वास आहे. मात्र या गोष्टी जनतेनें करावयाच्या त्या त्यांतील मर्म जाणूनच केल्या पाहिजेत. उपमाच द्यावयाची तर मी असें म्हणेन कीं, चरखा हा सूर्य असून इतर ग्रामोद्योग म्हणजे त्याच्या सभोंवतालची ग्रहमालिका आहे. ईस्ट इंडिया कंपनीनें या सूर्याला ग्रहण लावलें आणि तो निस्तेज झाल्याबरोबर इतर सर्व ग्रह सहाजिकपणेंच अंतर्धान पावले. या सूर्याचें ग्रहण दूर झाल्याबरोबर तो आपल्या मूळच्या तेजानें प्रकाशूं लागेल आणि त्याच्या प्रकाशामुळें बाकीचे ग्रहहि तेजःपुंज दिसूं लागतील. मी

सांगितलेल्या चतुःसूत्रीचें जनतेनें पवित्र व्रत समजून पालन केलें तर स्वराज्य चुटकीसरसें मिळेल. याचें एक कारण असें आहे कीं, त्यामुळें स्वराज्याची जबाबदारी पेलण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगीं येईल. चरख्याचें योग्य तें स्थान त्याला अजून मिळालेलें नाहीं, हिंदू व मुसलमान आपापसांत मारामाऱ्या करून एकमेकांच्या रक्ताचे पाट वहावीत आहेत, दारूबंदी झालेली नाहीं, हिंदूंनीं आपल्या धर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक पुसून टाकलेला नाहीं!'

त्यानंतर बहुतेक पुढारी निवडणुकांच्या धामधुमींत गुंतले पण गांधीजी मात्र आपलें विधायक कार्यच करीत राहिले. मात्र गांधीजींचा 'हरिजन' मतदारांना शिक्षण देण्याचें काम करीत राहिला. गांधीजींनीं हरिजनकार्यासाठीं त्रावणकोर संस्थानांत दौरा काढला. आपल्या एका भाषणांत ते म्हणाले, 'ईशोपनिषदांतील एका मंत्रांत हिंदुधर्माचें सार-सर्वस्व सामावलेलें आहे असें मला वाटतें. इतर सर्व धर्मग्रंथ आणि उपनिषदें जगांतून नाहींशीं झालीं आणि हा एकच एक मंत्र जिवंत राहिला तरी हिंदुधर्म अमर ठरेल अशी मला खात्री वाटते. या मंत्राचे चार भाग आहेत. पहिला भाग असा आहेः 'या विश्वांत आपणास जें जें कांहीं दिसतें त्या सर्वांत परमेश्वर भरून राहिलेला आहे.' दुसरा व तिसरा भाग एकत्र आहे. त्याचे दोन भाग केले असतांना त्यांचे अर्थ असे होतातः 'त्याग कर व त्यांत समाधान मान' आणि 'परमेश्वर तुला जें देईल त्याचा उपभोग घे—त्यांतच संतोष मान.' त्या मंत्राच्या शेवटच्या आणि अत्यंत महत्त्वाच्या भागाचा अर्थ असाः 'परस्वापहार करण्याचा विचारसुद्धां आपल्या मनाला शिवूं देऊं नकोस.' या मंत्राशीं जें जें कांहीं विसंगत असेल त्याला हिंदुधर्मांत थारा असणें शक्य नाहीं हें निर्विवाद होय.'

१९३७ सालच्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस गांधीजी शेगांवला

परत आले. त्यांच्या विधायक कार्यक्रमामुळें कॉंग्रेसचें लोण खेड्या-पाड्यांपर्यंत कसें जाऊन पोहोंचलें होतें याचा निवडणुकीच्या वेळीं चांगला प्रत्यय आला. जवळजवळ प्रत्येक खेड्यांत कॉंग्रेसचें निशाण जाऊन पोहोंचलें होतें. प्रचार, सभा, मिरवणुकी वगैरे गोष्टींनीं सगळीं खेडीं अक्षरशः दुमदुमून गेलीं होतीं. पं. जवाहरलाल नेहरु निवडणुकांच्या प्रचारकार्यासाठीं तीरासारखे फिरत होते. त्यांनीं पन्नास हजार मैलांचा प्रवास केला व कमींत कमी एक कोटी लोकांना कॉंग्रेसचा संदेश ऐकवला.

फेब्रुवारी महिन्यांत निवडणुकांचा निकाल जाहीर झाला. हिंदुस्थानां-तील अकरापैकीं सहा प्रांतांत कॉंग्रेसला निर्णायक बहुमत मिळालें होतें. मुंबई, मद्रास, संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, बिहार व ओरिसा हे ते सहा प्रांत होत.

## १२

मार्चच्या तिसऱ्या आठवड्यांत ऑ. इं. कॉं. कमिटीची सभा दिल्ली येथें भरली. या वेळीं कॉंग्रेसमध्यें दुफळी निर्माण झाली होती. कॉंग्रेसनें अधिकारस्वीकार करूं नये असें एका पक्षाचें म्हणणें असून कॉंग्रेसनें अधिकारस्वीकार केलाच पाहिजे असा दुसऱ्या पक्षाचा आग्रह होता. ज्या प्रांतांत कॉंग्रेसचें निर्णायक बहुमत असेल व त्या प्रांताच्या गव्हर्नराकडून आपण आपल्या विशेष अधिकाराचा उपयोग करणार नाहीं असें स्पष्ट आश्वासन मिळेल अशा प्रांतांत कॉंग्रेसनें अधिकार-स्वीकार करावा हा गांधीजींचा ठराव सदर सभेंत संमत झाला.

गव्हर्नराकडून अशा प्रकारचें आश्वासन कॉंग्रेसनें मागणें हें उचित आहे कीं नाहीं या मुद्यावर मोठमोठ्या कायदेपंडितांत रणें माजून राहिलीं. परस्परविरोधी पत्रकें व निवेदनें रोजच्या रोज प्रसिद्ध होऊं लागलीं. आतां मात्र गांधीजी प्रत्यक्ष राजकारणाच्या रणांगणावर येऊन उभे ठाकले. त्यांनीं पहिलाच सवाल केला तो असा कीं, मंत्री घटनेला सोडून कांहीं करीत नाहींत तोंपर्यंत आपण आपल्या जादा अधिकाराचा उपयोग करणार नाहीं असें गव्हर्नरानें आश्वासन दिल्यास त्यांत घटना-बाह्य असें काय आहे? मंत्री कायद्याच्या कक्षेंत राहून आपलें काम करीत असतांना गव्हर्नरानें त्यांत अडथळा उत्पन्न करणें ही शुद्ध मगरूरी आहे आणि ज्याला म्हणून कांहीं स्वाभिमान आहे आणि ज्याला आपल्या मतदारांच्या पाठिंब्याची संपूर्ण जाणीव आहे असा कोणीहि मंत्री गव्हर्नराकडून तसें स्पष्ट आश्वासन मागितल्याशिवाय रहाणार नाहीं असें गांधीजींचें म्हणणें होतें.

ज्या दिवशीं हा ॲक्ट प्रत्यक्ष अंमलांत यावयाचा त्या दिवशीं म्हणजे एप्रिलच्या एक तारखेला सबंध हिंदुस्थानभर हरताळ पाळण्यांत येऊन हिंदुस्थानाची घटना बनविण्याचा अधिकार हिंदुस्थानालाच आहे असें घोषित करण्यांत आलें.

कांहीं दिवसांनीं व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं आपलें एक निवेदन प्रसिद्ध केलें. मंत्र्यांना गव्हर्नरानें बडतर्फ करण्यापेक्षां तशा प्रसंगीं मंत्र्यांनीं आपण होऊन राजीनामे देणें हें त्यांच्या स्वाभिमानास अधिक शोभण्यासारखें आहे व गव्हर्नर आणि मंत्री यांच्यांत अतिशय तीव्र अशा प्रकारचा मतभेद निर्माण होईल तेव्हांच हा प्रश्न उपस्थित होणार आहे असें त्यांनीं त्या निवेदनांत म्हटलें होतें. या निवेदनामुळें पेंचप्रसंग सुटण्यास मदत झाली.

कॉं. वर्किंग कमिटीची सभा ८ जुलैला वर्धा येथें भरली. सदर

कमिटीनें आपल्या बैठकीच्या प्रतिवृत्तांत असें म्हटलें होतें कीं, ऑ. इं. कॉं. कमिटीनें गव्हर्नरांकडून ज्या स्पष्ट आश्वासनांची मागणी केली होती ती मागणी जशीच्या तशी पुरी करण्यांत आली नसली तरी इंग्रज सरकारची कॉंग्रेसशीं समेट करण्याची इच्छा अगदीं उघड झालेली आहे. परिस्थितीच अशी निर्माण झाली आहे आणि कॉंग्रेसनें सदर मागणी केल्यानंतरच्या घटनाच अशा घडल्या आहेत कीं, गव्हर्नराला मिळालेल्या ज़ादा अधिकाराचा उपयोग त्याला सुखासुखीं करतां येणें अशक्य आहे. अशा रीतीनें कॉंग्रेसच्या प्रतिनिधींना अधिकारस्वीकार करण्याची परवानगी देण्यांत आली. मात्र हें स्पष्ट करण्यांत आलें होतें कीं, हा अधिकारस्वीकार कॉंग्रेसनें आंखलेल्या धोरणाप्रमाणें एका बाजूनें घटनेला विरोध करण्याकरितां व दुसऱ्या बाजूनें विधायक कार्यक्रमास चालना देण्यासाठींच करावयाचा होता. कॉंग्रेस उमेदवारांना मताधिक्य मिळालेल्या सहाहि प्रांतांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें बनविण्यांत आलीं. सरहद्द प्रांतांत निवडून आलेल्या कॉंग्रेसच्या बाहेरील आठ प्रतिनिधींनीं कॉंग्रेसशीं सहकार्य करण्याचें मान्य केल्यामुळें त्या प्रांतांतहि कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ स्थापन झालें. अशा रीतीनें एकूण सात प्रांतांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें राज्यकारभार पाहूं लागलीं.

हरिजनमधून राजकारणविषयक लेख लिहावयाचे नाहींत असें गांधीजींनीं स्वतःवर जें बंधन आपण होऊन लादून घेतलें होतें तें त्यांनीं ता. २७ जुलैपासून काढून घेतलें. त्या लेखांत त्यांनीं म्हटलें होतें, 'कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनीं दारुबंदी अंमलांत आणावी. तरुंगांना सुधारणा घडवून आणणाऱ्या शाळांचें किंवा कारखान्यांचें स्वरूप द्यावें. मिठावरील कर काढून टाकावा. सरकारी कामासाठीं जें कापड लागत असेल त्यासाठीं खादीचा उपयोग करावा. शहरांपेक्षां खेडीं व शेतकरी यांच्याकडे विशेष लक्ष द्यावें.

आतां मंत्र्यांनीं कसें वागावें तें पाहूं. त्यांचा पुढारी म्हणजे काँग्रेसचा अध्यक्ष तिसऱ्या वर्गानें प्रवास करतो. मग हे मंत्री पहिल्या वर्गानें प्रवास करणार आहेत काय ? हे मंत्री काय पाश्चात्य पद्धतीच्या सुटाबुटांत रहाणार आहेत ? काँग्रेसचा अध्यक्ष जाडेंभरडें खादीचें धोतर नेसून खादीचें कुडतें व जाकीट किंवा कोट घालतो. अशा रहाणीची या मंत्र्यांना लाज न वाटतां उलट तिचा अभिमानच वाटला पाहिजे. आपल्या देशांतील कोट्यवधि लोक अर्धपोटी जगत आहेत. मतदारांच्या रहाणीशीं विसंगत अशी मंत्र्यांची रहाणी असून चालणारच नाहीं. इंग्रज लोक जेत्याच्या दिमाखानें या देशाचे राज्यकर्ते बनले आणि त्यांनीं त्या नात्यानें आपल्या राहणीचें मान भरमसाट वाढवून घेतलें. गरीब बिचाऱ्या जितांच्या परिस्थितीचा विचारच त्यांच्या मनाला कधीं शिवला नाहीं. जर आमच्या मंत्र्यांनीं गव्हर्नराचें किंवा इतर मुलकी नोकरांचें अनुकरण करण्याचा मोह आवरला तर काँग्रेसची व इतरांची मनोवृत्ति यांत जमीनअस्मानाचें अंतर असल्याचें आपोआपच सिद्ध होईल. काय वाटेल तें करून हा ॲक्ट राबवून घ्यावयाचा अशा हेतूनें कांहीं हीं मंत्रिमंडळें बनविण्यांत आलेलीं नाहींत. हिंदुस्थानचें ध्येय जें पूर्ण स्वातंत्र्य तें गांठण्याकरितां एका बाजूची सशस्त्र क्रांति टाळावी आणि दुसऱ्या बाजूचा अभूतपूर्व असा अतिशय मोठ्या प्रमाणावरील सविनय कायदेभंगहि टाळावा अशा दृष्टीनें करण्यांत आलेला हा एक प्रयत्न आहे. काँग्रेसचे अध्यक्ष व वर्किंग कमिटी यांच्याशिवाय काँग्रेस मंत्रिमंडळांना आदेश देण्याचा अधिकार इतर कोणालाहि नाहीं.'

सर्व काँग्रेस मंत्रिमंडळांनीं तीन वर्षांच्या अवधींत दारुबंदी अंमलांत आणावी असा त्यांस आदेश देण्यांत आला. मंत्र्यांचा पगार पांचशें रुपये ठरविण्यांत येऊन इतर लोकप्रतिनिधींचा पगार सत्तर रुपये

ठरविण्यांत आला. सरकारी पार्ट्या व मेजवान्या यांत मंत्र्यांनीं भाग घेऊं नये असें सांगण्यांत आलें. यासंबंधानें दुसऱ्या एका लेखांत गांधीजींनीं म्हटलें होतें, 'मंत्र्यांनीं आपली राहणी अगदीं साधी ठेवली व आपल काम नीटपणें केलें म्हणजे त्यांचें कर्तव्य संपलें असें नव्हे. ज्या खात्याचे आपण मंत्री आहोंत त्या सबंध खात्याचें काम नीटपणें चाललें आहे कीं नाहीं हेंहि त्यांनीं पाहिलें पाहिजे. गरिबांतील गरिबालाहि न्याय मिळूं शकेल अशी व्यवस्था झाली पाहिजे. आज लोकांना पोलिसांची भीति वाटते. त्या ऐवजीं लोकांना ते आपले मित्र वाटूं लागले पाहिजेत. आजची शिक्षण-पद्धति आमूलाग्र बदलून गरिबांतील गरीब खेडुताची गरज भागवूं शकेल अशा प्रकारची शिक्षणपद्धति अंमलांत आली पाहिजे. राजकीय कैद्यांची–मग ते हिंसावादी असले तरी–सर्रास मुक्तता झाली पाहिजे. हिंसावाद्यांना अहिंसेचें सामर्थ्य पटवून देण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. कॉंग्रेसनें पोलिसांच्या किंवा लष्कराच्या जोरावर राज्यकारभार न करतां जनतेच्या पाठिंब्याच्या आधारावर तो केला पाहिजे—हातीं आलेल्या सत्तेच्या जोरावर नव्हे तर जनतेच्या सेवेच्या सामर्थ्यावर तो आधारलेला असला पाहिजे. सर्व जप्त वाङ्मयावरील बंदी उठविण्यांत आली पाहिजे. मग त्यापैकीं कांहीं वाङ्मय अत्याचारी प्रवृत्तींना उत्तेजन देणारें असलें तरी हरकत नाहीं. जनतेच्या मनाला अहिंसेचें तत्त्वज्ञान पटलेलें असल्यानंतर त्या वाङ्मयामुळें कांहींहि नुकसान होण्याची भीति नाहीं. पोलीस आणि लष्कर यांना जितक्या कमी प्रमाणांत काम पडेल तितक्या अधिक प्रमाणांत कॉंग्रेस मंत्रिमंडळांचा कारभार यशस्वी झाला असें ठरेल. इतकेंच नव्हे तर आजची घटना नष्ट करायला हाच एक हमखास उपाय आहे.'

ता. २२ ऑक्टोबर रोजीं वर्धा येथें शैक्षणिक परिषद भरली. नव्या

पद्धतीच्या शिक्षणयोजनेचा विचार करण्याकरितां एक कमिटी स्थापन करण्यांत आली. सदर कमिटीनें दुसऱ्या दिवशीं आपला अहवाल प्रसिद्ध केला. त्यांतील महत्त्वाचे मुद्दे असे : प्रत्येक मुलाला सात वर्षे-पर्यंत सक्तीनें पण मोफत शिक्षण देण्यांत यावें. प्रत्येक मुलाला शिक्षण द्यावयाचें तें त्याला त्याच्या मातृभाषेंतून देण्यांत यावें. या अवधींत प्रत्येक मुलाला कोणत्या ना कोणत्या हस्तव्यवसायाचें शिक्षण देण्यांत यावें. या हस्तव्यवसायाला शक्य तोंपर्यंत मुख्य साधन समजून त्याच्या द्वारां मुलाला इतर सर्व विषय शिकविण्यांत यावेत. अशा प्रकारच्या शिक्षणपद्धतीमुळें शिक्षकांना द्यावें लागणारें वेतन परस्पर भागावें. ही योजना वर्धा योजना या नांवानें प्रसिद्ध झाली.

काँग्रेस प्रांतांतून राजकीय कैद्यांची मुक्तता करण्यांत आली. कित्येक लोकोपयोगी संस्थांवर लादण्यांत आलेली बंदी उठविण्यांत आली. ज्या वृत्तपत्रांकडून जामिनकीसाठीं रकमा घेण्यांत आल्या होत्या त्या त्यांस परत करण्यांत आल्या. शेतकऱ्यांच्या कर्जांत त्यांना सूट देण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आला. शिक्षण व म्युनिसिपालिट्या यांत सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरू झाले. मद्रासनें तर दारूबंदीच्याहि कामीं आघाडी मारली. पण त्याचबरोबर किसानांचे संप व दिग्दर्शनें यांनाहि ऊत आल्यासारखा झाला. बिहारमध्यें याचा विशेष प्रत्यय आला. अन्य ठिकाणीं, काँग्रेसचें मंत्रिमंडळ स्थापन झाल्याबरोबर अमूक होईल, तमूक होईल, अशा प्रकारचे मनोरथ करणारांचे आडाखे सफल न झाल्यामुळें त्यांच्यांत असंतुष्टता निर्माण झाली.

वर्किंग कमिटींतील कामाचा गांधीजींच्या मनावर विलक्षण ताण पडला व त्यांच्या प्रकृतींत बिघाड झाला. त्यामुळें त्यांना कलकत्त्याचा आपला मुक्काम वाढविणें भाग पडलें. तेथें ते सुभाषचंद्र बोस यांचे पाहुणे म्हणून राहिले. अवश्य ती विश्रांति घेतल्यावर त्यांनीं बंगालचे

गव्हर्नर अँडरसन व मुख्य प्रधान फझलूल हक्क यांच्याशीं अंदमानांतील राजबंदींच्या मुक्ततेसंबंधीं बोलणीं सुरू केलीं. याच्या परिणामीं बंगाल सरकारनें आपल्या प्रांतांतील अकराशें राजबंदींची मुक्तता केली. बंगालचें मंत्रिमंडळ काँग्रेसच्या प्रतिज्ञापत्रकानें बांधलेलें नव्हतें. काँग्रेसचें राजकीय तत्त्वज्ञानहि त्यांना मान्य होतें असें नाहीं. असें असूनसुद्धां सदर मंत्रिमंडळानें या बाबतींत काँग्रेस मंत्रिमंडळांप्रमाणेंच फार मोठी आघाडी मारली याबद्दल गांधीजींनीं त्याचें मनःपूर्वक अभिनंदन केलें.

१९३८ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन हरिपुरा येथें सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. खादी व ग्रामोद्योग प्रदर्शनाचें उद्‌घाटन गांधीजींच्या हस्तें झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले, 'आपणाला खादीचा मंत्र नीटसा कळलेला नसल्या-मुळेंच कांहीं समाजवादी मित्र असें म्हणत असतात कीं, गांधींचे दिवस आतां संपले असून आतां नवा काळ सुरू झालेला आहे. मी तुम्हांला नेहमींच असें सांगत आलों आहें कीं, तुम्हांला जें कांहीं करावयाचें असेल तें हिंदुस्थानासाठीं करा—माझ्यासाठीं कांहींहि करूं नका. जर तुम्ही माझ्याकरितांच खादी वापरीत असाल तर माझ्या मृत शरिराबरोबर तुम्ही तीहि जाळून टाकाल. पण जर तुम्हांला खादीचें खरें मर्म समजलें असेल तर माझ्या मृत्यूनंतरहि ती टिकूनच राहील. परमेश्वराचा खरा उपासक मूर्तीची पूजा करीत नाहीं. त्या मूर्तींत असलेल्या परमेश्वराची पूजा करतो. खादी वापरण्यांतील मर्म न समजतां तुम्ही जर देखावा करण्यासाठीं ती वापरीत असाल तर केवळ मूर्तीची दिखाऊ पूजा करणारासारखी तुमची स्थिति झाल्याशिवाय रहाणार नाहीं.'

सुभाषचंद्र बोस आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले, 'कारखान्यांशीं चढाओढ करण्याचा प्रसंग आला असतांहि जे तग धरूं शकतील अशा प्रकारचे ग्रामोद्योग आपण सुरू करणें आवश्यक आहे. शेतीच्या

जोडीला सूत कांतणें व विणणें या जोडधंद्यांनाहि आपल्या देशांत चांगला वाव आहे. कॉंग्रेसमध्यें उजवा व डावा असे दोन पक्ष असले तरी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची ज्यांना खरी तळमळ लागलेली आहे त्या सर्वांना तींत स्थान आहे. म. गांधींच्या मार्गदर्शनाचा लाभ आपणास अनेक वर्षे मिळावा अशी आपली सर्वांची इच्छा असून ती सफल व्हावी अशी परमेश्वराच्या चरणीं माझी प्रार्थना आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं व मानव्याच्या रक्षणासाठीं त्यांची आपणास अतिशय जरुरी आहे.'

राजकीय कैद्यांच्या मुक्ततेसंबंधानें गव्हर्नरांशीं मतभेद निर्माण झाल्यामुळें बिहार व संयुक्त प्रांत येथील कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले होते. सदर घटनेला अनुसरून व्हाईसरॉयनें ता. २२ फेब्रुवारीला आपलें एक निवेदन प्रसिद्ध केलें. अत्याचारप्रवर्तकांचा इतिहास पाहतां, कसून चौकशी केल्याशिवाय या राजबंद्यांची मुक्तता करणें म्हणजे अत्याचारी संस्थांना पुन्हा कार्यप्रवण होण्यास उत्तेजन ठरण्याची शक्यता आहे; तेव्हां अशा प्रकारची चौकशी न करतां केवळ मंत्री सांगतात म्हणून, कोणाहि कैद्याची मुक्तता करण्यास गव्हनरांनीं परवानगी देणें हें कितपत योग्य ठरेल? मंत्री हे कायदा व सुव्यवस्था यांना जबाबदार आहेत हें खरें असलें तरी आपल्या प्रांतांतील शांतता धोक्यांत न येईल याबद्दल दक्षता घेणें ही गव्हनरांच्या अंगावर टाकण्यांत आलेली जबाबदारी त्याहूनहि मोठी आहे, वगैरे विधानें सदर निवेदनांत केलेलीं होतीं.

सदर निवेदनास गांधीजींनीं उत्तर दिलें, 'कर्तुमकर्तुम् असें ज्याचें सामर्थ्य आहे त्याच्या मोठेपणाला साजेल असें हें निवेदन खास नव्हे. राजबंद्यांची वैयक्तिक चौकशी करण्यांत यावी कीं नाहीं याबद्दलचा वाद कोणी उपस्थितच केलेला नाहीं. प्रांतिक स्वायत्तता देण्यांत

आलेल्या प्रांताच्या गव्हर्नरास हा अधिकार आहे किंवा नाहीं हा खरा प्रश्न आहे. हें काम आणि हा अधिकार लोकमताला जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळालाच काय तो आहे असें माझें म्हणणें आहे. गव्हर्नराचें काम व अधिकार हा आहे कीं, त्यानें आपल्या मंत्रिमंडळास सर्वसाधारण धोरणाबद्दल उपयुक्त अशा सूचना कराव्या व अधिकारांचा उपयोग करीत असतांना कोणत्या प्रसंगीं काय धोका निर्माण होण्याची भीति असते याची त्यास कल्पना द्यावी. गव्हर्नर वैयक्तिक बाबींची चौकशी करूं लागल्यावर मंत्र्यांनीं त्याला हरकत घेतली नाहीं हें उदाहरण आपल्या निर्णयाच्या समर्थनार्थ व्हाईसरॉयनें पुढें मांडलें हें त्यांच्या मोठेपणाला शोभत नाहीं. माझी अशी कल्पना आहे कीं, हे मंत्री आपल्या कामांत नवीन असल्यामुळें त्यांना अवश्य तो अनुभव नव्हता आणि म्हणूनच ही सहनशीलता त्यांनीं दाखविली. मी बंगाल-मध्यें ज्या धोरणास आपली मान्यता दिली त्याकडे व्हाईसरॉयनें जनतेचें लक्ष वेधलें याचा मला आनंद होत आहे. संयुक्त प्रांत व बिहार यांच्यांत व बंगालमध्यें काय फरक आहे तोहि त्यांच्या लक्षांत असणारच. बंगालमध्यें कॉंग्रेसच्या प्रतिज्ञापत्रकाशीं कांहींहि संबंध नसलेल्या सरकारशीं माझी गांठ पडलेली होती. पण त्यांच्याशीं बोलणें करीत असतांना आपण फत्तराचें काळीज असलेल्या माणसांशीं बोलत असल्याचा मला चुकूनहि अनुभव आला नाहीं. संयुक्त प्रांत व बिहार येथील परिस्थिति याहून फारच निराळी आहे. या प्रांतांतील मंत्री कॉंग्रेसच्या प्रतिज्ञापत्रकाला शपथेनें बांधलेले असून त्या प्रतिज्ञापत्रकावर विसंबूनच त्यांच्या मतदारांनीं त्यांना निवडून दिलें आहे. त्यांनीं प्रत्येक राजकैद्याचें प्रकरण कसून तपासलें होतें. इतकेंच नव्हे तर आपल्या प्रांतांत शांतता व सुव्यवस्था यांचा बिघाड होणार नाहीं याबद्दलची जबाबदारी आपल्यावर असल्याची जाणीव ठेवून त्यांनीं त्या कैद्यांकडून

अत्याचारांवर आपला अजिबात विश्वास नसल्याचें ठाम आश्वासनहि जातीनें मिळविलें होतें.

मला असें वाटतें कीं, कैद्यांचीं प्रकरणें तपासून पहाण्याचें काम आपण आपल्या हातीं घेतलें यांत मंत्र्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करण्याचा आपला बिलकुल हेतु नव्हता असें आश्वासन देण्यास गव्हर्नरास मोकळीक असेल तर हा पेंचप्रसंग सुटण्यास अडचण पडणार नाहीं; आणि ज्याअर्थीं त्या मंत्र्यांनीं सदर कैद्यांकडून अवश्य तें आश्वासन स्वतः घेतलेलें आहे त्या अर्थीं स्वतःच्या जबाबदारीवर त्यांना मुक्त करण्यास मंत्री मोकळे आहेत असेंहि मान्य करण्यांत यावें.'

थोडयाच दिवसांनीं त्या त्या प्रांताच्या गव्हर्नराकडून दोन्ही मुख्य मंत्र्यांना निमंत्रण आलें व थोडयाच वेळांत हा पेंचप्रसंग सुटला. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचा अधिकार मंत्र्यांचा आहे हें तत्त्व या पेंचप्रसंगामुळें अप्रतिम रीतीनें सिद्ध झालें. त्या प्रांतांचे मुख्य मंत्री व गव्हर्नर्स यांचें पुढीलप्रमाणें संयुक्त पत्रक प्रसिद्ध झालें :

'कांहीं राजकीय कैद्यांच्या वैयक्तिक प्रकरणांच्या तपासणीचें काम पुरें झालें असून मंत्र्यांनीं केलेल्या सूचनेप्रमाणें त्यांच्या मुक्ततेचा हुकूम लौकरच काढण्यांत येईल. इतर कैद्यांचीं वैयक्तिक प्रकरणें मंत्री तपासून पहात असून त्यांच्या मुक्ततेचा हुकूमहि लौकरच देण्यांत येईल. व्हाईसरॉय व म. गांधी यांच्या पत्रकांनुसार आम्ही आपल्या परस्परसंबंधांविषयीं सांगोपांग चर्चा केलेली आहे. जबाबदार मंत्र्यांच्या कोणत्याहि कायदेशीर कामांत त्यांच्या अधिकारावर अतिक्रमण होण्याची किंवा कोणत्याहि प्रकारची ढवळाढवळ होण्याची भीति बाळगिण्याचें कारण नाहीं.'

# १३

कांहीं कॉंग्रेसराज्यांतून जातीय दंगे शमविण्याकरितां पोलिसांची व लष्कराची मदत घ्यावी लागली या घटनेस अनुसरून गांधीजींनीं आपला असा अभिप्राय व्यक्त केला कीं, 'याचा सरळ व स्पष्ट अर्थ असा कीं, आज इंग्रजांच्या हातांत असलेली राजसत्ता आपल्या हातांत घेण्याइतकी लायकी कॉंग्रेसच्या अंगीं अजून आलेली नाहीं. कॉंग्रेसशीं ज्यांचें वैर असेल आणि जे शक्य तर तिला चिरडूंहि पहात असतील अशांचेंहि प्रतिनिधित्व ती करूं शकली पाहिजे. जर कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांची अहिंसेच्या तत्त्वावर ठाम श्रद्धा नसेल तर कॉंग्रेसच्या तत्त्वज्ञानांतून अहिंसा हा शब्द जितक्या लौकर पुसला जाईल तितकें कॉंग्रेसच्या व राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें हितकारक ठरेल. याला पर्याय म्हणजे निर्भेळ हिंसा तर खास नव्हे. अखिल जगांत कॉंग्रेस ही एकच अशी राजकीय संस्था आहे कीं, जिनें स्वराज्य संपादन करण्यासाठीं निर्भेळ अहिंसेच्या तत्त्वाचा अंगिकार केलेला आहे. जर या अहिंसेचा दर्जा असावा तितका उच्च नसेल तर त्यामुळें राष्ट्राचें फार मोठें नुकसान झाल्याशिवाय रहाणार नाहीं. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या शौर्याचा प्रत्यय येण्याऐवजीं आपण नामर्द असल्याचाच अनुभव यावयाचा आणि स्वातंत्र्याचा लढा लढणारे लोक नामर्द ठरणें यासारखें दुसरें घोर लांछन नाहीं. आपणाला आपलें धोरण बदलावयाचें असल्यास त्यांत लाज वाटण्यासारखें कांहींच नाहीं. सशस्त्र लढा दिल्याशिवाय इंग्रजांच्या हातांत आज असलेली राजसत्ता आपल्या हातीं येणें अशक्य आहे अशी जर आपली खात्री होऊन चुकली असेल तर कॉंग्रेसनें हा

आपला अभिप्राय निःसंदिग्ध भाषेंत जाहीर करून त्याप्रमाणें प्रत्यक्ष उद्योगाला लागलें पाहिजे.'

शेतकऱ्यांच्या एकंदर परिस्थितीचा विचार करीत असतांना गांधीजी म्हणत, 'किसानांना सुखी करण्याचा खरा मार्ग म्हणजे त्यांना आजची अवनतावस्था कां प्राप्त झालेली आहे व त्यांना त्यांची परिस्थिति कशी सुधारतां येईल याचें त्यांना सम्यक् ज्ञान करून देणें हा आहे. जो कसेल त्याची जमीन, हें तत्त्व मलाहि संमत आहे. पण म्हणून जमीनदार नष्ट केला पाहिजे असें मला वाटत नाहीं. शारीरिक परिश्रम करणारांच्याच परिश्रमांना काय ती किंमत आहे आणि मेंदु खर्च करणारांची कांहींच किंमत नाहीं असें थोडेंच आहे? किसान व जमीनदार यांच्या परिस्थितींत आज जी जमीनअस्मानाची तफावत आहे ती नाहींशी करणें हें मात्र आपलें ध्येय असलें पाहिजे. असें होण्यास किती तरी युगें लागतील असें कांहीं लोक म्हणत असतील. पण पुष्कळदां लांबचा म्हणून वाटत असलेला मार्गच अगदीं जवळचा असा ठरत असतो. कोणतीहि गोष्ट आपण अविचारानें करतां कामा नये. आज आपण किसानांच्या हातांत जमीन असलेली पहात आहों. पण त्यांना आपल्या हक्कांची जाणीव नाहीं आणि असलीच तरी त्यांचा उपयोग कसा करावा याचा त्यांना उमज नाहीं. उद्यां जर त्यांना कोणी असें सांगितलें कीं, जमीनहि सोडूं नका आणि जमीनदारालाहि कांहीं देऊं नका, तर त्यांचीं सर्व दुःखें दूर होतील असें का आहे?'

या सुमारास ओरिसांत एक चमत्कारिक घटना होऊं पहात होती. तेथील गव्हर्नर रजेवर जाणार असून त्याच्या जागीं ॲक्टिंग गव्हर्नर या नात्यानें काम पहाण्यासाठीं एका दुय्यम दर्जाच्या माणसाची नेमणूक होणार होती व तसें झाल्यास कॉंग्रेस मंत्रिमंडळ राजीनामा देणार

होतें. तेव्हां गांधीजींनीं असा स्पष्ट इशारा दिला कीं, मंत्रिमंडळाचें गव्हर्नराजवळ बहुतेक दररोज काम पडतें. या गव्हर्नराचें काम चालविण्यासाठीं एखाद्या दुय्यम दर्जाच्या माणसाची नेमणूक करणें यांत एक प्रकारचा विषारी डंख आहे. अशा प्रकारची नेमणूक करणें म्हणजे प्रांतिक स्वायत्तता हा एक फार्स असल्याचा पुरावा देण्यासारखें आहे. प्रांतिक स्वायत्तता जर खरी असेल व तींतून पुढें स्वातंत्र्याचा कल्पवृक्ष फोफावायचा असेल तर अशा प्रकारच्या गोष्टी व्हाईसरॉय किंवा भारतमंत्री यांच्या लहरीवर अवलंबून असतां कामा नयेत. कायदे-मंडळांतील बहुसंख्याक पक्षाचें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्येक लहान-मोठ्या कृतीवर बारीक लक्ष असलेंच पाहिजे—नाहींतर ज्या जनतेचे ते स्वतः प्रतिनिधी असतात तिच्या अधिकारांचें संरक्षण ते कसें करूं शकणार? सदर दुय्यम दर्जाच्या माणसाची नेमणूक झाल्याबरोबर कॉंग्रेस मंत्रिमंडळ राजीनामा देणार आणि मग तेथें एक हंगामी मंत्रि-मंडळ नेमण्यांत येऊन त्याच्या मार्फत तेथील राज्यकारभार चालविला जाणार. आजचा गव्हर्नर आपली रजा संपवून परत आला कीं, तो पुन्हा आजच्या मंत्रिमंडळाला निमंत्रण पाठवील व पुन्हा हें मंत्रिमंडळ राज्यकारभार पाहूं लागेल. अशा योजनेला कॉंग्रेसची मान्यता मिळणें सर्वथैव अशक्य आहे. प्रांताचा कारभार म्हणजे पोरखेळ आहे कीं काय? गव्हर्नर किंवा हंगामी गव्हर्नर यांनीं आपल्या लहरीनें तयार केलेल्या मंत्रिमंडळाच्या हातांत आपल्या हातीं असलेला प्रांताचा कारभार देण्याला जनतेचा खराखुरा प्रतिनिधि जो आजचा मंत्री तो तयार होणें कसें शक्य आहे?'

सदर गव्हर्नरानें आपला रजेवर जाण्याचा बेत तहकूब केला व हा पेंचप्रसंग टळला. त्यानंतर गांधीजी पेशावरला जाण्यास निघाले. तेथें खान अबदुल गफारखान व त्यांचे लाल शर्टवाले अनुयायी यांनीं

त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत केलें. तेथील जनतेनेंहि उत्तम प्रकारची शिस्त दाखविली. तेथील लोक मैलचे मैल अत्यंत शांतपणें व शिस्तीनें रस्त्याच्या दोन्ही बाजूंस उभे होते. खान बंधूंबरोबर गांधीजी पेशावर जिल्ह्यांतील खेडोपाडीं फिरले. सर्व ठिकाणीं त्यांचें अत्यंत प्रेमानें स्वागत करण्यांत आलें. सभोंवार जमा झालेल्या लाखों धिप्पाड पठाणांकडे अंगुलीनिर्देश करून गफारखान म्हणाले, ‘या पठाणांच्या राक्षसी बांध्यांकडे पाहून हे सगळे शूर वीर आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. एखाद्या सामान्य शिपायापुढें सुद्धां हेच पठाण पूर्वी गोगलगाईसारखे नरम पडत असत. पण तेच आतां आपल्या चळवळीमुळें अस्सल मर्द बनले आणि लष्कराच्या गोळ्यांपुढें छाती ताठ करून उभे राहूं लागले.’

त्या भागांत गांधीजींना जीं मानपत्रें देण्यांत आलीं त्यांपैकीं बहुतेकांत पुढील मजकूर असे : आमच्या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं तुम्ही आमच्या वतीनें उभे ठाकलां हें आम्हांवरील आपलें ऋण आम्ही कधींहि विसरणार नाहीं. या आमच्या भूमींत एक तरी पठाण जिवंत आहे तोंपर्यंत आपल्या या ऋणाची जाणीव जिवंत राहील. आम्ही अज्ञानी आहों, गरीब आहों. पण तुम्ही आम्हांला अहिंसेची जी शिकवणूक दिली तीमुळें आम्हाला कशाचीच उणीव भासत नाहीं. आपल्या अहिंसेच्या शिकवणुकीमुळें आमच्यांत अत्यंत श्रेष्ठ दर्जाच्या क्रांतीसाठीं तयार होण्याचें सामर्थ्य निर्माण झाल्याशिवाय राहाणार नाहीं. अहिंसेमुळें खरें धैर्य व शौर्य निर्माण होतें. कोणत्याहि माणसाची भीति वाटेनाशी होते. नम्र वृत्ति अंगीं येते. जातीजातींतील वैमनस्य आणि दारिद्र्य असल्या प्रकारच्या संकटांचेंहि निवारण होऊं शकतें.

हा आपला दौरा आटोपून गांधीजी परत आले तेव्हां संस्थानी रयतेची स्वातंत्र्याची चळवळ सुरू झालेली होती. याच्या परिणामीं

त्रावणकोर व हैद्राबाद या दोन संस्थानांत दडपशाहीचा कहर उसळला. तेव्हां गांधीजी म्हणाले, 'अखिल हिंदुस्थानच्या जनतेंत जी जागृति झालेली आहे तिच्याकडे दुर्लक्ष करून संस्थानें जर आपल्या दुराग्रहालाच कवटाळून बसतील तर तीं आपल्या विनाशाची तयारी करीत आहेत असेंच म्हणावें लागेल. यापुढें सर्व संस्थानें आहेत अशींच टिकतील असें वाटत नाहीं. मोठमोठीं संस्थानें सुद्धां, लोकसेवेचें व्रत घेऊन, आपल्या प्रजेच्या कल्याणाचे आपण विश्वस्त आहों व आपलें अस्तित्व आपल्या किंवा इंग्रजांच्या शस्त्रबलावर अवलंबून नसून तें आपल्या प्रजेच्या सदिच्छेवरच अवलंबून आहे याची त्यांना पुरेपूर जाणीव झाली तरच टिकूं शकतील. संस्थानांतील प्रजाजनांनीं आपल्या मनाशीं अशी पक्की खूणगांठ बांधून ठेवावी कीं, त्यांच्या स्वतःच्या सामर्थ्यावरच त्यांचा उद्धार होणें अवलंबून आहे. निःशस्त्र जनतेला शस्त्रास्त्रांचें शिक्षण देऊन तिला उघड युद्ध करण्यासाठीं तयार करणें ही अशक्य कोटींतील गोष्ट आहे हें मात्र त्यांनीं कधींहि विसरूं नये.'

ता. ९ ऑक्टोबरला गांधीजी खान अबदुल गफारखान यांच्याबरोबर उटमंझईला गेले. कांहीं खुदाई खिदमतगारांनीं गांधीजींना असें स्पष्ट आश्वासन दिलें कीं, अशक्य असणारी गोष्ट शक्य झाली आणि खुद्द खानसाहेबांनीं अहिंसाव्रताचा त्याग केला तरी आम्ही त्यांचे अनुयायी अहिंसेचें व्रत सोडणार नाहीं. नंतर गांधीजींनीं आपल्या तिकडील दौऱ्यास प्रारंभ केला. मार्दन जिल्ह्यांतील दौरा आटोपून ते नौशेरा येथें आले. तेथील खुदाई खिदमतगारांच्या पुढाऱ्यांना उद्देशून ते म्हणाले, 'कांहींहि प्रतिकार न करतां अगदीं शांत मनानें तुम्हीं फटके सहन केलेले आहेत. पण ही तुमची अगदीं प्रारंभींची कसोटी झाली. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून द्यावयाचें असेल तर आपण क्लेश सहन केले पाहिजेत व त्याच्या जोडीला सतत परिश्रमहि करीत राहिलें पाहिजे.

धंदेवाईक सैनिक आणि तुम्ही यांच्यांत गणवेष व परिभाषा एवढ्यां-पुरतेंच साम्य आहे आणि तें तेवढ्यापुरतेंच राहिलें पाहिजे. त्यांच्या-प्रमाणें तुमचा स्थायीभाव हिंसा नसून अहिंसा हा असला पाहिजे. तुमच्या या प्रांतांत एकहि चोरीचा किंवा लूटमारीचा प्रसंग घडला तर त्याची तुमच्या मनाला लाज उत्पन्न झाली पाहिजे. तुमच्या सरहद्दी-पलीकडील टोळ्यांचा प्रश्न अहिंसात्मक मार्गांनीं हाताळणें तुम्हांला खात्रीनें शक्य आहे, आणि मला अशी खात्री वाटते कीं, या प्रश्नापुढें सरकारला हात टेकावे लागले असले तरी तुम्हांला यश मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. त्यांना ग्रामोद्योगांचें शिक्षण देऊन तुमच्याप्रमाणेंच प्रामाणिकपणें जीवन व्यतीत करण्यास तुम्ही शिकवा. तुम्ही त्यांच्यांत जाऊन रहा, त्यांच्या घरीं जाऊन त्यांची सेवा करा. तुमच्या निःस्वार्थ प्रेमाचा त्यांच्या मनावर थोडा तरी परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. असे प्रश्न हाताळण्याचे दोनच मार्ग असतात. पैकीं पाशवी बलाच्या मार्गाचा अवलंब केल्यावर तो मार्ग फोल असल्याचें सिद्ध झालेलें आहे. आतां उरला शांततेचा मार्ग. तुमच्या प्रत्यक्ष कृतीनेंच तुम्हीं त्याचा पुरावा दिला पाहिजे.'

खान अबदुल गफारखान गांधीजींना म्हणाले, 'अहिंसा हा या प्रांताला फार मोठा वरच मिळाला आहे. आतांपर्यंत आम्ही अहिंसेचा अवलंब फारच अल्प प्रमाणांत करूं शकलों आहों. पण तेवढ्यानेंहि आमच्यांत केवढी क्रांति घडून आली आहे! इंग्रज नुसता समोर उभा दिसला तरी या पठाणांची पूर्वी कोण गाळण उडून जात असे! पण तुम्ही उभारलेल्या चळवळीमुळें त्यांच्यांत आज केवढी तरी क्रांति घडून आलेली आहे. ते उद्योगप्रिय बनले आहेत. आपल्या शेतांत ते आतां दुप्पट पीक पिकवूं लागले आहेत. भीति हा शब्दसुद्धां ते विसरून गेले असून इंग्रजांचीच काय, पण कोणाहि माणसाची भीति आतां

त्यांना वाटेनाशी झाली आहे. इंग्रजांना याची प्रचीति आली असून हिंसावादी पठाण पत्करला, पण हे अहिंसक पठाण नकोत असें त्यांना होऊन गेलें आहे.'

कोहट, बन्नू, डेरा इस्माइलखान इत्यादि ठिकाणांना गांधीजींनीं भेट दिली. एका महिन्यानें हा आपला दौरा आटोपून गांधीजी परत आले. संस्थानांतील चळवळी वाढत्या प्रमाणावर चालू होत्या. गांधीजी म्हणत, 'कॉंग्रेस प्रांतांतील मंत्र्यांनीं संस्थानांत चाललेल्या हालचालींकडे काणाडोळा करणें कितपत इष्ट आहे हा एक प्रश्नच आहे. आजच्या कायद्याप्रमाणें कॉंग्रेस मंत्र्यांना या बाबतींत कांहींहि अधिकार नाहीं हें मी जाणतों. पण त्यांच्यावर नैतिक जबाबदारी अवश्य असते. कॉंग्रेस प्रांताला लागून असलेल्या एखाद्या संस्थानांत एखादा रोग उत्पन्न झाला व तो रोग आपल्या प्रांतांत पसरण्याची भीति निर्माण झाली असल्याचें त्यांना स्पष्ट दिसत असलें तर तिकडे कॉंग्रेस मंत्र्यांनीं लक्ष पुरविणें आवश्यकच नाहीं काय? आतांपर्यंत कॉंग्रेसनें संस्थानांच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारची ढवळाढवळ केली नाहीं ती माझ्या सांगण्यावरूनच होय. पण संस्थानांतील वाढते अन्याय प्रत्यक्ष दिसत असतांना मी तिला किती दिवस आवरून धरूं शकेन हा एक प्रश्नच आहे. आपल्या प्रजेचें हित तेंच आपलें हित अशी संस्थानिकांची भावना असेल तर, कॉंग्रेसची मदत मागण्यास व स्वीकारण्यास त्यांना कसलाहि कमीपणा वाटतां कामा नये. जी संस्था थोड्याच अवधींत साम्राज्य सरकारची सत्ता आपल्या हातांत घेणार आहे तिच्याशीं मैत्री जोडणें हें संस्थानिकांच्याच हिताचें ठरणार नाहीं काय?'

१९३८ सालच्या डिसेंबर महिन्यांत कॉं. वर्किंग कमिटीची सभा वर्धा येथें भरली असतांना, संस्थानांच्या बाबतींत राष्ट्रीय सभेची भूमिका कशी असावी या संबंधींचा ठराव स्वतः गांधीजींनीं तयार केला होता.

संस्थानी प्रजेनें आपल्या न्याय्य हक्कांसाठीं चालविलेल्या चळवळी-बद्दल तिचें त्यांत अभिनंदन करण्यांत आलें होतें. त्या त्या संस्थाना-बाहेरील कोणीहि सविनय कायदेभंगासारख्या चळवळींत भाग घेऊं नये, कारण त्यामुळें संस्थानांतील चळवळीचा फायदा तर होणार नाहींच पण उलट तिच्या मार्गांत अडथळा आणल्यासारखें मात्र होईल असा स्पष्ट इशाराहि त्यांत देण्यांत आला होता. तसेंच, संस्थानांतील कोणतीहि चळवळ कॉंग्रेसच्या अहिंसेच्या धोरणावरच आधारलेली असेल अशी आशाहि सदर ठरावांत व्यक्त करण्यांत आलेली होती.

१९३९च्या जानेवारींत कॉंग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं डॉ. पट्टाभि व सुभाषचंद्र बोस यांचा चुरशीचा सामना होऊन त्यांत सुभाषचंद्र विजयी झाले. गांधीजींनीं डॉ. पट्टाभींना आपला पाठिंबा दिला असल्यामुळें, पट्टाभींचा पराजय म्हणजे माझाच पराजय असें गांधीजी म्हणूं लागले. तेव्हां सुभाषचंद्र म्हणाले, 'गांधीजींचा विश्वास संपादन करणें हेंच माझें ध्येय राहील. बाकीच्या कितीहि लोकांचा विश्वास मी संपादन केला पण भारतांतील सर्वश्रेष्ठ व्यक्तीच्या विश्वासाला मी पात्र ठरूं शकलों नाहीं तर त्याचा उपयोग काय?'

राजकोट संस्थानच्या प्रजेशीं तेथील ठाकूर साहेबांनीं केलेला करार मोडल्याचें समजल्यावरून ता. २८ फेब्रुवारी रोजीं गांधीजी राजकोटला गेले. तेथील कैद्यांची भेट घेतल्यावर, राजकोट संस्थानच्या अधिकारी वर्गानें सत्याग्रहींवर अनन्वित अत्याचार केले असल्याबद्दल गांधीजींची खात्री पटली. तेव्हां गांधीजींनीं ठाकूरसाहेब, दिवाण दरबार वीरावाला व ब्रिटिश रीजंट यांच्याशीं बोलणीं सुरू केलीं. या वाटाघाटींतून विशेष कांहीं निष्पन्न होण्याची गांधीजींना आशा दिसेना. तेव्हां त्यांनीं आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें ठाकूर साहेबांना तडजोडीसाठीं कांहीं अटी कळविल्या व त्यांस मान्यता देण्यांत आली नाहीं तर आपण

उपवास सुरू करणार असल्याचें कळविलें. ठरलेल्या मुदतींत ठाकूर साहेबांकडून उत्तर न आल्यामुळें गांधीजींनीं उपोषणास प्रारंभ करण्याचें निश्चित केलें व त्याप्रमाणें एक पत्रक प्रसिद्ध केलें. जोंपर्यंत ठाकूर साहेब हे दरबार वीरावाला यांच्या सल्ल्याप्रमाणें वागत आहेत तोंपर्यंत त्यांच्याकडून न्याय मिळण्याची आशा करणें व्यर्थ आहे असें तेथील अनेक लोकांकडून आपणास समजलें असल्याचें सदर पत्रकांत म्हटलें होतें. गांधीजींनीं आपल्या उपोषणास प्रारंभ केला.

व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं आपला राजपुतान्यांतील उरलेला दौरा रद्द केला व ते दिल्लीला आले. हिंदुस्थानचे सरन्यायाधीश सर मॉरिस ग्वायर यांना आपण राजकोट प्रकरणीं लवाद म्हणून नेमण्यास तयार असल्याचें राजकोटच्या रेसिडेंटाच्या मार्फत लिनलिथगोनीं गांधीजींना कळविलें. गांधीजींनीं आपलें उपोषण सोडलें. ता. ३ एप्रिलला सर मॉरिस ग्वायर यांनीं आपला निकाल जाहीर केला. हा निकाल गांधीजींना सर्वस्वीं अनुकूल असाच होता.

एप्रिल महिन्यांत सुभाषबाबूंनीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्या वेळीं ते म्हणाले, 'मी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर नसलों तरी मी कॉंग्रेसचा आणि राष्ट्राचा सेवकच राहीन.' ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभासदांनीं पुढील वर्षापर्यंत बाबू राजेंद्रप्रसाद यांची कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानीं निवड केली.

आपण पुरोगामी गट स्थापन केला असल्याचें ता. ३ मे रोजीं सुभाषबाबूंनीं जाहीर केलें.

सर मॉरिस ग्वायर यांनीं दिलेला निर्णय गांधीजींना अनुकूल असला तरी हा सर्व प्रकार त्यांच्या मनाला खटकत होता. राजकोटमधील मुसलमान व भायात या दोन जमाती गांधीजींवर रागावल्या होत्या. कारण त्यांस पुरेसें प्रतिनिधित्व मिळणार नव्हतें. राजकोट रिफॉर्म्स

कमिटीवर सभासद कोण असावेत याविषयीं गांधीजी व वीरावाला यांच्यांत चाललेलीं बोलणीं फिसकटलीं असल्याचें ता. २३ एप्रिल रोजीं जाहीर करण्यांत आलें. ता. १२ मे रोजीं गांधीजी राजकोटला गेले. गांधीजींनीं तेथील परिषदेच्या कार्यकर्त्यांनाच वीरावाला यांच्याशीं वाटाघाटी करायला सांगितलें होतें. राजकोटला गेल्यावर ते तेथील कार्यकर्त्यांना म्हणाले, 'माझी अशी खात्री होऊन चुकली आहे कीं सर मॉरिस यांचा निर्णय म्हणजे माझ्या मानेला लागलेली तांतच आहे. दरबार वीरावाला यांच्यांतील सद्भाव जागृत करून त्यांच्याशीं तडजोड घडवून आणण्याचा अतिशय नाजुक व तितकाच कठीण असा मार्ग मी आक्रमीत आहें.'

गांधीजींनीं त्यानंतर या राजकोट प्रकरणीं एक पत्रक काढलें. त्या पत्रकांत त्यांनीं म्हटलें होतें, 'सरन्यायाधीशांनीं दिलेला तो निर्णय बाजूस ठेवून देण्याचा मीं निश्चय केलेला आहे. माझा उपवास यशस्वी झाला असें मी म्हणत होतों पण तो हिंसेनें दूषित झालेला होता याबद्दल माझी आतां खात्री झालेली आहे. ठाकूर साहेबांनीं दिलेल्या वचनाची पूर्ति करणें त्यांना भाग पडावें म्हणून मी सार्वभौम सत्तेला इरेस घातलें होतें. हा कांहीं अहिंसेचा किंवा मतपरिवर्तनाचा मार्ग नव्हे. हा हिंसेचा किंवा धाकदपटशाचा मार्ग आहे. केवळ ठाकूरसाहेब किंवा त्यांचे दिवाण दरबार वीरावाला यांच्यांत मतपरिवर्तन घडवून आणण्यासाठींच मी तो उपवास केला असता व तो करीत असतांना मी मरायलाहि तयार झालों असतों तरच त्या उपवासाचें शुद्ध स्वरूप कायम राहिलें असतें. दरबार वीरावालांना सदर निर्णय कांहीं आवडलेला नव्हता. म्हणूनच सदर निर्णय अंमलांत आणण्यांत विलंब व्हावा अशा दृष्टीनें त्यांना जी जी संधि दिसली तिचा त्यांनीं फायदा करून घेतला. माझ्यापुरतें मी असें जाहीर करतों कीं, ठाकूरसाहेबांनीं मुसलमान व

भायात या दोन जमातींना कांहींहि दिलें तरी त्याला माझी मुळींच हरकत नाहीं. व्हाईसरॉय व सरन्यायाधीश यांना या बाबतींत जो त्रास झाला त्याबद्दल त्यांची मी क्षमा मागतों. ठाकूरसाहेब व दरबार वीरावाला यांची क्षमा तर मला मागितलीच पाहिजे. माझ्या सहकाऱ्यांप्रमाणेंच माझ्याहि मनांत दरबार वीरावाला यांच्या संबंधानें कुत्सित विचार येत होते हें मी मान्य करतों. त्यांच्याशीं वागतांना मी अहिंसेचा जसा उपयोग करावयास हवा होता तसा तो केला नाहीं. त्यांच्याबाबत मीं जें दुटप्पी धोरण अंगिकारलें तेंहि मला शोभण्यासारखें नव्हतें. एकीकडे मला मिळालेल्या निर्णयाची तरवार मी त्यांच्या डोक्यावर टांगून ठेवली होती. आणि दुसरीकडे ठाकूर साहेबांनीं आपल्या प्रजेला राजकीय हक्क द्यावे अशा प्रकारची सल्ला वीरावाला यांनीं त्यांस द्यावी म्हणून मी त्यांची मनधरणी चालविली होती. ही माझी कृति अहिंसेच्या तत्त्वाशीं सर्वस्वीं विसंगत अशी होती. त्या निर्णयावर अवलंबून राहून माझ्या मनाचा कोतेपणा मी व्यक्त केल्यावर वीरावाला यांनीं मोठ्या मनानें वागावें अशी मीं अपेक्षा तरी कां करावी? फक्त विश्वासानेंच विश्वास उत्पन्न होत असतो. माझ्याच ठिकाणीं विश्वासाचा अभाव होता. मी पश्चात्ताप करावा असें माझ्या हातून कांहींहि घडलेलें नाहीं असें माझ्या सहकाऱ्यांचें म्हणणें आहे. पण मला हें पटत नाहीं. ठाकूरसाहेब व त्यांचे दिवाण दरबार वीरावाला यांच्या डोक्यावर लटकत असलेली निर्णयाची तरवार मी आतां काढून घेतली आहे. तेव्हां त्यांनीं आपल्या प्रजेचें शंकानिरसन करून तिच्या आकांक्षा फलद्रूप कराव्या अशी माझी त्यांस विनंती आहे.’

या प्रकरणासंबंधानें बोलतांना ते एकदां असें म्हणाले होते कीं, ‘ठाकूरसाहेब आणि दरबार वीरावाला यांना पश्चात्ताप होऊन आपल्या प्रजेला दिलेलें वचन आपण पाळण्यास तयार आहोंत असें ते कबूल करीपर्यंत मला माझा उपवास चालू ठेवतां आला असता; पण माझ्या

मनाची चलबिचल झाली. मृत्यूची मला भीति वाटल्यामुळें इंग्रज सरकारची मदत घ्यावी असा माझ्या मनाला मोह निर्माण झाला. माझ्या हातून हें पातकच घडलें आणि मला मिळालेला निर्णय हें जर त्या पापाचेंच फळ असेल तर त्याचा त्याग मला केलाच पाहिजे, नाहीं का? ठाकूरसाहेब आणि दरबार वीरावाला यांस मी खिजविलें असल्यामुळें त्यांच्याकडून चांगल्या वर्तनाची अपेक्षा करण्याचा मला अधिकारच उरलेला नाहीं. विघ्नें ते निर्माण करीत नसून त्यांच्या वतीनें परमेश्वरच तीं निर्माण करीत आहे. परमेश्वरानेंच माझे डोळे उघडले आणि मला मार्ग दाखविला. पापानें मळलेले हे माझे हात मी जितक्या लौकर स्वच्छ करीन तितकें चांगलें, नाहीं का? माझ्या उपवासाचें फळ मिळविण्याबाबत मी जो उतावीळपणा केला त्याबद्दल देवानें मला ही शिक्षा केली आहे असें मी समजतों. पण खरें सांगायचें म्हणजे हा माझा पराभव आहे असें मला वाटत नाहीं. आपली चूक कबूल करण्यांत पराभव मानण्याचें कांहीं कारण नाहीं.'

गांधीजींनीं तो निर्णय बाजूला ठेवल्यावर दोन दिवसांनीं दरबारांत हजर होण्याविषयीं त्यांना निमंत्रण आलें. पूर्वींचीं सर्व पत्रकें रद्द करण्यांत आलीं असल्याचें आणि जप्त केलेली मालमत्ता व वसूल केलेले दंड ज्याचे त्यास परत करण्यांत येणार असल्याचें ठाकूरसाहेबांनीं सदर दरबारांत घोषित केलें. प्रजेच्या राजकीय मागण्यांचा विचार करण्यासाठीं त्यांनीं एक कमिटीहि जाहीर केली.

या एकंदर प्रकरणांत गांधीजींनीं आपलें हंसें करून घेतलें व एकंदर चळवळ बिघडवून टाकली असें म्हणणारांना गांधीजी म्हणत, 'राजकोटमधील परिस्थितीचा मी विचका केला असें म्हणणारांना मला असें विचारायचें आहे कीं, माझ्या हातून तसा विचका होण्यापूर्वीं संस्थानिक लोक भीतीनें लटलट कांपत होते व आपण आपल्या

हातांतील सत्ता प्रजेच्या सुपूर्द केव्हां करतों असें त्यांना होऊन गेलें होतें कीं काय? सत्याग्रहींनीं आपल्या बुद्धिवादानें व प्रत्यक्ष आचरणानें संस्थानिकांना हें पटवून दिलें पाहिजे कीं, संस्थानिकांना यापुढें हुकूमशहांसारखें वागतां येणें शक्य नाहीं–आपल्या प्रजेचे विश्वस्त या नात्यानेंच त्यांनीं यापुढें वागलें पाहिजे व त्यांत त्यांचें हितहि आहे. दुसऱ्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे मी माझी चूक दुरुस्त करून सत्याग्रहींना योग्य तोच मार्ग दाखवून दिलेला आहे. संस्थानी प्रजेच्या हितसंरक्षणाची जबाबदारी सार्वभौम सत्तेवर असून तिनें ती संभाळलीच पाहिजे हा माझा अगदीं ठाम अभिप्राय आहे. ज्या परमेश्वराच्या नांवानें मी तो उपवास सुरू केला होता त्याच्यासंबंधानें माझ्या मनांत अविश्वास निर्माण झाला याबद्दलचाच केवळ तो माझा पश्चात्ताप होता. परमेश्वराबरोबरच किंवा परमेश्वराऐवजीं व्हाईसरॉयवर अवलंबून रहाण्याचा मोह माझ्या मनाला झाला ही माझ्या हातून हिंसा घडली व त्या हिंसेचाच मला पश्चात्ताप झाला. संस्थानिक व त्यांचे दिवाण यांच्या मनांत काँग्रेसविषयीं अविश्वास निर्माण झाला आहे. आपल्या अहिंसेचें स्वरूप शंभर टक्के शुद्ध असतें तर असें झालें नसतें.'

ता. ९ ऑगस्ट रोजीं वर्धा येथें काँग्रेस वर्किंग कमिटीची सभा झाली. युद्ध सुरू झालेंच तर हिंदुस्थाननें त्यांत भाग घेऊं नये व काँग्रेस मंत्रिमंडळांनीं युद्धाच्या बाबतींत कोणतेंहि साहाय्य करूं नये असा त्यांस आदेश देण्यांत आला. या कारणासाठीं त्यांच्यावर राजीनामे देण्याची पाळी आली किंवा त्यांस बडतर्फ करण्यांत आलें तरी त्यांनीं तशी तयारी ठेवावी असाहि त्यांस आदेश देण्यांत आला. तसेंच, सुभाषबाबूंच्या शिस्तबाह्य वर्तनाचा विचार करण्यांत येऊन काँग्रेसमधील कोणत्याहि महत्त्वाच्या जागेसाठीं निवडणुकीसाठीं उभे रहाण्यास त्यांस तीन वर्षेपर्यंत बंदी करण्यांत आली.

# १४

जर्मनीनें पोलंडवर स्वारी केल्याबरोबर सप्टेंबरच्या तीन तारखेला इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. त्याच दिवशीं हिंदी पुढाऱ्यांची किंवा कायदेमंडळांची आगाऊ संमति न घेतां व्हाईसरॉयनें हिंदुस्थान हें युध्यमान राष्ट्र असल्याचें घोषित केलें. त्यानंतर त्यांनीं हिंदी पुढाऱ्यांना मुलाखतीसाठीं निमंत्रणें पाठविलीं. ता. ५ सप्टेंबर रोजीं गांधीजी सिमल्याला गेले. नंतर पुन्हा कांहीं दिवसांनीं व्हाईसरॉयनें पन्नास हिंदी पुढाऱ्यांना मुलाखतीस बोलावलें. त्याप्रमाणें गांधीजी, राजेंद्रप्रसाद, जवाहरलाल, सुभाषबाबू, वल्लभभाई पटेल व बॅ. जिना त्यांच्या मुलाखतीस गेले.

ता. १७ ऑक्टोबर १९३९ ला व्हाईसरॉयनें केलेल्या घोषणेंत हिंदी मुसलमानांच्या वतीनें बोलण्याचा हक्क फक्त मुस्लिम लीगचाच आहे असें घोषित करण्यांत आलें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मागणीस या घोषणेंत मोठ्या खुबीनें बगल देण्यांत आली असून युद्धसमाप्तीनंतर अल्पसंख्याकांच्या म्हणण्याचा नीट विचार करून हिंदुस्थानला देण्यांत यावयाच्या साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचा फेरविचार करण्यांत येईल असें म्हटलें होतें.

ता. २३ ऑक्टोबर रोजीं कॉं. वर्किंग कमिटीची सभा वर्धा येथें भरली. सदर सभेंत व्हाईसरॉयच्या घोषणेचा धिःकार करण्यांत येऊन कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं आपापले राजीनामे सादर करावे असा त्यांस आदेश देण्यांत आला. गांधीजी म्हणाले, 'युद्ध चालू असतांना इंग्रजांनीं हिंदुस्थानाला विशेष कांहीं राजकीय हक्क द्यावे अशी कॉंग्रेसनें

मागणी केलेली नाहीं. युद्धसमाप्तीनंतर ज्या कांहीं गोष्टी व्हावयाच्या त्यांत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचाहि समावेश करण्यांत यावा एवढेंच तिचें म्हणणें आहे. इंग्लंडनें उभा केलेला हिंदुस्थानांतील अल्प-संख्याकांचा प्रश्न म्हणजे केवळ बुजगावणें आहे. हा प्रश्न अस्तित्वांतच नाहीं असें नव्हे पण तो सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे घटनासमिति हाच आहे. हिंदुस्थानांतील गुंतागुंतीचे प्रश्न इंग्लंडनें नव्हे तर घटनासमितीनें सोडवावयाचे आहेत. कॉ. मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिल्यानंतर त्याची इंग्लंडवर काय प्रतिक्रिया होते तें पाहूनच कॉंग्रेस काय करावयाचें तें ठरवील. इंग्लंडनें आपली चूक सुधारावी अशासाठीं कॉंग्रेसनें अजूनहि दरवाजा खुला ठेवलेला आहे.'

कायदेभंगाच्या चळवळीसंबंधींचे सर्व अधिकार कॉ. वर्किंग कमिटीनें गांधीजींच्या सुपूर्द केले. तेव्हां ते म्हणाले, 'सरकारनें आपणाला दुसरा मार्गच शिल्लक ठेवला नाहीं तरच कायदेभंगाची चळवळ आपणाला करावी लागेल. आपला हा झगडा जीवनमरणाचा आहे. आपल्या सभोंवतीं सर्वत्र हिंसेचें वातावरण भरून राहिलें आहे. देशाच्या परीक्षेचीच ही वेळ आहे. आतां लपवालपवी करून चालणार नाहीं. अहिंसेचें व्रत आपल्या अंगीं संपूर्णपणें बाणलेलें नाहीं अशी आपली खात्री होऊन चुकली असेल तर आपण तसें स्पष्टपणें जाहीर करून वर्किंग कमिटीला काढून टाकलें पाहिजे. असें करण्यानें मोठीशी आपत्ति ओढवेल असें नाहीं. पण तिच्यावर व तिच्या आदेशावर आपली श्रद्धा नसतांना ती तशीच कायम असल्याचें ढोंग करण्यानें मात्र फारच मोठी आपत्ति कोसळल्याशिवाय रहाणार नाहीं. सत्य व अहिंसा या व्रतांचें संपूर्णतया पालन केल्याशिवाय हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळणें अशक्य आहे असें माझें निश्चित मत आहे. अगदीं जहालांतील जहाल कॉंग्रेसवाल्याला, परकीयांच्या गुलामगिरींतून आपल्या मातृभूमीला मुक्त

करण्याची जेवढी तळमळ आहे तितकीच ती मलाहि आहे. पण मी कोणाहि इंग्रजाचा— इतकेंच नव्हे, तर जगाच्या पाठीवरील कोणाचाहि—द्वेष करीत नाहीं. मी दोस्त राष्ट्रांना मदत करूं शकलों नाहीं तरी त्यांचा नाश व्हावा असेंहि मला वाटत नाहीं. इंग्रज सरकारनें माझी व काँग्रेसची निराशा केली तरी त्याच्या संकटाचा फायदा घेण्याची माझी इच्छा नाहीं.'

ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस मद्रास, मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा व सरहद्द प्रांत येथील काँ. मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. ता. १ नोव्हेंबर रोजीं गांधीजी, राजेंद्रप्रसाद व जिना यांची व्हाईसरॉयशीं एकत्र मुलाखत झाली. पण या मुलाखतींतून कांहींच निष्पन्न होऊं शकलें नाहीं. गांधीजींचें म्हणणें असें होतें कीं, हिंदुस्थानला काय पाहिजे आहे याची विचक्षणा करीत बसण्यापेक्षां आपलें हिंदुस्थानसंबंधानें काय धोरण आहे हें इंग्लंडनेंच असंदिग्ध भाषेंत सांगितलें पाहिजे. दुसऱ्यांना गुलामगिरींत राबविणारानें गुलामगिरीची पद्धत नष्ट करावयाची असें एकदां ठरविल्यानंतर, सदर गुलामांना स्वतंत्र होण्याची इच्छा आहे कीं नाहीं हें तो त्यांना विचारीत बसत नाहीं. हिंदुस्थानला गुलामगिरींतून मुक्त करण्यांत येणार आहे अशी इंग्लंडनें स्पष्ट भाषेंत घोषणा केल्यानंतर कांहीं तरी तात्पुरता मार्ग काढणें सहज शक्य होईल. अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची बाब मग अगदींच सोपी ठरेल. ज्यामध्यें बहुसंख्याकांइतकीच अल्पसंख्याकांनाहि संरक्षणाची हमी देण्यांत आलेली नसेल त्याला स्वातंत्र्याचा जाहीरनामा असें नांवच देतां येणार नाहीं. तथाकथित बहुसंख्याकांविरुद्ध अल्पसंख्याकांची आघाडी उभी करून इंग्रज सरकारनें आतांपर्यंत आपलें हिंदुस्थानांतील बस्तान कायम टिकविलें आहे. अशा परिस्थितींत बहुसंख्य व अल्पसंख्य यांच्यांत तडजोड घडून यावीच कशी? अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची

सारी जबाबदारी आपल्या शिरावर आहे असा इंग्रजांचा ग्रह कायम असेल तोंपर्यंत ते हिंदुस्थानला गुलामगिरींतच रखडविणार व स्वातंत्र्य-संपादनासाठीं आतुर झालेले हिंदी देशभक्त इंग्रजांशीं लढा करीत रहाणार ! हें महायुद्ध म्हणजे मानवजातीला शाप असा वाटत असला तरी जर यामुळें हिंदुस्थानाला गुलामगिरींतून मुक्त करण्याची सुबुद्धि इंग्रजांना झाली तर तो शाप हा एक प्रकारचा वरच ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.'

यानंतर कांहीं दिवसांनीं फक्त निवडक सभासदांचें कार्यकारी मंडळ तयार करण्यांत येऊन गांधी सेवा संघाचें विसर्जन करण्यांत आलें. ता. ५ मार्च १९४० रोजीं गांधीजींनीं शेगांवला सेवाग्राम असें नांव दिलें. १९ मार्च रोजीं मौ. अबुल कलम आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं रामगड येथें कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं हिंदूइतकाच मुसलमानांनींहि त्याग कां केला पाहिजे हें त्यांनीं विशद करून सांगितलें. त्याच महिन्याच्या अखेरीस मुस्लिम लीगचें अधिवेशन लाहोर येथें भरून पाकिस्तान हें मुस्लिम लीगचें ध्येय असल्याचें जाहीर करण्यांत आलें.

मे महिन्यांत जर्मनीनें हॉलंड, बेल्जम व लक्झेंबर्ग यांवर स्वारी केली. इंग्लंडचे मुख्य प्रधान या नात्यानें चेंबर्लेनच्या जागीं चर्चिल व भारतमंत्र्याच्या म्हणजे लॉर्ड झेटलंडच्या जागीं एमरी यांची योजना झाली. ता. १७ जूनला फ्रान्सनें शरणागति पत्करली.

डाव्या गटाच्या पुढाऱ्यांची सरकारनें धरपकड सुरू केली. सुभाषचंद्र बोस यांस अटक झाली. मध्यवर्ती एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल वाढवावयाचें व ॲडव्हायसरी वॉर कौन्सिल स्थापन करावयाचें असा इंग्रज सरकारनें निर्णय घेतला. ता. १५ सप्टेंबरला ऑ. इं. कॉं. कमिटीची सभा मुंबई येथें भरली असतांना कॉंग्रेसचीं अधिकारसूत्रें

ग्रहण करण्याबाबत गांधीजींना विनंती करण्यांत येऊन त्यांनीं ती मान्य केली. ता. २७ व ३० सप्टेंबरला गांधीजींनीं सिमला येथें व्हाईसरॉयची मुलाखत घेतली. गांधीजींनीं सूचित केलेलें भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य त्या परिस्थितींत मान्य करणें अशक्य असल्याचा आपला अभिप्राय व्हाईसरॉयनें सदर प्रसंगीं व्यक्त केला. त्यानंतर कॉं. व. कमिटीची सभा होऊन ता. १५ ऑक्टोबरला गांधीजींनीं असें प्रसिद्ध केलें कीं, 'कॉंग्रेसच्या वतीनें सत्याग्रहाची जी मोहीम सुरू करण्यांत येणार आहे तिचें उत्तरदायित्व सर्वस्वीं माझ्या शिरावर आहे. मी प्रवर्तित असलेल्या प्रकाराहून अन्य प्रकारची मोहीम सुरू करण्यांत आली पाहिजे असें ज्यांना प्रामाणिकपणें वाटत असेल त्यांनीं कॉंग्रेसमधून बाहेर पडून आपली योजना जनतेपुढें अवश्य मांडावी. माझ्या योजनेप्रमाणें श्री विनोबा भावे हे एकमेव सत्याग्रही या सत्याग्रहाचा श्रीगणेशा करतील. हा सत्याग्रह केवळ भाषणस्वातंत्र्यासाठीं असल्यामुळें या सत्याग्रहाशीं श्रोतृवर्गाचा संबंध येणें क्रमप्राप्तच आहे. विनोबांचें भाषण श्रोत्यांनीं वाटल्यास ऐकावें किंवा ऐकूं नये. विनोबांचें भाषण ऐकणें किंवा त्यांनीं लिहिलेला मजकूर वाचणें म्हणजे गुन्हा आहे असा सरकारनें निर्णय घेतल्यास पेंचप्रसंग निर्माण होईल.

जनतेला कदाचित् असा प्रश्न पडेल कीं, विनोबा भावे ही व्यक्ति तरी कोण आणि या कामीं मी त्यांचीच योजना कां केली ? याला उत्तर असें कीं, ते संस्कृत भाषेचे गाढे पंडित आहेत, माझ्या आश्रमाचे जवळजवळ प्रारंभापासून सदस्य आहेत, आश्रमाच्या हरएक बाबतींत त्यांनीं प्रत्यक्ष भाग घेतलेला आहे. त्यांची स्मरणशक्ति अचाट असून सूत कांतण्याच्या कलेंत त्यांची बरोबरी फारच थोडे लोक करूं शकतील. अस्पृश्यतेची नुसती कल्पनाहि त्यांच्या अंतःकरणाला स्पर्श करूं शकत नाहीं. अरबी भाषा उत्तम प्रकारें शिकून त्यांनीं सतत एक वर्षपर्यंत कुराणाचा

अभ्यास केलेला आहे. हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न माझ्याइतकाच त्यांनाहि जिव्हाळ्याचा वाटतो. त्यांचे सहकारी आणि शिष्य यांची संख्या खूपच मोठी असून विनोबांच्या इशाऱ्याबरोबर केवढाहि अलोट त्याग करण्यास ते धांवून येतील. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची त्यांना आस्था आहे. त्यांनीं इतिहासाचा चांगला अभ्यास केलेला आहे. चरखा हें अहिंसेचें उत्कृष्ट प्रतीक असल्याची त्यांची ठाम श्रद्धा आहे. आतांपर्यंतच्या अनेक सत्याग्रहसंग्रामांत त्यांनीं प्रत्यक्ष भाग घेतलेला आहे. पहिला सत्याग्रही म्हणून मी स्वतःच सत्याग्रह करीत नाहीं तो केवळ माझ्या अटकेमुळें सरकारला जो त्रास होण्याचा संभव आहे तो होऊं नये म्हणून! परमेश्वर जशी प्रेरणा देईल तसें मी करीन.'

ता. १७ ऑक्टोबर १९४० रोजीं श्री विनोबा भावे यांच्या वैयक्तिक सत्याग्रहास प्रारंभ झाला. वर्ध्याजवळील पवनार येथें त्यांचें पहिलें भाषण झालें. त्यानंतर त्यांनीं पायीं प्रवास सुरू केला. प्रत्येक खेडयांत ते भाषण करीत. त्यांना ता. २१ रोजीं अटक होऊन तीन महिन्यांची शिक्षा झाली. दुसरा सत्याग्रही या नात्यानें गांधीजींनीं जवाहरलाल नेहरूंची नियुक्ति केली. पण त्यांनीं सत्याग्रह करण्यापूर्वींच त्यांस अटक करण्यांत येऊन चार वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली. नंतर सरदार वल्लभभाई पटेल व श्री. राजगोपालाचारी यांसहि अटक करण्यांत आली.

जर्मनीनें रशियावर स्वारी केल्यामुळें जूनच्या मध्याच्या सुमारास युद्धाचा रंग पालटला. हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं जातीय दंगे सुरू झाले. जर्मनी हळुहळू रशियांत घुसूं लागला होता व जपान इंडोचायनांतील आपलें आसन घट्ट करून युद्धांत सामील होण्याच्या योग्य अशा मोक्याची वाट पहात बसला होता. हिंदुस्थानांतील कच्चा माल व हिंदुस्थानांतून मिळूं शकणारें मनुष्यबळ यांची इंग्लंडला आतां विशेषच गरज वाटूं लागली. पं. जवाहरलाल आदिकरून कॉं. नेत्यांना मुक्त

करण्याचा सरकारनें निर्णय घेतला. ता. ४ डिसेंबर १९४१ पासून हें काम सुरू झालें.

ता. २३ डिसेंबर रोजीं कॉं. वर्किंग कमिटीची सभा बार्डोली येथें भरली. आतां जपाननेंहि महायुद्धांत उडी घेतली होती. सदर बैठकींत गांधीजींच्या पुढारीपणावर अविचल श्रद्धा असल्याचें स्पष्ट करण्यांत येऊन मुंबई येथें १९४० च्या सप्टेंबरमध्यें ऑ. इं. कॉं. कमिटीनें केलेल्या ठरावाला कॉंग्रेसनें चिकटून रहावें असें ठरविण्यांत आलें.

घटना विजेच्या गतीनें घडत होत्या. आशिया व युरोप या दोन्ही ठिकाणीं दोस्तांची पिछेहाट होत होती. ता. ७ मार्च रोजीं रंगून पडलें. हिंदुस्थानच्या दारावर जपानचे धक्के बसूं लागले. ता. ११ मार्च रोजीं हिंदुस्थानसाठीं एक नवी योजना तयार करण्यांत आली असल्याचें इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांनीं जाहीर केलें आणि ही योजना हिंदी जनतेच्या गळीं उतरविण्यासाठीं स्टॅफर्ड क्रिप्स यांना हिंदुस्थानला रवाना करण्यांत आलें.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्याशीं विचारविनिमय करण्याचें सत्र क्रिप्सनीं सुरू केलें. त्यांनीं आणलेल्या योजनेप्रमाणें हिंदुस्थानचा वसाहतीचा दर्जा मान्य करण्यांत आला असून, साम्राज्यांतून फुटून निघण्याच्या हिंदुस्थानच्या हक्कासहि मान्यता देण्यांत आली होती. मात्र या सगळ्या गोष्टी व्हावयाच्या त्या युद्धसमाप्तीनंतर, अशी त्या योजनेंत मेख मारून ठेवण्यांत आली होती. त्यांनीं गांधीजींची मुलाखत घेतली तेव्हां गांधीजी त्यांना म्हणाले, 'तुम्हांला आमच्यापुढें हीच योजना ठेवायची होती तर इथें येण्याचे परिश्रम तुम्ही घेतलेतच कशाला? माझें तुम्हाला अगदीं आग्रहाचें सांगणें आहे कीं इथें कालापव्यय करीत बसण्यापेक्षां

इंग्लंडला जाणारें पहिलें विमान तुम्ही गांठावें! तुमची ही योजना म्हणजे वायद्याची हुंडी आहे!!'

व्हाईसरॉयनें आपलें नवें कौन्सिल म्हणजे मंत्रिमंडळ मानावें व त्याच्या निर्णयास आपली मान्यता द्यावी अशी कॉंग्रेसतर्फे अट घालण्यांत आली. क्रिप्सनीं हें मान्य केल नाहीं आणि ता. १२ एप्रिल रोजीं त्यांनीं हिंदुस्थान सोडलें.

१९४२ सालच्या ऑगस्ट महिन्यांत ऑ. इं. कॉं. कमिटीची सभा मुंबई येथें भरली. सदर प्रसंगीं भाषण करतांना गांधीजी म्हणाले, "मी तुम्हांला प्रारंभींच सांगून टाकतों कीं १९२० सालीं गांधी जे होते तसेच ते आजहि आहेत. फरक झालाच असेल तर तो हाच कीं, अनत्याचारावरील माझा विश्वास त्या वेळेपेक्षां आज थोडासा अधिकच वाढलेला आहे. तेव्हां जर तुम्हांपैकीं कोणाची अहिंसेवरील श्रद्धा उडाली असेल किंवा कोणाला अहिंसेचा वीट आला असेल तर त्यानें या ठरावाच्या बाजूनें मत देऊं नये. मी आणि माझी अहिंसा यांची आज कसोटीची वेळ आलेली आहे. आज सारें जग हिंसेच्या ज्वाळांनीं होरपळून निघत असून त्यांतून सुटण्याकरितां आक्रोश करीत आहे. परमेश्वरानें मला दिलेल्या शहाणपणाचा जर मी अशा वेळीं उपयोग केला नाहीं तर त्यानें दिलेल्या देणगीला मी अपात्र आहें असें सिद्ध होईल. या प्रसंगीं मला कृति केलीच पाहिजे.

आपला हा लढा सत्तेसाठीं नसून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं सुरू करण्यांत येणारें तें अहिंसात्मक युद्ध आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्याचा लाभ झाल्यानंतर त्याच्यावर सत्ता कोण गाजविणार याचा विचारहि कॉंग्रेसच्या मनाला शिवत नाहीं. सत्ता येणार ती जनतेच्या हातीं. तेव्हां ती कोणाच्या सुपूर्द करावयाची हें जनतेनें ठरवायचें आहे. कॉंग्रेसनें प्रत्येक वेळीं अखिल राष्ट्राचाच विचार केला आहे आणि तिनें

जें कांहीं केलें तेंहि राष्ट्रासाठींच केलेलें आहे. आपण ज्या प्रकारचा शुद्ध लोकशाहीचा लढा चालविला आहे तसा जगांतील इतर कोणत्याहि देशानें आजपर्यंत केलेला नसेल. अनत्याचारी लढ्यानें स्थापन होणाऱ्या लोकशाहींत सर्वांना पुरेपूर स्वातंत्र्याचा लाभ होत असतो. अशा प्रकारची लोकशाही प्रस्थापित व्हावी म्हणून जो लढा उभारण्यांत यावयाचा आहे त्यांत सामील होण्यासाठीं मी तुम्हांला पाचारण करीत आहें. याची तुम्हांला एकदां नीट जाणीव झाली म्हणजे तुम्ही हिंदु व मुसलमान हे भेद विसरून जाल आणि स्वतःविषयीं फक्त हिंदी या नात्यानेंच विचार करूं लागाल.

अनेक हिंदी लोकांच्या मनांत इंग्रजांविषयीं तिरस्काराची भावना नांदत आहे. हे लोक इंग्रजी साम्राज्यशाही आणि इंग्रज जनता यांच्यांतील फरक लक्षांतच घेत नाहींत. त्यांच्या दृष्टीला हे दोघेहि सारखेच दिसतात. या द्वेषामुळें ते जपान्यांचें स्वागत करायलाहि तयार होतील. ही मनोवृत्ति फार भयंकर आहे. याचा सरळ अर्थ असा कीं हे लोक इंग्रजांऐवजीं दुसऱ्या कोणाच्या तरी गुलामगिरींत रहायला तयार आहेत.

आपलें भांडण इंग्रजांशीं नसून त्यांच्या साम्राज्यशाहीशीं आहे. इंग्रजांची राजसत्ता या देशांतून नाहींशी झाली पाहिजे या आमच्या भावनेचा जन्म क्रोधाच्या पोटीं झालेला नाहीं—तर आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदुस्थानानें आपलें कर्तव्य पार पाडण्यास समर्थ व्हावें या भावनेच्या पोटीं तो झालेला आहे. जोंपर्यंत हिंदुस्थान स्वतंत्र नाहीं आणि हें आमचें युद्ध आहे असें आम्हांला वाटत नाहीं तोंपर्यंत हिंदी जनतेंत त्याग आणि शौर्य या गुणांची परिणति झालेली दिसणें अशक्य आहे. मला हें पक्कें माहीत आहे कीं, हिंदी जनतेनें पुरेसा स्वार्थत्याग केल्यानंतर हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यावांचून इंग्लंडला गत्यंतरच उरणार नाहीं.'

सदर कमिटीच्या ता. ८ च्या सभेंत गांधीजी म्हणाले, 'मला माझ्या देशाचें स्वातंत्र्य आतांच्या आतां—शक्य असेल तर उद्यांच्या आंत सुद्धां—पाहिजे आहे. आतां स्वातंत्र्य जातीय ऐक्यासाठीं वाट पहात रहाणें शक्य नाहीं. मी तुम्हांला एक लहानसा मंत्र सांगून ठेवतों तो तुम्ही आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवा आणि तुमच्या प्रत्येक श्वासाबरोबर तो जपला जाऊं द्या. तो मंत्र म्हणजे 'करा किंवा मरा' हा होय. आपण एक तर हिंदुस्थानला स्वतंत्र तरी करूं किंवा तसा प्रयत्न करीत असतांना मरून तरी जाऊं. आम्ही गुलामगिरी सहन करीत जिवंत राहणार नाहीं. प्रत्येक कॉंग्रेस सभासदानें या लढ्यांत सामील झालेंच पाहिजे आणि आपल्या देशाची गुलामगिरी पहात आपण जिवंत राहणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली पाहिजे. प्रत्येक पुरुषानें व स्त्रीनें अशी प्रतिज्ञा केली पाहिजे कीं, त्यांचें जीवन आतां देशाचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठींच आहे आणि जरूर तर त्यासाठीं प्राणार्पण करण्याचीहि त्यांची तयारी आहे. परमेश्वराच्या आणि आपल्या मनाच्या साक्षीनें तशी शपथ व्हा. स्वातंत्र्यलक्ष्मी नामर्दांना माळ घालीत नसते.

मात्र कोणींहि कांहींहि गुप्तपणानें करूं नये. हें अगदीं उघड आणि राजरोस बंड आहे. अशा या झगड्यांत गुप्तता हें पाप आहे. स्वतंत्र मनुष्य गुप्त चळवळींच्या भानगडींत पडत नसतो. या लढ्यांत प्रतिपक्षानें आपल्यावर गोळ्या झाडल्या तर त्या आपल्या छातींत घुसल्या पाहिजेत—पाठींत नव्हे! मला या राज्यकर्त्यांना एवढेंच निक्षून सांगावयाचें आहे कीं आम्हां हिंदवासीयांचें जें कांहीं व्हायचें असेल तें होईल, पण तुम्ही मात्र हा हिंदुस्थान सोडून आत्तांच्या आत्तां चालते व्हा!'

रविवार ता. ९ ऑगस्ट रोजीं सकाळीं गांधीजींना अटक झाली. देशांत सर्वत्र वटहुकुमांचें थैमान सुरू झालें. त्या दिवशीं मुंबई,

अहमदाबाद व पुणें या तीन शहरांत भयंकर दंगे झाले. चळवळ सर्वत्र जोमानें फोफावूं लागली. छापखान्यांवर आणि वृत्तपत्रांवर सरकारनें विलक्षण प्रकारचीं बंधनें घातल्यामुळें अनेक छापखाने व वृत्तपत्रें बंद करण्यांत आलीं.

गांधीजींना अटक झाल्यानंतर आठच दिवसांनीं महादेवभाई देसाई निधन पावले. गेलीं पस्तीस वर्षें त्यांनीं गांधीजींच्या चरणीं आपलें सर्वस्व वाहिलें होतें. इतकीं वर्षें गांधीजींच्या चिटणिसाचें काम करीत असतांना त्यांनीं एक दिवसहि रजा घेतलेली नव्हती. गांधीजींचा उजवा हातच निखळून पडल्यासारखा झाला. त्यांच्या शवाला अग्नि देऊन गांधीजी म्हणाले 'महादेवनें करा किंवा मरा हा मंत्र प्रत्यक्ष कृतींत उतरविला. त्याच्यामुळें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा दिवस थोडातरी अलीकडे आल्याशिवाय रहाणार नाहीं.' महादेभाईंचें दहन करण्यांत आलें त्या ठिकाणीं त्यांची समाधि बांधण्यांत आली. गांधीजी दररोज सकाळसंध्याकाळ त्या समाधीचें दर्शन घेत. सकाळीं गीतेचा बारावा अध्याय ते त्या समाधीसमोर बसून वाचीत. ते म्हणत, 'महादेवाचें जीवन म्हणजे गीतेंत सांगितलेल्या भक्तिमार्गाचें जिवंत प्रतीक होतें आणि म्हणून त्याच्या समाधीपुढें बसून भक्तियोगाचेंच पठण केलें पाहिजे. तो पूर्वीं माझा शिष्य होता पण आतां माझा गुरु झाला आहे. त्यानें अखेरपर्यंत दाखविलेल्या सेवावृत्तीचा मला क्षणमात्रहि विसर पडूं नये म्हणून मी दररोज त्याच्या समाधीचें दर्शन घेत असतों.'

# १५

वृत्तपत्रांची मुस्कटदाबी झाल्यानें जनतेला देशांतील महत्त्वाच्या घडामोडी समजेनाशा झाल्या. आपल्या भावना प्रकट करणें जनतेला अशक्य झालें. सभामिरवणुकांना तर बंदी होतीच पण त्यांतल्या त्यांत कोणी निदर्शनें केल्यास सरकार त्यांच्यावर अश्रुधुराचा मारा करी, गोळ्यांनीं त्यांचे मुडदे पाडी. लोकांच्या भावना अनावर झाल्या. पुढारी-वर्गाची धरपकड झाल्यानंतर पहिल्याच आठवड्यांत २५० रेल्वे स्टेशनें, ५०० पोस्टऑफिसें व १५० पोलीस ठाणीं जनतेच्या क्षोभानलानें भाजून निघालीं. जनता निदर्शनें करीत असतांना सरकारनें विमानांचा उपयोग करण्यासहि कमी केलें नाहीं. फटक्यांची शिक्षा देण्याचें तर सत्रच सुरू झालें होतें. कॉंग्रेसचे हजारों कार्यकर्ते तुरुंगांत गेले, तर हजारों भूमिगतहि झाले.

देशांतील अत्याचारांना सरकार जबाबदार का कॉंग्रेस जबाबदार याबद्दल गांधीजी व व्हाईसरॉय यांच्यांत पत्रव्यवहार चालू होता. ता. ९ फेब्रुवारी १९४३ पासून आपण २१ दिवस उपोषण करणार असल्याचें गांधीजींनीं व्हाईसरॉयला कळविलें. पण सरकारला विचार करण्यास आणखी सवड मिळावी म्हणून त्यांनीं आपला हा विचार एक दिवस पुढें ढकलला. संबंध देशांत एकच खळबळ उडून गेली. वयाच्या ७४ व्या वर्षी प्रारंभिलेल्या या उपोषणांतून गांधीजी सहीसलामत पार पडूं शकतील कीं नाहीं याबद्दल सगळेच लोक साशंक होते. ता. १७ पासून गांधीजींच्या हृदयाची क्रिया मंदावली. त्यांच्या सुटकेसाठीं साऱ्या देशभर चळवळ सुरू झाली. ता. २२ ला त्यांची

प्रकृति फारच खालावली. अखेर ता. ३ मार्च रोजीं सकाळीं गांधीजींनीं आपला उपवास सोडला. साऱ्या देशानें समाधानाचा सुस्कारा सोडला.

कॉंग्रेसच्या सर्व पुढाऱ्यांना बंधमुक्त करण्यांत यावें अशी अपक्ष पुढाऱ्यांनीं आपल्या परीनें खटपट सुरू केली. देशाची परिस्थिति अधिकाधिक चिघळत चालली होती. गांधीजींशिवाय जनतेला असहाय वाटत होतें. देशांतील अत्याचारांना कॉंग्रेसच जबाबदार आहे असा लोकांचा ग्रह करून देण्यासाठीं सरकारनें एक पुस्तिका प्रसिद्ध केली. त्या आरोपांना गांधीजींनीं पूर्वीप्रमाणेंच उत्तर दिलें.

कस्तुरबांची प्रकृति दिवसेंदिवस खालावूं लागली. ता. २० फेब्रुवारी १९४४ रोजीं तर त्या अत्यवस्थच झाल्या व ता. २२ रोजीं आपल्या पतीच्या मांडीवर डोकें ठेवून त्या देवाघरीं निघून गेल्या. त्यांच्या निधनानिमित्त सबंध देशानें हरताळ पाळला. व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनीं लिहिलेल्या सांत्वनपर पत्रास उत्तर पाठवितांना गांधीजींनीं म्हटलें होतें, 'आम्ही पतिपत्नी कांहींशीं जगावेगळींच होतों. १९०६ सालापासून आम्ही परस्परांच्या संमतीनें ब्रह्मचर्यव्रताचें पालन केलें होतें. त्यामुळें आम्ही पूर्वीं कधींहि नव्हतों इतकीं एकमेकांच्या जवळ आलों होतों. पूर्वीं आम्हां दोघांचीं दोन स्वरूपें होतीं पण ब्रह्मचर्याचें व्रत घेतल्यानंतर आम्ही अक्षरशः एकरूप झालों. माझी तशी इच्छा नसतांनाहि ती माझ्या ठिकाणीं सर्वस्वीं एकरूप झाली. त्याचा परिणाम म्हणजे ती यथार्थानें माझें अर्धांग होऊन राहिली. तिची इच्छाशक्ति जबरदस्त होती. त्या शक्तीला वेडेपणानें मी पूर्वीं हटवाद म्हणत असें. पण त्या इच्छाशक्तीच्या जोरावर अनत्याचारी असहकारितेच्या कलेंत ती माझी गुरु बनली.

आपण असेंब्लींत नुकतेंच जें भाषण केलें त्यांत मला तरी नवीन असें कांहींच दिसलें नाहीं. अशा प्रकारचीं भाषणें ऐकून ऐकून माझ्या

मनांत निराशेचें प्राबल्य माजलें होतें आणि त्यांतूनच हिंदी लोकांना उद्देशून 'करा किंवा मरा—' आणि इंग्रज राज्यकर्त्यांना उद्देशून 'चले जाव–चालते व्हा–' या माझ्या उद्गारांचा जन्म झाला होता.

ज्यांच्या लायकीबद्दल तुम्ही प्रशस्तीपत्र देतां त्याच कॉंग्रेसवाल्यांच्या आजच्या धोरणाला तुम्ही अव्यवहारी म्हणतां. लायक माणसांनीं घेतलेले निर्णय एक वेळ चुकीचे असूं शकतील पण ते अव्यवहारी असतात हें आज मी पहिल्यानेंच ऐकतों आहें. कॉंग्रेसवाले हे लाखों लोकांचे प्रतिनिधी आहेत हें तुम्हाला मान्य आहे ना? मग त्यांच्याशीं वाटाघाटी करण्यापूर्वी त्यांच्या धोरणावर तुम्ही टीका कशी काय करूं शकतां? निःशस्त्र स्त्रीपुरुषांचा पाठिंबा असलेल्या निःशस्त्र स्त्रीपुरुषांना बंधमुक्त करण्यास सर्वसमर्थ सरकारनें भ्यावें हें त्याला शोभतें काय? वर्किंग कमिटीच्या सभासदांचें मत काय आहे हें अजमावून पहाण्याकरितां तुम्ही मला त्यांना भेटण्याची संधि कां देत नाहीं?

तुमच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलांत बहुतेक हिंदीच लोक असल्याचा दिमाख तुम्ही मिरवतां. पण ते लोक हिंदी आहेत का नाहींत हा मुद्दा महत्त्वाचा नसून ते जनतेचे प्रतिनिधी आहेत किंवा नाहींत हा मुख्य मुद्दा आहे.'

युद्धसमाप्तीपर्यंत गांधीजींची सुटका होणें शक्य नाहीं असेंच सर्वांना वाटत होतें. पण ता. ६ मे रोजीं त्यांची मुक्तता झाली. आगाखान पॅलेसमधून बाहेर पडतांना ते म्हणाले, 'बा आणि महादेव या दोघांनाहि स्वतंत्रता देवीच्या स्थंडिलावर मृत्यु आला आहे, तीं दोघेंहि अमर झालीं आहेत. जर या दोघांना तुरुंगाच्या बाहेर मृत्यु आला असता तर त्यांना हें वैभव लाभलें असतें काय?'

कांहीं दिवसांनीं ते म्हणाले, '१९४२ चा ऑगस्ट आणि आजचा क्षण यांत काय फरक आहे तें मी सांगतों. हिंदी जनतेची कितपत तयारी

आहे याची मला त्यावेळीं नीटशी कल्पना नव्हती. शौर्य, कष्ट आणि त्याग यांची या चळवळींत हिंदी लोकांनीं अगदीं शर्थ केली. पण सत्य व अहिंसा या तत्त्वांच्या पालनाच्या दृष्टीनें मात्र त्यांच्या या गुणांत दोष उत्पन्न झाला; आणि मी तरी असेंच म्हणतों कीं, या दोषामुळेंच हिंदुस्थानला आपलें ध्येय गांठतां आलें नाहीं. अर्थात् हें मी मान्यच करतों कीं, जनतेनें केलेल्या अत्याचारांच्या कुसळाला सरकारनें मुसळाचें स्वरूप दिलें असून आपण स्वतः केलेल्या पर्वतप्राय अत्याचारांना मात्र मोहरीचा आकार दिलेला आहे.'

मुस्लिम लीगच्या वर्किंग कमिटीनें गांधीजींशीं वाटाघाटी करण्याचे सर्व अधिकार जिनांना दिले. ता. ९ ते २७ सप्टेंबरपर्यंत त्या दोघांत वाटाघाटी चालू होत्या. पण त्यांतून कांहींहि निष्पन्न झालें नाहीं. गांधीजींनीं जिनांची भेट घेतल्यामुळें कांहीं राष्ट्रीय वृत्तीचे मुसलमान त्यांच्यावर रागावले. तेव्हां गांधीजी म्हणाले, 'राष्ट्रीय वृत्तीचे मुसलमान माझ्यावर रागावले असून आपल्या राष्ट्रीय वृत्तीला आपण चिकटून रहावें कीं नाहीं अशी शंका त्यांना आतां येऊं लागली आहे असें म्हणतात. हें खरें असेल तर ती एक गंमतच म्हटली पाहिजे. आपण राष्ट्रीय वृत्तीचे असणें हें आपलें कर्तव्य आहे असें ज्या मुसलमानांना वाटतें तेच त्या वृत्तीचे होत असतात. मी राष्ट्रीय आहें तो काय दुसऱ्या कोणाला खूष करण्याकरितां आहें? मी इतर कांहीं होऊंच शकत नाहीं म्हणून राष्ट्रीय आहें. मी जिनांची भेट घेतली ती माझ्या, राष्ट्रीय मुसलमानांच्या, साऱ्याच राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांच्या हितासाठीं घेतली.'

ता. २ ऑक्टोबर १९४४ रोजीं गांधीजींचा पंचाहत्तरावा वाढदिवस होता. तो अखिल हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्व जगांत साजरा झाला. आझाद हिंद सरकारचे प्रमुख व इंडिअन नॅशनल आर्मीचे सरसेनापति

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं या वाढदिवसानिमित्त रंगून येथें ध्वज-वंदनाचा कार्यक्रम घडवून आणला. त्या प्रसंगीं ते म्हणाले, 'हे राष्ट्रपित्या! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं सुरू करण्यांत आलेल्या या पवित्र युद्धांत विजय मिळण्यासाठीं आम्हांला तुमचा आशीर्वाद व सदिच्छा हीं पाहिजे आहेत!'

गांधीजी सर्वांना विधायक कार्यक्रम करण्यास सांगत असत. ता. १४ जून १९४५ रोजीं लॉर्ड वेव्हेलनीं आपली नवी योजना जाहीर केली. व्हाईसरॉयच्या कार्यकारिणींत या योजनेप्रमाणें स्पृश्य हिंदूंना व मुसलमानांना सारख्या जागा मिळावयाच्या होत्या. राजबंदींना मुक्त करण्याचें जाहीर झालें होतें. ता. २१ जून रोजीं कॉं. वर्किंग कमिटीची सभा मुंबईला भरली. व्हाईसरॉयनें बोलाविलेल्या सिमला परिषदेला उपस्थित रहावयाचें असें सदर सभेंत ठरलें. ता. २५ जून रोजीं सदर परिषदेचें काम सुरू झालें. ता. २९ जून रोजीं, एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलांत कॉंग्रेस व मुस्लिम लीगचे कोण कोण व किती सभासद असावेत या मुद्यांवर मतभेद झाल्यामुळें परिषदेचें काम १४ जुलैपर्यंत स्थगित करण्यांत आलें. तोंपर्यंत प्रत्येक पक्षानें आपली यादी सादर करावी व मी त्यांतून निवड करीन असें व्हाईस-रॉयनें सांगितलें. ता. ७ जुलै रोजीं कॉंग्रेसनें व इतर पक्षांनीं आपापली यादी व्हाईसरॉयकडे सादर केली. परंतु कार्यकारिणींत येणारा प्रत्येक मुसलमान हा मुस्लिम लीगचाच सभासद असला पाहिजे असा हट्ट जिना धरून बसले. अर्थातच सदर परिषदेंतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

ता. २६ जुलै रोजीं इंग्लंडमध्यें मजूर मंत्रिमंडळ सत्तारूढ झालें व त्यानंतर पंधराच दिवसांनीं जपाननें शरणागति पत्करली. हिंदुस्थानांतील मध्यवर्ति व प्रांतिक निवडणुका लवकरच होतील असें ता. २१ ऑगस्ट रोजीं जाहीर करण्यांत आलें. निवडणुकांचे निकाल

जाहीर झाल्याबरोबर व्हाईसरॉय आपली कार्यकारिणी बनविण्याची खटपट करतील असेंहि घोषित करण्यांत आलें.

नोव्हेंबर महिन्यांत इंडिअन नॅशनल आर्मीच्या खटल्याचें काम दिल्लीच्या लाल किल्ल्यांत सुरू झालें. तीस वर्षांपूर्वीं काढून टाकलेला बॅरिस्टरचा आपला झगा जवाहरलालनीं या वेळीं अंगावर चढविला. भुलाभाई देसाई मुख्य वकील होते. आरोपींच्या बचावाचें भाषण करतांना ते म्हणाले, 'सुभाषचंद्र बोस यांच्या महनीय नेतृत्वाखालीं ही सेना लढली. हिंदुस्थानचें गतस्वातंत्र्य संपादन करणें हा या सेनेचा हेतु होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिश राज्यसत्ता झुगारून देऊन तें मिळवून देणाऱ्या सेनेंत दाखल होण्याचा कोणाहि हिंदी माणसाला अवश्य अधिकार आहे.' या खटल्यांतील सर्व आरोपी दोषमुक्त ठरले.

१९४२ च्या चळवळींत बंद करण्यांत आलेलें 'हरिजन' गांधीजींनीं १० फेब्रुवारी १९४६ पासून पुन्हा सुरू केलें. ता. २२ मार्च रोजीं आपलें निसर्गोपचाराचें इस्पितळ त्यांनीं पुणें-सोलापूर रस्त्यावरील उरुळीकांचन या ठिकाणीं सुरू केलें.

कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांच्या प्रत्येकीं चार प्रतिनिधींनीं सिमला येथें जाऊन इंग्लंडहून आलेल्या शिष्टमंडळाशीं वाटाघाटी कराव्या असें ठरल. पण ता. १२ मे रोजीं सदर वाटाघाटी फिसकटल्याचें जाहीर करण्यांत आलें.

ता. २४ ऑगस्ट रोजीं हंगामी सरकारांतील मंत्र्यांचीं नांवें जाहीर करण्यांत आलीं. महामंत्री म्हणून पं. जवाहरलाला नेहरु यांचें नांव घोषित करण्यांत आल होतें. व्हाईसरॉयनें आपल्या रेडियोवरील भाषणांत मुस्लिम लीगला फेरविचार करण्यास आणि आपल्या अत्याचार-प्रवर्तक भाषणांना व कृतींना आळा घालण्यास सुचविलें. ता. २ सप्टेंबर रोजीं पं. जवाहरलाल व त्यांचे सहकारी यांनीं राज्यसूत्रें

आपल्या हातीं घेतली. त्या दिवशींच्या प्रार्थनासभेंत गांधीजी म्हणाले, 'आजचा हा दिवस परम शुभ आहे. पूर्ण स्वातंत्र्याची ही पहिली पायरी आहे. हिंदुस्थान व इंग्लंड यांचा लढा इंग्लंडनें इतक्या सामोपचारानें मिटविला याबद्दल मी इंग्लंडचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. आजचा हा दिवस मुसलमान लोक शोकदिन म्हणून पाळीत आहेत. पण भावाच्या क्रोधाची परतफेड आपण क्रोधानें करतां कामा नये. इंग्रज व हिंदु या दोघांनाहि आपले शत्रू मानणें आणि त्यांना प्रत्यक्ष कृतीचा धाक दाखविणें हें मुस्लिम लीगच्या दृष्टीनें तर्कशुद्ध नाहीं आणि न्याय्यहि नाहीं. कॉंग्रेस मुसलमानांच्या विरुद्ध इंग्रजांशीं संगनमत करणें कधींच शक्य नाहीं. हिंदू आणि मुसलमान दोघेहि याच भूमींत जन्मले, गेलीं कित्येक शतकें याच भूमींत नांदले, याच भूमींत त्यांनीं आपला उदरनिर्वाह केला आणि यथावकाश या दोघांनाहि याच भूमीच्या पोटांत चिरकाल विश्रांति घ्यावयाची आहे. हें सारें विसरून मुसलमानांनीं हिंदूंना आपले वैरी मानणें हें चुकीचें आहे. मी तर असेंहि म्हणतों कीं, मुसलमानांची ही आजची वृत्ति इस्लामला शोभण्यासारखी नाहीं.'

ता. ३ ऑक्टोबरच्या प्रार्थनासभेंत गांधीजी म्हणाले, 'अहिंसेच्या तत्त्वज्ञानामुळें हिंदु लोक नामर्द बनत आहेत, मी महात्मा नाहीं, मी हिंदूंचा घात करीत आहें, अशा अर्थाचीं अनेक पत्रें मला दररोज येत असतात. पहिली गोष्ट अशी कीं, मी कोणी महात्मा आहें असा दावा मी कधींच केलेला नाहीं. तुमच्यासारखाच मीहि एक सामान्य मर्त्य मनुष्य आहें. मी जाणूनबुजून आजपर्यंत कोणालाहि दुखविलेलें नाहीं. मी तुम्हांला जें सांगतों तें तुमच्या व जगाच्या हितासाठीं सांगतों. मी तुम्हांला नेहमीं असेंच सांगत असतों कीं, जर तुम्हांला अहिंसेच्या धर्माचें पालन करतां येत नसेल तर तुम्ही हिंसेचा अवलंब

करून आत्मसंरक्षण करा पण कोणत्याहि प्रसंगीं नामर्द मात्र बनूं नका. माझें म्हणणें इतकेंच कीं, आपल्या बंधूचा शरिरान किंवा मनानें प्रतिकार न करतां त्याच्या हातून ओढवणाऱ्या मरणाला हसतमुखानें सादर होणें या शौर्याला दुसरी जोडच नाहीं.

मरण कोणालाच चुकलेलें नसल्यामुळें मरणाची फारशी क्षिति बाळगण्याचें कारण नाहीं. तुम्ही कसे मरतां, हाच खरा प्रश्न आहे. तसेंच, शौर्य हा काय फक्त पुरुषांचाच मक्ता आहे? स्त्रिया सहसा शस्त्र धारण करीत नाहींत हें खरें आहे. पण झांशीच्या राणीनें हातांत तलवार धरली आणि तलवारीच्या पराक्रमांत मी मी म्हणणाऱ्या पुरुषांनाहि लाजविलें. सर्वच स्त्रिया कांहीं झांशीच्या राणी बनूं शकत नाहींत पण सीतेचें अनुकरण करणें मात्र स्त्रियांना सहज शक्य आहे. एवढा बलाढ्य रावण, पण तो सीतेच्या अंगाला स्पर्शहि करूं शकला नाहीं. झांशीच्या राणीला एकवेळ नमवितां येईल पण सीतेला नमवितां येणें अशक्य आहे. शस्त्रधारी माणूस शस्त्रविहीन झाला म्हणजे शरणागति पत्करण्यावांचून त्याला दुसरा उपायच रहात नाहीं. ज्या स्त्रिया जुलुमानें बाटविल्या गेल्या असतील किंवा ज्या बलात्कारानें भ्रष्ट झाल्या असतील त्यांचें धर्मांतर झालें किंवा त्या भ्रष्ट झाल्या असें मी मुळींच मानीत नाहीं. अशा स्त्रियांना शुद्ध करून घेण्याची आवश्यकता आहे असेंहि मला वाटत नाहीं.'

बंगालमध्यें—विशेषतः नोआखालींत—मुसलमानांनीं अत्याचारांचा कळसच केला. तेव्हां बंगालमध्यें स्वतः जाण्याचें गांधीजींनीं ठरविलें. ते म्हणाले, 'स्त्रियांना क्लेश भोगावे लागले कीं माझें अंतःकरण तिळतिळ तुटत असतें. स्त्रियांचे अश्रू पुसून त्यांच्या अंतःकरणांत कांहीं धैर्य निर्माण करतां आल तर तें करण्यासाठीं मी बंगालला जात आहें.'

बंगालमधील आपला दौरा सुरू केल्यावर एका प्रार्थनासभेंत ते

म्हणाले, 'बंगालमधील मुसलमानांनीं हिंदूंची कत्तल केली आणि खाटकापेक्षांहि अधिक क्रूरपणाचीं कृत्यें केलीं तर बिहारमध्यें हिंदूंनीं मुसलमानांची लांडगेतोड केली. दोघांनींहि क्रूरपणाचा विक्रम केल्यानंतर अधिक क्रूर कोण याची शहानिशा करीत बसण्यांत अर्थ काय? तुम्हांला सूडच घ्यायचा असेल तर ती कला तुम्ही माझ्या-पासून शिका. मी सुद्धां सूड घेत असतों पण सूड घेण्याची माझी रीत कांहींशी निराळी आहे. ज्यानें तुम्हाला पेलाभर पाणी दिल असेल त्याला तुम्ही दोन पेले पाणी दिलेंत तर त्यांत कांहीं तुम्हांला फारसें भूषण नाहीं. पण ज्यानें तुमच वाईट केलें असेल त्याचें तुम्ही कल्याण केलें तर त्यांत तुम्हांला निःसंशय भूषण आहे. मी याला 'उमदा सूड' असें म्हणतों.'

ता. २० नोव्हेंबर रोजीं गांधीजींनीं आपल्या सहकाऱ्यांना कामें वाटून दिलीं आणि एक दुभाषी व एक स्टेनोग्राफर या दोघांना घेऊन अज्ञात भूमींत संचार करण्यासाठीं ते निघाले. ७७ वर्षांचे गांधीजी दररोज अठरा तास काम करीत होते. ते पहांटे चार वाजतां उठत व रात्रीं साडेआठ वाजतां झोंपीं जात. कधीं कधीं तर ते पहांटे दोन वाजतांहि उठत असत. गरिबांच्या झोंपड्यांत जाऊन ते दुःखितांना धीर देत होते. त्यांचा मुक्काम श्रीरामपूरला असतांना पं. जवाहरलाल नेहरु त्यांना भेटण्यासाठीं गेले होते. तेथून परत येतांना ते म्हणाले, '७७ वर्षांच्या या नवजवानाला भेटण्याची संधि मिळाली म्हणजे मला नेहमींच आनंद वाटतो व मला नवीन स्फूर्ति लाभते. याला भेटल्यावर आम्हालाहि आपण अधिक तरुण झाल्याचा किंवा आपल्या अंगीं कांहीं तरी विशेष सामर्थ्य संचारल्याचा भास होऊं लागतो. नोआखालीचा प्रश्न हा भीतीनें ग्रस्त झालेल्या, दारिद्र्यानें पिचत असलेल्या आणि दुःखानें हैराण झालेल्या मानवांचा प्रश्न आहे. हा प्रश्न आज महात्माजी

आपल्या पद्धतीनें सोडवीत आहेत. त्यांच्या प्रयत्नामुळें माणसाच्या मनावर चिरस्वरूपाचा परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं.'

ता. ५ जानेवारी १९४७ पासून गांधीजींनीं आपली पदयात्रा चालू केली. या यात्रेला निघाल्यावर पहिले सात दिवस त्यांना दररोज वीस तास काम करावें लागे. त्या दिवसांत ते रात्रीं दहा वाजतां निजत व पहांटे दोन वाजतां उठत. पहांटे दोन ते पांच कंदिलाच्या मंद प्रकाशांत ते आपलीं कामें करीत. एका प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले, 'ज्या मनुष्याची बुद्धि त्याच्या जमातीपलीकडे जाऊं शकत नाहीं तो स्वतः तर स्वार्थी बनतोच पण आपल्या जमातीलाहि स्वार्थी बनवतो. त्यागवृत्तीची परिणति अशी झाली पाहिजे: व्यक्तीनें जमातीसाठीं, जमातीनें आपल्या जिल्ह्यासाठीं, जिल्ह्यानें प्रांतासाठीं, प्रांतानें देशासाठीं व देशानें जगासाठीं त्याग केला पाहिजे. महासागरांतील एक थेंब काढला तर तो कोणताहि पराक्रम न करतां वाफेच्या रूपानें लौकरच नाहींसा होतो; पण तो महासागरांतच राहिला तर आपल्या छातीवरून मोठमोठीं जहाजें नेण्याच्या वैभवाचा वांटेकरी होऊं शकतो.'

ही आपली यात्रा आटोपून ता. ५ मार्च रोजीं गांधीजी पाटण्याला पोहोंचले. तेथील लोकांना उद्देशून ते म्हणाले, 'नोआखाली येथें मुसलमानांनीं हिंदूंवर जे अत्याचार केले त्यापेक्षां बिहारमधील हिंदूंनीं येथील मुसलमानांवर कितीतरी अधिक अत्याचार केलेले आहेत. मुसलमान बंधूंचे प्राण वांचविण्यासाठीं कांहीं कॉंग्रेसजनांनीं आपले स्वतःचे प्राण धोक्यांत घातले असल्याचें मला माहीत आहे. नोआखालीच्या अत्यारांचा सूड बिहारनें घेतला म्हणून आनंद मानणारे अनेक हिंदू आहेत हेंहि मला माहीत आहे. पण ही त्यांची वृत्ति शूराची नसून गुलामाची आहे. अशा सैतानी अत्याचारांनीं आपण आपल्या स्वातंत्र्याचें किंवा धर्माचें संरक्षण करूं शकूं असें मानणें हा शुद्ध जंगलीपणा

आहे. जर तुम्हांला हिंदुस्थानचें स्वातंत्र्य पाहिजे असेल तर असल्या रानटी उपायांचा अवलंब करण्याचा विचारसुद्धां तुमच्या मनाला शिवतां कामा नये. एकाच्या मूर्खपणाला दुसऱ्यानें मूर्खपणानेंच उत्तर देण्याचें ठरविलें तर हिंदुस्थानांत रक्ताच्या नद्या वहाल्याशिवाय राहणार नाहींत. कांहीं मुसलमान स्त्रियांना अजूनहि हिंदु लोकांच्या घरांतून कोंडून ठेवण्यांत आलेलें आहे, असें मला समजलें आहे. त्या स्त्रियांना ताबडतोब त्यांच्या घरीं पोहोंचविण्यांत आलें पाहिजे. ज्या हिंदूंनीं हा गुन्हा केला असेल त्यांनीं पश्चात्तापयुक्त अंतःकरणानें आपला गुन्हा कबूल करून त्याचें प्रायश्चित्त भोगण्यास तयार झालें पाहिजे.

कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं हिंदुमुसलमानांचीं हीं भांडणें खरोखर धार्मिक नसून राजकीय आहेत. हें खरें आहे असें धरून चाललें तरी राजकीय भांडणांत सारी माणुसकी आणि सारे नीतिनियम आपण गाडूनच टाकले पाहिजेत असें कोणत्या शास्त्रांत सांगितलें आहे? हिंदुस्थानांतील चाळीस कोटी जनतेंत राजकीय मतभेद असले म्हणून काय त्यांनीं पशु बनून निरपराध बायकामुलांची कत्तल उडवायची? त्यांना आपसांतले मतभेद माणसांप्रमाणें वागून दूर करतां येऊं नयेत? आज हिंदू व मुसलमान हे दोघेही ज्या मार्गावरून चालले आहेत त्याचा त्यांनीं वेळींच त्याग केला नाहीं तर त्यांच्या कपाळीं सर्वस्वनाशाशिवाय कांहींहि येणार नाहीं.'

पंजाबांतहि हिंदुमुसलमानांच्या दंग्यांना ऊत आल्यामुळें गांधीजींनीं तिकडे जावें असें कांहीं लोकांनीं सुचविलें. पण बिहारबंगालमधील हिंदुमुसलमानांत एकी प्रस्थापित झाल्याशिवाय आपण इतर कोठेंही जाणें शक्य नाहीं असें गांधीजींनीं जाहीर केलें. ते ठिकठिकाणीं दौरा काढीत होते. ता. १७ मार्च रोजीं मसुरी येथें गांधीजींच्या प्रार्थनासभेला तीस हजार श्रोते जमले होते. तेथें ते म्हणाले, 'ता. २३ मार्च हा दिवस

येथील हिंदु लोक पंजाबदिन म्हणून पाळणार असल्यामुळें येथील मुसलमानांचीं मनें अस्वस्थ झालीं आहेत. ही वार्ता खरी नसेल अशी मी आशा करतों. असा दिन पाळणें याचा सरळ अर्थ हा कीं, भावाभावांनीं एकमेकांची कत्तल करण्यास तयार रहाणें. मी मुसलमानांना असें स्पष्ट आश्वासन दिलें आहे कीं, असल्या प्रकारची जातीय दंग्याची आग येथें पेटली तर तिच्या ज्वालांमध्यें मी आत्माहुति दिल्याशिवाय रहाणार नाहीं.'

नंतर कांहीं दिवसांपुरते ते दिल्लीला गेले.

# १६

गांधीजी आपल्या प्रार्थनेच्या वेळीं कुराणांतील कांहीं श्लोकहि म्हणत असत. कांहीं हिंदूंना हें आवडत नसे. त्यांना ते म्हणत, 'मी अशा रीतीनें प्रार्थना करूं नये असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं वाटल्यास मला ठार करावें. माझ्या प्राणावर प्रसंग आला तरी मी राम आणि रहीम यांचीं नावें उच्चारण्यास कमी करणार नाहीं. माझ्या दृष्टीनें ही दोन्हीहि परमेश्वराचींच नांवें आहेत. या नांवांचा जप करीत असतांना मरायला मी आनंदानें तयार आहें. जर राम व रहीम यांचीं नांवें घेण्यास मी कचरलों तर नोआखालींतील हिंदू व बिहारमधील मुसलमान यांना मी तोंडच दाखवूं शकणार नाहीं. परमेश्वराचें नांव अरबी भाषेंत घेतलें तर तें पाप कसें काय ठरतें?'

ता. १५ एप्रिल रोजीं गांधीजी व जिना या दोघांच्या सह्या असलेलें संयुक्त पत्रक दिल्ली येथें प्रसिद्ध करण्यांत आलें. आपला राजकीय हेतु

साध्य करून घेण्यासाठीं अत्याचारांचा अवलंब करण्याच्या धोरणाचा सदर पत्रांत तीव्र निषेध करण्यांत आला होता. सर्व जमातींनीं अत्याचारांपासून सर्वथैव अलिप्त रहावें अशी त्यांत अत्यंत कळकळीनें विनंती करण्यांत आली होती. ता. ४ मे रोजीं गांधीजी आपल्या प्रार्थनासभेंत म्हणाले, 'हिंदुस्थानचे शेवटचे व्हाईसरॉय म्हणून आलेले लॉर्ड माऊण्टबेटन म्हणतात कीं, ता. ३० जून १९४८ पर्यंत ब्रिटिश राजसत्तेचें एकहि चिन्ह हिंदुस्थानांत शिल्लक रहाणार नाहीं! पण इंग्रज लोक आणखी तेरा महिने इथें रहाणार आहेत याचेंच मला वाईट वाटत आहे. आपसांत भांडावयाचें आणि मदतीसाठीं इंग्रजांच्या तोंडाकडे पहावयाचें अशी वाईट खोड आपल्या लोकांना जडलेली आहे. ब्रिटिश लष्कर आणखी तेरा महिने रहाणार ही एक अडचणच आहे. जो तो मनुष्य आपल्या मदतीसाठीं या लष्कराकडे पहात बसणार. बिहार, बंगाल, पंजाब, सरहद्द प्रांत या सर्व ठिकाणीं असेंच झालं. हें दृश्य अत्यंत लज्जास्पद असें आहे. म्हणून मी असें म्हणत असतों कीं, हिंदुस्थानांत बेबंदशाही माजली तरी एक वेळ चालेल पण इंग्रजांनीं इथून ताबडतोब निघून जावें. आज परिस्थिति अशी आहे कीं, एका प्रांतांतील हिंदु लोक गोऱ्या लष्कराकडे डोळे लावून बसलेले असतात तर दुसऱ्या प्रांतांतील मुसलमान लोकहि तेंच करीत असतात. इंग्रज इथून ताबडतोब निघून गेले तर आपल्याला कांहीं दिवस आगींतून जावें लागेल हें खरें; पण त्या ज्वालांनीं आपली शुद्धि झाल्याखेरीज रहाणार नाहीं.'

ता. ८ मे रोजीं गांधीजी पुन्हा बिहारमध्यें गेले. ता. २१ रोजीं विक्रम येथील प्रचंड श्रोतृवर्गाला उद्देशून ते म्हणाले, 'कॉंग्रेसनें अधिकारस्वीकार केल्यापासून तपश्चर्या, त्याग व सेवा यांना ती पारखी झाली असून कॉंग्रेसजन हे सत्तालोलुप व स्वार्थसाधु बनलेले असल्याची किंवदन्ती माझ्या कानीं वारंवार येऊं लागली आहे. जे कॉंग्रेसवाल

पूर्वी स्वतःला जनतेचे सेवक म्हणवीत होते तेच आज तिचे मालक बनल्याच्या तोऱ्यांत वागूं लागले आहेत. कॉंग्रेसमध्यें अनेक पक्षोपपक्षांचा बुजबुजाट माजून राहिला आहे तो निराळाच. येणारें स्वातंत्र्य आपणाला टिकवायचें असेल तर आपल मन अत्यंत निर्मळ असल पाहिजे, बुद्धि तजेल असली पाहिजे आणि समजूतदारपणाशीं आपली फारकत झालेली असतां उपयोगी नाहीं. कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांच्यांत जर हे गूण नसतील तर त्यांच्या हातांतून सत्ता निसटून गेल्याशिवाय रहाणार नाहीं. इंग्रजांनीं आपली सत्ता ज्याप्रमाणें संगिनींच्या जोरावर टिकवून धरली तशीच ती आपणहि धरूं शकूं या भ्रमांत या दोघांनींहि राहूं नये. त्यांच्या हातीं आलेली सत्ता जनतेमुळें आलेली आहे आणि त्यांनीं जनतेचे सेवक म्हणूनच राहिलें पाहिजे. कॉंग्रेसनें जनतेचा विश्वास गमावला तर जनता गुंडांच्या आहारीं जाईल आणि सत्तासुद्धां जनतेचेंच अनुकरण करून गुंडांच्या हातीं गेल्याशिवाय राहाणार नाहीं.’

पं. जवाहरलाल नेहरु यांच्या निमंत्रणावरून ता. २५ मे रोजीं गांधीजी दिल्लीला गेले. ता. ३ जून रोजीं लॉर्ड माऊन्टबेटन, पं. जवाहरलाल नेहरु, जिना व बलदेवसिंग यांचीं अखिल जनतेला उद्देशून रेडिओवरून भाषणें झालीं. नेहरूंचें भाषण अत्यंत हृदयस्पर्शी होतें. ते म्हणाले, ‘हिंदभूमीची फाळणी करण्यांत येत आहे याचें आपणा सर्वांनाच दुःख होत आहे. पण ती कायमची रक्तानें न्हात रहाण्यापेक्षां, प्राप्त परिस्थितींत तिच्यावर शस्त्रक्रिया करणें बरें अशा विचारानेंच या फाळणीस मान्यता देण्यांत येत आहे.’

फाळणीची ही योजना जाहीर झाल्यानंतर गांधीजी म्हणाले, ‘देशाची फाळणी होणें हें मी माझ्या शरिराची फाळणी होण्यासारखेंच समजेन असें मी म्हटलें होतें तें जनमताच्या अनुरोधानें. मग आतां जर

जनमतच फाळणीला अनुकूल झालें असेल तर त्याची मुस्कटदाबी मी कशी करूं शकणार? कॉंग्रेस पुढाऱ्यांनींहि या योजनेला कांहीं मोठ्याशा आनंदानें संमति दिलेली नाहीं. पण ते जनतेचे प्रतिनिधी होते आणि जनतेच्या मताप्रमाणें करणें हें त्यांचें कर्तव्यच होतें. जून १९४८ च्या ऐवजीं १५ ऑगस्ट १९४७ लाच हिंदुस्थानांतून जावयाचें असें इंग्रजांनीं ठरविल्यामुळें त्यांना आपल्या हातांतील सत्ता कोणत्या ना कोणत्या प्रकारें सोडणें भागच होतें. तो प्रकार साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचा असावा असें ठरलें. भारताची स्वतंत्र घटना तयार झाल्याबरोबर आपला हा दर्जा धुडकावून लावण्याची सवलत हिंदुस्थानला मिळालेली आहे आणि जर त्यानंतरहि आहे हीच परिस्थिति बरी आहे असें भारताला वाटलें तर तो कांहीं इंग्रजांचा दोष ठरणार नाहीं–तो आपलाच नामर्दपणा ठरेल.'

ता. २८ जून रोजीं गांधीजी म्हणाले, 'आज जो उठतो तो आपल्या अधिकाराचें, आपल्या हक्काचें तुणतुणें वाजवितांना दिसत आहे. भांडवलदार, जमीनदार, संस्थानिक, मजूर—, कोणाकडेहि पहा. प्रत्येकजण आपला अधिकार—आपला हक्क—याशिवाय दुसरी भाषाच बोलतांना ऐकूं येत नाहीं. आपल्या हक्कांच्या जाणीवेबरोबरच आपल्या कर्तव्याचीहि जाणीव नसेल तर सगळाच गोंधळ उडून जाईल आणि सगळ्यांचाच विनाशकाल ओढवल्याशिवाय रहाणार नाहीं. आपल्या हक्कांविषयीं जागरूक रहाण्यापेक्षां जो तो मनुष्य आपलें कर्तव्य इमानें-इतबारें करूं लागेल तर किती बरें होईल! हक्क आणि कर्तव्य यांचा योग्य समन्वय आपल्याला घालतां आला पाहिजे.' माझें असें स्पष्ट मत आहे कीं, आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावल्यामुळेंच जे हक्क आपल्याला प्राप्त होत असतील तेच हक्क खरे–बाकीच्या हक्कांत फारसा अर्थ नाहीं. ते झटकून टाकलेलेच बरे. जो बाप मुलांविषयींचें आपलें कर्तव्य न बजावतां

त्यांच्याकडून मात्र आज्ञाधारकत्वाची अपेक्षा करतो त्याच्या वांट्याला त्यांच्या तिरस्काराशिवाय दुसरें कांहींच येऊं शकत नाहीं. पण पिता आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावीत असतांना मुलें जर त्याचा तिरस्कार करीत असतील तर त्यांना कृतघ्नच म्हणावें लागेल. आपल्या अशा वागण्यानें तीं आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतील.'

ता. १३ जुलै रोजीं जिनांनीं असें जाहीर आश्वासन दिलें कीं, पाकिस्तानमधील अल्पसंख्य जमाती जोंपर्यंत पाकिस्तानशीं एकनिष्ठ राहातील तोंपर्यंत त्यांच्या जीविताच्या, मालमत्तेच्या, धार्मिक भावनांच्या सुरक्षिततेबद्दल यत्किंचितहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं. तेव्हां गांधीजी म्हणाले, 'एखाद्या मोठ्या पुढाऱ्यानें एखादें मोठें आश्वासन दिलें असलें तरी त्याचें पालन अचूकपणें होतेंच असें नाहीं. खुनांच्या आणि लुटमारीच्या बातम्या चोहोंकडून येत आहेत. आतां कराची ही पाकिस्तानची राजधानी होणार. पण सिंधमधील हिंदू तर आतांपासूनच स्थलांतर करूं लागले आहेत. तेथील हिंदूंच्या मनांत विश्वास उत्पन्न करण्याकरितां जिनासाहेब १५ ऑगस्टपर्यंत वाट पहाणार आहेत कीं काय? पाकिस्तानांतील हिंदूंच्या मनांत विश्वासाची भावना ताबडतोब निर्माण करणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. व्यक्ति काय किंवा सरकार काय, त्यांच्या कृतीवरूनच त्यांची पारख करण्यांत येत असते. हाच न्याय भारतालाहि लागू आहे.'

ता. १८ जुलैला इंडिअन इंडिपेंडन्स बिलाला बादशहाची संमति मिळाल्याचें जाहीर करण्यांत आलें. ता. १४ ऑगस्ट रोजीं गांधीजी कलकत्त्यांत होते. त्या दिवशीं जिनांनीं पाकिस्तान जन्माला आलें असल्याचें जाहीर केलें. त्याचबरोबर त्यांनीं अशी घोषणा केली कीं, 'हिंदुस्थानचे हे दोन विभाग मित्रत्वाच्या नात्यानें एकमेकांपासून दूर होत असून त्यांचे हे मित्रत्वाचे संबंध यावच्चंद्रदिवाकरौ असेच कायम टिकतील.'

भारताचा सोहळा डोळे भरून पहाण्यासाठीं दिल्लींतील सर्व माणसें ता. १४ च्या रात्रीं जागीं राहिलीं होतीं. बारा वाजण्याच्या सुमारास 'महात्मा गांधीकी जय' च्या आरोळ्यांनीं सारें वातावरण दुमदुमून गेलें. घटना समितीचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांनीं स्वातंत्र्यसंग्रामांत जे ज्ञात व अज्ञात वीर फांसावर चढले किंवा ज्यांनीं आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्या-साठीं आपल्या सर्वस्वाचें बलिदान केलें त्या सर्वांचें भक्तिभावानें स्मरण केलें आणि हिंदुस्थानच्या राजकारणाची धुरा सतत तीस वर्षें मोठ्या कुशलतेनें वाहून लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना ज्यानें अचूक मार्गदर्शन केलें त्या म. गांधींना धन्यवाद दिले. भारतांतील सर्व अल्पसंख्याकांना भारतांत न्यायानें वागविण्यांत येईल—त्यांच्या बाबतींत कसल्याहि प्रकारचा पक्षपात करण्यांत येणार नाहीं असेंहि त्यांनीं घोषित केलें. या प्रसंगीं राष्ट्राला संदेश देतांना पं. जवाहरलाल म्हणाले, 'आजच्या या सोन्याच्या दिवशीं आपल्या मनांत पहिला विचार कोणाबद्दल येत असेल तर तो आपल्या राष्ट्रपित्याबद्दल. सर्व बाजूंनीं निराशेचा घोर अंधःकार पसरलेला असतांना त्यानेंच स्वातंत्र्याची ज्योत उजळत ठेवली. त्याचा अनुनय करतांना आपल्या हातून अनेकदां चुका झाल्या पण त्याचा संदेश आपल्याच नव्हे तर पुढील अनेक पिढ्यांच्या अंतःकरणांत कायमचा अधिष्ठित होऊन राहील. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं ज्या ज्ञात व अज्ञात स्त्रीपुरुषांनीं त्याग केला त्यांचें या प्रसंगीं स्मरण होणें अपरिहार्यच आहे. आपल्यापुढें कामांचा पर्वत उभा आहे. आपल्या प्रिय मातृभूमीला वंदन करून, आपण एकदिलानें कामाला लागूं या. जय हिंद.'

भारताचा कोपरा न् कोपरा या स्वातंत्र्यमहोत्सवांत न्हाऊन निघाला होता. भारताला हें स्वातंत्र्य मिळवून देण्यांत ज्या व्यक्तीला इतर कोणाहि व्यक्तीपेक्षां अधिक श्रेय होतें ती मात्र या साऱ्या सोहळ्यापासून सर्वस्वी अलिप्त राहिली होती.

पूर्व बंगालमध्यें हिंदुमुसलमानांची शांतता प्रस्थापित करून ९ सप्टेंबर रोजीं गांधीजी दिल्लीला आले. तोंच त्या शहरांत दंगा उसळला असल्याचें वृत्त त्यांच्या कानीं आलें. तेव्हां गांधीजी म्हणाले, 'मी दिल्लीला आल्यावर माझ्यापुढें हें ताट वाढून ठेवलेलें असेल अशी मला कल्पनाहि नव्हती. दिल्लीमध्यें पूर्ण शांतता प्रस्थापित केल्याशिवाय मी पंजाबला जाऊं शकत नाहीं हें उघड आहे. दिल्लींत सुद्धां करीन किंवा मरेन या तत्त्वाचाच अवलंब करणें मला भाग आहे. पश्चिम पंजाबमधून जे निर्वासित दिल्लीला आले आहेत त्यांच्या जिवाचा संताप उडालेला असणें साहजिक आहे. पण क्रोध हा वेडाचाच एक छोटासा प्रकार आहे. क्रोधाच्या आहारीं गेल्यानें सर्व दृष्टींनीं माणसांचें नुकसानच होत असतें. जशास तसें वागणें हा मुळीं खरा उपायच नव्हे. त्यामुळें मूळचा रोग अधिकच बळावतो.' त्यानंतर पांचसहा दिवसांनीं ते म्हणाले, 'स्वातंत्र्याच्या वृक्षाला हेंच फळ का यायचें होतें? दिल्लीच्या नागरिकांना वेड तर लागलेलें नाहीं ना? त्यांच्यामध्यें मानवतेचा लेशहि उरलेला नाहीं कीं काय? येथील हिंदूंना आणि शिखांना दोष देणें मला भागच आहे. द्वेषाची ही लाट थोपवून धरण्याइतका मर्दपणा त्यांच्यांत उरलेला नाहीं काय? दिल्लीच्या नागरिकांच्या या अशा वागणुकीमुळें पाकिस्तान सरकारकडे न्यायाची मागणी करणें कठीण जाणार आहे. ज्यांनीं न्यायाची मागणी करावयाची त्यांची स्वतःची वर्तणूक न्यायाची असणें जरूर असतें. त्यांचे हात स्वच्छ असावे लागतात. जर प्रत्येक मनुष्य आपल्या हातांत कायदा घेऊं लागला तर सरकार म्हणून कांहीं शिल्लकच उरणार नाहीं आणि सर्वत्र अंदाधुंदी माजेल. या मार्गानें स्वातंत्र्याचा निःसंशय नाश होईल. निर्वासितांनीं आपल्या क्रोधाला लगाम घालावा आणि सरकारवर संपूर्ण भरंवसा टाकावा. त्यांनीं सरकारला त्याचें कर्तव्य करण्यास पुरेशी सवड दिली तर माझी पक्की खात्री आहे कीं, प्रत्येक हिंदु

व शीख निर्वासिताला आपापल्या घरीं सन्मानानें परत जाण्याची संधि मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. या निर्वासितांना पाकिस्तानांत अनन्वित हाल सहन करावे लागले याची मला पूर्ण जाणीव आहे. जर ते संयम राखतील आणि क्रोधाच्या आहारीं जाऊन आपल्या बुद्धीशीं फारकत करून घेणार नाहींत तर त्यांचें झालेलें सर्व नुकसान भरून मिळाल्या-शिवाय रहाणार नाहीं. आपल्या मुसलमान बंधुभगिनींची भारतांतून हकाल-पट्टी करण्यांत आली पाहिजे असेंच त्यांना वाटत असेल तर मात्र आपली नुकसानभरपाई होण्याची त्यांनीं आशाच करूं नये. पाकिस्तानांत हिंदू-वर व शिखांवर जितके अत्याचार झाले तितकेच अत्याचार पूर्व पंजाब-मधील मुसलमानांवरहि झाले, हें खरें नाहीं काय? कोणी किती अत्याचार केले हें समजायला आपल्याला मार्ग नसला तरी दोघांनींहि भरपूर अत्याचार केले हें निःसंशय खरें आहे.'

ता. २० रोजीं ते म्हणाले, 'पश्चिम पंजाबांतून दिल्लींत आलेल्या निर्वासितांची आज काय परिस्थिति आहे? अशा पावसांत त्यांचे किती हाल होत असतील? त्यांना ना घर, ना पुरेसा आधार! कोणाच्या पापाचें प्रायश्चित्त त्यांना भोगावें लागत आहे? पश्चिम पंजाबांतून पूर्व पंजाबांत येऊं पहाणाऱ्या हिंदु व शिखांची रांग म्हणे सत्तावन मैल लांब लागली आहे! ही नुसती कल्पना मनांत आणली तरी डोकें गरगरूं लागतें. असल्या प्रकारचें केविलवाणें व भीषण दृश्य जगाच्या इतिहासांत आजपर्यंत दिसलें नसेल! हिंदुस्थानांतून मुसल-मानांची व पाकिस्तानांतून हिंदूंची व शिखांची हकालपट्टी करण्याच्या मार्गाचें अवलंबन केल्यास हिंदुस्थान व पाकिस्तान या देशांचा व हिंदु आणि मुसलमान या धर्मांचा विनाशकाळ ओढवल्याशिवाय रहाणार नाहीं.'

दुसऱ्या दिवशीं ते म्हणाले, 'पाकिस्तानच्या गैरवागणुकीकडे हिंदु-स्थान सरकारनें डोळेझांक करावी असें मी कधींहि म्हटलेलें नाहीं.

पाकिस्तानांतील हिंदूंच्या व शिखांच्या सुरक्षिततेबद्दल हिंदुस्थान सरकारनें सावधान राहिलेंच पाहिजे. पण त्यासाठीं हिंदुस्थान सरकारचे हात आपण बळकट केले पाहिजेत. कायद्याचा वडगा आपल्या हातांत घेण्यानें आपण तसें करूं शकणार नाहीं. जर दोन्ही पक्ष अधर्मानेंच वागायला लागले तर कोणी कोणाला दोष द्यायचा? कोणी किती अधर्म केला किंवा पहिल्यानें कोणी अधर्म केला, याला फारसें महत्त्व नसतें.'

अशा रीतीनें निर्वासितांची समजूत घालण्याचें व त्यांची शक्य तितकी चांगली व्यवस्था व्हावी असा प्रयत्न करण्याचें गांधीजींचें काम अव्याहत चालू होतें. ता. २४ नोव्हेंबर रोजीं गांधीजींचें लेखी भाषण वाचून दाखविण्यांत आलें. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें, 'दिल्लीच्या मध्यवस्तींत कालच घडलेली गोष्ट पहा. कांहीं हिंदू व शीख मुसलमानांनीं खाली केलेल्या एका इमारतीशीं गेले व बेकायदेशीर रीतीनें तिचा ताबा घेऊं लागले. अर्थातच त्यांना तसें करूं देण्यांत आलें नाहीं. त्यांतील कांहीं लोकांना किरकोळ स्वरूपाच्या जखमाहि झाल्या. पण या घटनेच्या पराचा कावळा करण्यांत आला. पहिली बातमी अशी आली कीं तेथें चार शिखांचे मुडदे पडले. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. सुरामारीला सुरुवात झाली. शीख लोक आपल्या कृपाणाऐवजीं नंग्या तरवारी घेऊन मुसलमानांच्या इमारतींत घुसतात आणि इमारत खाली करायला सांगतात. याबद्दल सरकारनेंच नव्हे तर जनतेनेंहि विचार केला पाहिजे. जनतेचा पाठिंबा नसेल तर सरकार तरी काय करूं शकणार?

पाकिस्तानांत घडलेल्या अत्याचारांचा पाढा वाचण्याचा मला कोणी आग्रह करूं नये. कारण त्यामुळें कोणाचाच फायदा होण्यासारखा नाहीं. त्याच्या हातून घडलेल्या पातकांचा भार पाकिस्तानला सहन

करावाच लागेल. माझ्या मताला जर कांहीं किंमत असलीच तर मी असें स्पष्टपणें सांगतों कीं, १५ ऑगस्टच्याहि कितीतरी पूर्वीं मुस्लिम लीगनें या राक्षसी पर्वाला सुरुवात केली. १५ ऑगस्टनंतरहि त्या संस्थेनें आपल्या धोरणांत कांहीं फरक केला असें मला वाटत नाहीं. पण या माझ्या मतानें तुमचा काय फायदा होणार आहे? आज मुख्य मुद्दा हा आहे कीं, आपण पाकिस्तानचें अनुकरण केलें आणि त्याच्याइतकेच स्वतःहि पातकी बनलों. पापाचा पापाला छेद गेला. अजून तरी आपल्या हातून घडलेल्या पातकाबद्दल पश्चात्ताप करून आपण सावध होणार कीं अशीच आपली अधोगति करून घेणार?'

ता. २७ रोजीं ते म्हणाले, 'मनुष्यानें आपल्या प्राणाइतकेंच मृत्यूवरहि प्रेम करायला शिकलें पाहिजे. हें फार कठीण आहे असें कोणी म्हणेल. पण कोणतीहि चांगली गोष्ट करणें हें नेहमींच कठीण असतें. चढण चढतांना नेहमींच त्रास पडत असतो. उतारावरून जाणें नेहमींच सोपें असतें आणि त्यांत सपशेल आदळण्याची नेहमींच भीति असते. मृत्यूला आपला शत्रु न मानतां मित्र मानल्यानेंच आपलें जीवन सुसह्य होऊं शकतें. आपला मृत्यु चुकविण्यासाठीं नामर्द मनुष्य आपला स्वाभिमान, आपली पत्नी, आपली कन्या या सर्वांचाहि बळी देण्यास तयार होत असतो. पण खरा मर्द असेल तो स्वाभिमानाचा बळी देण्यापेक्षां हंसतमुखानें मृत्यूला कवटाळायला तयार होत असतो.'

# २७

सरकारनें साखर, अन्नधान्य वगैरेंवर नियंत्रणें घातलीं होतीं. त्यांतील बरींचशीं नियंत्रणें काढून घेण्यांत आल्यावर गांधीजींनीं असे विचार प्रकट केले कीं 'साखरेवरील नियंत्रण काढून टाकण्यांत आलें असून धान्यें व कापड यांच्यावरील नियंत्रणहि लवकरच काढून टाकण्यांत येणार आहे. वस्तूंच्या किंमती खालीं याव्यात म्हणून नव्हे तर जनतेला आपलें जीवन नैसर्गिकपणें जगतां यावें म्हणून तीं उठविण्यांत येत आहेत. मुद्दाम घालण्यांत येणारीं नियंत्रणें केव्हांहि अनिष्टच. नियंत्रणें उठल्यानंतर सगळे लोक सुटकेचा निःश्वास टाकतील. त्यानंतर लोकांच्या हातून कांहीं चुका होतील पण त्या झाल्या तरी हरकत नाहीं. चुका करून त्या सुधारीत गेल्यानेंच खरी प्रगति होत असते. निर्नियंत्रण याचा अर्थ असा कीं, भवितव्याचा विचार करण्याचें काम आतां सरकारवर राहिलें नसून तें जनतेवर येऊन पडलें आहे. शेतकरी आपल्या वस्तू आतां खुल्या बाजारांत आणूं शकत असल्यामुळें त्याला चार पैसे अधिक मिळतील व जनतेनेंहि ते त्याला स्वखुषीनें द्यावे. त्या वस्तूंच्या मोबदल्यांत सरकारी किंमतीपेक्षां गिऱ्हाईकांकडून जो अधिक पैसा मिळतो तो सर्व शेतकऱ्याच्याच खिशांत पडला पाहिजे. मला अर्थशास्त्रांतील शास्त्रीय दृष्टि नाहीं हें खरें असलें तरी नियंत्रणें उठावींत या माझ्या सल्ल्यामुळें जनतेचें अजून तरी नुकसान झालेलें नाहीं हें खरें. मध्यस्थांनीं जर स्वार्थी कुशलता न करतां राष्ट्रहिताची दृष्टि ठेवली तर नियंत्रणें उठल्यामुळें अखिल जनतेचा फायदा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. व्यापारीवर्ग राष्ट्रहिताकडे न बघतां फक्त स्वार्था-

कडेच पहात बसेल अशा शंकेमुळेंच नियंत्रणें उठवूं नयेत असें कांहीं लोकांचें म्हणणें होतें. अशा लोकांना शेतकऱ्यांचा व व्यापाऱ्यांचा विश्वास वाटत नव्हता. देशांतील बहुजनसमाज जर स्वार्थी आणि विश्वास ठेवायला नालायक असेल तर त्या देशांत लोकशाही किंवा पंचायत राज्य चालणार तरी कसें?'

ता. २५ डिसेंबर रोजीं आपल्या प्रार्थनासभेंत ते म्हणाले, 'काश्मीर-वर कांहीं लुटारू टोळ्यांनीं हल्ला केला असें पहिल्यानें सगळ्यांना वाटत होतें. पण या हल्ल्यामागें पाकिस्तानचा हात होता' असें कालांतरानें उघडकीस आलें. आतां तर जिहादसाठीं साऱ्या मुसलमानांना उघड आवाहन करण्यांत येत आहे. मुसलमानेतरांवर शिव्यांची सतत आग पाखडली जात आहे. काश्मीरची फाळणी करण्यांत यावी असें कांहीं लोक सुचवितात. हिंदुस्थानच्या फाळणीला कॉंग्रेसनें व मुस्लिम लीगनें मान्यता दिली म्हणून सर्वच संस्थानांची तशी फाळणी करीत बसायचें कीं काय? काश्मीर जनतेनें तशी मागणी केल्यावरूनच हिंदुस्थान सरकारनें त्यांच्या मदतीसाठीं आपलें लष्कर पाठविलें.

आपण जगाच्या पाठीवरील सर्वांत मोठें इस्लामी राष्ट्र आहों याचा पाकिस्तानला अभिमान वाटत आहे. पण त्यानें आपल्या हद्दींतील प्रत्येक हिंदूला व शिखाला न्याय मिळवून दिला नाहीं तोंपर्यंत या अभिमानाला किंमत काय?'

ता. २८ रोजीं ते म्हणाले, 'बरींचशीं नियंत्रणें उठविण्यांत आलीं म्हणून अनेक लोकांकडून मला अभिनंदनपर तारा व पत्रें येत आहेत. पण मी माझ्या मुखानें जनतेचेच विचार बोलून दाखवीत असल्यामुळें या बाबतींत माझें अभिनन्दन करणें अप्रस्तुत आहे. सर्व वस्तूंचे भाव दिवसें-दिवस खालीं जात आहेत. कापडावरील नियंत्रण अजून कायम असलें तरी कापडाच्या लहानसान वस्तूंच्या किंमती एव्हांपासूनच उतरूं

लागल्या आहेत. काळ्या बाजारांतील माल आतां खुल्या बाजारांत येऊं लागला असून तो लोकांना आतां योग्य किंमतीला मिळूं लागलेला आहे. नियंत्रणें उठलीं तीं कांहीं माझ्या शब्दांच्या प्रभावामुळें नव्हत. माझ्या शब्दांत एवढा प्रभाव असता तर हीं जातीय भांडणें केव्हांच थांबलीं असतीं. जातीयवादाचा विषय निघाला कीं, लोक मला स्वप्नसृष्टींत वावरणारा एक मूर्ख मनुष्य असें मानूं लागतात. पण लोक चूक आहेत आणि मी बरोबर आहें अशी माझ्या दिलाची पक्की खात्री आहे. भूतकाळांतील अनेक प्रसंगीं, मला व्यवहारज्ञान आहे आणि माझी सल्ला अचूक असते असा अनुभव आलेला असतांना आजच्या या आणीबाणीच्या प्रसंगीं माझ्या कपाळावर अव्यवहार्यतेचा छाप कां मारण्यांत येत आहे? दया आणि क्षमा हें धर्माचें सार असल्याचा तुळशीदासानें निर्वाळा दिलेला आहे. मी तरी लोकांना याहून निराळें तें काय सांगत असतों?'

ता. २ जानेवारीच्या आपल्या भाषणांत ते म्हणाले, 'हिंदुस्थानांतील बहुतेक मुसलमान देशद्रोही असल्यामुळें त्यांना इथून घालवून लावावें असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. गेल्या आठवड्यांत लखनौ येथें मुसलमानाची एक प्रचण्ड परिषद भरली होती. सदर परिषदेंत एक लाख मुसलमान उपस्थित होते. त्यांनीं एकमुखानें देशनिष्ठेची घोषणा केलेली आहे. एखादा मनुष्य देशद्रोही असल्याचें सिद्ध झाल्यावर त्याला कितीहि भयंकर शिक्षा करायला हरकत नाहीं. पण कोणत्याहि आधाराशिवाय कोणावर तरी तसा संशय घेणें हें अज्ञानाचें आणि नामर्दपणाचें द्योतक आहे. या असल्या शंकेखोर वृत्तीमुळेंच अलीकडचा हा अमानुष रक्तपात घडून आला आहे.'

'हरिजन' च्या एका अंकांत त्यांनीं लिहिलें होतें, 'हरिजन इंग्रजी भाषेंत काढण्याची माझी प्रथा मी यापुढेंहि चालू ठेवणार आहें. इंग्रज

व इतर पाश्चात्य यांच्याशीं मी पूर्वींहि कधीं वैर केलेलें नाहीं व आजहि करीत नाहीं. माझ्या देशबांधवांचें कल्याण व्हावें असें मला वाटतें तितकेंच त्यांचेंहि कल्याण व्हावें असें मला वाटत असतें. तेव्हां माझ्याजवळ जी ज्ञानाची अगदीं लहानशी पुंजी आहे तिच्यांतून मी इंग्रजी भाषेला कमी करूं शकत नाहीं. इंग्रजी भाषा विसरून जाण्याची माझी इच्छा नाहीं व इतर हिंदी लोकांनींहि ती विसरण्याचा प्रयत्न करावा असें मला वाटत नाहीं. मात्र तिला तिच्या वाजवी स्थानापेक्षां अवास्तव स्थान देण्यांत येऊं नये असें मी नेहमींच सांगत आलों आहें. इंग्रजी ही हिंदुस्थानची राष्ट्रभाषा होऊं शकणार नाहीं किंवा ती आपल्या शिक्षणाचें माध्यमहि होऊं शकणार नाहीं. तिला आपण आपल्या शिक्षणाचें माध्यम बनवून आपल्या भाषांच्या मानेला नख लावलें आहे आणि त्यामुळें आपल्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीवर विलक्षण ताण पडला आहे. आपण इंग्रजीची गुलामगिरी पत्करल्यामुळें आज अनेक वर्षें आपल्या कोट्यवधि देशबांधवांना शिक्षणाचा लाभ करून घेतां आलेला नाहीं. मला वाईट वाटतें तें हें कीं, हें आपल्याला उमजत नाहीं, याची आपणाला थोडीसुद्धां लाज वाटत नाहीं, आपल्याला याबद्दल जरासुद्धां पश्चात्ताप होत नाहीं. हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा आहे तशीच इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. तिचें आंतरराष्ट्रीय महत्त्व नाकबूल करून चालणार नाहीं. इंग्रजी साम्राज्यसत्ता नष्ट होण्याच्या लायकीची होती आणि ती झालीहि. इंग्रजी भाषेचें तसें नाहीं.'

हरिजनच्या दुसऱ्या एका लेखांत त्यांनीं म्हटलें होतें, 'आपल्याला आतां स्वातंत्र्य मिळालेलें असूनहि कांहीं लोकांच्या मनावरील गुलामगिरीची छाप अजून गेलेली दिसत नाहीं. नियंत्रणें दूर झाल्यामुळें जनतेचा तोटाच होईल अशी या लोकांना भीति वाटते. जर

आपल्या समाजांत जळवांचा सुळसुळाट झालेला असेल आणि त्यांचा उपद्रव नाहींसा कसा करावा हें आपल्याला समजत नसेल तर आपलें रक्त शोषलें जाण्याच्याच लायकीचे आपण आहोंत असें सिद्ध होईल. अशा रीतीनें आपलें रक्त शोषलें जाऊं लागलें म्हणजे संकटांना तोंड कसें द्यावें हें आपल्याला समजूं लागेल. खरी लोकशाही पुस्तकांवरून किंवा सरकारकडून शिकतां येत नाहीं. अशा प्रकारचा अनुभवच लोकशाहीचे योग्य पाठ देऊं शकतो. मला कौल लावण्याचे दिवस आतां भूतकाळांत जमा झालेले आहेत. हिंदुस्थानावर इंग्रजांची सत्ता असतांना अहिंसेचा बुरखा आपण पांघरला होता. आतां त्या बुरख्याची जरुरी राहिलेली नसल्यामुळें आपल्या मनांतील सुप्त हिंसा आतां उफाळून बाहेर पडलेली आहे. माझा आवाज एकाकी असला तरी नियंत्रणें घालूं नयेत असें जाहीरपणें म्हणण्यास मी कचरणार नाहीं.

हिंदुमुसलमानांच्या वादासंबंधानेंहि लोकांना जें जें कांहीं वाटत असेल तें तें त्यांनीं निःसंदिग्धपणें सांगितलें पाहिजे. मला जें वाटेल तें मीहि सांगत राहीन. अर्थात्, माझ्या सामर्थ्याची मला पुरेपूर जाणीव आहे. पूर्वीं एकदां सारें राज्य माझेंच होतें. आतां माझ्या-सारखे किती तरी राजे झाले आहेत. आज खरें सांगायचें तर मी सर्वांत लहान राजा आहें. लोकशाहीला नव्यानें प्रारंभ झाला असतांना अशाच प्रकारचे विसंवादी स्वर एकसारखे कानावर पडत असतात. ते ऐकून ऐकून कित्येकदां आपलें डोकें गरगरूंहि लागतें. जर लोकशाही जिवंत रहावयाची असेल तर अशा विसंवादी स्वरांच्या गोंधळांतच विसंवादी वाटणारा पण खरोखर मधुर असणारा स्वर उमटत रहाणें आवश्यक असतें. पाकिस्तानांतील मुसलमानांच्या पापकृत्यांना जर आळा घालावयाचा असेल तर हिंदुस्थानांतील हिंदूंच्या पापांचा पाढा जाहीरपणें वाचला जाणें भाग आहे. आपलें पाप आपण कबूल केलें

तर आपली चित्तशुद्धि होते आणि आपल्या मनाची उन्नतीहि होते. पाप छपविण्याचा प्रयत्न केल्यानें आपला अधःपात होत असल्यामुळें तसें कधींहि करतां कामा नये.'

ता. १२ रोजीं ते म्हणाले, 'उद्यांपासून मी उपोषण सुरू करीत आहें. समाजाच्या हातून घडत असलेल्या पातकांसाठीं, अहिंसेचें व्रत आचरणारा मनुष्य त्याचे सर्व उपाय थकल्यावर उपोषणाचा अवलंब करीतं असतो. माझें हें उपोषण अशांपैकींच आहे. आज दिल्लींत जी थोडीफार शांतता दिसत आहे ती खरी शांतता नसून पोलीस व लष्कर यांच्या भीतीनें निर्माण झालेली बनावट शांतता आहे. या शांततेचा बुडबुडा कोणत्या क्षणाला फुटेल याचा नेम सांगवत नाहीं. हिंदू, शीख व मुसलमान यांच्यांत मैत्री प्रस्थापित करण्यासाठीं माझें अंतःकरण अक्षरशः तीळतीळ तुटत आहे. कालपरवांपर्यंत या तिन्ही जमाती गुण्यागोविंदानें नांदत होत्या. पण आज त्या एकमेकींच्या पक्क्या शत्रू बनल्या आहेत. कोणाहि प्रामाणिक हिंदी देशभक्ताला ही परिस्थिति सहन होणार नाहीं. या परिस्थितीवर कोणता उपाय योजावा याचा गेले तीन दिवस मी सारखा विचार करतों आहें. आतां मी अखेरचा निर्णय घेतला आहे. ज्या मनुष्याचें मन शुद्ध आहे, त्याच्या-जवळ देण्यासाठीं स्वतःच्या प्राणांइतकें मौल्यवान कांहींच नसतें. हें माझें उपोषण बेमुदत चालणार आहे. या तिन्ही जमातींत दुसऱ्यांच्या सांगण्यामुळें नव्हे तर कर्तव्यबुद्धीनें स्नेहभावना निर्माण होईल तेव्हांच तें सुटणार आहे. हा निर्णय घेतांना मी कसलीहि फलाशा बाळगलेली नाहीं. मला उपवास केल्याशिवाय रहावतच नाहीं म्हणून तो मी करीत आहें. या तीन जमातींनीं चालविलेले राक्षसी अत्याचार उघड्या डोळ्यांनीं पहात बसण्यापेक्षां मला मरण आलेलें पुरवलें. माझ्या जीविताचीं सूत्रें परमेश्वराच्या हातीं आहेत.'

ता. १३ जानेवारी रोजीं गांधीजींच्या या उपोषणास सुरुवात झाली. ता. १३ रोजीं प्रार्थनेच्या वेळीं ते म्हणाले, 'मी माझ्या आयुष्यभर अल्पसंख्याकांच्या, गरजूंच्या वतीनेंच झगडत आलों आहें. पाकिस्तान-मुळें हिंदुस्थानांतील मुसलमान स्वाभिमानाला आणि आत्मविश्वासाला पारखे झाले आहेत. ज्या राष्ट्रांत असे आत्मविश्वासाला पारखे झालेले लोक नांदतात तें राष्ट्र दुबळें बनत असतें. हिंदूंनीं व शिखांनीं काय केलें पाहिजे हें मी आतांपर्यंत अनेकदां सांगितलें आहे तेंच पुन्हा एकदां सांगतों—आणि माझ्या अंगांत शब्दोच्चाराची ताकद आहे तोंपर्यंत सांगत राहीन—! पाकिस्तानांत काय वाटेल तें होवो, हिंदुस्थानांतील हिंदूंनीं व शिखांनीं हिंदुस्थानांतील एकाहि मुसलमानावर हात उगारतां कामा नये.'

दिल्लींतील एका सभेंत भाषण करतांना पं. जवाहरलाल म्हणाले, 'महात्मा गांधींना मृत्यु आला तर हिंदुस्थानचा आत्मा गमावला असेंच म्हणावें लागेल.'

पाकिस्तानचे निर्वासितमंत्री गझनफर अलीखान म्हणाले कीं, 'गांधीजींच्या या उपोषणानें हिंदुस्थानच्याच नव्हे तर पाकिस्तानच्याहि जनतेचे डोळे उघडले पाहिजेत. या दोन्ही देशांतील लोकांनीं आपल्या अपकृत्यांनीं आपल्या तोंडाला काजळ फांसून घेतलें आहे याची त्यांना आतां तरी जाणीव झाली पाहिजे.'

देशाच्या फाळणीच्या वेळीं हिंदुस्थाननें पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये द्यावयाचे असें ठरलें होतें. पण त्यानंतर या दोघांत काश्मीर-वरून तेढ उपस्थित झाल्यामुळें हिंदुस्थान सरकारनें ती रक्कम पाकिस्तानला दिली नव्हती. ता. १५ जानेवारी रोजीं रात्रीं गांधीजींच्या शांतताप्रस्थापनेच्या प्रयत्नाशीं सुसंगत अशी कृति करावयाची म्हणून ही रक्कम ताबडतोब पकिास्तानला देऊन टाकण्याचा हिंदुस्थान सरकारनें

निर्णय घेतला. तेव्हां गांधीजी म्हणाले, 'हिंदुस्थान सरकारनें केलेल्या या कृतीमुळें मी माझें उपोषण सोडावें असें कांहीं लोक म्हणतात. माझ्या डॉक्टर मित्रांना माझ्या प्रकृतीबद्दल आतां चिंता वाटूं लागली आहे. माझ्या मूत्रपिंडांत कांहीं दोष उत्पन्न झाला असून माझें उपोषण असेंच चालू राहिल्यास तो दोष अधिकाधिक वाढत जाईल असें त्यांचें म्हणणें आहे. पण मी माझें उपोषण परमेश्वरानें माझ्या मनांत उत्पन्न केलेल्या स्फूर्तीमुळें सुरू केलेलें आहे. परमेश्वराला जोंपर्यंत माझ्या हातून सेवा करून घेण्याची इच्छा असेल तोंपर्यंत तो मला जगविणारच. मला मृत्यूची भीति वाटत नाहीं किंवा हा विकार मला कायमचा जडून बसेल याचीहि मला पर्वा वाटत नाहीं. जर माझा या जगांत कांहीं उपयोग आहे असें जनतेला वाटत असेल तर तिनें आपलें कर्तव्य करावें.'

ता. १८ जानेवारी रोजीं कॉंग्रेस, हिंदुमहासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुस्लिम लीग, शिखांच्या संस्था, निर्वासित, वगैरे सर्वांनीं गांधीजींनीं मागितलेली लेखी हमी दिल्यावरून त्यांनीं आपलें उपोषण सोडलें. त्यानंतर ते म्हणाले, 'हिंदुस्थान हा हिंदूंचा देश आहे, त्यांत मुसलमानांनीं रहातां कामा नये असें आपण म्हणणें, आणि पाकिस्तान हा फक्त मुसलमानांचा देश आहे, त्यांत हिंदूंनीं रहातां कामा नये असें पाकिस्ताननें म्हणणें हें सर्वस्वीं चुकीचें आहे.'

त्या दिवशीं संध्याकाळीं गांधीजींनीं दिलेला पुढील संदेश वाचून दाखविण्यांत आला. 'सत्याच्या म्हणजे परमेश्वराच्या नांवानें मीं हें उपोषण सुरू केलें होतें. फक्त जिवंत सत्यांतच परमेश्वराचा वास असतो. गेले कांहीं दिवस आपण निरपराध स्त्रीपुरुषांची व बालकांची कत्तल करण्यांत चूर होऊन गेलों होतों. बायकामुलांना पळवून नेतांना किंवा सक्तीनें धर्मांतर करायला लावतांना आपणाला तिळमात्रहि

शरम वाटत नव्हती. हीं सर्व कृत्यें आपण सत्याच्या नांवानें केलीं असतील असें मला वाटत नाहीं. मी माझें हें उपोषण सत्याच्या नांवानें सोडलें आहे.'

ता. २० रोजीं बिर्ला भवनाच्या आवारांत गांधीजी प्रार्थनेला प्रारंभ करणार इतक्यांत कोणीतरी त्यांच्यावर बॉंब फेकला. ते बसले होते तेथून पन्नास यार्डांवर त्याचा स्फोट झाला पण कोणालाहि दुखापत वगैरे झाली नाहीं. या प्रकरणीं पश्चिम पंजाबांतून आलेल्या मदनलाल नांवाच्या निर्वासिताला अटक करण्यांत आली. या बॉंबस्फोटामुळें गांधीजी यत्किंचितहि विचलित झाले नाहींत. आपल्या भाषणांत ते म्हणाले, 'कांहीं लोकांनीं निष्कारण आपला गैरसमज करून घेतलेला आहे. सरदार, जवाहरलाल आणि मी यांच्यांत कांहींहि मतभेद नाहींत. आमच्यापैकीं कोणीहि मुसलमानांना आपले वैरी मानीत नाहीं. आम्ही तिघेहि मुसलमानांना आपले मित्रच मानतों. जनतेनें कायदा आपल्या हातीं घेऊन अनन्वित कृत्यें करण्यास प्रवृत्त होऊं नये. अशानें आपल्या समाजाचा नाश झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हिंदु व शीख निर्वासितांची योग्य प्रकारें व्यवस्था लावण्यासाठीं जवाहरलाल नेहरु आपल्या रक्ताचें अक्षरशः पाणी करीत आहेत. ते हिंदुस्थानचे मुख्य प्रधान असल्यामुळें त्यांच्या निवासस्थानांत अनेक हिंदी व परदेशस्थ पाहुण्यांची नेहमीं गर्दी उडालेली असते. असें असूनहि आपल्या निवासस्थानांतील कांहीं खोल्या त्यांनीं निर्वासितांसाठीं देऊं केल्या होत्या. दुःखांत असलेल्या कोणालाहि ते आपला बिछाना देतील व आपल्या अंगांतील ऊब टिकविण्यासाठीं ते रात्रभर फेऱ्या घालीत रहातील. एवढे थोर व स्वार्थत्यागी लोक हिंदुस्थानांत पैदा होत असतात याचा आपणां सर्वांना अभिमान वाटला पाहिजे.'

दुसऱ्या दिवशीं ते म्हणाले, 'कालचा बॉंब माझ्यावर फेकण्यांत आलेला

होता हें मला माहीत नव्हतें. तेव्हां काल मी विचलित झालों नाहीं म्हणून माझ्या धैर्याबद्दल कौतुक करणें अप्रस्तुत आहे. मला बॉंब लागून मी खालीं पडत असतांना माझ्या मुद्रेवरील स्मित जर कायम टिकूं शकलें आणि बॉंब फेकणाऱ्या माणसाबद्दल माझ्या मनांत कसल्याहि प्रकारचा कुविचार निर्माण झाला नाहीं तरच मी अशा प्रकारच्या प्रशस्तीपत्रास लायक ठरेन. काल ज्यानें बॉंब फेकला त्याचा आपण उपहास करतां कामा नये. मी हिंदुधर्माचा कट्टा दुश्मन आहें असें त्याला वाटत असावें. धर्माच्या गळ्याला नख लावणाऱ्या माणसाचा विनाश करण्यासाठीं परमेश्वर कोठल्या तरी माणसाची योजना करीत असतो ना ? पण त्या तरुणाला हें समजलें असतें तर बरें झालें असतें कीं, ज्यांच्याशीं त्याचा मतभेद असेल तीं सारीं माणसें वाईटच असलीं पाहिजेत असें नाहीं. आपण पूर्णावस्थेला पोहोंचलों आहोंत व दुर्जनांचा विनाश करण्याचें महत्कार्य करण्याची कामगिरी परमेश्वरानें आपणावर सोंपविली आहे अशा खोट्या घमेंडींत कोणीहि रहातां कामा नये.

कालच्या तरुणानें ज्या लोकांच्या पाठिंब्याच्या बळावर हें दुष्कृत्य केलें असेल त्या लोकांना माझी अशी प्रेमाची विनंती आहे कीं, त्यांनीं अशा आततायी कृत्यांपासून परावृत्त व्हावें. हिंदुधर्माचें संरक्षण करण्याचा हा खरा मार्ग नव्हे. हिंदुधर्माचें रक्षण करण्याचा मी आचरीत असलेला मार्ग हा एकच खरा मार्ग आहे.'

ता. २३ रोजीं गांधीजी म्हणाले, 'आज सुभाषबाबूंच्या जयंतीचा दिवस आहे. मी अहिंसेच्या तत्त्वाचा पुजारी आहें तर सुभाषबाबू हिंसेच्या तत्त्वावर निष्ठा ठेवणारे होते. पण सुभाषबाबूंच्या मनांत प्रांतीयतेला किंवा जातीयतेला यत्किंचितहि थारा नव्हता. सर्व धर्मांकडे जो योग्य आदरानें पाहूं शकतो तो हिंदु धर्म. माझ्या मतें सुभाषबाबू हे असे हिंदु होते.'

ता. २८ रोजीं गांधीजींना विचारण्यांत आलें, 'आपल्या आजच्या प्रार्थनेनंतरच्या सभेच्या वेळीं तुम्हांला कसले आवाज ऐकूं आले का?' गांधीजी म्हणाले, 'नाहीं. माझ्याबद्दलच्या काळजीमुळें तुम्ही मला असें विचारीत आहां कीं काय? जर एखाद्या माथेफिरूच्या गोळीनें मरण्याचें माझ्या प्राक्तनांत असेल तर त्याप्रमाणें मला हंसतमुखानें मेलेंच पाहिजे. त्या परिस्थितींतहि क्रोधाचा अंमल माझ्यावर चालतां कामा नये. परमेश्वर माझ्या ओंठांवर पाहिजे आणि अंतःकरणांतहि पाहिजे.'

ता. २९ च्या प्रार्थनासभेंत ते म्हणाले, 'आज दुपारीं एक गृहस्थ मला म्हणाले कीं, तुमच्यामुळें आमच्यावर ही आपत्ति ओढवलेली आहे. तुम्ही आतां हिमालयाचा मार्ग स्वीकाराल तर आमच्यावर फार उपकार होतील. मी त्यांना विचारलें, कोणाच्या सांगण्यामुळें मी हिमालयांत जावें? माझा हा प्रश्न ऐकून त्या गृहस्थाच्या बाजूला असणाऱ्या निर्वासितांना माझा राग आला आणि माझ्यावर ते शिव्यांचा वर्षाव करूं लागले. मी त्यांना विचारलें, तुमचें दुःख मला समजत नाहीं किंवा तुमच्या दुःखांत मी सहभागी नाहीं असें का तुम्हांला वाटतें? मी हें जें लोकसेवेचें व्रत पत्करलें आहे तें कोणाच्याहि सांगण्यावरून नव्हे; आणि म्हणून कोणाच्याहि सांगण्यावरून मला त्या व्रताचा त्याग करतां येत नाहीं. परमेश्वर मला दाखवील त्या मार्गानें मी जात असतों. त्याला माझें जें कांहीं करावयाचें असेल तें तो करील. त्याला तसें वाटलें तर तो मला मारूनहि टाकील. मला हिमालयांतली शांतता नको आहे. मला दुःखें सहन करून प्राप्त होणारी शांति हवी आहे.'

# १८

ता. ३० रोजीं गांधीजी नेहमींप्रमाणें पहांटे साडेतीन वाजतां उठले. प्रार्थना आटोपून ते कामाला बसले. नंतर थोडी झोंप घेऊन ते पुन्हा कामाला लागले. नंतर मालिश करून घेऊन त्यांनीं स्नान उरकलें. तेव्हां त्यांना थोडें बरें वाटलें. त्यानंतर नेहमींप्रमाणें बंगाली भाषेचा एक पाठ तयार केल्यावर साडेनऊ वाजतां त्यांनीं भोजन केलें.

त्यानंतर कांहीं लोकांना मुलाखती देऊन त्यांनीं आपणाला आलेलीं कांहीं महत्त्वाचीं पत्रें मागविलीं.

सायंकाळीं चार वाजतां सरदार पटेल गांधीजींच्या निवासस्थानीं आले. सरदार पटेल व जवाहरलाल नेहरु यांच्यांत अलीकडे कांहीं मतभेद निर्माण झाले असल्याची कुणकुण गांधीजींच्या कानावर आली होती व त्याबद्दल त्यांना अतिशय वाईट वाटत होतें. त्या दोघांची एकी कायम रहावी अशी त्यांची इच्छा होती. गांधीजींची सायंप्रार्थना आटोपल्यानंतर पं. जवाहरलाल व मौ. आझाद त्यांना भेटायला येणार होते. बरोबर पांच वाजतां आपली प्रार्थनेला जाण्याचीं वेळ झाली असल्याचें गांधीजींनीं सरदारांना सांगितलें. पांच वाजून दहा मिनिटांनीं ते खोलींतून बाहेर पडले व आपल्या प्रार्थनेच्या जागीं जाण्यास निघाले. ते आपल्या नातींच्या खांद्यांवर हात ठेवून चालले होते. प्रार्थनासभेला जमलेल्या श्रोतृवर्गाच्या बाहेरच्या सांखळींतून आंत शिरतांना लोकांना नमस्कार करण्यासाठीं आपले हात मोकळे असावेत म्हणून त्यांनीं आपल्या नातींच्या खांद्यांवरून ते काढून घेतले. इतक्यांत नथूराम विनायक गोडसे या नांवाचा एक हिंदु तरुण कोपरखळ्या मारून

आपला मार्ग काढीत गर्दीतून पुढें आला. सदर तरुण गांधीजींच्या पायां पडण्यासाठीं पुढें घुसत असावा अशा कल्पनेनें गांधीजींच्या एका नातीनें त्याचें निवारण करण्यासाठीं त्याचा हात पकडला. त्यानें तिच्या हाताला हिसडा मारून आपला हात सोडवून घेतला. नंतर तो तरुण गांधीजींच्या अगदीं समोर जाऊन उभा राहिला आणि त्यानें त्यांच्यावर आपल्या हातांतील पिस्तुलाच्या तीन गोळ्या झाडल्या. पहिली गोळी लागल्याबरोबरच पुढें जाण्यासाठीं गांधीजींनीं उचललेलें पाऊल थबकलें. नमस्कारासाठीं उचललेले त्यांचे हात खालीं आले. अजूनहि ते आपल्या पायांवर उभे होते. तोंच दुसरी गोळी लागली. 'हे राम'—असे शब्द त्यांच्या मुखांतून बाहेर पडले आणि ते खालीं पडले !

महात्म्याचा आत्मा अनंतांत विलीन झाला !!!

हे राम ! हे राम !! हे राम !!!

दा. क. 6092

REFBK-0008912